MATERIALS
FOR THE
HISTORY OF THE MARATHAS

RAJWADE

VOL. 5

B. B. R. A. S.

ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें प्रकरण.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड ५ वा.

पत्रें यादी वगैरे.

इ० स० १७२५ जून—आक्टोबर.

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

यांनीं शोधिलीं

तीं,

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए.

संपादक यांनीं

कोल्हापूर ' श्रीसमर्थप्रसाद ' छा० छा०.

एप्रिल १९०२.

किंमत २ रुपये.

श्री.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

उपोद्घात.

खंड ५ वा.

ह्या खंडांत माधवराव नारायण पंत प्रधान यांचे हैदराबाद् येथील वकील गोविंदराव कृष्ण काळे यांचीं नाना फडणीसांस व पंत प्रधानांस आलेलीं पत्रें छापावयाचीं आहेत. गोविंदराव कृष्ण काळे यांचे वंशज श्रीमंत रा. रा. बापूसाहेब काळे, बी. ए., एल्एल्. बी. यांनीं आपल्या बारामती येथील दफ्तरांतील सुमारें दहा बारा हजार पत्रें माझ्या स्वाधीन केलीं. हीं पत्रें १७८६ पासून १७९८ पर्यंतच्या अवधींतील बहुतेक आहेत. नाना फडणीसांस व पंत प्रधानांस पाठविलेल्या पत्रांचे जावक गोविंदराव कृष्ण यांनीं सेक्शन बांयडिंगनें बांधून, सुरेख, वळणदार व टपोऱ्या अक्षरांनीं लिहून, फार सुरक्षित असे आपल्या दफ्तरखान्यांत ठेविलें होतें. गोविंदराव कृष्ण यांच्या मृत्यूनंतर ८० वर्षेपर्यंत हीं जावकें अंधारांत लोळत पडून सुमारें दोन वर्षांपूर्वी श्रीमंत बापूसाहेब यांच्या हस्तें त्यांची झाडपूस झाली. उंदीर, पाऊस, घुशी, वाळवी, कोळी, वारा आणि आळशी व अज्ञ कारकून ह्यांच्या तडाक्याखालीं ह्या जावक पत्रांच्या पुस्तकांच्या निवळ भाकरी बनून गेल्या होत्या कित्येक जावकें आरपार पोखरून गेलीं होतीं; व कित्येकांना तर मिसर देशांतील ममीप्रमाणें भुगा होऊन गेला होता. ह्या शेवटल्या दोहोंची सुधारण्याची आशाच सोडावी लागली. आरपार पोखरून हैराण झालेलीं पुस्तकें थंड पाण्याच्या घड्यांच्या नाजूक उपचारानें पुन्हां थोडीं बहुत वाचूं लागलीं. व पहिल्या वर्गांतील भाकऱ्यांतील निवडक [illegible] चाकाऱ्यानें सुरून काढल्यावर, आंतील पत्रें पुनः [illegible] अशा मोठ्या दुर्धर प्रसंगांतून हीं पत्रें [illegible] आहेत. त्या

कदीम, रियासतींतील हीं अवशेषें आहेत. त्यांचा सत्कार महाराष्ट्रांतील इतिहासज्ञ अत्यंत आदरानें करतील अशी खात्री आहे.

प्रस्तुत पत्रांचा सत्कार करण्याचें काम महाराष्ट्रांतील इतिहासज्ञांवर सोंपविल्यामुळें, इतर जनांचा कचित् रोष होण्याचा संभव आहे. परंतु वास्तविक प्रकार जो आहे तो बोलून दाखविला पाहिजे. इतिहास व चरित्रें लिहिण्याची ज्यांची इच्छा आहे, इतिहासशास्त्राचा ज्यांनीं अभ्यास केला आहे, जे ह्या विषयांत अधिकारी झालेले आहेत, त्यांच्याखेरीज इतरांना ह्या पत्रांच्या वाचनापासून काडीचाही उपयोग नाहीं. स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन कित्येक लोक हीं पत्रें वाचतात ही आनंदाची गोष्ट आहे; परंतु इतिहासाची रचना करण्याच्या हेतूनें किंवा त्यांतील मर्म समजून घेण्याच्या इच्छेनें जे कोणी थोडे लोक मध्या प्रोत्साहित झाले आहेत किंवा पुढें होतील, त्यांच्याकरितां विशेषतः हा प्रयत्न आहे. नवी नवी चीज आहे तोंपर्यंत इतिहासेतर लोक ह्या पत्रांचें कौतुक करतील; परंतु त्यांचें हें आगंतुक प्रेम लवकरच थिजून जाईल असा मला संशय येतो. इतिहासाच्या वाचनानें स्वदेशप्रीति उत्पन्न होते, ह्या आशेनें कित्येक उतावीळ वाचक ह्या पत्रांचें सेवन करतील; परंतु त्यांच्या ह्या खोट्या आशेवर माझी बिलकूल भिस्त नाहीं. खातीनें हेहि लोक मला लवकरच सोडून जातील. ज्यांच्या वाचनानें स्वदेशप्रीति उत्पन्न होते, ज्यांच्या निदिध्यासानें राष्ट्रांचा उद्धार होतो, तीं हीं पत्रें नसून, ह्या पत्रांपासून उत्पन्न झालेला जो इतिहास तो होय. इतिहासापासून मिळणारें फळ ऐतिहासिक पत्रांपासून कदापि मिळणार नाहीं. सारांश हे दोन्ही प्रकारचे लोक माझ्या ह्या प्रयत्नाला लवकरच कंटाळतील. सध्यां कोठें चार गंडें छापून झालीं आहेत नाहींत तोंच अशा प्रकारचा ध्वनि कचित् कोठून कोठून ऐकूं येतो. मला तर अद्याप शंभर दीडशें खंडें छापावयाचीं आहेत. तेव्हां शेवटपर्यंत नेट धरणारा, स्तुतिनिंदेला न जुमानणारा, लोकांच्या औदासिन्याला भीक न घालणारा, लोकानुनयानें दूषित न होणारा, असा वाचकसमूह जमेल तेव्हांच

चून तरणोपाय नाहीं. इतिहासज्ञांच्या समानशील समाजाव्यतिरिक्त असा वाचकसमूह इतरत्र कोठें मिळणार आहे? इतरत्र कोठेंही मिळणार नाहीं अशी पक्की खात्री होऊन, ह्या पत्रांचा सत्कार करण्याची विनंति महाराष्ट्रांतील इतिहासज्ञांस मी करीत आहें. श्रीमंत, गरीब, परीक्षित, अपरीक्षित, नोकर, स्वतंत्र अशा सर्व समाजांत इतिहासाच्या साधनांचा संग्रह करणारे थोडे थोडे लोक आहेत, त्यांच्या जोरावर हें काम चालावयाचें आहे. त्यांनीं जर ह्या प्रयत्नाचें अगत्य धरिलें नाहीं, तर हीं पत्रें सांपडलीं आणि न सांपडलीं सारखींच आहेत.

शिवाय महाराष्ट्रांतील इतिहासजिज्ञासूंनाच संबोधण्याचें एक विशेष कारण आहे. इतर देशाप्रमाणें आपल्या ह्या महाराष्ट्राची स्थिति नाहीं. कलकत्ता, मद्रास, मुंबई येथील १७ व्या व १८ व्या शतकांतील इंग्रेजी चिटणिशी दफ्तरांतील राजकारणी पत्रें छापण्यास प्रो. फारेस्टसारख्यांस इंग्रज सरकार पगार व खर्च देतें. वाशिंग्टन, वेलिंग्टन, नेपोलियन, फ्रेडरिक वगैरे पुरुषांचे पत्रव्यवहार शोधण्यास, निवडण्यास व छापण्यास त्या त्या देशांतील सरकारें केवळ उत्सुक असतात. आपल्या ह्या देशांतील प्रकार मात्र अगदीं वेगळा आहे. मराठी दफ्तरें छापण्याचा खर्च देण्यास सार्वभौम किंवा मांडलिक सरकारें सध्यांच कोणी तयार होतील असा अद्याप तरी रंग दिसत नाहीं. तेव्हां हें काम आपलें आपणच केलें पाहिजे.

प्रस्तुत खंडांत खर्ड्याच्या लढाईनंतर मराठे व निजाम ह्यांच्यामध्यें तहप्रकरणीं जीं बोलणींचालणीं झालीं त्यांचा वृत्तांत आहे. नाना फडणीसाच्या कारकीर्दीत परदरबारीं मराठ्यांचे वकील केवढ्या इभ्रतीनें, डौलदारीनें व तालेदारीनें बोलणें करीत असत, ह्याचा मासला ह्या पत्रांत उत्तम पहावयास मिळतो. प्रस्तुत खंडांत छापिलेलीं पत्रें नाना फडणीसाच्या मेणवली येथील दफ्तरांत असलेल्या अस्सल पत्रांच्या नकला आहेत. अशीं हीं पत्रें मजजवळ सुमारें दहाबारा हजार आहेत. अर्थात् मेणवली येथील दफ्तराचा एक तृतीयांश काळे यांचें दफ्तर छापलें म्हणजे छापल्यासारखाच आहे.

मुखपृष्ठ.

सरकार श्रीमंत राजश्री माधवराव नारायण पंत प्रधान. सुरु सीत तिसैन मया व अलफ, छ १७ जिल्काद, ज्येष्ठ वद्य तृतीया, शुक्रवार, शके १७१७, राक्षस नाम संवत्सरे, पुरू मृगसाल तागाईत छ १६ माहे रबिलाखर, आश्विन वद्य तृतीया, शुक्रवार, सन फसली १२०५ मुक्काम भागानगर. येथून पुढें पत्रें लिहिणें बंद झालियाची सबब अखेरीचे पानावर असे.

[१] श्री. १६ जून १७९९.

छ २८ जिलकाद, मुक्काम भागा-
नगर रवाना टप्यावर मंगळवार.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २८ जिलकादपर्यंत मुक्काम हैदराबाद येथें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. नबाबाचे दरबारास गेलों, बोलणें झालें, नंतर नबाब वेगळे मीर अल्लम व राजे रेणुराव बोलले, नंतर एक दोन वेळ रेणूराव माझे येथें आले होते, इत्यादिक अलाहिदा पुरवणी पत्रांत मजकूर लिहिला आहे, त्याजवरून ध्यानांत येईल. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[२] श्री. १६ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. पूर्वी नबाबाकडे जाणें झालें, त्यावेळेस नबाब बोलिले कीं, मुलूख वगैरे कांहीं बोलूं नये असा मशरुल महाम यांचा शफतपूर्वक कोणा एकाशीं करार असतां ही गोष्ट कशी झाली? याचा जबाब राजे रेणूराव व मीरअल्लम व रत्नोत्तमराव जवळ असतां दिला; परंतु कोणी याजवर उत्तर न दिलें. हा मजकूर पेशजी तपशीलवार सेवेसी लिहिलाच आहे. नंतर वर्तमान ऐकिलें कीं, नबाबांनीं त्रिवर्गास एकांतीं पुसिलें कीं, गोविंदराव कृष्ण यांचे तर ह्मणण्यांत कीं, लढाईची शर्त मध्यें होती आणि मी बोलतच होतों, परंतु तसें न घडलें. तेव्हां तें काय मंजूर? तुमचे तर सागण्यांत कीं, लढाई झाली तरी मुलूख मागणार नाहीं, यास आणि त्याचे बोलण्यास कांहींच मिळत नाहीं. याचें उत्तर त्रिवर्गांनीं केलें कीं, आह्मांशीं आणि मशरुल महाम यांशीं गोविंदराव भगवंत यांचे विद्यमानें पक्कें बोलणें झालें कीं, लढाई झालियावरही मुलकाचें बोलूं नये, गामलतीचे वाजवी जाबसाल करून द्यावे, मशरुलमुलूख यास काढावें, हा करार. याजवर

त्यांचें आमचें बोलणें ठरून यादी ठरल्या. बोलण्यांत शफतपूर्वक आले. मगर यादींवर करार करावा इतकियांत गोविंदराव कृष्ण यांचें पत्र त्यास आलें. मा।। तसेंच राहिलें. काय त्यांनीं लिहिलें असेल तें असो. आह्मास समजलें नाहीं. करार होणें राहिला. मगर बोलण्यांत शफतपूर्वक आलें आहे. याजवर आतां बदलून गोष्ट सांगितल्यास अलाहिदा गोष्ट आहे. दौलतमंद यांची पंचायत काय? बाजूंत कुवत आहे तर सर्व जाबसाल दुरुस्तीनें होतील, याप्रमाणें आपली गोष्ट बनावून दाखविण्यास अशी तकरीर करून समजावलें. आपली सुखरोई व्हावी ह्मणून बनावणी केली. श्रीमंत आणि मदारुल महाम वजनावर कायम नाहींत. गोविंदराव कृष्ण यांनीं हितशत्रुत्व केलें असें समजावून आपले मिरवणुकीची चाल घातली. याप्रमाणें खचीत वर्तमान याजवर मीरअलम नबाबास दिलासा देऊन बोलले कीं, हजरतीनीं कांहीं काळजी करूं नये. दोस्तीचे पोटांत श्रीमंतांनीं मुलूख सोडल्यास बरेंच झालें. नाहींतर इंग्रजांस षरीक करून करार न करण्याची तजवीज करतों. एवढ्यावरून नबाबाचे डोळे फिरून जाऊन मीरअलम व रेणूराव प्रिय वाटूं लागले. याचा दाखलाही पुढें येत गेला. तो अलाहिदा लिहिला आहे. त्याजवरून ध्यानांत येईल. र।। छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[२] श्री. १६ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नबाबाकडे जाणें झालें. स्वामीकडून पुण्यास पावलियाची आणि तहनाम्याप्रकर्णीं पत्रें नबाबास आलीं तीं दिलीं. आपले सरकारचा अस्सल तहनामा आपलेजवळ ठेवून त्याची नकल दाखविली. पत्रांत तुमचे जबानी हवाला आहे असें नबाब बोलिले. तेव्हां ह्मटलें कीं, आपण मोहर करून तहनामा दिला त्याचे हिंदवींत आणि पारसींत अंतर आहे, याजकरितां हल्लीं श्रीमंताचा तहनामा आहे याप्रमाणें तोही लिहावा ह्मणजे साफ झालें. मीरअलम आणि राजे

रेणूराव जवळ होते. तेव्हां नवाब ह्मणाले कीं, तुह्मीं जसें लिहून मागाल. तसें द्यावें कीं काय? मीं ह्मटलें, नवें काय लिहावयाचें आहे? जें पहिल्यानें ठरलें तेंच आहे. घर घेण्याची गोष्ट ह्मणूं लागले तर काय करावें? जसें मदारुल महाम ह्मणतील तसेंच करावें. मीं ह्मटलें, मशरुल्ल महाल कराराशिवाय नाहींत, जो करार ठरला तोच बोलतात, अधिक किमपि बोलणार नाहींत, आणि बोलतही नाहींत. तेव्हां ह्मणाले कीं, तुह्मीं आह्मांस रात्र ह्मणा ह्मटलें, रात्र ह्मटली; दिवस ह्मणा ह्मटलें, दिवस ह्मटला; परंतु गोष्टी निभल्या तर पाहिजेत; कशा निभतील? तेव्हां मीं ह्मटलें कीं हैदराबादेस आतां नुकतेंच येणें झालें, इतक्यांत करारावेगळ चाल दिसूं लागली हें काय? तेवेळेस मीरअल्लम बोलले कीं, तुह्मापाशीं ह्मणून बोलतात. तेव्हां त्यास ह्मटलें कीं, मजपाशीं ह्मणून असें बोलतात असे असल्यास गोष्ट अलाहिदा, परंतु मला तसें बोलणें दिसत नाहीं, श्रीमंत व मदारुलमहाम यांस लिहून पाठवावें असें बोलणें दिसतें, याजकरितां पुसावयाचें कारण. तेवेळेस नवाबांनीं उत्तर केलें कीं, इतल्ला देण्याकरितांच बोलतों. तेव्हां क्षणभर उगाच राहिलों. मीरअलम तेथून उठोन नवाबाचे कानास लागले. नंतर बोलले कीं, हजरत बरखास्त झालियावर तुह्मीं आह्मीं बसून तहनाम्याचा मवाजया करूं. त्यानंतर घरगती मामलती प्रकर्णे रेणूराव नवाबाशीं बोलत होते. दोन तीन घटिका बसून नवाब महालांत गेले. उपरांत मीरअलम व रेणूराव व मी असे माडीचे खालीं उतरून चवुऱ्यावर फर्ष केला होता तेथें बसलों. तीन घटिकापर्यंत बोलणें झालें. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे त्याजवरून ध्यानास येईल. रा। छ २८ जिल्काद. हे विज्ञापना.

---

[४] श्री. १६ जून १७९५.

विज्ञापना ऐसीजे. त्रिवर्ग चवुऱ्यावर बसलों. चौथे रघोत्तमरावही होते. मीर अलम बोलूं लागले कीं, नवाबाची प्रकृत प्रकारची झाली,

जो येतो तो तोडणी लावितो, कोणांत कोणी नाहीं, एक इकडे ओढतो, एक तिकडे ओढतो, हरएकाशीं तकरार करणें बोलणें यांत मर्जी बरहम होते, आतांच तुह्मांशीं एके प्रकारचेंच बोलूं लागले, मी उठून कानांत सांगितलें कीं आह्मीं एकीकडे बसून तहनाम्याचा मवाजहा करून हजरतीस अर्ज करूं ह्मणून बोलून तितकीच गोष्ट राहविली, त्यास हा रियासतीचा मुकदिमा एकाकडे काम सोंपल्याखेरीज कसा गाडा चालेल? राजाजी यांचे गायचांना नालिष करणें ठीक नाहीं, रोबरोच करितो, सरकारचा ऐवज बाकी मामलेदार व ताहुदवाले वगैरेकडे येणें त्यास निकड होत नाहीं, तुह्मांस मुरुवत फार, यास काय करावें? यास्तव एकाचे गळीं घालावें, अमक्यानेंच करावें, असेंही नाहीं, जो खावंदाचे मर्जीस येईल त्यास, आजमखान यांचे मनांत दिवानीचें काम करावें असें आहे ह्मणून ऐकितों, त्यास हेंच उत्तम आहे. शफतपूर्वक सांगतों कीं यांची ताबेदारी पाहिजे तशी करूं, यांत बालबराबर तफावत येऊं देणार नाहीं, जे नेक सुचले ते सांगूं, त्याचे करण्यास षरीक राहूं. एके साईस लागल्यानें खावंदाचे दौलतीस रोनक येईल, याजकरितां इतकें बोलतों. याजवर रेणूराव बोलले कीं, रावजीनीं मनःपूर्वक खुलाशानें सांगितलें असतां सर्व होतें. याप्रमाणें सिद्धसाधक होऊन बोलूं लागले. त्यास उत्तर दिलें कीं, नवाबांनीं सर्व पाहिलें, अनुभवही फार आहेत, आमचे तीर्थरूप दौलतखाही करीत आले हें सर्व हजरतीस माहित, आमच्यानें जें झालें तें केलें, याचा बयान कशास? वय लाऊन हजरत बुजुर्ग कोणी सांगावें असें नाहीं, परंतु आह्मास असें दृष्टीस पडतें कीं आह्मीं कोण याची ओळख देखील हजरतीस राहिली नाहीं, सर्व प्रकारें ना दौलतखाही यांनीं केली असें समजाविणारांनीं समजाविलें, तेंच मनांत भरून ओळख टाकलीशी दिसतें, तुमचें बोलणें आणि हजरतीचे बोलण्यास कांहींच मिळत नाहीं, यांत काय समजावें? तेव्हां बोलले:--तुह्मांविषयीं काय मनांत यावयाचें? जर मनांत कांहीं नाहीं तर ते दिवशीं तुमचे समक्षच बोलिले कीं, मदारुलमहाम यांचा करार होता कीं, कांहीं मुलुखाविषयीं ह्मणूं नये. मग असें कां झालें? यांत काय झालें कीं

आह्मी नादौलतखाही केली, असो, ज्यानीं दौलतखाही केली असेल ती त्यांणीं हजरतीस दाखवावी, आह्मी दौलतखाही केली न केली हें ईश्वरास ठाऊक आहे. तेव्हां मीरअलम ह्मणाले कीं कशाचा करार, कशाचा मदार, जर असें आहे तर खावंदास समजावणारांनीं कोणा तोंडानें समजाविलें, असो, आह्मांस कांहीं नावबाची दिवाणागिरी करावयाची नाहीं, कीं लटकें लांडें बोलून समजूत काढावी. एवढ्या शब्दावर मीर अलम बोलले कीं, आपण दाना दुरंदेष असें कां मनांत येईल? याजवर एक गोष्ट उलटून बोललों कीं, नवाब आपले मनांत समजोत अथवा न समजोत, परंतु ज्यांत दोही दौलतीची बेहबूद तेंच चांगलें, कोणी दिवाण होऊन या चालीनें चालल्यास उत्तम मार्ग, या चालीविरुद्ध चाल असल्यास आह्मी साफ अर्ज नवाबास करूं कीं, हा दिवाण कामाचा नाहीं, याविषयीं मागें पुढें पाहणार नाहीं, दौलतीचे भेदबुद्धीची इच्छा असल्यास ऐकतील, नसल्यास न ऐकतील, होणार असेल त्यास कोण काय करितो? प्रस्तुतचा रंग तर असा दिसतो जे अला व अदना खावंदापाशीं बराबर, आणि ज्यास हौसक आहे तो, ज्यास हौसक नाहीं, आणि योग्यता नाहीं तो, उभय प्रकारचीं मनुष्यें सर्वांस असेंच वाटतें कीं, नवाबाची दिवाणी करावी, अशी बचबच झाली आहे. याप्रमाणें बोलल्यावर मीर अलम ह्मणाले; प्रस्तुतकालीं तर असेंच आहे. राजाजी ह्मणालें, पुढें व्हावें जालें. मीरअलम ह्मणाले कीं, व्हावयाचें काय? हजरत कराराशिवाय गोष्टी बोलतात, त्या बोलूं नयेत याची खातरजमा करून द्यावी, हेही दौलतखाहीस कसूर करणार नाहींत, असें घडावें ह्मणजे झालें. याचें उत्तर मीं दिलें जे, याविषयीं हजरत सर्व जाणतात, आह्मी आपलेकडे नादौलतखाहीचा शब्द घेऊन तुह्मांकडून रदबदल करवीत नाहीं, करारमदार इमान प्रमाणास , सचोटीस, सरदारीस जे लाजम असेल तें करावें, जाहीरदारीचें प्रयोजन नाहीं, जशी मर्जी असेल तें स्पष्ट सांगावें हें चांगलें, तुह्मीं नोकर आहा, तेव्हां खैर खाहीस काय पुसावयाचें? योग्य आणि लाजिम असेल तेंच करावें. याअन्वयें बोलणें होऊन

उठलों. खिलवतेचे दिवाणखान्याबाहेर आलों. तेथून राजाजी आपले घरास गेले. थोरले दिवाणखान्याबाहेर देवडी आहे तेथपर्यंत मीरअलम व मी बरोबर बाहेर आलों. तेव्हां बोलिले कीं, दप्तरचे कामास आणि राजकारणाचे कामास बहुत अंतर, आहे, मनुष्यांत गंभीरता असणें हें योग्यतेचें कारण आहे. मीं ह्मटलें, खरें आहे, हा तुका रेणूराव याजवर. नंतर ह्मणाले, त्यांची माझी गांठ पडून बोलणें झालें पाहिजे, याचा योग कसा? त्यास ह्मटलें, तुह्मी योजना करून सांगावें. उत्तम ह्मणून बोलले. त्यानंतर निरोप आला नाहीं. रा छ २८ जिल्काद. हे विज्ञापना.

---

(९) श्री.

विज्ञापना ऐसीजे. राजे रेणूराव मीर अलम याचे घरीं गेले होते. तेथून रघोत्तमरावसुद्धां माझे येथें आले. पूर्वस्नेहावर बोलणें. शिष्टाचार होऊन गेले. मागती दुसरे वेळेस आले. वर्तमान ऐकण्यांत आलें. मीर अलम यास बोलले कीं, अजून तुमचे येथील बंदोबस्त पाहिजे तसा झाला नाहीं, इंग्रजाकडील जाबसाल अद्यापि खचित समजला नाहीं, इतक्यांत तुह्मीं अथवा हजरतीनीं त्यास नाखुष करणें सलाह नाहीं, पागावाले वगैरेशीं पूर्वीपासून स्नेह, त्याची नालिष करणें ठीक नाहीं. यानें उत्तर रघोत्तमराव आणि रेणूराव यांनीं केलें कीं, प्रथम कडू वाटल्यास वाटो, त्याचा कदम आतांच आंत शिरल्यास पुढें कठिण पडेल, यास्तव आतांच ठेंचून राखणें, याजकरितां नबाबास समजावून केलें तें ठीकच, आमचें लगामीं लागल्यावर नीट करूं. याप्रमाणें त्याचे घरीं बोलणें झालें. आमचे येथें आले. मींही शिष्टाचार केला कीं, आह्मीं जे आहों तेच आहों, तुह्मीं आमचे इष्ट, ज्यांत तुह्मांस चांगलें आणि दोही दौलतीची बेहबूद असावी, त्याविषयीं प्रयत्न ईश्वरें सफल केला, तुह्माकडूनही असेंच असावें, पूर्वीपेक्षां नबाबाची कृपा तुमचे येणें झाल्यावर आह्मावर अधिक असावी, एतद्याविषयीं विपरीत दृष्टीस पडतें हें

आश्चर्य आहे, असो, आह्मांकडून तर कांहीं कसूर नाहीं, ब्राह्मण मंडळी तुह्मां व्यतिरिक्त दुसरी कोणी येथें नाहीं, तुमचे इष्टत्वाप्रमाणें इष्टत्वही नाहीं, या स्थळीं आह्मांस तुह्मी एकच दिसता, सुखादुःखाचे सोबती पूर्वीं होता तसेंच असावें हें योग्य, तुमचे योग्यतेची वृद्धि असावी याचा आह्मांस किती संतोष याचा बयान नलगे, श्रीमंतांची कृपा संपादून घेतली त्याची वृद्धि होय असें करावें, राजश्री नानानीं बहुत ममतेनें खुणेची गोष्ट सांगितली आहे कीं, राजे रेणूरावजी यास साध्य करीत जावें, त्यांचे ममतेची जात मनांत वागत जावी. इत्यादिक बहुत भाषण झालें. याचें उत्तर कांहीं संकोचित होऊन केलें:—मीर आलम खवासींत बसत होता, तो काय बोलला असेल न कळे, मला कांहीं ठाऊक नाहीं, मजकडून कांहीं अंतर झालें नाहीं, असें टाळाटाळ करूं न जाणों. सारांश, काम मोठें, हौसक थोडा, कसेंहीकरून पेष आमद करावी ह्मणून बोलावयास जातात. पत कोणते गोष्टींत राहील याविषयीं समज नाहीं. दैवाची गोष्ट. अलाहिदा कसें असलें तरी निभतें. याप्रमाणें चाल आहे. दुसरे वेळेस आले त्याचा तपशील अलाहिदा लिहिला असे. रा। छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[६] श्री. १६ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. राजे रेणूरावजी दुसरे वेळेस आले. रघोत्तमरावही बरोबर होते. ह्मणूं लागले कीं, हजरतीनीं सांगितलें आहे कीं, गोविंदराव यांशीं माझें बोलणें खरड्यावर आहे कीं, आह्माकडील जुजवियातचे फडचे करून द्यावे व तसाच भोसले याजकडील फडच्या व शिंदे याजकडून तमसुका—प्रमाणें ऐवज मजुरा येणें आणि तालुक्याचा ऐवज जप्तींत घेतला असेल तो इत्यादिक बाबती याचा फडच्या कसा करतां? रुजुवात हिशेब आदवनीचा पाहून त्यांत कापड व होन वगैरे संप्रदायाप्रमाणें घ्यावे. याचें उत्तर त्यास दिलें जे, जुजवियात तुह्माकडील काय असेल ती काढावी, त्याचे नावसाल कर-

ण्यांत येतील, वाजवीस गुंता नाहीं, भोसले याजकडील लढा तुह्माकडे असेल तो उलगडा करावा, त्याजकडे असेल त्याचा ते करितील. पुढें एक रकम निर्वेध करावयासी येईल, चिंता नाहीं, शिंदे याजकडील ऐवज येणें ह्मणतां तो आह्मांस ठाऊक नाहीं; तुह्मी कशाकरितां ऐवज दिला असेल तो तुमचा तुह्मांस ठाऊक. हा जाबसाल आह्माकडे नाहीं. याविषयीं नवाबांनीं सांगितलें होतें खरें; परंतु मदारुल महामांनीं याचें उत्तर असें सांगितलें, जसी तुमच्या लढाईमुळें झाली, सल्लाह ठरली तोपावेतों जे जिकडील गेले ते गेले, याविशीं दुतर्फाही बोलूं नगे. तेव्हां रेणूरावजी बोलिले कीं, पूर्वीं श्रीमंतांचे बोलण्यांत आहे कीं, फौजा पाठवून मामलत उगवूं, त्यास फौजा पाठवून जसी केली, ऐवज घेतला, तो मामलतींत मजुरा पडावा असें बोलण्यांत आहे. मी ह्मटलें, खरें आहे, याविषयीं तुह्मासी श्रीमंत बोलले; तुह्मीही नवाबांस लिहिलें होतें, त्यांत काय आहे जे मामलत उगविण्यास फौजा पाठवूं. परंतु नवाबांशीं आमचा दुसरा प्रकार लढाईचा नाहीं; मामलत उगविणें प्राप्त, याप्रमाणें बोलण्यांत आहे. तसेंच झालें असतें ह्मणजे ठीकच होतें. जसींत ऐवज आला हा मामलतींत मजुरा देतो. ती गोष्ट मार्गाची होती, ते हजरतीकडून न घडतां बिघाडानी करून लढाई दरपेष करून आह्मांत नेस्तनाबूद करावयाचा इरादा केला, तेव्हां बाकी काय राहिली, बोलावयास जागा होती कीं काय? लढाईंतील गोष्ट लढाईत राहिली, त्याचा जिकीर आतां कशास पाहिजे? तेव्हां मध्यें एक गोष्ट बोलिले कीं, किस्तीचे ऐवजाचे भरण्याचें साधन आह्मी नवाबापाशीं बोलत असतां मीरअलमानीं मध्येंच घोडें घालूं लागले जे जसीचा ऐवज आणि बादशाहीचे स्वारीचा ऐवज काढला असतां फार निघेल. तेवढीच गोष्ट नवाब घेऊन बसले. तेव्हां त्यास ह्मटलें, नवाब बोलत अथवा मीरअलम बोलत, आपण उत्तर याप्रमाणें करावें, यांत किमपि संदेह मानूं नये, आदवनीचे जाबसालाचे त्यास इतके दिवस आदवनीचा फडच्या राहिला, सरकारांतून सावकारी ऐवज घेऊन त्याऐवजीं फौजेस देणें पडला, नुकसानीची काय वाट; व्याजसुद्धां आमचा फडच्या सर्व

करून द्यावा, मग तुह्मी सालाबादची चाल ह्मणता ती ऐकूं, दोन्ही दौलती मोठ्या, यांत व्याज घेणें आणि देणें हें ठीक दिसत नाहीं, याजकरितां आजपर्यंत सालीना ऐवज द्यावा, पुढें चालते सालापासून मामूल चाल असेल त्याप्रमाणेंच अमलांत येईल. याप्रमाणें उत्तर प्रतिउत्तरें झालीं. यावर रेणूरावजी ह्मणूं लागले कीं, जुजुवियातचा हिशेब व रुजुवात होणें आहे, याजकरितां कांहीं ऐवज या किस्तींत तहकूब ठेवावा, कांहीं पुढले किस्तींत ठेवावा, ह्मणजे निर्वाह होईल. तेव्हां त्यांस ह्मटलें कीं, या किस्तांस आणि हिशेबास काय संबंध? रुजुवातीचे आणि हिशेबाचे गोष्टीस नाकबूल कोणी नाहीं, एक एक करीतच जावें, रुजुवातीमुळें जिकडे फिरेल तिकडून फडच्या होईल हें करारांतच आहे, त्याअर्थी तूर्त चालते किस्तींत दिक्कत करूं नये, ही किस्त सालीना द्यावी, पुढें दोन किस्ती आहेत, अवकाश रुजुवातीस आहे, सहजांत गोष्ट आहे, यास दिकतीखालीं घालूं नये. तेव्हां रेणूरावजी ह्मणूं लागले कीं, श्रीमंतास मला निभावून नेणें आहे तर कांहीं ऐवज हिशेबाकरितां तहकूब ठेवावा, किस्तींचीं सालें वाढवावीं ह्मणजे मी नबाबजवळ बोलून जिम्मा करून घेईन, मामलत आणखी सारा याचा फैसला करून देईन, असें मी श्रीमंताजवळ बोलेन, त्याप्रमाणें दोन्ही जाबसाल मी बोलल्याप्रमाणें निभावून देतों, एक गोष्ट माझी बोलण्यांतील आहे, आणि त्याचें वचन आहे, त्या गोष्टीचा भारम दारुल महाम यांवर आहे, याप्रमाणें आपण लिहावें आणि जबाब आणवावा, जर श्रीमंत मान्य करतील तर उत्तम नाहीं तर माझ्यानें निभावणार नाहीं, या कामांतून मी कदम काढीन, आपल्यावर हवाला घालून मीही एक पत्र देतों, बादजबरसात एक वेळ श्रीमंतांची नबाबाची मुलाखतही ठरवावी. याप्रमाणें बोलले. कसें लिहावयाचें तें सांगावें आणि पत्र द्यावें, असें बोललों. त्यास ते सांगतील तसें मागती लिहीन आणि पत्र त्यांनीं दिल्यावर पाठवून देईन. याचें उत्तर येणें तसें यावें. रा छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

ज्युन सरकार राव पंत प्रधान.

[७] श्री. १६ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. रघोत्तमराव आले. त्याशीं बोलतां बोलतां बोलण्यांत आलें कीं, मुलूख घेण्याचा नाहीं, असा मदारुलमहाम यांचा करार ह्मणून नवाब बोलतात हें काय कोणी समजाविलें आहे, करार होणें तर रेणूरावजी आणि तुह्माशीं झाला असावा, त्यास कांहीं बोलण्यांत आलें आहे कीं काय? तेव्हां बोलले कीं, याचें काय सांगूं, श्रीमंत आहेत, आतां विसरले असले तर यास आह्मीं काय करावें? आतांचा समयच विचित्र, दौलत मंद यांशीं आगच्यानें सख्त बोलवेल कीं काय? तेव्हां त्यांस ह्मटलें कीं, कराराची याद स्पष्ट आली असल्यास मग त्याचा संकोच तरी कां करितां? काय कसें झालें तें सांगावें. तेव्हां ह्मणाले, आपल्यास सर्व कळलेंच असेल. मीं ह्मटलें कीं, झालें असल्यावर न कळावें असें तर नाहीं, मगर फुरसत झाली नाहीं ह्मणून कळलें नाहीं, किंवा करार झाला नसेल. तेव्हां काय सांगावें ह्मणून तशीच गोष्ट राहिली. यांतील अर्थ समजत नाहीं ह्मणून पोटांत शिरून ममतेनें पुशिलें कीं, वास्तविक असेल तें सांगावें. तेव्हां मशारनिल्हे बोलले कीं, असें बोलणें झालें जे मषिरुलमुलूख यांस काढावें, मामलतीचा फडच्या बाजवी असेल तो करावा, याजवर राजश्री नाना बोलले कीं, ही गोष्ट नबाबानीं न ऐकिली आणि लढाईचा प्रसंग असल्यास आह्मांस फौजेचा खसारा पडेल याची काय वाट? त्यास फौजेचा खसारा पडेल तो देऊं. याप्रमाणें बोलण्यांत आले, तेव्हां नाना बोलले कीं, खिसाऱ्याचा पैका फार होईल, तुह्मांस देण्याची सोय होणार नाहीं, याजकरितां त्या ऐवजास कांहीं तालुका लावून द्यावा, इतकें बोलणें, खिसाऱ्याचे बोलण्यास मीरसाहेब कबूल नव्हते, परंतु राजाजी ह्मणाले कीं, मी बोललों आहे, त्यांअर्थी अंतर पाडूं न देईन, एवढें बोलणें, याशिवाय मुलुकाचें अक्षर नाहीं. त्यास ह्मटलें कीं, यादीवर करार करून तुह्मीं घेतला आहे कीं नाहीं? यादी ठरल्या; परंतु करार होणें राहिल्या, त्यांचे मसविदे

गोविंदराव याजपाशीं आहेत, असें बोलले. तेव्हां त्यास ह्मटलें, करार झाला नाहीं, तेव्हां मजविशीं काय करावें? याजवर मशारनिल्हे बोलिले, बोलण्यांत शपथपूर्वक आलें, गोविंदराव माहित आहेत. तेव्हां त्यास ह्मटलें, करार न झाला तर नहो, नानानीं तुह्माशीं शपथ याविषयीं केली आहे कीं काय? तेव्हां बोलले, शपथपूर्वक करावें असें बोलणें आहे. बोलणें हें निराळें, दहा गोष्टी बोलण्यांत येत असतात, परंतु निश्चयें होऊन याप्रमाणें अमलांत आणावें याचे बोलणेची शपथ होत असते, तें पक्कें कसें झालें आहे किंवा कसें? याजवर बोलले कीं, निश्चय याप्रमाणें करावें असें ठरलें, निश्चयांत तथा राहिली नाहीं, याउपर करार एका दोहों दिवसांत व्हावा तो न झाला. याप्रमाणें त्यांचे बोलण्यांतील गर्भ ऐकून घेतला. मला बहुत संदेह पडला होता कीं, मुलकाविषयीं सरकारचें वचन गुंतलें आहे कीं काय? मशारनिल्हेनीं बयान करून सांगितलें याजवरून समजलें जे बोलण्यांत गोष्टी आल्या असतील, परंतु दस्तऐवज अथवा वचन शपथक्रिया अमल कलम असें झालें नाहीं. येथें त्रिवर्ग आले. नवाबाची कृपादृष्टि, आणि खुशामतीची गोष्ट, आणि दौलतखाही केली असे तर दाखविलें पाहिजे. ऐवज तर कांहीं नाहीं. तेव्हां काय करितात? यास्तव नवाबापाशीं उजागरीनें बोलावयाकरितां हा मनसुबा केला कीं, आह्माशीं शपथपूर्वक मदारुलमहाम यांचे बोलणें झालें होतें, यादी ठरल्या, करार व्हावा, इतक्यांत गोविंदराव कृष्ण यांचें पत्र काय आलें न कळे, करार होणें तसाच राहिला, ह्मणून मजवर अदावत टाकिली. श्रीमंत लोकांनीं वचन धरावें. वचन पाळणें न पाळणें हें थोरास उचित असेल ते करतील. आह्मीं त्या वचनाचे विश्वासावर आहों ह्मणून स्वामीचें व राजश्री नानाचें नांव घेऊन बोलतात. यांतील वास्तव अर्थ पाहतां स्वामीचें वचन झालें, त्यास विरुद्ध पडलें नाहीं. मीही इष्टत्वांत अंतर केलें नसतां शुद्ध अदावतीसारखे मशीं चालतात. आणि स्वामीचे वचनास शब्द ठेवण्यासारखें दाखवितात. इतकें कारस्थान रघोत्तमराव यांचें. राजाजीचे सल्लाहगार हेच आहेत. जसा हे बीर

भरतात तशी ते वर्तणूक करितात. मुख्याचा प्रकार तर पिशाचे हातीं कोलीत तशी अवस्था आहे. स्वामीकडे दोष ठेवून बोलतात. याच्या गति काय होतील न कळे. जसें भविष्य तदनुसार बुद्धि! काय असेल तें दृष्टीस पडेल. स्वामीचे ध्यानांत यावें ह्मणून वास्तव्य झालें तें लिहिलें आहे. रा। छ २८ जिल्काद. हे विज्ञापना.

---

[८] श्री. १६ जून १७९५.

विज्ञापना ऐसीजे. मीर अलम व रेणूराव आणि रत्नोत्तमराव त्रिवर्ग मिळून नबाबास समजाविलें कीं, पागावाले व एहतेषामजंग हे फितुरांत गोविंदराव कृष्ण यांशीं मिलाफी झाले, याजमुळें एवढी नक खरड्यावर हजरतीस बसली, याचा दाखला खचित पुण्यांत आह्मांस समजला आहे? ह्मणून नालिष केली. गोविंदराव कृष्ण यांचा फितूर सर्वां ठिकाणीं हें मनात भरविलें. त्याजवरून अजमखान व घासी मिया याजवर नबाब खफा आहेत. शिंव्यागाळीही करितात. मीरनसाहेब घासीमियाकडील यांचे येणें जाणें आमचे येथें पूर्वींपासून बहुत त्याप्रमाणें ते येत असत. याविषयीं नबाबास सांगितलें कीं, नित्य सल्लतें करितात. अजमखान व घासीमिया रात्रीं घोंगड्या पांघरून जातात. असें लटकें समजावून मीरन साहेब यांस दरबारांत मना करविला. उभयतांवर राग करविला. त्यांनीं नबाबास सांगितलें कीं, जो जें सांगेल ते हजरत ऐकतात, यास इलाज नाहीं, षमपुल उमरा होते तेव्हांपासून हजरतीचे परवानगीनें त्याशीं घरोब्याचा शिलशिला, आह्मांस राजकारणाशीं दरकार नाहीं, त्याचा घरोबा राखतो ह्मणून आणखी कांहीं शकल असल्यास आमचे अंगीं लावावें, पत्यामुद्यानिशीं रुजू झाल्यास पाहिजे तें करावें, परवां तहनामा देण्याकरितां हजरतींनीं पाठविलें ह्मणून गेलों, नाहींतर कांहीं खोळंबा होता कीं काय? तुफान घेऊन कोणी बोलूं लागला तेंच मनावर घेणें असें होऊं लागलें तर भरंवसा काय मानावा? हजरतींनीं पागा घोडीं सर्व ठेवावीं, षमपुल उमराचे कबरेपाशीं जाऊन बसूं. याप्रमाणें

बोलल्यावर नवाब उगेच राहिले. दिलगीर आहेत. सारांश त्रिवर्ग मिळून चाल विचित्र घातली. सर्वांस जरब देऊन मिळवून घ्यावें, या गतीवर चालून सर्वांच्या नालिषी सुरू केल्या. आतां आटोपावयास जातात, तो आटपत नाहीं. एकवेळ नालिष केली, त्याची शिफारस करूं लागल्यास ठीक बनत नाहीं. अशी गत झाली आहे. परिणाम ठीक दिसत नाहीं. काय होईल पहावें. रा। छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[९] श्री. १६ जून १७९१.

विज्ञापना ऐसीजे. मीरअल्लम वगैरेचे मनांत कीं गोविंदराव यानीं खरड्याचे सलूकांत आह्मांस सामील केलें नाहीं, बरें, काय चिंता आहे? नवाबास समजावून याची मध्यस्ती दूर करवीन, श्रीमंतानीं ऐकावें असें करीन, परंतु शेवटास नेईन. यांतील वास्तविक अर्थ पाहतां यांनी इतके जीदीस पडावें असें मजकडूनही झालें नाहीं. खरड्यावर यास शरीक करावें तर अवकाश नाहीं. दुसरे शरीक झाले असते तर यासच चांगलें नव्हतें. बलके नवाबाचा रोष विशेष होता. या कामांत त्यांनीं षरिक नसावें, हें वास्तव मनांत नाहीं. सरकारचें वचन याशीं गुंतलें, यास्तव आणीकशी दोस्ती. सरकारास उपयोग तें करावयाचें. यज्ञाकरितां नवाबापाशीं बोलून पत्रें घेतलीं कीं, तहनामा ठरावयाचा यास्तव उभयतांस पाठवावें. तहनामे याचे विद्यमानें झाले ह्मणजे हे सरकार कामांत आले. तीं पत्रें स्वामीचे रुबरू यांस दिलीं. स्वामीनींही आज्ञा केली कीं, तहनामा ठरावून आणावा, येथीलही न्यावा. ज्या दिवसाचें चिंतन करीत होतों तो समय हाच आहे. याप्रमाणें खातरजमा करून सांगितलें. मी नवाबापाशीं आल्यावर कळंबचे मुक्कामीं उभयतांस बहुत बजीद झालों कीं, चलावें. कबूल न करीत. नवाबास दोन चार वेळा ह्मटलें. मान्य करीनात. सरकारची आज्ञा कीं, तहनाम्याबरोबर त्याजकडील गृहस्थ असावा. कोणास तरी द्यावें असें ह्मटलें. तेव्हां घासीमियास त्यांनीं दिलें. यांत मज-

कडून विरुद्ध तर झालें नाहीं. सरकारांतून कांहीं विपरीत व्हावें, तेंही नाहीं. असें असतां यांनीं मजवर रोष करून चुगल्या सांगाव्या असें नाहीं. मग एका गोष्टीविषयीं इतकें करीत असतील तर न कळे. कोणती गोष्ट? यास खचीत समजलें आहे कीं, नबाबाचे दौलतींत सर्वांशीं यास ओळख. तसेंच महालांत वगैरे आमचेपेक्षां प्राचीन माहीत हे आहेत. लहान मोठे सर्व यांस ओळखतात. तेव्हां यांजवर आमचा दबाव पडणार नाहीं. कसेंही झालें तर हे आपल्यावर गालब राहतील, हें आपल्यास जड पडेल. याजकरितां इतका उद्योग असल्यास न कळे. असो; दोन गोष्टी माझ्या बळकट आहेत. एक तर मजकडून याशीं प्रतरणेची चाल नाहीं. दुसरी गोष्ट रात्रंदिवस मनांत हेंच वागत आहे कीं, नबाबाची दौलत स्वामीवेगळ असूं नये. दोहींचें ऐक्य असें असावें कीं, स्वामींनीं इकडील काळजी किमपि न करावी. असें करून दाखवावें. मग स्वामीची आज्ञा घेऊन स्वस्थ बसावें. ही चाकरी ईश्वरास मजपासून घेणें व इतर कोणाच्यानें कांहीं होत नाहीं. ज्याचें कर्म त्यास फलद्रुप होईल. रात्रंदिवस मजवर झोड आहे. कोणी असेंही येऊन सांगतात कीं, तुह्मावर बलवा होणार आहे. दहा वीस माणूस रात्रंदिवस बातनीवर फिरतात. लटकी बातमी किंवा खरी याचा विचार अधिकारीयांस नाहीं. बुद्धीस भ्रंश आहे. मुशीरुलमुलूक यांस बरें ह्मणविलें. किती तपशील लिहूं? स्वामीचे पायांचे ध्यान करून चिंता सोडली. पार पाडणार पाय आहेत. मी चिंता केल्यानें काय होणार? स्वामीचे ध्यानांत सर्व यावें ह्मणून लिहिलें आहे. रा॥ छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[१०] श्री. १६ जून १७९५.

विज्ञापना ऐसीजे. राजे रेणूरावजी व रघोत्तमराव आले होते तेवेळेस सहजांत त्यास पुशिलें कीं, लोकांत षोहरत फार झाली आहे कीं, नबाबास खरड्यावर खिपत बसली, त्याविषयीं रात्रंदिवस निजध्यास

आहे, याजकरितां इंग्रजास षरीक करून घेऊन याचा बदला करावा ह्मणून राजकारण ज्यारी आहे. त्यास ही षोहरत दहाकरितां किंवा वास्तविक आणि या भरंवशावर हजर फडच्यासाठीं ढील करितात कीं, काय? इंग्रज बहुत दुरंदेश आहेत. केवळ लालचीवर दृष्टि देतील असें नाहीं. जी निर्दोष कळेच त्याचा अंगीकार करतील. त्यांत दोष आणि नुकसानी त्याविषयीं हरगीज कबूल करणार नाहींत. यांचा पल्ला फार आहे. आहद कर्नाटक तहत बंगाला अनर्थ. तेव्हां गोष्ट कठीण. तुमचे भरंवशियावर षराकत करावी तर तुमचा अनुभव त्यास आला आहे. यांत परिणाम नाहीं. श्रीमंत व नवाब दोही दौलतींतील गोष्ट नफानुकसान याच दौलतींत असणें हीच सल्लाह.—कदाचित् दोस्तीच्या पोटीं रियासत मुरुवात होणें याचा संभव तरी आहे. इंग्रजाचे घरांत जें जाईल तें पायां पडून घेईन ह्मटल्यास यावयाचें नाहीं. मसलत देणारांनीं विचार पहावा. तुह्मीं नवाबाचे नोकर आणि दौलतखा मातबर समंजस आहां. दौलतीस धक्का बसलियावर प्रस्तुत दुन्याईत नमूद तुह्मीं व्हाल. तेव्हां त्यांचा उद्गार निघाला कीं, हल्लींचे शिकस्तेची गैरत आणि षरमिंदगी नवाबास फार झाली आहे, याजमुळें चैन नाहीं, इंग्रजांस फरासीसाची मसलहत आणखी सख्त अशी येऊन पडली आहे कीं, त्याला दुसरें कांहीं सुचतच नाहीं, तेव्हां ते काय कबूल करितात, तुह्मीं ही कल्पना मनांत आणूं नये. तेव्हां त्यांस ह्मटलें जे तुह्मीं श्रीमंतांचे खैरखाह, आमचे इष्ट आणि ब्राह्मण ह्मणून घरोब्यानें बोललों. या मजकुरांतील भावगर्भ कायम निघाला. जर इंग्रेज सामील होतील तर ते करून घेणार. ते सामील नाहींत, त्याअर्थी उगेच रहावें, इतकाच प्रकार. अंतःकरण खोटें, हें खरें. रा। छ० २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[११] श्री. १६ जून १७९१.

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजांचे येथील कुफिया बातमी मीरअलम कीरकपात्री इंग्रजाकडील वकील येथें आहे त्याशीं षराकतीविषयीं बोलिले.

त्यानें यास साफ जबाब दिला कीं, दोहींकडे आमची दोस्ती, तेव्हां तुह्मीं ह्मणतां हें आह्मांस कबूल नाहीं, तुह्मां उभयतांतील वाजवी गैरवाजवी पाहतां पंत प्रधान यांनें ह्मणणें वाजवी, तुमचे भरंवशावर काम करावें तर पट्टणावर तुमचे फौजेचा आणि चालीचा अनुभव आला आहे, हिम्मत किती हेंही कळतच आहे, तेव्हां आमचेंच जातीवर येऊन पडेल, त्यास तुमचा निभाव तुह्मी व तेच पाहून घ्यावा, या बोलण्याची गरज धरून आह्मी श्रीमंताचे दोस्तींत फरक आणणार नाहीं. याप्रमाणें साफ जाब दिल्यावर मीर अलुम उगेच राहिले. कित्येक जमीदारांचें पारिपत्य करावयाचें याजकरितां चिनापट्टणाहून कांहीं पलटणें देवावीं ह्मणून बोलिले. याचें उत्तर चिनापट्टणकरानें आलें कीं, कलकत्त्याहून हुकूम आल्यास देऊं. पैका आणि मुलूख श्रीमंतानीं फार घेतला याविषयीं दोस्तीचे मार्गे इंग्रजाकडून बोलवावें, या प्रयत्नांत आहेत. परंतु इंग्रज अद्याप कबूल करीत नाहीं. जर इंग्रजांनीं कबूल केलें तर श्रीमंतांशीं बदलून गोष्ट सांगावी हें मनांत आहे. प्रस्तुत हें होत नाहीं. तर राहिले, जेव्हां दावा बनेल तेव्हां करूं तूर्त गोविंदराव कृष्ण आमचे कामांत नसावे, याविषयीं स्वामी व राजश्री नानास व गोविंदराव भगवंत यास पत्रें पाठवावीं, हा उपदेश नबाबास करितात. पहावें काय ठरतें. मुलूख आपला गेला, पैका गेला, हुकमत गेली, कारभारी पेशव्यांचे हवालीं केला, याची बदनामी दुनयायींत झाली, मदारुल्महाम याचे मनांत कांहीं नाहीं, मशिरुलमुलुल यांस आमचे हातीं द्या हेंही ह्मणणें नव्हतें, हजरतींनीं आपले जवळून काढावें इतकेंच, आता त्यांचे देण्यामुळें फार बेवकीरी झाली, इतके गोविंदराव कृष्ण यांनीं केलें, हजरतींनीं दौलास कैद करून ठेविलें असतें तरी बरें होतें, असो, तो गेला तर जावो, ज्याचें कर्म त्यास फळास आलें; ऐसा नाकारा कशास पाहिजे ह्मणून दिला, ऐशी इतर दौलतदाराची समजून होईल, मुलूख गेला यांत केवळ हजरतीवर हर्फ. ऐशा चिडवणुकीच्या गोष्टी चालल्या आहेत. सारांश चाल खोटी. रा। छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

[१२] श्री. २६ जून १७८९.

विज्ञापना ऐसीजे. शिंदे यांजकडील ऐवज मजुरा देण्याचें हें आतांशींच याशीं बोललों नाहीं. कारण जाबसालांत दिकती काढल्या आहेत. याजकरितां जाबसाल सुरळीत स्वच्छपणें करूं लागल्यावर मग बोलावयास येईल कीं, ही बाबत ऐकावयाची नाहीं. परंतु नवाबाचे मुरुवतीकरितां मजुरा देऊं. याजकरितां सध्या बोललों नाहीं. रा॥ छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[१३] श्री. १६ जून १७८९.

विज्ञापना ऐसीजे. मीर अलम कोणा एका गृहस्थापाशीं बोलत होते कीं, पुणेंवाले याची सचोटी आणि चाल मजबूत वाटते, परंतु अलीकडे रघोत्तम याचें बजीनस पत्र आलें, त्यांत त्यांनीं लिहिलें आहे जे श्रीमंत आणि मदारुलमहाम यांचे डोळे फिरले, आतां स्मरणही यास तुमचें नाहीं, मीर अलम कोणते याची ओळख अथवा स्मरण देखील नाहीं, ऐशी चाल दिसून आली. याप्रमाणें मशारनिल्हेचें पत्र मौजूद आहे असें ह्मणत होते. मग काय असेल नकळे. ऐकिलें तें लिहिलें आहे. कलम १

दरबारांत नबाबदेखत अगर त्याजवेगळ तेथें गांठ मीरअलमाची पडते. तेंव्हां बोलतात कीं, मदारुलमहामासारखे मनुष्य नाहींत, जे बोलतील त्यांत तफावत येऊंच देणार नाहींत, ही खातरजमा. बोलण्याचे अर्थ दोन. एक अर्थ असून आह्मी ऐकावें तें लिहूं. याजनंतर मदारुलमहाम यास खातरजमा व्हावी. दुसरा अर्थ जें आह्माशीं बोलण्यांत आणि करारांत शपथपूर्वक आलें असले त्यांत व्यत्यय पडूं नये. या बोलण्यांत सुचवावें. त्यास मुलुखाविषयीं स्वामीचें अथवा राजश्री नानांचें वचन गुंतलें आहे कीं काय याची खचीत आज्ञा व्हावी. राजे रेणूराव व रघोत्तमराव उभयतां गोठा पीळ भरून आहेत कीं, आह्माशीं मुलुखाविषयीं न बोलावें अशी शपथ आहे. यांतील कसा प्रकार असेल त्याची पक्की आज्ञा व्हावी. कलम १

काल छ २६ वेरखेस नवाबाचें सालगिरेचे नजरेकरितां गेलों होतों. नजर केली. उपरांत फिरगाणी एक बंगला चार लाख रुपयांस नवाबानीं औरंगाबादेंत पूर्वीं घेतला तो दाखवावयास घेऊन गेले. तेथेंच बैठक झाली. त्या बंगल्यांत फिरगाणी राग वाजतात. आणि फवारे पाण्याचे सुटतात. तेंच पाणी पुन्हा खजान्यांत कळ फिरविली असतां जातें. झाडें, फुलें, जनावरें, पुतळ्या आहेत. दोन तीन घटिका तेथेंच बसले. इराणचा शहाजादा आला आहे. तो तेवेळेस आला होता. नवाबानीं ताजीम देऊन भेटले. आपलेजवळ बसविलें. तकिये मसनद कांहीं नव्हतें. गालीच्यावरच बसले होते. आपण लाव्हा घेत होते. त्याप्रमाणें शहाजादे यासही प्यालयांत लाव्हा द्यावा ह्मणून सांगितल्यावरून त्यासही प्याला भरून देत असत. ते दिवशीं कांहीं विशेष भाषण झालें नाहीं. नवाब बरामद होण्याचे पूर्वी मीर अलम व रेणूराव यांशीं दिवाणखान्यांत गांठ पडून बोलणें झालें. तें अलाहिदा लिहिलें आहे. त्याजवरून ध्यानांत येईल. कलम १

तीन कलमें. रा छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

---

[१४] श्री.

विज्ञापना ऐसीजे. काल छे २६ तेरीखेस नवाबाकडे गेलों होतों. नवाब बाहेर निघाले नव्हते. त्याअगोदर मीरअलम व रेणूराव यांची गांठ पडली. एकीकडे बसलों. खैरयतीचा शिष्टाचार होऊन नंतर त्यास विचारिलें कीं, आह्मास येऊन महिना होत आला, आजपर्यंत प्रथम दिवसच आहे, हजरतीचे बोलण्याचा भाव समजत नाहीं, खावंदास काय लिहावें? आह्माविषयीं तुमचे मनांत संशय आला असल्यास तुह्मीं आह्मांशीं स्पष्ट बोलावें, आमचे मनांत कांहीं आल्यास आह्मीं तुह्मांशीं बोलूं, जोंपर्यंत साफ बोलण्यांत आलें नाहीं तोंपावेतों भ्रम आहे, तुमचे आमचे बोलण्यांत कोणी मध्यस्थ नलगे, निखा-

लस बोलण्यांत आलें ह्मणजे आतांच तुह्मांस वाटेल कीं, उगीच भ्रम वाटत होता, परंतु कांहींच नाहीं, इतकें बोलण्याचें कारण हेंच कीं, दोही दौलती कुलियात तुह्मीं आह्मीं मिळून संभाळावी, यांत अंतर दिसूं नये, इकडे दृष्टि सर्वांनीं ठेवावी हें चांगलें. याजवर बोलिले जें, माझें ह्मणणें तुह्मांस इतकें आहे कीं, हजरत बरी वाईट गोष्ट बोलतात, याविषयीं तुह्मीं मनांत वाईट मानून असें बोलिले तेव्हां काय करावें, खाविंदास काय लिहावें? भरंवसा कोणता धरावा? असे संशय मनांत आणून या पैरवीस लागूं नये, खावंदाची मिजाज एक प्रकारची, आह्मीं येथें आलियावर आह्मांवर मिजाज दुरुस्त नाहीं ऐसें पाहिलें, तेव्हां लटकें लांडें कळलें तसें बोललों, नालिषही केली, आणि मर्जी संपादन करून घेतली, खरें बोलणें खावंदास बरें न वाटे, तेव्हां कसें करावें? असा प्रकार येथील आहे.) तेव्हां त्यास ह्मटलें, याच गोष्टी अवघड, खावंदाची मिजाज कायम नाहीं, बोलणें नीट नाहीं, एवढ्या बोलण्यावर आह्मीं आपले खावंदास कांहीं लिहावें तर ठीक नाहीं, भलतेंच होईल, याजकरितां आजपर्यंत कांहीं लिहिलें नाहीं, परंतु किती दिवस प्रतीक्षा करावी, मजवर खावंदाचा शब्द येईल कीं नाहीं? यास काय करावें? तेव्हां ह्मणाले, सर्व यथास्थित होईल, परंतु मला विचार मोठा पडला आहे, नवाबास एक सवै हामेषाची आहे कीं, कोणी एक जण पुढारी होऊन त्यानेंच याशीं बोलावें, त्याजवर नवाबांनीं भार टाकून त्याचे स्वाधीन करावें, त्याजपासून आपण जें पाहिजे तें समजत जावें, या धोरणेवर आल्याशिवाय गाडा ठीक चालत नाहीं, ती तर गोष्ट अद्याप कांहींच दिसत नाहीं, यास काय करावें? आह्मांसच कारभार सांगावा असें आमचें ह्मणणें नाहीं, जो चित्तास बरा वाटेल त्यासच सांगावें, आह्मी सर्व त्याशीं रुजू राहूं, परंतु एकास पुढें करून त्याजवर भार टाकल्याव्यतिरिक्त परिणाम नाहीं, चहूंकडून चार चोटें घालतात, एकासही ठिकाण नाहीं, मुलुखाचा अथवा मामलतीचा बंदोबस्त नाहीं, मुषीरुलमुल्क यानीं तालुक्यावर ताहूद केलें तें मोडावें आणि आमानी

करावी हें आमचें मानस, नबाबाचें ह्मणणें मषीरुलमुल्क यानीं केलें त्याजपेक्षां आह्मीं अधिक करावें, नाहींतर तो कारस्थानी होता, आह्मीं खुद खावंदगिरीनें करूं लागलों आणि नुकसानी करून घेतली हा लौकिक होईल, तेव्हां काय आमचें करणें? असें बोलतात, परंतु किफायत ह्मणजे काय हें कांहींच समजत नाहींत, कागदावर रकमा वाढवून दाखवाव्या यांत फळ काय याचा विचार नाहीं, हें कोणीं समजवावें. तेव्हां त्यास ह्मटलें, असें कां करितां? तुह्मी आणि राजाजी मिळून समजावून सांगावें ह्मणजे होईल, विचार करीत बसल्यानें कांहींच होत नाहीं. तेव्हां ह्मणाले, आठ पंधरा दिवस वाट पाहतों, नाहीं तर तालुक्याचे बंदोबस्ताकरितां निरोप घेऊन कोपळाकडे जाईन. तेव्हां त्यास ह्मटलें, मग आह्मीं तरी कशास रहावें, आह्मांस निरोप देववा, मग तुह्मीं जावें. असें बोलतों इतक्यांत नबाब बरामद झाले. मग सारेच उठून तिकडे गेलों. चालतांना त्यास ह्मटलें, तुह्मीं कांहीं सांगणार होता तें काय? हळूच बोलले कीं, राजाजी जवळ आहेत, बोलूं नये. राजाजीवेगळ बोलावें हें त्याचे मनांत. परंतु अवसर नाहीं. राजाजी याचें मानस कारभारांत आपण असून साऱ्यावर चर्च असावें. मीर अल्लम याचे मनांत आपण साऱ्यावर चर्च असावें. हे आंतील प्रकार खरोखर आहेत. राजाजी याची पेप नबाबाजवळ विशेष आहे. परंतु धर धरून बोलण्यास हिम्मत होत नाहीं आणि वजन पडत नाहीं. अशा नाना प्रकारच्या तिढणी आहेत. आणखी बहुत विस्तार किती लिहूं? गोपवारा लिहिला आहे. राजे रेणूराव यास हिताच्या गोष्टी सांगून कांहीं वळणावर आणिलें आहे. आणखी शोध करून वळणावर येतील. त्याची प्रकृत सरळ आहे. परंतु सोबती चांगले नाहींत. याजमुळें बुद्धीस भ्रंश होतो. वास्तव्य खुनशी नाहीं. प्रस्तुत काळीं रघोत्तमराव प्रथमच विचारांत पडले आहेत. पहिल्यानें विचार करून ठेवणी राखून खावंदाशीं बोलावें तें बोलले नाहींत. भरीं भरून चित्तास येईल तसें बोलत गेले. आतां उलगडणें कठीण पडलें. एषा प्रकार. २॥ छ २८ जिल्काद. हे विज्ञापना.

[१९] श्री. १६ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नबाबांनीं खरड्याहून एक पत्र सरकारांत लिहिलें होतें कीं, आह्मींच तेथें येतों. तेवेळेस मीर अल्लम याचे विचारें जाब लिहिला कीं, मुनाफ़ा नाहीं, तनहा यावयाचें करावें. नंतर पुन्हां असें ठरलें कीं, असा जाब लिहूं नये. फडच्या झालियावेगळ आपलें येणें सल्लाह नाहीं. दोन्ही पत्रें मजकडे पाठविलीं, आणि आज्ञा केली कीं, यांत सल्लाह चांगली असेल ती समजून जें पत्र देणें तें द्यावें. नंतर दुसरें पत्र होतें तें मी दिलें. पहिलें पत्र दिलें नाहीं. तो विचार मीर अलम याशीं विश्वासानें सरकारांतून झाला. ती गोष्ट यांनीं नबाबास समजाविली कीं, हजरतीनीं पत्र पाठविलें. आपले येण्याविषयीं त्याचा जाब मीं मदारुलमहाम यांशीं बोलून ऐसा ठरविला कीं, तनहा यावें यांत फार काम होतें, हजरत जर येते तर त्यास मुरुवत पडून मुलुखाची बाबत अगदीं मौकूफ होत होती, त्यास हीं पत्रें मदारुलमहाम यांनीं गोविंदराव यांजकडे पाठविलीं तीं त्यांनीं हजरतीस दिलीं नाहींत असें होऊं नये, दुसरे तऱ्हेचें पत्र यावें असें गोविंदराव यांनीं लिहिलें, मदारुलमहाम यांनीं दुसरें पत्र लिहून पाठविलें, आणि असें लिहिलें कीं, दोन्ही पत्रें तुह्मापाशीं आहेत, जें देणें तें द्यावें, जर हजरतीचे येण्याविषयीं मीं राजी करून जाब लिहविला, तें पत्र पोहोंचून हजरत येते, तर मुरुवतीनें मोठें काम झालें होतें, हें न होण्यास मूळ गोविंदराव, ऐशीयाचीं कर्मे असतां आपण त्यास दौलतखाह कसें ह्मणतात, मला तर असें वाटतें कीं, त्यास हजरतीनीं आपलेजवळ ठेवणें सल्लाह नाहीं, हजरतीचे दौलतीस घात आहे. याप्रमाणें चित्तास येईल तसें समजावून पुढें बोलतात कीं, कदाचित् हजरत ह्मणतील कीं, राव पंत प्रधान व मदारुलमहाम यांनीं गोविंदराव याजविषयीं आड धरिली, यास कसें करावें, त्यास याविषयींची काळजी हजरतीनीं करूं नये, गोविंदराव यांनीं या कामांत असावें, याविषयीं त्यांसही संतोष नाहीं, याचें साधन मी करून देईन. ऐसा

बीर दिला. याविषयीं सरकारांत व राजश्री नानांस पत्रें लिहून द्वारातर्रें पाठवावीं, ऐसाही विचार होत आहे. रा। छ २८ जिलकाद. हे विज्ञापना.

छ ८ जिल्हेज, मुा भागानगर
रवाना टप्यावर.

[१६] श्री. २६ जून १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीं.—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ता। छ ८ माहे जिल्हेजपर्यंत मुा भागानगर येथें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानाची विनंति पेशजी लिहून पत्राची रवानगी केली आहे. त्याजवरून ध्यानांत आलें असेल. हल्लींचे प्रसंगींचें वर्तमान अलाहिदा पुरवणीपत्रांत लिहिलें आहे. अवलोकनानें ध्यानांत येईल. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

१७] श्री. २६ जून १७९९.

विनंति विज्ञापना. इसामिया याजकडे पेशजी नलगुंडा, देवरकुंडा वगैरे भवानगिरी सरकारचे महाल आहेत. अलीकडे वरंगळ, खमम वगैरे त्यांचे लगते तालुके त्याजकडे सांगण्याचा बेत ठरून बोलणें होत आहे. तिमलराव सुरापूरकर याजकडे नवे महाल कनकगिरी, गजेंद्रगड वगैरे यांचें बोलणें लागलें. बादमहालीच्या सनदा खिलत नाहीं. महमद अमीखान याजकडे कडपे तालुका आसदअलीखानाकडील सांगून खान मजकूर यास पेशजी रवाना केलें. तालुक्यांत गेले. आसदअलीखान याजकडे गुडमठकल, नारायणपेठ, बैंगलपली इतके राहिले. खान मजकूर याचें बोलणें आणिक तालुक्याप्रकरणीं आहे. त्यावरून मंगथळ वगैरे चार महाल सांगावे अशीही योजना आहे. अद्याप कोणताही निश्चय नाहीं. होईल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल. रा। छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[१७] श्री. २६ जून १७९९.

विनंति विज्ञापना. मृगनक्षत्र निघाल्यानंतर दोन तीन पर्जन्य हैदराबाद प्रांतीं पडले. येथें शहरांतही दोन पाऊस बरेच झाले. मुसा नदीस पाणी आलें. तलाव भरपूर होऊन नहर अद्याप ज्यारी नाहींत. पेशजी येथें गल्ल्याची धारण होती त्याजहून विशेष स्वस्ताई व्हावी ह्मणून महसूल नानकराम करोड्याचे अमलांत चालत होता; त्या बमोजीब घ्यावा ऐसा बेत ठरला होता; परंतु महसूल अद्याप कमी न होतां अलीकडील शिरस्त्या बमोजीब चालतो तसाच आहे. हल्लीं धारणीची गिराणी तांदूळ सात शेर, गहूं हरभरे नऊ शेर, जोरी अकरा शेर, कडबा साडेपांच रुपये शेंकडा, या अन्वयें निरख प्रस्तुतचा आहे. रा छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[१८] श्री. २६ जून १७९९.

विनंति विज्ञापना. हवेलीचें नवें काम गनीयारखान यांनीं तयार केलें तें नबाबांनीं पसंत करून बहुतकरून त्याजागींच दरबार होत असतो. छ २४ रोज शुक्रवारीं तेथें जनान्याचा बंदोबस्त करवून मीना बाजार भरविला. जंगाली कमानी दरवाज्यासमीप नबाब बरामद झाले. बेगमात आशीक येऊन मिठाई वगैरे जिनसांची खरेदी झाली. एक प्रहर झाली. एक प्रहरपर्यंत निष्कृत्त राहून बरखास झाले. रा छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[१९] श्री. २६ जून १७९९.

विनंति विज्ञापना. छ २२ माहे जिल्काद बुधवारीं नबाबाची साल-गिरेचा दिवस. नजूमियास बोलावून साअत पांच घटिका रात्रींची ठरली. तयारीविषयीं गनीयारखान यांस सांगितलें. नेमाप्रमाणें रात्रीं पांचवे घटिकेस हाकीम जाफरखान व गनीयारखान हजर झाले. गुल अनारी रंगाचा पोषाग व जवाहीर, सरपेच, जिगा, कंठी, दस्तबंद, भुजबंद घेऊन हकीम मजकूर यांनीं सालगिरेची गांठ नबाबास बांधिली. बाहेर

आल्यानंतर त्यांनीं नजरा केल्या. दुसरे दिवशीं अलीजाहा बहादूर व शिकंदरजाहा सुभानअल्ली वगैरे सर्व साहेबजादे व बसालतजंग यांचे पुत्राची याद केली. हजर झाले. त्यांच्या नजरा झाल्या. फुलाचे हार त्यास दिले. प्रहर दिवसा ते आपलाले हवेलीस गेले. सालगिरेचा समारंभ चार पांच दिवस नित्य नजरा होत आहेत. रा छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[२०] श्री. २६ जून १७९९.

विनंति विज्ञापना. शिंदे यांजकडील राजश्री जिवाजी बल्लाळ यांचे जमीयतीपैकीं कित्येक पायदळीचे लोक त्यांनीं बरतर्फ केले. ते इकडे नवाबाचे सरकारांत येऊन इसामिया वगैरे यांजकडील सरदारांनीं दरमहा करून ठेविले. कमकसर दोन हजार तिकडील पायदळ लोकांची जमीयत यांनीं आपल्याकडे ठेविली. याशिवाय स्वारही कांहीं कांहीं येतात. त्यास ठेवीत आहेत. पेंढारी याजबराबर सरकारच्या पागा देऊन हिंदुस्थानांत रवाना केले. त्यांजपैकीं कांहीं पेंढारी पळाले. दोन तीनशें प्रस्तुत येथें आले आहेत. त्यांस लावून देणार आहेत. आणखी येतील कीं काय पहावें. रा छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

प्रतदफा

[२१] श्री. २६ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नवाबाकडे सांगून पाठविलें होतें कीं, मला कांहीं अर्ज करणें आहे. तेव्हां त्याचा निरोप आला जे तनहाईंत बोलावयाचें किंवा कसें? जर तनहाईंत बोलावयाचें असें सांगून पाठवावें तर विप्र आणि यवन वाईट मानतील. आणखी कोणादेखत बोलावें तर किती एक गोष्टी बोलतां येत नाहींत. दोहींकडूनही अडचण. तेव्हां सांगून पाठविलें कीं, जशी आपली मर्जी. नंतर दरबारास गेलों. इमतीयाजउद्दवला, भाचे वगैरे कुल जमा झालें होतें. मी जातांच नवाब उठून माडीवर चालले. मला बोलाविलें. मीरअलम आणि राजे रेणूराव व रघोत्तमराव तिवर्गांस बोलाविलें.

वरतें जाऊन बसल्यावर, मी प्रश्न केला कीं, मला येऊन महिना होत आला, अद्याप एका गोष्टीचाही जबाब नाहीं, लोकांत नानाप्रकारच्या आफवा उठतात, इंग्रजांशीं राजकारण चाललें आहे, बादजबरसाद तदारुख करावा ऐसाही बेत होत आहे, ही गोष्ट बुद्धीनें ध्यानांत येत नाहीं, परंतु आफवा फार आहे, याची आखबर खावंदास अलबत गेली असेल, माफक पत्र अद्याप कांहींच नाहीं, तेव्हां त्याचे मनांत अंदेशा येईल, मजवर शब्द येतो, त्यास मीं खावंदास काय लिहावें? जसें आपण सांगतील तसें लिहीन, करारमदार झाले, त्याजवर अम्मल होईल किंवा कसें? याजवर नबाब बोलले कीं, आफवाई गोष्टीवर मदार नाहीं, आणि मनांतही कांहीं न आणावें, तशी गोष्ट व्हावयाची नाहीं, आणि करारमदारांत अंतर करावयाचें नाहीं. ऐसें बोलून मीरअलम व राजे रेणूराव यांजकडे पाहून बोलत असतां मजकडे अवलोकन करून बोलत होते जे, खरड्याचे मुकामीं जें तुह्मांशीं बोलत गेलों तें दौलतखाह ह्मणून बोललों, पूर्वीं राक्षसभुवनची लढाई झाली, तेवेळेस तुमचे तीर्थरूप कृष्णरावजी होते, आह्मीं औरंगाबादेस गेलों, रघुनाथराव व माधवराव उभयतां सरदार तुमचे येथील, त्यांनीं दहा लक्षांची जहागीर तवाजा करून समजाविष केली, कृष्णरावजी आले होते, त्या गोष्टी आमचे मनांत साबीत होत्या, ह्मणून कृष्णरावजी यानीं आमचें वचन घेतलें कीं, मातुश्री गंगाबाई गरोदर आहेत, सर्व सेवक लोकांस उमेद अशी आहे कीं, आह्मांस खावंद होतो, याजकरितां आपली मदत सर्व प्रकारें असावी, त्यावेळेस हे श्रीमंत गर्भांत होते, काय होईल न होईल याचा अंदेशा न करितां आह्मीं मदतगारी केली, त्या गोष्टी झांकल्या नाहींत, तेच श्रीमंत आतां आहेत, मदारुल्महामही ते वेळेपासून माहीत, जे कृष्णरावजी तेच तुह्मीं, दौलतखाहीस उचित तें सांगावें ह्मणून खर्ड्यावर तुह्मांस ह्मटलें, आह्मीं जरीदा भेटीस येतों, असें पत्र मदारुलमहाम व रावपंत प्रधान यांस लिहिलें होतें, त्याचा जबाबही तयार झाला, परंतु आह्मांस पावला नाहीं, कोठें राहिला असेल तो असो, पुढेंही तुह्मांस दौलतखाही मंजूर असेलच. असें खोंचून बोललें. याचें उत्तर दिलें जे,

'इतक्या गोष्टी फर्माविल्या ह्या खऱ्या, ह्या सर्व गोष्टींची कैफीयत श्रीमंतांस आहे, मदारुलमहाम यांनीं तर जातीनें वहिवाटच केली, तेव्हां याचें विस्मरण कसें होईल? नित्य हेंच त्याचें ह्मणणें जें हजरतीची आमची दोस्ती आणि इतेहाद पूर्वींपासून जो आहे त्यांत खलष न यावा, जे खलष आणीत असतील त्यांचे कोते अंदेशावर नजर न देतां तनहाईंत सफाई व्हावी, मामलतीचा जाबसाल वाजवी फडच्यांत यावा ह्मणजे आणखी कांहीं आह्मांस दरखास्त नाहीं, दूरदेशीचे मार्गे ही गोष्ट हजरतीचे मनांत न आल्यास आमचा उपाय नाहीं, मामलत तर उगविली पाहिजे, यासाठीं खिसारा फौजेस पडेल तर ही बाबत मुलुखावर आहे, हजरतीशीं आह्मांस दुसरा प्रकार करावयाचा नाहीं, असें मरातीब हमेष बोलण्यांत येतें, हेंच मीरअल्लम व राजे रेणूरावजी तेथें होते त्यांस पुसावें, तेव्हां उभयतांनीं रुकार दिला, माझे बोलण्यांतही हमेषा असेंच आलें होतें, परंतु कारपरदान याचा अर्ज आपल्यास मान्य पडून इरादा लढाईचा धरिला, त्यासमयीं श्रीमंतांची आज्ञा मला झाली कीं, आमचा इरादा नबाबाशीं विपरीत नाहीं, असें असून त्याचा कस्त लढाईचा असल्यास वचनप्रमाणाशिवाय गोष्ट झाली, याचा हवाला ईश्वरावर आहे, ज्यास ईश्वर यश देईल तें खरें, करारमदाराची गोष्ट राहिली नाहीं, आपले कानूनी गोष्ट प्राप्त, हजरतींनींच वचनावर दृष्ट ठेविली नाहीं, तेव्हां आज आमचें बोलणें आहे तें निश्चयाचें मानूं नये, घांट उतरल्यावर तो मोहराच अल्लाहिदा, इतक्या बाबती अर्ज करण्यांत आल्या, परंतु याचा विचार न झाला. ईश्वराचे इच्छेस आलें तसें झालें, नंतर खरड्याचे मुक्कामीं मला आपण श्रीमंतांकडे पाठविलें तेसमयीं श्रीमंतांस विनंति जे करावयाची ते रदबदलीनें फार केली, तेथील आज्ञा झाली कीं, आमचेकडून कोणतीही आगळीक झाली नाहीं, जे पर्याय सुचविण्याचे ते पूर्वींच सुचविले, परंतु मनांत कांहींच न आलें, कारभारी यांची वांकडी चाल, त्याजवर आमची दृष्ट नव्हती, नबाबाचे जातीवर मदार होती, नबाब आपले तोंडानें न बोलावयाच्या गोष्टी बोलूं लागले, त्यांत कांहींच आह्मांस उमेद राहिली नाहीं, इतके दिवस परभारें

दवलतीवर एहसान होत गेली, आणि दुनयाईंत दोही दौलतींची एगानगत मषहूर तें सर्व विस्मरण झालें, खानदानाची रीत होती तीही सोडली, दुस्मानही कोणी असा इरादा करणार नाहीं, तो इरादा आह्मांवर धरिला, कदाचित् तशीच गोष्ट कल्पनेंव्यतिरिक्त झाली असती तर कसा प्रसंग येऊन पडता? त्यावेळचें ध्यानाचें स्मरण करावें, नवाबानीं तर आपण बुजुर्गीस लाजीम तो मार्ग सोडला, तेव्हां त्या गोष्टीचा मुकाबला आह्मीं केली, यास ईश्वराचा शब्द आह्मांकडे नाहीं, असें असूनही तुह्मीं रदबदल करितां, आणि श्रीमंत आपले खानदानावर दृष्टी देऊन कदीम दोस्तीचें विस्मरण न करितां रदबदलीनें ठराविलें, आह्मीं आपलेकडून एहसानास कमी केली नाहीं, हेही बाबत सर्व सरदारांचे मनास येत नाहीं, बदलखातर हजरतीचे एवढ्यावर ठराव झाला, याप्रमाणें मदारुलमहाम यांनीं दौलतखाही करून दाखविली, याजउपर आजराहे दोस्ती दोहीं दौलतीचें नुकसान न व्हावें हाच इरादा आहे, जरीदा मुलाकातीविशी हजरतींनीं पत्रें लिहिलीं, त्याचा जवाब तेथून आला तोच हजरतीस मी गुजराणिला, मध्यें कशास ठेवावा? ठेविला नाहीं, याजवरही परभारे मुलाकात होण्याची बाबत श्रीमंतांपाशीं ठरावून आलों, त्यांनीं आज्ञा केली जे भोसले आणि शिंदे, होळकर यांसमवेत भेटीचा प्रकार ठरवा, नाहींतर ठीक खुषनुमा दिसणार नाहीं, आह्मीं सिद्ध आहों, हा मजकूर हजरतीपाशीं केला, हजरतींनीं फरमाविलें कीं, फिलहाल मौकूफ करावें, बादज बरसात खुषीनें मुलाकती होतील ऐसें आपणच ठरवावें, तेव्हां बोलिले कीं, खरें आहे, कोणतीही गोष्ट आपणास छपावून ठेविली नाहीं, ऐवजाची किस्त ठरली याची खातरजमा कशी करावी ह्मणून कलंबचे मुक्कामास मागती पुसलें, तेव्हेळेस आज्ञा झाली कीं, जो ठराव झाला त्याप्रमाणें खातरजमा तुह्मीं करावी, त्याजवरून मीं श्रीमंतांची खातरजमा केली, येथें आलों तों कांहींच दिसत नाहीं, हें अपूर्व आहे! याजवर बोलणें झालें तें अलाहिदा लिहिलें आहे. रा॥ छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

[२२] श्री. २१ जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नवाब बोलले कीं, तुह्मीं गेले तेवेळेस तुह्मांस सांगितलें होतें कीं सोडचिठ्या तालुक्याच्या आपलेबरोबर घेऊन याव्या, त्या अद्याप आणल्या नाहींत, मुलुखाची खराबी फार झाली, किस्तीचा तगादा करितां कित्येक बाबती आमचे सरकारच्या फडच्या होणें आहेत, त्याची काय वाट? मामलतीचा ऐवज तुमचा किती होतो हें पाहणें आहे, जप्तींत ऐवज गेला आहे तो मजूरा देणें, याचा उलगडा कसा होता आणि करिता? सांगावयाचें उत्तर दिलें जे, सोडचिठ्या तयार झाल्या, आज उद्यां रवाना होतील, किंवा झाल्या असतील, रघोत्तमराव यांचीच खबर आली, पुसून घ्यावें, कामें कित्येक फडचे होणें त्यास वाजवी असतील तीं काढावीं, जाबसाल करून हिशेब पाहणें, त्यास करारांतच आहे, हिशेबीं जें जिकडे अधिक उणें निघेल तें द्यावें घ्यावें, मुजाका नाहीं, परंतु किस्तीस इतकी घर्त कशास पाहिजे, याजमुळें टाळाटाळ दिसते, याजकरितां कराराप्रमाणें अमलांत यावें, आजच असें आपण ह्मणतात तेव्हां त्यांचे मनांत काय येईल, सोडचिठ्याविषयीं गुंता असला तर लिहून पाठवितों. तेव्हां बोलले कीं, लवकर चिठ्या आणवाव्या, किस्तीचे ऐवजास न्याय दाद झाली पाहिजे, लावणीचे दिवस, मामलेदारास सोडचिठ्या देऊन खातरजमा करावी, तेव्हां ऐवजास ठिकाणा होईल, मषीरुलमुल्क यांनीं करोड रुपये खर्च केला, शिल्लक पहावी तर कांहींच नाहीं, आसदअल्लीखान याजकडे लाखो रुपयांचा हिशेब येणें तो बगला उचलून दाखवितो, जें होतें तें शिपायास दिलें, मजपाशीं काय आहे? असें स्पष्ट बोलणें, यास कसें करावें, त्या चिठ्या लवकर आणवाव्या, ह्मणजे तजवीज करावयास येईल. लवकर आणवितों ह्मणून उत्तर दिलें. सारांश टाळाटाळीच्या गोष्टी! चिठ्या आल्या ह्मणजे लवकर ऐवजाची तरतूद करतील असें दिसत नाहीं. परंतु आपलेकडून बोलावयास नीट चिठ्या दिल्या. आतां कां हप्त्याचा ऐवज येत नाहीं. यास्तव चिठ्या पाठवावयासी आज्ञा व्हावी. रा॥ छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

[२३] श्री. २६ जून १७९५.

विज्ञापना ऐसीजे. नबाब बोलले कीं, राजाजी व तुह्मीं मिळून दमऱ्या-बादज मुलाकतीचा नक्षा ठरवावा. मीं ह्मटलें, उत्तम आहे, एक अर्ज करितों, हा समजून घ्यावा. श्रीमंतांकडील तहनामा व बेलभंडार मज-बरोबर आहे, दिवस पाहून घ्यावा, हजरतीकडील तहनाम्यांत कांहीं हर्फ नीट करावयाचें तें करून तिकडे पाठवावा, पहिले किस्तीचा वायदा जवळ आला, आतांपासून तजवीज करावी, आणि किस्त लष्कर पोहों-चावी, ह्मणजे कराराप्रमाणें अंमल होत चालला, तिकडे खातरजमा पटत जाईल, पुढें मुलाकतीचा बेतही ठरवावा, ही चाल बरी दिसते. तेव्हां मीर अलम बोलले कीं, तहनामा दोस्ती खुलाशाचा ठरणें तो मुलाकतीचे वेळेस रुबरू ठरेल तो चांगला कीं नाहीं? आह्मीं ह्मटलें, बाकी ठरण्यांत काय राहिली? ठरून चुकली, हजरतींनीं तर दिलीच आहे, त्यांत कांहीं हर्फ नीट करावयाचें तें केलें ह्मणजे झालें, तिकडील तर मजपाशीं तयारच आहे, ठरावांत आलें असतां न होणें हें ठीक नाहीं, याज-करितां ह्मणतों. असें बोलल्यावर, बरें आहे, मुकाबला पाहिला. इत-केंच बोलले. सोडचिठ्या लष्कर आणवाव्या, ह्मणून दोन चार वेळ सांगितलें. त्यास सोडचिठ्याचे रवानगीविषयीं आज्ञा झालीच असेल. रा॥ छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[२४] श्री. २६ जून १७९५.

विज्ञापना ऐशीजे. येथील चाल ठीक दिसत नाहीं. राजाजी व मीरअलम व रघोत्तमराव त्रिवर्ग मिळून नबाबाशीं बोलले. त्यांतील दोन प्रकार ऐकण्यांत आले.

१. एक प्रकार ऐसाजे. गोविंदराव कृष्ण याशीं आज सक्तीनें बोलूं नये. आजच सावध होतील. आपले येथील सरदार लोक कित्येक फितुरी आहेत. ते काढून बंदोबस्त केला पाहिजे. नवी जमयत जमा झाली पाहिजे. भोसले, शिंदे, होळकर हे पुण्यांत आहेत. यास

रुकसती झाल्या नाहींत. त्यांची रुकसत होऊं न द्यावी तोंपर्यंत यास नाद लावून ठेवावा. ह्मणजे हे वडेवाकडे लिहिणार नाहींत. त्यांच्या रुकसती झाल्यावर दाव घालून दावाचे पोटीं कारभार करावा.

१. दुसरी मसलहत. गोविंदराव कृष्ण यास या कामांतून काढावें, याचा प्रयत्न करितों, तोंपर्यंत ओढ धरावी. प्रयत्न साध्य असाध्य हें समजेल त्याप्रमाणें करावें. तोंपर्यंत यांस दुखवूं नये. गोड बोलून नाद लावावा. पुढें पहावें तसें करावें.

२

दोन कलमें. यांतून कोणतें असेल तें असो. त्यास मीं पुढें याशीं कसें बोलावें. सख्त बोलून दाबल्याखेरीज काम व्हावयाचें नाहीं. सरकारचीं पत्रें नबाबास यावीं कीं, कराराप्रमाणें फडचे करावे, यास दिरंग लावून तफावत होणें दोस्तीचे आलमांत दुरुस्त नाही, गोविंदराव कृष्ण यास लिहिलें ते बोलतील, ऐसें पत्र यावें. याची सल्लाह कशी? मीं कसें बोलावें? याविषयीं आज्ञा आली पाहिजे. रघोत्तमराव यांनीं यांस समजावलें आहे कीं, शिंदे मदारुलमहाम यांशीं बहुत खपा आहेत. पैका फौजेचा बहुत चढला आहे. मदारुलमहाम देत नाहींत. याजमुळें खपा. तसेंच होळकर काय बखेडे पाडतात पहावें. त्या नादावरही लागले आहेत. रा। छ ८ जिल्हेज. हे विज्ञापना.

छ १० माहे जिल्हेज

मु॥ भागानगर रवाना टप्यावर.

[२१] श्री. २८ जून १७९१.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १० माहे जिल्हेजपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. छ० ९ माहे मजकुरीं पिछली

रात्र चार घटका बाकी असतां अलीजाह बहादूर, नबाबाचे ज्येष्ठ पुत्र यांस सदाशिव रड्डी व हैदराबादचे सुभेदार नाजीमजंग, नबाबाचे जावाई, यांनीं शहरांतून हवेलींतून काढून नेलें. प्रातःकाळींच वर्तमान समजलें. नबाब उठून तेच वेळेस बसले. सरदारांस बोलावणीं पाठविलीं. दुसरे साहेबजादे तिघे त्यांस बोलाविलें होतें. दोनप्रहरपर्यंत सर्व लोक होते. शहरचे दरवाजावर पहारे, वाड्याभोंवतें गारद नबाबानीं उभी केली. कांहीं हवेलीच्या आंतही घेतली. बंदोबस्त बराच केला. अलीजाह कोणीकडे गेले, याचा पत्ता अद्याप लागला नाहीं. समजल्यानंतर लिहून पाठवीन. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

छ १२ जिल्हेज मु॥ भागानगर.

रवाना टप्यावर.

[२६] श्री. ३० जून १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदकृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १२ जिल्हेज मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीजाह येथून निघून गेले; ह्मणून सरासरी वर्तमान छ १० जिल्हेजीं सेवेसीं लिहून पाठविलें आहे. त्यानंतर तहकीक वर्तमान ऐकण्यांत आलें तें अलाहिदा पुरवणी पत्रांत लिहिलें आहे. त्यावरून ध्यानांत येईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[२७] श्री. ३० जून १७९५.

विज्ञापना ऐसीजे. राजश्री रघोत्तमराव छ १० जिल्हेजीं तृतीय प्रहरीं मजकडे आले. त्यांचें जबानीं वर्तमान कळलें कीं, सदाशिव रड्डी शहरापासून पांच कोस दरयाजवळ उतरला होता. ते दिवशीं त्यानें राजे रेणूरावजी यास तृतीयप्रहरीं चिठ्ठी पाठविली जे, लांब उतरलों, जागा ठीक नाहीं, याजकरितां आनंदगिरीस येऊन राहतों.

नबाबास असें करून उत्तर पाठविणार होते. त्याच रात्रीं ह्मणजे छ ९ तेरिखेस मंदवारीं प्रहर रात्र अवशेष असतां रड्डी मजकूर आपले जमयतीनिशीं नडग्याचे दरवाजानें कुलुपें तोडून किंवा उचडून दरवाजाच्या आंत येऊन रस्त्यानें शहरांत आले. नाकेबंदी ज्याचज्या केली. आणि आलीज्याहा यांचे दरवाजावर येऊन उभे राहिले. तेवेळेस अलीजाह यांनीं नबाबाकडे चोबदार याजबरोबर सांगून पाठविलें कीं, माझे दरवाजापुढें स्वार येऊन उभे राहिले आहेत समजत नाहींत. तेव्हां नबाबांनीं सांगून पाठविलें कीं, तुह्मीं आपले ठिकाणीं सावध मजबूत असावें. इकडून बंदोबस्ताकरितां लोक पाठवितों. नंतर दुसरा चोपदार अलिजाहा यांनीं पाठविला कीं, स्वार आले, त्यांनीं जबरदस्तीनें मला बाहेर काढलें, त्यास हजरतीची माझी भेट झाली पाहिजे. याचा निरोप नबाबांनीं पाठविला कीं, तुह्मीं कसेंही करून मजपाशीं यावें. त्यानंतर पुन्हा साहेबजादे याजकडील चोपदारानें येऊन सांगितलें जे, त्या स्वारांनीं हजरतीचे दरवाजापुढील जिलौखान्यांत आणिलें, दरवाजा खुला करावा ह्मणजे येतों. तेवेळेस नबाबाचा निरोप गेला जे, तुह्मीं एकटे दरवाजाजवळ यावें, ह्मणजे आंत घेऊं. त्यानंतर काय विचार केला न कळे. शेवटचा निरोप आला कीं, मला एकट्यास येऊं देत नाहींत, घेऊन चालले. याप्रमाणें सांगून पाठवून प्रातःकाळचे घटिका दोन घटिका रात्रीं जमीयतसुद्धां नडग्याचे दरवाजानें निघून गेले. प्रथम इरादा त्यांचा असा होता कीं, छ १० तेरखेस बकरी ईदेचा दिवस, ते दिवशीं नबाब इदग्यास येतील, इदगा अनंतगिरीचे सुमारें आहे, रड्डीनें अनंतगिरीहून येऊन तेथें हजरतीस दगा करावा. इदग्यास नबाब येत नसतात, अशी बातमी कळलियावर दुसरा मनसुबा करून अलिजाहास घेऊन येऊन हवेलींत शिरून दगा करावा असा बेत केला होता परंतु साध्य न झाला. अवसर थोडा याजकरितां निघोन गेले. समशेरजंग यांचें येथें तेसमयीं चोपदार अलिजाहा यांनीं पाठविला कीं, तुह्मीं येऊन हजर होणें. त्याचा जबाब त्यांनीं दिला कीं, हजरतीचा हुकूम झाल्यावेगळ माझें येणें होणार

नाहीं. तेवेळेस रघोत्तमराव यास मीं सांगितलें कीं, माझे येथें एक चोपदार अलिजाहाकडून आला. पाठीमागून कांहीं स्वार दरवाजावर आले. चोपदारानें निरोप सांगितला कीं, कांहीं बोलवा हजरतीचे हवेलीवर झाला आहे. सर्व येऊन हजर झाले. तुह्मींही लवकर यावें. त्यावेळेस दरवाजाच्या कड्या लागल्या होत्या. आह्मीं चोपदारास सांगून पाठविलें कीं, रात्रीचा विषय, काय आहे हें समजत नाहीं, आपचें येणें होत नाहीं. तेव्हां चोपदार गेला. नंतरचे समजलें नाहीं. माझे येथें चोपदार आलियाचें वर्तमान झालें तें मशारनिल्हेस सांगितलें. चोपदार पाठवून सांगून पाठविणें. दुसऱ्यानें घाबरें होऊन जाणें हें वाटविण्याचें लक्षण. मशारनिल्हे ह्मणाले, अजून काय झालें? याउपरि सर्वांस अलीजाह पत्रें लिहील कीं, संकेताप्रमाणें तुह्मीं यावें. अशी आफत आणावयास चुकणार. आपण जिवावर उठल्यावर दुसऱ्याचे जिवाची परवा त्यास काय? खावंद समंजस आहेत. इतकी गोष्ट खरी ह्मणून बोलण्यांत आलें. सारांश अलीजाह यांचे सोबती सदाशिव रड्डी, शहरचा सुभा नाजीमजंग, नबाबाचा जांवई, आणि सैफजंग गुढूरवाले-त्याचे लेक यास किताब तोच आहे असे ऐकण्यांत—चार हजार पायदळ, आणि हजार स्वार, सदाशिव रड्डीचे सुभा, आणि सैफजंगवाले मिळून दोन तीन हजार स्वार, कांहीं पायदळ, याप्रमाणें जमीयत अलीज्याहाबरोबर गेले. पट्टण, चरू, सदाशिव पेठ, संगारडी पेठ, रड्डीचाच तालुका तिकडे गेले. अशी बातमी नबाबाचे सरकारांत आली. नबाबाचा निरोप स्वामीस लिहावयाकरितां मशारनिल्हेनीं सांगितला तो अलाहिदा लिहिला त्याजवरून ध्यानांत येईल. रा। छ १२ माहे जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[२८] श्री. ३० जून १७९१.

विज्ञापना ऐसीजे. रघोत्तमराव यांस विचारिलें कीं, पुढें तजवीज काय ठरली. त्यांनीं सांगितलें कीं, राध्यां येथें फौज जुजबी आहे.

ज्याचज्या सरदार निरोप घेऊन गेले त्या सर्वांस बोलावणीं गेलीं कीं, आपले जमयतीनिशीं हजर होणें. दहा हजार फौज नवीन ठेवावयास हुकूम झाला. दहा बारा हजार पायदळ मुसारेमूस वगैरे सध्यां आहे. आणखी ज्याचज्या आहे तेंही लवकर करविलें आहे. फौजा लवकर पिछावर पाडविणार. आपल्यास हजरतींनीं सांगून मला पाठविलें कीं, जाला मजकूर याचे तंबीची तरतूद होत आहे, तुह्मीं श्रीमंतांस व मदारुल यांस लिहावें कीं अलिज्याहा फरारी झाले. निगादास्त करतील, त्यांस श्रीमंतांचे तालुक्यांतील लोक नोकरीकरितां जातील, त्यांस सर्वांस ज्याचज्या ताकीद व्हावी कीं कोणी तिकडे जाऊं नये, गेल्यास सरकारचा गुन्हेगार, याप्रमाणें लवकर तुह्मीं लिहावें, या मुकदम्याविषयीं पारशी पत्रें खरिता तयार झाला ह्मणजे पाठवून देऊं, पूर्वीं याप्रमाणें तुह्मीं लिहून पाठवावें. असें राव मशारनिल्हेनीं सांगितलें. उत्तम आहे, हुकुमाप्रमाणें लवकर लिहून पाठवून बंदोबस्त करवितों, असा अर्ज करावा, ह्मणून त्यास सांगितलें. स्वामीस विनंति लिहिली असे. नबाबाची दोस्ती, घरगुती काम, ह्मणून नबाबानीं सांगितलें आहे. त्यास तालुक्यांत ज्याचज्या ताकीद झाली पाहिजे. यांत नबाबाचा संतोष. स्नेहासही उचित. नबाबाकडून खरिता आतां ह्मणजे पाठवून देतों. याचें उत्तर लवकर आलें पाहिजे. प्रतीक्षा याम बहुत आहे. रा। छ १२ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[२९] श्री. ३० जून १७९९.

विज्ञापना ऐसीजे. मुसारेमू वगैरे दफेदार व त्रिंगलराव यांचे प्यादे मिळून दहा हजार जमयत यांजपैकीं कांहीं गोलकुंड्याचे किल्ल्यापुढें रस्त्याचा नाका आहे तेथें ठेविले. कांहीं गोलकुंड्याचे जवळ, कांहीं शहराचे दरवाजावर आणि ज्याचज्या सफेलीवर, कांहीं वाड्यांत आणि बाहेर वाड्याचे, याप्रमाणें नाकेबंदीनें लोक ठेविले आहेत. हुक्का नबाब दरबार करितात. लहान गोटे अमीर व सरदार यांस

ताकीद दरबारास येण्याची आहे. प्रातःकाळीं चार सहा घटिका दिवसां निघून दरबार करितात तो दोनप्रहरपर्यंत. दोन घटिका रात्रीं-पासून दोन प्रहर रात्रपर्यंत. नंतर चौकीचे लोक ठेवून आपण निद्रेस जातात. इफ़तियाजुद्दौला भाचे व नफ़रुद्दौला उभयतांस ताकीद आहे कीं, तुह्मीं रात्रीं दिवाणखान्यांतच हजर राहत जावें. त्याजवरून ते तेथेंच असतात. पागावाले याचे लोकही हजर असतात. रात्रीं दिवसां हुशारी फार आहे. नैनिगादास्त फौज ठेवावयास सांगितली त्यास मुसलमान स्वार असेल त्यास दरमहा तीस रुपये. मराठा असेल त्यास पंचवीस रुपये, याप्रमाणें ठेवावे ह्मणून परवानगी झाली आहे. इसामिया याचे लोक तालुक्यांत गेले आहेत. कांहीं थोडे आहेत, त्यास अजीजयाहा याचे पाठलागाविषयीं हुकूम झाला. त्याजवरून ते गेले होते. परंतु त्याची जमीयत फार, हे थोडे, याजकरितां पुढें जाऊं सकले नाहींत. माघारे आले. याप्रमाणें वर्तमान. रा छ १२ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[३०] श्री. ३० जून १७९९.

विनंति विज्ञापना. एहतषामजंग, नफरुद्दौला यांजपाशीं नौकर दोघे पठाण होते. त्यांची बरतरफी होऊन जंग मजकूर यांचा ऐवज त्यांजकडे फाजील निघाला असतां छ २ जिल्हेज शनवारीं अडीच प्रहर दिवसां त्यांचे हवेलींत ते पठाण दिवाणखान्यांत होते. नफरु-द्दौलाचा पुत्र अकरा बारा वर्षांचे वयाचा फारसीचा अभ्यास करीत तेथें बसला असतां त्याशीं पठाणाचें बोलणें कीं, नफरुद्दौलाशीं बोलून आह्मास फारखती देणें. मुलानें सांगितलें, हा कारभार आहे, मी लेकरूं, मजकडे काय आहे, तथापि दरबाराहून ते आल्यानंतर त्यास तुह्माविषयीं रदबदल करून पाहीन. हें बोलणें होत आहे, इत-क्यांत नफरुद्दौला दरबार करून आले ते महालांत गेले. मूलही उठून आंत जाऊं लागला. इतक्यांत एक पठाण दरवाजापाशीं

उभा राहून, एक पठाणानें तरवार घेऊन मुलास सात आठ जखमा चालविल्या. जंग मजकूर याचे खिजमतगार वगैरे धांवून दोघे पठाण धरून तुकडे करून जिवें मारिले. मुलाच्या जखमा बांधविल्या. नबाबास वर्तमान कळल्यानंतर अशील मुलाच्या समचारास पाठवून जखम-पट्टीकरितां तीन हजार रुपये देवविले. मी आपले येथील कारकून समाचारास त्याजकडे पाठविला होता. रा॥ छ १२ जिल्हेज हे विज्ञापना.

---

[३१] श्री. ३० जून १७९५.

विज्ञापना. आसद अलीखान याजकडे नवे तालुके मंगथळ, अमीराची तावड, मानखेड, चूर हे चार महाल पेशजी महमद हुसेनखान बखळे याजकडे होते ते व गोंदल, अमराबाद, नागूर, कर्नूळ, परगी हे महाल कृष्णा ऐलतीरचे करारांत आले. सनदा पत्रें होणार रा॥ छ १२ जिल्हेज. हे विज्ञापना.

छ १९ जिल्हेज मु॥ भागानगर.

रवाना टप्यावर.

[३२] श्री. २ जुलै १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीं—

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ता० छ १९ माहे जिल्हेजपर्यंत मु॥ हैदराबाद येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिली आहे. अवलोकनानें मजकूर ध्यानांत येईल. उत्तर रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

[३३] श्री. ३ जुलई १७९५.

विनंति विज्ञापना. छ १० जिल्हेज रविवारीं इदीचे दिवशीं पिछली प्रहर रात्र तेसमयीं अलीज्याह बहादूर साहेब ज्यादे यांस सदाशिव रड्डी घेऊन शहरांतून नवाबाचे देवडीवरून निघून गेला. या वर्तमानाची विनंति यापूर्वी लिहिण्यांत आलीच आहे. साहेबज्यादे निघतेसमयीं तमाम येथील सरदार, पागावाले व नफरुद्दौला, कयामन्मुलूक व आसद-अल्लीखान व समशेरजंग वगैरे व मीरपोलादअल्ली यांजकडे चोबदार अलीजाहां याजकडून बोलावूं गेले कीं, आह्मी निघालों, तुह्मी लष्कर यावें. कोणाकडे असेही निरोप गेले कीं, हजरत बरामद झाले आहेत, इदीच्या जत्रेकरितां तुमची याद केली, लष्कर यावें. अशा तऱ्हेनें बोलावूं पाठविली. परंतु रात्रीचा समय. सर्वत्र अंदेश करून कोणी बाहेर निघाले नाहींत. आपआपले घरींच राहिले. नवाबाचे देवडीपाशीं जमीयतसुद्धां आल्यानंतर अर्ज सांगून पाठविला कीं, जमीयत येऊन मला घेऊन जातात. काय इर्षाद नवाबाकडील निरोप आला कीं, तुह्मी एकले येणें. वाड्यांतील बंदोबस्त चौकी-पाहरा व दरवाजा बंद नवाबानीं करविले. चौकांतील वडाचे झाडा-खालीं घटकापर्यंत बसून चार पांच घटिका रात्र राहतां साहेबज्यादे व सदाशिवरड्डी, नाजमन्मुलूक सुभा शहरचा व सैफजंगाचे दोघे पुत्र जमीयतसुद्धां साहेबज्यादेसहित घोड्यावर स्वार होऊन, पुढें चोबदार पुकारीत, मोर्चेल होत, याप्रमाणें वाड्याचे दरवाजानें कारवान लंगर हौदावरून पट्टण, चेरूचे मार्गे गेले. मार्गांतच इदीच्या फात्या देऊन नजरा झाल्या. घटिका दीड घटिका रात्र अवशेष होती. तेवेळेस अलीज्याहां शहरांतून गेले. इसामिया याची दौड पाठीमागें गेली होती. परंतु ते मजबुतीनें स्वस्थतेनें गेले. कोणाच्यानें गांठ घालावी ही हिम्मत न झाली. रा। छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[३४] श्री. ३ जुलै १७९५.

विनंति विज्ञापना. अलीज्याहाबहादूर साहेबज्यादे शहरांतून निघून छ १० रोजीं प्रहर दिवसां लिंगपल्लीपट्टणचरू अलीकडे तीन कोस

येथें स्वारी येतांच चरईस नवाबाकडील पागेचीं घोडीं पन्नास पंचावन्न होतीं, व तीन चार हत्ती मीरअल्लम याचे वगैरे होते, ते घेतले. मार्गानें अल्ली महमदखान बीडवाला याजकडील कायत लिहिणार येत होता, त्याचीं दोन घोडीं व चार पांच हजार रुपये नगदी येत होते, ते हस्तगत केले. पट्टणचरूस जाऊन तेथील पेठ लुटली. वित्तविषय, भांडेंकुंडें, लोकांचे हातीं लागलें तें घेतलें. संगारडीस जाऊन मुक्काम केला. दुसरे दिवशीं रंगमा पेठ येथें गेले. सदाशिवरड्डी यांनीं साहेबज्यादे यांस ज्याफत व नजर केली. सैफजंगाचे दोघे पुत्र समागमें आहेत. वडील पुत्र सारमजंग यास अर्जबेगीचें काम व धाकट्यास खजानचीचें सांगून वस्त्रें खिलत दिल्हा. बेदरास कांहीं लोक, स्वार, पायदळ हस्तगत करण्याकरितां दौड रवाना केली. पिलखाना व उष्ट्रखाना चरईस तिकडेच समीप आहे तोही हस्तगत करणार. साहेबज्यादे याजपाशीं जमीयत स्वार, पायदळ मिळून दहा बारा हजार, शिवाय नवे लोक येतात. त्यांस ठेवीत आहेत. कलम ज्यारी याप्रमाणें वर्तमानें येतात. र॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[३९] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीजाह बहादूर रंगपेठेस दाखल होऊन बेदरास नाजमन्मुलुख यांस पांचशें स्वार व सातशें पायदळसुद्धां रवाना केलें. नाजमन्मुलुख तेथें जाऊन बेदरांत प्रवेश केला. सदरहू जमीयतसुद्धां बेदरचा किल्ला छ ११ जिल्हेजीं रात्रीं त्याचे हस्तगत झाला. याप्रमाणें वर्तमान आलें. याचा शोध करितां बेदर अद्याप हस्तगत झालें नाहीं. नाजमन्मुलुक जमीयत घेऊन दौडसे आणीक कोठें गेला. तहकीक समजण्यांत येईल त्याप्रमाणें विनंति लिहीन. र॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

(३६) श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीजाह बहादूर पट्टणचरूस जातेसमयीं मार्गांत डांकेचे जासूद लिंगपल्ली व पट्टणचरूस होते, ते चार जासूद

लुटले गेले. पांघरुणें, चिरगुटें जासुदांचीं त्याजकडील लोकांनीं घेतलीं. उघडे होऊन आले. त्यास खर्चास देऊन मागती टप्यावर कायम केले. रा॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[३७] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीजाह बहादूर साहेबजादे निघून गेल्यापासून शहरचा व हवेलीचा बंदोबस्त फारच झाला आहे. घटिका दिवस बाकी राहतो तेसमयीं तोफ व्हावी. तोफ होतांच दरवाजे शहरचे बंद होऊन खडकी मात्र खुली प्रहर रातपर्यंत राहते. दरवाजापाशीं गाडद ज्याबज्या ठेवून पालखी म्याना गाडी घटाटोपसुद्धां कोणाची जाऊं नये. याप्रमाणें ताकीद आहे. हवेलीचेही दरवाजे बंद करून थोरले देवडीचा मात्र एक दरवाजा खुला असतो. वाड्यांत व भोंवतें व वरील कमानींत हत्यारबंद ढाल, तरवारा, कमाना, तीर याप्रमाणें बारगिराची चौकी नेहमीं ठेविली. रायराया यास रात्रंदिवस हवेलींतच राहण्याचा हुकूम. त्याप्रमाणें नवाबाचे वाड्यांत त्याचें एक मकान आहे तेथेंच भोजन होतें. सर्वकाळ दिवाणखान्यांत हजर असतात. नफरुद्दौला व क्यामन्मुलूक तीन दिवस अहोरात्र तेथेंच राहिले. मीरअलम भोजनसमयीं घरास जाऊन येतात. पागावाले वगैरे सर्व सरदार खिळवतीचे दिवाणखान्यांत रात्रंदिवस हजर, याप्रमाणें बहुत बंदोबस्त आहे. कोणा एकाचा विश्वास व इतबार पोहोंचत नाहीं समजून, असा बंदोबस्त तूर्त प्रसंगीं आहे. गोलकुंड्याचे किल्यानजीक मुसारेमूचे लोक चौकीस ठेविले आहेत. वाटसरू येणार जाणार जासूद हरकारे यांजपाशील कागदपत्र घेऊन पहावे, येथपावेतों चौकशीही होत आहे. आपले टप्यास अद्याप हरकत नाहीं. रा॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[३८] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीजाह बहादूर साहेबजादे व सदाशिवरड्डी यांजकडे नवाबांनीं खुषरकमखान अलीजाह याचा गुरू वस्ताद यास व सदाशिवरड्डी याचा वकील पेशजी येथें दिनकरराव ह्मणून आहे त्यास या उभयतांस रुखसत त्यांजकडे जाण्याची छ १४ जिल्हेजीं दिल्ही. साहेबजादे व रड्डी याशीं बोलण्याचे पर्याय सांगितले. रवाना होणार. यांचे समागमें मेवेजातच्या बहंग्या वगैरे सरंजामही रवाना करावयास तयार झाला आहे. बक्षीबेगमही साहेबजादे याचे समाधानास जाणार, हें दाट वर्तमान आहे. रा। छ १५ जिल्हेज. हे विनंति.

---

[३९] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. येथें धारण फार महाग झाली आहे. जोरी पांच शेर, गहूं चार शेर, तांदूळ तीन शेर याप्रमाणें निरख. परंतु बाजारांत गल्ला घेऊं गेल्यास मिळत नाहीं. चहूंकडील गल्ला येथें येण्याची आमदनी बंद झाली. रस्ते तमाम बंद. वाटा चालत नाहींत. जमीदार वगैरे चोहोंकडे हंगामा. वाटसरू निभावून येणें कठीण. तेव्हां गल्ला आणि बेपारी येणें कोठून? महागाईचा कडाका आहे. याहून पुढें धारण कशी होती, दाणा मिळणें मुष्कील, अशी अवस्था. यामुळें शहरांतील लोक फारच हवालदील झाले आहेत. घटकेंत एक भाव धारणीचा वेगळाच होत आहे. रा। छ १५ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४०] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. महमद हुसेनखान घटाळे याजकडे पा। मंगथळ अमर चितावड, मानखेड, चूर हे चार महाल होते. त्याची तगिरी होऊन असदअल्लीखानाकडे महाल द्यावे, असा बेत ठरला होता. हें वर्तमान खानमजकूर यास समजल्यावरून घटाळे मजकूर पन्नास स्वारसुद्धां छ १२ जिल्हेजीं हैदराबादेस आला. व्यंकटराव सुरापूरवाल्याही आल्याचा अर्ज झाला. रा। छ १५ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४१] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. नवाबांनीं किल्ले गोवळकुंडा येथें जाऊन राहण्याची तयारी केली. छ १४ जिल्हेज गुरुवारीं असबाब लादून किल्ल्यास प्रातःकाळींच गेला. मागती सुस्तीखालीं पडलें आहे. इतक्यावर जसें ठरेल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल रा॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४२] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. नवाबांनीं बेदरच्या किल्ल्याच्या बंदोबस्ताकरितां येथून शिद्दी अबदुला-व-रुद्दौला यास सातशें गाडद व तीनशें स्वारसुद्धां रुखसत देऊन छ १४ जिल्हेजीं रवाना केलें. पट्टणचरू सदाशिवपेंठ हा रस्ता नीट चालत नाहीं. सबब शिद्दीस जनवाडे, धोबीपेंठ कुहीरचे मार्गानें बेदरास जाण्याची ताकीद होऊन रवानगी झाली. शिद्दी मजकूर कूच करून सांगितल्याप्रमाणें त्या मार्गी गेला. रा॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४३] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याहबहादूर ज्या जागीं आहेत तेथून कोणी कोणी येथें शहरांत येतात. त्यांचे जबानीं ऐकण्यांत कीं, अलीज्याहा यांनीं स्वारास शंभर रुपये व बारगीरास तीस रुपये व पायदळचे जवानास पंधरा याप्रमाणें दरमहा मुकरर केला. याजकारितां लोक येण्याची आमदनी फार. याप्रगाणें वर्तमान आहे. रा॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४४] श्री. ३ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. साहेबजादे सदाशिवरड्डी याची जमीयत दहा बारा हजार शिवाय निगादास्त ज्यारी. त्याजवर येथून सरदार जमीयत रवाना करावी. याची मसलत नवाब करीत आहेत. जमीयत येतांच

बहुतकरून असदअल्लीखान वगैरे भरणेवाईक यांची बरतरफी करविली. हल्लीं काम रुक्कर झालें. येथें जमीयत तूर्त थोडी, सबब नवनिगादास्तीचा हुकूम सरदारांस झाला आहे. जोधसिंग खदारकर यांस दोन हजार स्वार ठेवण्याचें सांगितलें. नडसी, सेवाळें, नांदापूर हे तीन महाल नफरदौलाकडील त्यास नेमिलें. मनमोहनराव पिंगळे यांस हजार स्वार ठेवण्याची ताकीद झाली. रुद्रुर पहिले जहागीर त्याजकडे होती, ते हल्लीं बहाल झाली. याप्रमाणें कित्येकांस स्वार पायदळ ठेवण्याविषयीं सांगितलें. येथून लोक जमा करण्याचा उद्योग आहे. पागाही लवकरच आणावी, हे ताकीद पागवाले यास झाली. मुसारेहमू व सुभानखान रोशनखानाचा भाऊ वगैरे सरदार लहानमोठ्यांस रवाना करावयाची नेमणूक होत आहे. मुसारेहमूचें ह्मणणें कीं, तूर्त दोन लाख रुपये दिल्यास निघणें होईल. त्यावरून लाख रुपये त्रिमलराव सुरापूरकर याजकडून त्यास देवविले आहेत. तनखाचिठ्ठी दिली. ऐवज हातास आल्यानंतर लोकांस खर्चास देऊन मुसारेमूचें निघणें होईल. लोकांचे दरमहाचा शेरा स्वारास मराठे यांस वीस, रजपूत पंचवीस, मुसलमान तीस, याप्रमाणें. यांतच कसूर व दसरोजा, वीसरोजा. याजवर लोक जमा होत नाहींत. लोकांचें ह्मणणें या दरमहावर घोडेस्वारांचें पोट भरणें कठीण, तेव्हां चाकरी कशी होती. याप्रमाणें वास्तव्य आहे. मागील नौकरीवर लोक येथें आहेत. त्यांचे आठ आठ महिने बाक्या तटल्या आहेत. त्याची तोड प्रस्तुत ज्याचे आठ महिने देणें त्यास दोनमाही ऐवज द्यावा, चार महिने बाकी त्यास एक महिना. या अन्वयें हिस्सेरसी देण्याचा डौल ठरला आहे. बाजेलोक जमा होणें सुस्तीचा प्रकार दिसतो. ईश्वरइच्छेवर आहे. लोक कबूल करीत नाहींत. रा छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४९] श्री. .३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐशीजे. नवाबानीं छ १३ तारिखेस बोलाविलें. रात्रौ गेलों. इदीची नजर करावयाची होती ती केली. नंतर अलीज्याहां यांचे

प्रकर्णीं बोलणें झालें. दोन खलितें स्वामींचे नांवाचे दिले. एकांत मजकूर अलीजाहा प्रकरणीं आहे. जे, आपल्या तालुक्यांतील लोक नोकरीच्या इराद्यानें जातील तर जाऊं नयेत, ताकीद सर्वांस व्हावी. दुसरे पत्रांतील मजकूर, अलीजाहा प्रकरणीं इंग्रजांचीं पलटणें दोन पेशजीं होतीं, त्याप्रमाणें आणविलीं, याविषयीं आणखी कांहीं संशय मनांत येऊं नये ह्मणून दोन खलितें पाठविले आहेत. त्याच मजकुराचीं दोन पत्रें राजश्री नानांचे नांवाचीं, दोन गोविंदराव भगवंत याचे नांवाचीं दिलीं तीं पाठविलीं आहेत. नवाबापाशीं बोलणें झालें त्याचा तपशीलवार मजकूर लिहून उदईक पत्रें रवाना करितों. तीं पाऊन सर्व ध्यानांत येऊन उपरांत या पत्राचीं उत्तरें यावीं. रा॥ छ १९ जिल्हेज. हे विज्ञापना.

छ १४ जिल्हेजीं नवाबांनीं पत्रें दिलीं कीं, अलीजाहा रुसून गेलेत, यास तालुक्यांतील फौज सामील होऊं देऊं नये व दोन पलटणें आणविलीं आहेत. याचे इतल्लयाचा मजकूर येणेंप्रमाणें.

फारशी पत्र.

* * *

* * *

दुसरे दफे पत्रें तीन येणेंप्रमाणें. छ १४ रोजीं.

फारशी पत्रें ३.

* * * *

फारशी पत्रें.

* *

* *

* *

छ २० जिल्हेज.
मु. भागानगर रवाना टप्यावर.

[४६] श्री. ८ जुलै १७९५

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता० छ २० माहे जिल्हेजपर्यंत मु० भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमानाची विनंति पेशजी पत्रीं लेखन केल्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानास येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

[४७] श्री. ८ जुलै १७९५.

विज्ञापना ऐसीजे. नवाबांनीं अलीज्याहा गेले या प्रकरणीं व पलटणें दोन बोलाविलीं ह्मणून दोन खलिते स्वामीचे नांवाचे दिले ते पेशजीं पाठविले आहेत. पूर्वीं मला बोलावून ह्मणूं लागले कीं, तुह्मांकडेही अलीज्याहा याचा चोपदार आला होता कीं काय? मीं ह्मटलें, आला होता, बोलिला जे हजरतीचे हवेलीवर बलवा झाला, सर्व लोक येऊन हजर झाले, तुह्मांसही बोलाविलें आहे, तेव्हां त्यास सांगितलें कीं, हुजूर येण्याचा संप्रदाय यावेळेस कधीं नाहीं, जाणें झालें तर अवल वक्तीं जातों, आतां रात्र पहांटेची आहे, यावेळेस आह्मी येत नाहीं, दिवस उगवल्यावर येऊं; इतक्यांत पंचवीस तीस हजार स्वार दरवाजाजवळ येऊन उभे राहिले. चोपदार मागती येऊन ह्मणूं लागला जे, भले लोक हजुराहून आले त्यास दरवाजा आंत बोलावून घ्या, अथवा तुह्मी दरवाजापर्यंत येऊन त्याशीं दोन गोष्टी बोला, याजवरून आह्मास यांत कांहीं कृत्रिम आहे असें वाटून त्यास सांगितलें कीं, तुझें बोलणें ठीक दिसत नाहीं, भले लोक कोण

काय? आह्मास त्याशीं बोलावयास गरज काय? नजर ठीक दिसत नाहीं, जर अधिक उणी चाल दिसल्यास तुझी तुंबी करूं, असें दाबून सांगितल्यावर चोबदार आणि स्वार गेले, पुन्हां कोणी आले नाहीं. जर भ्रम पडून त्याशीं बोलावयाशीं गेलों असतों तर मला धरून घेऊन जाते, याप्रमाणें वर्तमान झालें. प्रातःकाळ झालियावर शहरांत षोहरत झाली कीं, गोविंदराव कृष्णही गेले, बहुत लोकांकडील जासूद माझे येथें आले, मी स्नान करून बसलों होतों, हें वर्तमान ऐकून बाहेर दिवाणखान्यांत येऊन बसलों! असें सांगितलें. नंतर नवाब ह्मणाले कीं, सर्वांचे घरीं चोबदार याप्रमाणेंच आले होते, तुह्मी बाहेर निघाला नाहीं, बरें केलें, सर्वांस बदनाम करून आपले सोबती करावे ऐसा त्याचा मनसुबा होता, परंतु घडलें नाहीं. मीं उत्तर दिलें कीं, आपले जिवावर उदार जो होतो त्यास दुसऱ्याचे जिवाची काय काळजी? जितके बदनाम होतील तितके त्यास बरेंच, परंतु श्रीमंतांचे आणि हजरतीचे कृपेमुळें अरिष्ट टळलें. नंतर अलीज्याहा निघून गेले. त्याची कथा सांगत होते. राजेरेणूराव जवळ बसले होते, त्यास ह्मणाले कीं, तुह्मीं सदाशिवरड्डीचे जाबसालांत आहां, फौजेची निगादास्त ऐशी बातमी वरचेवर येत होती, शहराजवळ हा फौज येऊन राहिला असतां तुह्मीं त्याचे तरफेची खातरजमा करीत होता, ह्मणून आह्मीं दगा खाल्ला, नाहीं तर त्याची तंबी करणें किती होतें? तेव्हां राजाजी ह्मणूं लागले जे, तकशीर मजकडून झाली, लायक सजा करण्याचें आहे, मर्जीस येईल ती मला सजा करावी. हें ऐकून उगेच राहिले. मला ह्मणूं लागले कीं, जमीदार आणि सुभेदार यांनीं अलीज्यास बहकाविल्यावरून तो गेला, याची तजवीज कशी? तेव्हां त्यास ह्मटलें कीं, मला सुचतें त्याची पर्याप्ति करून मर्जीस येईल तसें करावें, हजरत त्यांस बुजुर्ग, हजरतीनीं ममतायुक्त त्याजकडे सांगून पाठवावें जें, तुझी निष्ठा आजपर्यंत कशी आणि आमची कृपा तुजवर कोणेप्रकारें हें मनोमन साक्ष आणि जे वाकफकार घरांतील बायका यांस माहीत, त्या खालीस अशी गोष्ट तुजकडून होणें मुनासब नसतां हें कसें घडलें?

याविषयीं तुह्मांस कोणी बहकाविलें! त्याजवरून ही गोष्ट अमलांत आली, किंवा तुह्मीं आपले बुद्धीनें केली? आपल्या बुद्धीनें केलें असल्यास काय कारण हें समजावें. तुमचा निरोप आला होता कीं, जमीदार मला घेऊन चालला, त्यास हजरतीची भेट व्हावी, त्यास तुह्मीं त्याचे यख्तियारांत अहां किंवा आपले यख्तियारांत हें कळवावें. याअन्वयें अधिक उणें गोडीनें ममतायुक्त सांगून पाठवावें. जरबेनें सांगूं नये. विचकतील. ह्मणजे काय खुलासा असेल तो समजण्यांत येईल. नंतर याचा विचार करून करणें तें करावें. तेव्हां बोलले, उत्तम आहे, असें करितों, एक पत्र आह्मी त्यास लिहितों, तुह्मींही एक पत्र लिहावें. तेव्हां ह्मटलें, माझें पत्राचें प्रयोजन काय, याचें कारण समजलें नाहीं. तेव्हां फर्माविलें कीं, तुमचा निरोप चोबदारानें अलीज्याहा यास चौकांत आल्यावर सांगितला कीं आह्मी येत नाहीं, तेसमयीं अलीज्याहा यास निराशा होऊन बोलला कीं, दगा झाला, त्यास जे त्याचे बुद्धीस भ्रंश करणार त्यांनीं राव पंतप्रधानाकडील भरंवसा त्यास दाखविला असेल, त्याजवरून तुह्माकडे चोपदार बोलावणें पाठविलें, तुमचा निरोप साफ येत नाहीं ह्मणून आला, तेव्हां त्यास असें वाटलें कीं समजावणारांनीं लटकें समजाविलें, याजकरितां तुह्मी पत्र पाठवावें ऐसें तुह्मांस सांगतों. यांतील हेंच कारण कीं तुमचें पत्र त्यास निषेधाचें गेलें ह्मणजे त्यास असें वाटेल कीं पंतप्रधानाकडील मातबर त्याचें लिहिणें याप्रकारचें, तेव्हां पंतप्रधानाचा आश्रय नाहीं, ऐसें मनांत खचित येऊन वास्तव्य असेल तें कळवील. याचें उत्तर नबाबास दिलें कीं, उत्तम आहे, मसविदा करून द्यावा, आज्ञा होईल तसें लिहीन. तुह्मींच मसविदा ठरावून द्यावा, आतांच येथें लिहावा, असें सांगितलें. बोललों कीं, राजेरेणूरावजी यास आज्ञा व्हावी, ह्मणजे हे मसविदा ठरावून मजकडे पाठवितील, त्यांत अधिक उणें करावयाचें असल्यास मी सांगेन, तें हजरतीनीं पहावें. उत्तम ह्मणून बोलले. नंतर मीरआलम वगैरेस बोलाविलें. मला पानदान देऊन रुकसत केलें. मी घरास आलों. दुसरे दिवशीं राजाजीकडून कोणी येईल ह्मणून प्रतीक्षा केली. कोणी आलें नाहीं. तिसरे दिवशीं रघोत्तम-

राव आले. त्यांनीं सांगितलें, मसविदा कसा ठराविला तो पहावयासि आणविला. त्यास सांगितलें आह्मीं ठराविला नाहीं, तुह्मींच ठरवावा. त्याजकडूनच मसविदा ठरविला. त्यांत हाच मजकूर कीं, हजरतीची कृपा तुह्मांवर विशेष, तुमची निष्ठा हजरतीचे कदमांपाशीं एकनिष्ठ, असें असतां हें कोणाचे सल्लाहानें झालें? किंवा खुद्द यख्तियारानें? मनांतील इरादा काय आहे तो समजावा, ह्मणजे हजरतीस अर्ज करून इरषाद होईल तसें लिहिण्यांत येईल, अन्यायावर दृष्टि देऊन ज्यांत परिणाम चांगला त्याची पर्याप्त करून उत्तर पाठवावें. याप्रमाणें रघोत्तमराव यांनींच आपले हातानें मसविदा लिहिला. नवाबास दाखवून आणावा, ह्मणजे पत्र लिहून देऊं, असें सांगितलें. मशारनिल्हे मसविदा घेऊन गेले. चार दिवस झाले. पुन्हा आले नाहींत. ऐकिण्यांत असें आलें कीं, रघोत्तमराव नबाबास बोलले कीं याजकडून पत्र कां लिहवावें, दुसरे दौलतींतील मनुष्यास आपले घरचे कामांत का आणावें? हजरतीनींच कोणास अलीज्याकडे पाठवावें, पर्याप्त करावें, नंतर करणें तसें करावें. याजकरितां आमचें पत्र पाठविण्याचा प्रकार राहिला असें वाटतें. उगीच तंट्यांत शिरणें कशास पाहिजे? त्यांनीं ह्मटलें होतें. त्यांजकडूनच राहिलें. बरें झालें. रा। छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४८] श्री. ८ जुलै १७९५.

विज्ञापना ऐसीजे. अलीज्याहा गेले, फौज जमा करतील, त्यास सरकारचे तालुक्यांतील फौज तिकडे जाऊं देऊं नये, ह्मणून नवाबानीं लिहिलें आहे. आणि पलटणें या कार्याकरितां आणविलीं ऐसा लेख. याचें उत्तर नवाबास यावें जे, ही गोष्ट बहुत आश्चर्याची वाटली! कारण अलीज्याहा बहादूर याजकडून असें घडूं नये, असें असतां झालें, याचें कारण काय? हजरत त्यास सर्वप्रकारें बुजुर्ग कोणतेंही उणें त्यास आणण केलें नसतां असें त्याजकडून कां घडलें? याचा खुलासा त्याचा घ्यावा, परकीय बाबत नाहीं, केवळ घरची, त्यांत

लेकरूपणा, या प्रकरणास लांबणीखालीं टाकूं नये, दुनयाईंत वाईट दिसेल, कोणेहीप्रकारें समजूत काढून समेट करावा, यांत बुजुर्गीस लाजीम तें हजरतीनीं केलें, मुलास समजाविलें, यांत लौकिक वाईट होणार नाहीं, चांगलाच होईल, हीच सलाह दुरुस्त. केवळ घरचे कामाकरितां इंग्रजी जमीयत बोलावणें ठीक नाहीं. एक तर घरांतील बंदोबस्तास पर यातींतील मनुष्य आणून बंदोबस्त करणें लाजीम नाहीं, दुसरी गोष्ट आपल्या घरांतील बंदोबस्त आपल्याच्यानें न झाला ह्मणून इंग्रजी पलटणें आणिलीं, यात बुंबकी काणि दूवाची कमती, इंग्रज ही पोहोंची ओळखतील, यास्तव इंग्रजी जमीयत न बोलावतां समेट करून घेणें चांगलें, तालुक्यांतील जमीयत न जावी ह्मणून लेख, त्यास नोकर लोक यास ताकीद केल्यानें जप्त राहील, जे नोकर नाहींत जे रोजगार त्याजवर जप्त कसा राहील? खुसूस तुमचे तालुक्यांतील लोक बेरोजगार बहुत त्याजकडे गेले असें ऐकिण्यांत, याजवरून कियास करावा कीं असे लोकांवर जप्त कसा राहील? तथापि जेथवर ताकीद करून मनाई करावयाची ती करीतच आहों. याअन्वयें नवाबाचे पत्राचे जाब यावे. पलटणाविषयीं वगैरे बहुत तपशील नवाबाचे पत्रांत न लिहावा असें असल्यास थोडकेंच दंशरूप लिहून माझे पत्रावर हवाला घालावा. मला जें लिहिणें असेल तें लिहावें. परंतु पत्रें नवाबास वाचून दाखवावयाजोगीं यावीं. उपदेश करावयाचा तितका करावा. त्यांत आलस्य करूं नये यांतच काम आहे. रा।। छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[४९] श्री. ८ जुलै १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नवाबाच्या पत्रांचीं उत्तरें लवकर यावीं. यास फार दिवस लागूं नयेत. नवाबाचे आणि सर्वांचे मनांत अंदेशा आहे कीं, अलीज्याहा फक्त जमीदाराचे बोलण्यावर बहकणार नाहीं, कांहीं एक आश्रा कोणाचा असेल ह्मणून कित्येक लोक यास भरंवसा वाटून परभारें स्वार अलीज्याहाकडे नोकरीस जातात. नवाबासही अंदेशा मोठाच आहे. याजकरितां स्थळें सुधी करितात. आपले सरकारचा

दोरा तर नाहीं. नवाबाजवळ जमेयत प्रस्तुत थोडी आहे. मुसारेमूयाची चार हजार गाडद सध्यां येथें आहे. बाकी कांहीं पूर्वीं बरतर्फ, कांहीं ज्याबज्या गेली. चहूं हजारांतून हजार गाडद येथें ठेवून तीन हजार गाडद देऊन त्यांस पाठविलें. पागावाले घासीमिया व महमद आजीमखान यास रुकसतीचें पानदान दिल्हें. तेही शहराबाहेर जाऊन उतरले. चारशें लोक उभयतां मिळून तूर्त आहे. बारगिरांस निरोप दिला, त्यांस बोलावणीं गेलीं आहेत. पागेचीं घोडीं तालुक्यांत आहेत तेथून आणविलीं आहेत. अलीज्यांहा यानीं परभारें न नेलियास येतील. रोषनखान याचे भाऊ सुभानखान याजवळ सहा घोडीं, दहा वीस माणसें, जोधसिंग खंदारकर याजवळ दहा घोडीं, वीस पंचवीस माणसें, इसामिया याचे शें दोनशें लोक, याप्रमाणें बाहेर उतरले आहेत. प्रस्तुत तर इतकीच जमीयत आहे, असदअलीखान रुकसत होऊन आपले नवे तालुक्यांत गेले. तालुक्याचा बंदोबस्त करून फौज नवी व पायदळ ठेवून दोन महिन्यांनंतर मोहरम झालियावर येणार. याप्रमाणें आहे. रा॥ छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[९०] श्री. ८ जुलै १७९१.

विज्ञापना ऐसीजे. श्रीमंतांकडील सूत्र अलीज्याहाकडे असेल ऐसा गुमान येथें आहे. आपले सरकारांतून तर कांहींच नाहीं. ह्मणून स्वामीनीं केवळ तटस्थ राहूं नये. नवाबाची आणि सरकारची दोस्ती दिली. नवाबाचा वृद्धापकाळ, या दिवसांत तमाषबीनी स्वामीकडून झालियास दौलतीस नवाबाचे धक्का बसेल. कदाचित् लढाईचा प्रसंग पडल्यास परिणाम ईश्वराधीन. जर त्याची शिकस्त झाली, आणि बरें वाईट झालियास मुलाची समजूत करावयाची होती, ती न केली, आपले हातानें घात केला, असें होईल. यांतही बदनक्षी नवाबाची. कदाचित् शिकस्त वडिलावर कांहीं गुजरली तर मुलाकडे बदनामी. आणि येथपर्यंत वडिलांनीं कां लांबणीवर टाकून ह्मातारपणीं बदनामी

घेतली असें होतें. दोहींकडूनही चांगलें नाहीं. येथें नबाबास दूर देशींची गोष्ट कोणी सांगेल असें दिसत नाहीं. बहुतकरून सर्व नौजवान आहेत. कित्येक वयस्क आहेत, त्यांनीं बोलावें तर खावंदाचे समजेचा भरंवसा येत नाहीं. अशी गोष्ट कां सांगतात, हा संशय मनांत येऊन काय गाठ मनांत बसेल न कळे. यासाठीं कांहीं बोलत नाहींत. प्रस्तुतकाळीं नबाबास कोणाचा विश्वासही येत नाहीं. यास्तव सर्व अंदेशा आहेत. कोणी पुढारी होऊन बोलूं सकत नाहींत. या प्रसंगीं स्वामीनीं स्वस्थ बसूं नये. दूर देशीचे आणि यगानगतेचे मार्ग नेक सलाह मसलहत घराऊ असेल ती नबाबास लिहावी. अलीज्याहा याजकडेही सांगून पाठवून त्याचे मनांतील अर्थ समजून घेऊन त्यास निषेध करावयाचा असेल त्याविषयीं निषेध करून सांगून मार्गावर आणावें. त्याची कांहीं आढ असेल त्याजविषयीं नबाबास तशी रदबदल करावी. नबाबाकडून ऐकवून समजूत परभारें करून द्यावी. अलीज्याहा जर न ऐकतील तर त्यास दाबून आपणही सांगावें लागेल. यास्तव कांहीं फौज घेऊन स्वामीनीं निघावें. नबाबास लिहावें कीं अलीज्याहा यानीं मार्गाच्या गोष्टी ऐकिलियास उत्तम, नाहीं तर त्यास शिक्षा करून ऐकवूं, दाबानें सांगितल्यावेगळ ऐकणार नाहींत, याजकरितां आह्मी निघालों. नबाबाचे मनांत संशय न यावा, याविषयीं खातर जमा करावी, आणि उभयतांचा हित बसवावा ही गोष्ट सर्वापरी चांगली. सरकारचा पाय मध्यें घालावाच घालावा. दोस्ती एकदिली राखून करावयास बाध नाहीं. नबाबाची आणि सरकारची दोन्ही दौलती एक. याचा लौकिक या गोष्टींत आहे. जे उभयतां एकदिल होऊन घरची आग विझविली, तिसऱ्यास खबर देखील नाहीं. या पुरवणींत चढउताराचे प्रकार थोडक्यांत लिहिले आहेत. एक एक कदम ठेवीत करावे. मिठी सोडूं नये. यांत फार गुण चहूंकडे आहेत. ही पुरवणी तीन वेळ वाचून पाहून मनन व्हावें. याचा विस्तार वाटावाट केल्यानें फार समजण्यांत येत जाईल. याजवर जितका उपन्यास करावयाची मर्जी असेल तितका करून पहावा.

गुणच येतील. मनन जरूर व्हावें, नबाबाची स्वामींची दोस्ती घरोबा. याजकरितां सूत्रप्राय लिहिलें आहे. याचें उत्तर मला यावें ह्मणजे स्वस्थ होईन. रा। छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[५१] श्री. ८ जुलै १७९५.

विनंति विज्ञापना. साहेबजादे शहरांतून निघून गेल्यापासून, नबाबानीं शहर व हवेलीचा बंदोबस्त ज्याबज्या चौक्या पहारे ठेवून, बहुत लोक मुसारेमू यास पायदळचे जमीयतसुद्धां तोंडावर जाऊन शह देण्याविषयीं ताकीद झाल्या. बमोजी म बमुसामनकूर आपले लोकसुद्धां लिंगपल्लीनजीक जाऊन उतरला. छ १७ जिल्हेज रविवारीं सदाशिव रड्डीकडील कांहीं स्वार पायदळ जमीयत संगारड्डीहून निघून पुढें आली. मुकेरीयाच्या गोण्या व बैल शहरांत येत होते, ते कांहीं हातीं लागले, पाडून नेले. शहरांत सदाशिवरड्डीचे पांच चारशें लोक गुला होऊन आहेत, ह्मणून नबाबास वर्तमान आवई समजल्यावरून शहरचे तमाम दरवाजे बंद करावे ऐशी ताकीद झाली. छ मजकुरीं तीन प्रहर दिवसां दरवाजे बंद झाले. साहुकार व बेपारी बकाल यांचीं दुकानें लागलीं. जागजागा चौक्या पहारे याचा बंदोबस्त झाला. अस्तमानपर्यंत हीच हुल्लड झाली. हवेलीचेही तीन दरवाजे बंद करून थोरले देवडीचा एक दरवाजा मात्र खुला ठेविला. वाड्यांत पागेकडील बारगीर व तेजसिंग हजारी वगैरे लोक नेहमीं चौकीस ठेवून रात्रंदिवस हुशारी व सावधगिरीची येहतियात फार राखिली आहे. रा। छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[५२] श्री. ८ जुलै १७९५.

विनंति विज्ञापना. हैदराबाद शहरचे दरवाजे खुले व बंद.

४ खुले दरवाजे ठेविले. तेथें गाडद बार जवान व प्यादे ठेवून बंदोबस्त केला ते.

१ नडव्याचा.	१ चंपादरवाजा.
१ आलियाबाद.	१ याकूतपुरा.
—	—
२	२

८ बंद झाले.

१ कलदरवाजा.	१ दूधबावडीचा.
१ हैदरीदरवाजा.	१ दिल्लीदरवाजा.
१ गाजी बंडा.	१ चदरघाटचा.
१ फत्तेदरवाजा.	१ तिरपोली दरवाजा.
—	—
४	४

१ दबीलपुऱ्याची खिडकी बंद आहे.

—

१३

चार दरवाचे खुले बंदोबस्तीनें ठेवून आठ दरवाजे व एक खिडकी बंद करविले. ते चिनून टाकावे ऐशी ताकीद कोतवालास होऊन दरवाजे चिनावयास आरंभ केला. रा छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[९३] श्री. ८ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याहा बाहदूर साहेबज्यादे यांजकडे नवाबांनीं त्याचे वस्ताद खुषरकमखान व चतुर्भुजदास वकील व दिनकरराव सदाशिवरड्डीचा वकील या त्रिवर्गास रवाना केलें. समागमें बहंग्या तरमेट्याच्या दोन व नवाबांनीं इनायतनामें व बक्षी बेगम यांचीं पत्रें देऊन साहेबजादे यांस समाधानपूर्वक बोलावयाचे प्रकारें सांगून पाठविलें. छ १९ जिल्हेजीं ते येथून निघून साहेबजादे यांजकडे गेले आहेत. रा छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

[९४] श्री. ८ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. नवाबानीं येथून मुसारेमू यास अघाडीस त्याचे जमीयतसुद्धां रवाना केलें. घासीमिया व महमद आजीमखान या उभयतांसही रुखसतीचीं पानदानें दिलीं. छ १७ रोजीं त्याचे डेरे गोवर्धनाचे बागेपाशीं झाले. छ १९ रोजीं उभयतां निरोप घेऊन डेरे दाखल झाले. पागा चरईस आहेत, त्यांस बोलावणीं गेलीं आहेत. येथें थोडेबहुत लोक त्यांसहित बाहेर निघून इसामिया व जोतसिंगखंदारकर व सुभानखान रोषनखानाचा भाऊ वगैरे सरदारांची नेमणूक झाली. सर्वत्रांचे लोक तालुक्यांत आहेत, तेथून आणविले. आल्यानंतर जमा होतील. रा छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[९५] श्री. ८ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. असद अलीखान याजकडे नवा तालुका, घटाळ्याकडील मंगथळ वगैरे चार महाल व नागरकर्णूल व गोदर अमराबाद व कोयलकुंडा याप्रमाणें चौदा लक्षांचे सांगून जमीयतस्वार अडीच हजार व पायदळ दोन हजार घेऊन मोहरम होतांच हजर व्हावें, ऐसा करार करून खानमजकूर यास रुखसत तालुक्यास जाण्याची दिल्ही. छ १९ रोजीं खानमजकूर शहरांतून कुच करून तालुक्याकडे गेले. तालुक्याचा वसूल होईल त्याप्रमाणें जमीयत ठेवावी, ऐसा त्यानीं करार केला आहे. छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[९६] श्री. ८ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. मीरजुलफकार अलीज्याहांदरज्याह याचे कन्येची बिसमिलाची षादीसाठीं छ १७ रोज रविवारीं रात्रीं मेहदी निघाली. अतषबाजीचीं झाडें व रोशनी, हा समारंभ झाला. र॥ छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[५७] श्री. ८ जुलै १७९५.

विनंति विज्ञापना. इंदूर बोधन या महालीं सरकांतून राजश्री श्रीनिवास शामराव कमाविसदार आले. ठाणीं दाखल होण्याकरितां नवाबाकडील अमिलाच्या सोडचिठ्या पाठवाव्या; ह्मणून मशारनिल्हेकडून निळो बापूजी कारकून आह्मापाशीं आले. त्यावरून नवाबाशीं बोलून त्रिमलराव अमील हरदो महालचे यास ताकीद करवून त्याच्या सोडचिठ्या ठाणीं व तालुका सरकारचे कमाविसदाराचे स्वाधीन करण्याविषयीं घेऊन कमाविसदाराकडील कारकुनासमागमें आह्मीं आपला एक कारकून व सोडचिठ्या व त्रिमलराव याचाही कारकून दखल करून देण्याकरितां, याप्रमाणें छ १७ जिल्हेजीं इंदूर, बोधनाकडे रवाना केले. त्रिमलराव याचे सोडचिठ्याच्या नकलाही सेवेशीं रवाना केल्या आहेत. त्यावरून ध्यानास येईल. र॥ छ २० जिल्हेज. हे विज्ञापना.

त्रिमलराव यांनीं सोडचिठ्या
दिल्या त्याच्या नकला.

[५८] श्रीव्यंकटेश प्रसन्न.

मोहर पारसी.

एकलास दस्तगाह जलोल महमदखा नायब परगणे इंदूर व बोधन यांस. राजे तिमलराव गुणवंत बहादूर दुवा सुा १२०४ फसली. इंदूर व बोधन दोनी परगणे हजरत बंदगान अलीबहादर यांनीं श्रीमंत पेशवे यांस देऊन दोन महाल त्यांचे सुपुर्द करून देण्याविषयीं आमचे नांवें इनायतनामा करून दिले आहेत. इनायतनामा घेऊन त्याजकडून राजश्री श्रीनिवास शामराव यांनीं महालास आले आहेत. तर येथें श्रीमंत राजश्री गोविंदराव बापूचे विद्यमानें करार ठरला कीं, आमचें पत्र तुह्मांस पोहोंचल्यावर चार दिवस आवध करून चार दिवसांमध्यें आमचे सरंजाम, गल्ला वगैरे कुल जिन्नस दोनी महालांतून काढून घेऊन अगर

चार दिवसांत सरंजाम काढिता, आणखी सरंजाम बाकी राहिल्यास तो सरंजाम श्रीमंत बापूसाहेबांकडून राजश्री त्रिंबक वैद्य आले आहेत, याचे जिमा करून वोकडून यादास्त तुह्मीं घेऊन पांचवे दिवशीं बजिन्नस इनायतनामा आमचे नांवाचे रसीद दोनी घेऊन मग दोनी महाल ठाणेंसुद्धां राजश्री श्रीनिवास शामराव याचे स्वाधीन करावयानिमित्य आह्मांकडून राजश्री व्यंकट नरसूपंत कारकून यांस पाठविलें असे. याचे विद्यमानें सरंजाम काढून इनायतनामा व रसीद घेऊन दोनी महाल त्याचे सुपूर्द करावें. राजश्रींनीं सांगितल्याप्रमाणें अमलांत आणावें. मानसीक न करावा. कळलें पाहिजे. हे किताबत.

---

[९९] श्रीव्यंकटेश प्रसन्न. २९ जून १७९९.

पारसी मोहर

राजश्री व्यंकटराव बापू स्वामीचे सेवेशीं.

विनंति उपरी. येथील कुशल छ ११ जिल्हेज जाणून स्वकीय लेखन करणें. विशेष. परगणें इंदूर व बोधन दोनी परगणे हजरत बंदगानअली यांनीं श्रीमंत पेशव्यांस दिले. त्याजकडून राजश्री श्रीनिवास शामराव यांनीं मामलत करून घेऊन आले आहेत. त्याजपाशीं हजरतानीं दोनी महाल सुपूर्द करून देण्याविषयीं आमचे नांवें इनायतनामा लिहून दिल्हाच. बजिनस आहे. तो दस्तऐवज घेऊन दोनी महाल स्वाधीन करून रसीद घ्यावी. आमचे सरंजाम खालीं वगैरे गेले. सरंजाम व घोडे व तट्टू, गूर व नगदी वगैरे दरोबस्त जिन्नस दोनी महालांतील पत्रें पोहोंचल्यावर चार दिवस महसूल जिन्नस काढून नवी पेठ व आरमूर येथें पाठवावें. चार दिवसांत सरंजाम काढितां बाकी राहिल्यास, श्रीमंत राजश्री गोविंदराव बापूकडून वो। राजश्री त्रिंबक वैद्य आले आहेत, यांचे जिमा अवघे सरंजाम करून वोचे हातीं यादास्त घेऊन ठाणेसुद्धां दोनी महाल त्याचे स्वाधीन करावे. बाकी राहिले सरंजामाकरितां वोजी जफ्तीवालेस बोलून आगग आणखी चार दिवस तेथें राहून तुमचे

सरंजाम अवघे काढून देतील. अतःपर उजूर न करितां दोनी महाल बोचे विद्यमानें चार दिवसांचे कराराप्रमाणें सरंजाम काढून घेऊन मागून सुपूर्द करणें. उजूर न करणें. आह्मांकडून राजश्री व्यंकट नरसूपंत यास पाठविलें असे. यांनीं बोपाशीं राहून सरंजाम काढवून देतील. राजश्रीनीं सांगितल्याप्रमाणें अमलांत आणावें. मानसीक न करावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे. हे विनंति.

छ २४ जिल्हेज. मुा भागानगर
रवाना टप्यावर.

[६०]   श्री.   १२ जुलै १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता० छ २४ माहे जिल्हेजपर्यंत मुा भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. हिकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी डांकेवर केली त्यावरून सविस्तर ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानास येईल. उत्तराविषयीं आज्ञा झाली पाहिजे. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[६१]   श्री.   १२ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. सदाशिव रड्डी यांचें सूत बेदर येथील किल्लयांत कोणी जमातदार याजकडे होतें. आंदोलाहून सदाशिव रड्डी जमीयतसुद्धां जाऊन किल्लयास शिड्या लावून किल्ला शहरासुद्धां घेतला. किल्लयाचा बंदोबस्त करून सदाशिव रड्डी तेथून निघून शिद्दी अबदुल्ला जमीयत पांच सातशें स्वार पैदल मिळून हजार बाराशें बेदरचे किल्लयाचे

हिफानतीस जाणार होता. त्यास मार्गीं अचानक आडवे झाल्यानंतर त्याची याची लढाई झाली. शिद्दी अबदुल्लाकडील कित्येक लोक ठार, जखमी शेदोनशें व कांहीं फरारी झाले. अबदुल्लास सदाशिव रड्डीनें धरून पाडाव करून नेलें. दुसरें वर्तमान:—शिद्दी अबदुल्लास रड्डीचे लोकांनीं घेरा घालून धरिलें. तो कबजांत आला तेव्हां लढाई व तरवार न चालतां धरून नेला. हें एक वर्तमान. दुसरें वर्तमान कीं, अगोदर सदाशिव रड्डीनें शिद्दी अबदुल्लास हस्तगत करून मग बेदरचे किल्ल्यास लागून किल्ल्यांत खबर केली कीं, शिद्दी अबदुल्ला जमीयतसुद्धां बंदोबस्तास आला आहे. त्यावरून यास किल्लेदारानें आंत घेतलें. जमीयतसुद्धां किल्ल्यांत पोहोंचून बंदोबस्त केला. ऐशीं एक दोन वर्तमानें आहेत. वास्तव्य काय असेल तें असो; तात्पर्य बेदर घेतलें, शिद्दी अबदुल्लास धरून नेलें, हें खचीत. नवाबाकडे वर्तमानें आलीं. बेदरचे किल्ल्याचे दरवाजाकड सदाशिव रड्डी जमीयत घेऊन गेला. दरवाजाचे रुखास लढाई दाखविली. किल्ल्यांत दोनतीनशें माणूस होतें, तें तेवढें दरवाजाचे रुखास जमा झालें. किल्ला खालीं. याप्रमाणें डाव करून जिकडून दादासाहेब कैलासवासी यांनीं महाकाली तोफ बेदरास लाविली होती, त्याबाजूनें सदाशिव रड्डी याजकडील जमयतीची दुसरी तुकडी होती, त्यांनीं शिड्या लावून तट चढून आंत शिरले. किल्ला घेतला. शिद्दी अबदुल्ला बेदरापासून चार सहा कोस उतरला होता, त्याजवर जाऊन शेदोनशें लोक कापून काढिले. शिद्दीस दोन चार जखमा भारी लागल्या होत्या. ठार झाला. जखमी लोक फार झाले. ते हैदराबादेस दाखल झाले. शिद्दीची बायको व कन्या पोटकटारी करून मेल्या. असें कोणी सांगतात. कोणाचें ह्मणणें त्यांनीं धरून नेल्या. सारांश, सदाशिव रड्डीनीं किल्ला घेतला. शिद्दी अबदुला यास जमीयतसुद्धां बुडविला. हे तहकीक खबर. रा छ २४ जिल्हेज. हे विज्ञापना. शिद्दी अबदुलाबरोबर पन्नास हजार होन होते, ते त्यास सांपडले. घेऊन गेले. हे विज्ञापना.

[६२] श्री. १२ जुलै १७९१.

विनंति विज्ञापना. अलीज्याहा बहादूर साहेबज्यादे आंदोल येथें होते. सदाशिव रड्डी जमीयत घेऊन दौंडेस जाऊन बेदरचा किल्ला घेतला. साहेब ज्यादे याजकडे रड्डीकडून किल्ल्याची खबर आल्यानंतर खुषीच्या तोफांचे बार व साखर वाटली. लोकांच्या नजरा झाल्या. शिद्दी अबदुल्लाही हस्तगत झाला. साहेब ज्यादे आंदोलाहून निघून बेदरास गेले. याप्रमाणें वर्तमान आहे. रा। छ २४ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[६३] श्री. १२ जुलै १७९१.

विनंति विज्ञापना. बेदरचा किल्ला व शहर दरोबस्त सदाशिव रड्डीनें घेतलें, शिद्दी अबदुल्लास धरून नेलें, हें वर्तमान नबाबाकडे आल्यानंतर बेदरचा किल्ला शिद्दी इमामखान याजकडे असतां त्याचे नायबानें किल्ला परवानगीशिवाय कसा दिला. लढाई होऊन किल्ला जावा. तें न होतां किल्ल्यांत दखल झाला. तेव्हां सूत्रानें हे गोष्ट झाली, ऐसें नबाबानीं मनांत आणून छ २३ जिल्हेज शनिवारीं दोनप्रहर दिवसा शिद्दी इमामखान व नूरमहमदखान व इसूफअल्लीखान शिद्दी इमाम याचा नायब, करोडगिरीचे कामावर होता, या त्रिवर्गास बोलावून आणिलें. खिलवतीचे रोषन महालापुढें दोन अडीचशें बारगीर आणून बसविले होते. शिद्दी इमाम वगैरे त्रिवर्ग येतांच त्याचा सलाम बंगल्याखालून झाला. त्यांजपाशीं तरवारा, हत्यारें होतीं तीं बारगिरांनीं घेतलीं. त्रिवर्गास कैद करावें ह्मणून हुकूम झाला. त्यावरून तिघांस बारगिरांनीं धरून कोठडींत घातलें. पहारे भोवते ठेविले. पायांत बेड्याही घालण्यास हुकूम झाला. शिद्दी इमाम वगैरे तिघांचे घरीं चौक्या पाठवून बंदोबस्त झाला. त्यांजकडील मुत्सद्दी वगैरे त्यांचे वाड्यांत होते ते धरून नेले. याप्रमाणें झालें. सदाशिव रड्डीनें जुरत व कारस्थानी करून किल्ला घेतला. शिद्दी अबदुल्लाखान यास मारिलें. याविषयींचा शब्द शिद्दी इमामखान याजवर किमपिही नाहीं. त्याचे जिमेस किल्ला इतका मात्र शब्द. सदाशिव रड्डी याजविषयीं राजे रेणूराव नबाबाजवळ खातरज-

मेनें बोलत असतां दगा जसला. हा शब्द आला. बेदरचेंही वर्तमान आलें. बेदरांत किल्लेदार शिद्दीकडील. शिद्दीचें बोलणें राजाजीचे विद्यमानें मामलत वगैरेचें सदाशिव रड्डीसारखा आरोप आला तर कसें करावें म्हणून त्यांनीं सलाह कैद करण्याविषयीं दिली. त्याजवरून कैद केले. ऐसें ऐकण्यांत. सारांश कैद केलें. रा छ २४ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[६४] श्री. १२ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. समशेरजंग याजकडे शहरचे सुभेदारीचें काम नाजमनमुल्क याजकडे होतें तें सांगितलें. हल्लीं शिद्दी इमाम याजकडील करोडगिरीचेंही काम समशेरजंग यास सांगून बाहलीचा खिल्लत छ २३ जिल्हेजीं दिला. रा छ २४ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[६५] श्री. १२ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. मुसारेमूयांस जमीयतसुद्धां नवाबांनीं सदाशिवरड्डी याचे मुकाबिल्यावर रवाना केलें. लिंगपल्लीपट्टण चरूस जाऊन मुसारेमूसंगारड्डीनजीक इसमापूरपेंठ येथें महसरा करून गढी घेतली. संगारडीसही माहसरा केला. पेंठ घेतली. ऐसें वर्तमान आहे. सदाशिवरड्डीकडील लोकांशीं व मुसारेमूशीं झटपट होऊन लोक ठार व जखमीही मुसाकडील कांहीं होऊन आले. ऐसेंही वर्तमान आहे. रा छ २४ जिल्हेज हे विज्ञापना.

छ २९ जिल्हेज मु॥ भागानगर.
रवाना टप्यावर.

[६६] श्री. १७ जुलै १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीं.

सेवक गोविंद कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता छ २९ माहे जिल्हेजपर्यंत मु० भागानगर येथें स्वामीचे कृपा-

वलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. हिकडील वर्तमानाची विनंति पेशजीं पत्रीं लिहून रवानगी पत्राची केली आहे. त्याजवरून ध्यानांत आलें असेल. सांप्रत प्रसंगींचें वर्तमान अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहून रवानगी केली आहे. त्याजवरून ध्यानांत येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

[६७] श्री. १७ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याहा बहादूर यांनीं बेदरचा किल्ला घेतला. शिद्दी अबदुलाखान याजवर छापा घालून लोक मारिले. व खानमजकूरही ठार झाले, ह्मणून पेशजीं येथें वर्तमान आल्याचा मजकूर विनंति पत्रीं लिहिण्यांत आला आहे. त्याजवरून ध्यानास आलें असेल. तदनंतर दुसरें वर्तमान आलें कीं, किल्ला घेतला नाहीं. त्याजवरून येथून कुतबुद्दीखान फराषखान्याचे दरोगे यास किल्लेदारीचें काम करार करून शें दोनशें स्वार, बारयाची जमयत मुकरार करून देऊन येथून रवानगी केली. ते बाहेर जाऊन उतरले. पुढें जलदीनें कूच करून जावें असा नेम होता. मध्यवर्ती मागती वर्तमान आलें कीं, अलीज्याहाबहादूर ज्यालकलनजीक उतरले होते. तेथून बेदरचा किल्ला चार कोस. बहादूर मवसूफ यानीं किल्लेदाराकडे सांगून पाठविलें कीं, आह्मी बंदगानअलीचे ज्येष्ठ पुत्र, दौलतीचा अधिकार आह्मांकडे, असें असतां तुह्मीं अमुल हुकमी करून बेदरचा किल्ला देत नाहींत हें ठीक नाहीं. याचें उत्तर किल्लेदाराकडून आलें कीं आपण एकले थोडके जमयतनशीं आल्यास मकान देतों. त्याजवरून बहादूर मवसूफ किल्लयानजीक थोडके जमयतनशीं गेले. किल्लेदारानें दरवाजा उघडून यास आंत घेतलें, आणि दरवाजे बंद केले. याप्रमाणेंही वर्तमान आलें. परंतु वास्तविक वर्तमान समजण्यांत आलें त्याचा तपशील. एक मनुष्य बेदरचा राहणार येथें कोणी एक गृहस्थापाशीं चाकरीस आहे, तो आपल्या घरास गेला होता. त्याचे जबानी कीं, अलीज्याहाबहादूर छ २२ जिल्हेज रोज शुक्रवारीं किल्लयाचे दरवाजानजीक गेले.

किल्लेदारानें दरवाजे उघडावयास अनमान केला. तेसमयीं जमीदार व रयत लोक जमा झाले. यांनीं किल्लेदारास सांगितलें कीं, हे जागा तख्तानी, त्यांत नबाबाचे ज्येष्ठ पुत्र दौलतीचे धनी खुद्द आले असतां तुह्मीं याशीं विन्मुख होता, त्यास तुह्मीं चिठ्ठीचे चाकर, आह्मीं वतनदार, आह्मांस दुसरी गोष्ट सांगतां येत नाहीं, ईश्वरसत्तेकरून याचा अम्मल फैला प्रांतांत झाल्यानंतर आह्मांस कचेबच्चेसुद्धां जेर करून बेवतन करितील. याजकरितां आह्मीं दरवाजे उघडितों. तेव्हां किल्लेदार लाचार, कांहीं एक शिबंदीचा भेद होता, सबब दरवाजे उघडले. अलीज्याहा बहादूर किल्लेदाखल होऊन मुलतानीसाहेब याचे दरग्यांत जाऊन तवाफ करून साखरा वांटल्या. उपरांतिक बाले किल्ल्यांत गेले. मोगलअली हुमाउज्याहा तेथें अटकेंत होते त्यांस बाहेर काढिलें. उभयतांची भेट झाली. फारच सद्गद होऊन त्याचा खुलासा केला. पेशजीं मोगलअली किल्ल्यास नेले तेसमयीं अलीज्याहा बहादूर यांनीं नबाबास अर्जी केली होती कीं, हे बेतकसीर आहेत. इतकें लिहावयाचें कारण अलीज्याहा बहादूर यांची कन्या मोगलअली याचे पुत्रास दिली आहे. आणि पहिलेपासून तर्फेनें प्रेमा विशेष; परंतु दौलाचा कदम दरम्यान होता ह्मणून अलीज्याहा बहादूर यांची गोष्ट पेषरफ्त झाली नाहीं. ते हल्लीं घडली. याजमुळें परस्परें प्रेमयुक्त भेटणें बोलणें झालें. इतका प्रसंग माणसानें आपले दृष्टीनें पाहून छ २९ रोजीं सोमवारीं येथें येऊन आह्मांस वर्तमान सांगितलें. मागाहून नबाबाचें येथेंही वर्तमान आलें. त्याजवरून कुतबुद्दीखान नवे किल्लेदार होऊन जात होते. ते सोमवारीं रात्रीं माघारें गांवांत फिरून आले. येथें तहकीक वर्तमान येत नाहीं. जे बातनीस जातात, त्यांस तेथें कैद करितात. आजपावेतों येथील बीस जोड्या तेथें कैद आहेत. जागाजागा चौक्या पहारे. तालुका सदाशिव रड्डीचा, याजमुळें बंदोबस्त अधिक. पेशजीं येथून खुषरकमखान अलीज्याहा बहादूर याचे वस्ताद व दिनकरराव रड्डी मजकूर याचा वकील यांसही शिष्टाई करावयास पाठविलें होतें. त्यांस तेथेंच ठेवून घेतलें. निरोप माघारे येण्याविषयीं

देत नाहींत, ह्मणून उभयतांनीं पत्र आलें. रा छ २२ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[६८] श्री. १७ जुलै १७९५.

विनंति विज्ञापना. अलीज्याहा बहादूर गेल्यानंतर शहरचे दरवाजे बंद करून चिनविले. याचा तपशील पेशजी विनंति पत्रीं लिहिण्यांत आलाच आहे. त्यानंतर शहरचे आसपास गिर्दचगीर्द फौज ठेवून चौक्या, पहारा, तलावा, छबिना रात्रंदिवस फिरत असावा, ह्मणून नवाबांनीं राजाजीकडे सांगून पाठविलें कीं, या कामास सरदाराची नेमणूक करावी, व सरदारास हुकूम असावा कीं, काय दिवसा व काय रात्रीं तेलंगा अथवा कानडा प्यादा तरवारवाला अथवा बंदूकवाला जो आढळेल त्यास पाहतांच त्याचे कान व नाक साफ करीत जावें, दुसरे परवानगीचा उजूर न ठेवा. याप्रमाणें हुकमी फर्दा लिहून सरदारापाशीं द्याव्या. नवाबाकडील चोपदार राजाजीकडे येऊन सांगितलें, त्याजवरून मशारनिल्हेनीं दौलतखान कलमनुरीकर व सास्तखान व सुलतानखान व लोदीखान व आपली खासगत जमयत वगैरेची नांवनिशी लिहून जागाजागा अलंगा व हद्दी करार करून दिल्या व त्यास नवाबाचे हुकमाप्रमाणें एक एक फर्द तयार करविले. तेसमयीं कोनेर बाबूराव आह्मांकडील कांहीं कार्याकरितां गेले होते, व रोषनराय व रामभट वगैरे मंडळी होती. त्यांत कोनेर बाबूराव यांनीं बोलले कीं, नवाबांनीं या गोष्टीचा हुकूम केला हें काय समजून? भागानगर शहर व मुलूख तेलंगा, सरकारची शिबंदी कानडी, त्यांत या प्रांतीचे तमाम मुसलमान लोक प्यादगिरीचें कसब करून पोट भरितात, त्यास मुसलमानी बोलणें देखील येत नाहीं, सरदार अनिवार, हुकूम झाला पुरे, अनर्थ करतील, भलत्यास धरून नाक कान घेतील, सदाशिव रड्डी याचे प्यादे तेलंगे ह्मणून इतकें करावें, तरी याचा विचार राहणार नाहीं, या सरकारचे लोक बाहेर गांवखेड्यांस जाऊं लागतील, त्यांस कठीण पडेल. तेलंगे लोक विचार न पाहतां असेंच करूं लागतील तेव्हां रायरायासही बिचार पडला: उत्तर केलें कीं,

हुजूरचा हुकूम यास आह्मीं काय करावें, तथापि सरकारचा हुकूम पाहून कांहीं दुसरी तजवीज होत असल्यास सांगावी. त्याजवरून कोनेर बाबूराव यांनीं सांगितलें, सरदारास हुकूम असा तरी करावा कीं, तेलंगे अथवा कानडे प्यादे जे चौकीपहाऱ्यांत सांपडतील त्यास धरून बसवीत जाणें, याचा अर्ज संध्याकाळीं हुजूरांत करीत जावा, पुढें जसा इर्षाद होत जाईल त्याप्रमाणें अमलांत आणीत जावें. याप्रमाणें सरदारांस आज्ञा झाल्यास ठीक, नाहीं तर कबाहात फार होईल. ह्मणून सांगितल्याप्रमाणें फर्द्रा करून सरदारांस दिल्या. रा छ २९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[६९] श्री. १७ जुलै १७९१.

विनंति विज्ञापना. मुसारेमू आपले जमयत व तोफखान्यासुद्धां संगारडी पेठेस गेले. संगारडी भागानगराहून अठरा कोस आहे. त्यास मुसा मजकूर यानीं पेठेस मोर्चे लावून तोफाची मारगिरी करून पेठ घेतली. हिकडील लोक फार जाया झाले. पेठेंत वस्ती नव्हती. प्यादे मात्र होते. ते निघून गेले. सांप्रत भागाहून अजम साहेब व घासीमिया यांस जमीयतसुद्धां रवाना केलें. त्यास अवघे मिळून सध्यां पांचशें स्वार आहेत. त्यास पांच सात दिवस दरगाहजवळ भागानगराहून तीन कोसांवर मुक्काम होता. रात्रंदिवस चौकी पहारा हुशारीनें होते. प्रस्तुत दरगाहावरून कुच करून पुढें संगारडी पेठेचे सुमारें गेले. कोणेही प्रकारें मुसारेमू यास जाऊन मिळावें. नाहींतर शिद्दी अबदुल्लाखान याप्रमाणें झाल्यास बदलौकिक ह्मणून विचारांत पडून जातात. शिद्दी अबदुल्लाखान ठार झाले. लोक गारत होऊन राहिले. ते परागंदा झाले. जखमी अद्यापि येथें येतात. सांप्रत वर्तमान कीं, बेदरचा किल्ला घेतल्यानंतर सदाशिव रड्डी आपले जमयतसुद्धां लागभाग पाहून गायब आहे. रा छ २९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[७०] श्री. १७ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना. इसामिया याजपाशीं शंभर स्वार व कांहीं पायदळ होतें. याजकडील तालुक्यांत हांगामा जमीनदारांनीं फार केला, याचा बंदोबस्त झाला पाहिजे, ह्मणून इसामियाचे भावाचें पत्र आलें. त्याजवरून यांनीं निरोप घेऊन तालुक्याचा बंदोबस्त करून व जमीयत घेऊन येतों ह्मणून करार करून गेले. सांप्रत वर्तमान ऐकिलें कीं, इसामिया तालुक्यांत गेले, जमीदारांनीं त्याचे भावाचें पारिपत्य करून इसामिया याजवर येऊन छापा घातला, जमयत गारत केली, इसामिया निघून जातीनशीं गेला, अद्याप ठिकाण नाहीं. ह्मणून वर्तमान. रा छ २९ जिल्हेज. हे विज्ञापना.

---

[७१] श्री. १७ जुलै १७९९.

विनंति विज्ञापना.. फतहुल्लाखान याचा पुत्र महमद अनवरखान कलबर्ग्यास आहे. त्याचें पत्र नवाबास आलें. त्यांत मजकूर कीं, अलीज्याहा बहादूर यांनीं सुरापुरास खिलत व जवाहीर पाठवून लिहिलें कीं, सगरचा किल्ला तुह्माकडे करार केला, तुह्मीं खातरजमईनें बंदोबस्त त्या मकानाचा करून आपले जमयतसुद्धां हलकी नवनिगादास्त करून जलद कलबर्गे व चितापूर व घार महाल या प्रांतास यावें, यांत तुमचा मजुरा आहे. त्याजवरून बेडर मजकूर काबू वखूत पाहून जागा व मकानें घ्यावयाचे उद्देशें जमयत ठेवून हरकत करणार, नदी उतरावयाकरितां ठोकरे वगैरेचा सरंजाम होत आहे, यामुळें दंडवती वगैरे मकानांतही शिबंदीची निगादास्त आपलाले संरक्षणाविषयीं होत आहे. इत्यादिक मजकूर लिहिला होता. त्यास हें पत्र नवाबांनीं पाहून आह्मास सांगितलें कीं, येविशीं तुह्मीं सुरापूरकर यास पत्र लिहावें. त्याजवरून सुरापूरकरास पत्र लिहिलें. त्याची नक्कल सेवेसी अवलोकनार्थ रवाना केली आहे. त्याजवरून ध्यानांत येईल. रा छ २९ जिल्हेज. हे विज्ञापना.

सुरापूरकरास पत्र लिहिलें त्याची
नक्कल त्याने जुनावरच आहे.
सबब येथें बार केलें नाहीं.

---

[७२] श्री. १७ जुलै १७९९.

विज्ञापना ऐशीजे. शिद्दी अबदुलावर सदाशिव रड्डीनें छापा घातला, ते दिवशीं रड्डीस गोळी लागून ठार झाला असें येथें वर्तमान आलें. नवाबांनीं त्यास दहा रुपये इनाम दिले. खरें वाटेना. याजकरितां फिरोन बातनीस पाठविलें होतें तो बातमीदार आजच नबाबाचे येथें आला. त्याचे सांगण्यांत जे, सदाशिव रड्डी अलीज्याहाबहादूर याजवळ स्वस्थ आहे; त्याजकडील कोणी एक सरदार होता तो जाया झाला. ह्मणून वर्तमान. हैदराबाद येथील शहरच्या बुरजावरून तोफा आहेत. त्यांची चौकशी सरंजामाची करूं लागले. तेव्हां समजलें कीं, सारे तोफेच्या कानांत खिळे मारले आहेत. मग कोणी खिळे मारले असतील ते असोत. आतां तोफेचे कानास बरमे करावयास लावले आहेत. याप्रमाणें तहकीक वर्तमान कोणीं येऊन सांगितलें. त्याजवरून लिहिलें असे. मागाहून चौकशी करून पक्कें असेल तें लिहिण्यांत येईल. रा। छ २९ जिल्हेज. हे विज्ञापना.

छ ६ मोहरम मुा भागानगर
रवाना टप्यावरून.

[७३] श्री. २३ जुलै १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ ६ माहे मोहरमपर्यंत मुा भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. नवाबांशीं बोलणें झालें इत्यादिक सर्व तपशील अलाहिदा पुरवणी पत्रांत लिहिला आहे.

अलीज्याहाप्रकरणीं नवाबांनीं खरिता दिल्हा तोही पाठविला आहे. अवलोकनें ध्यानांत येईल. उत्तराविषयीं लवकर आज्ञा झाली पाहिजे. नबाब बहुत इंतज्यारी करीत आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

[७४] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐशीजे. खरड्याचे जाबसालांत नबाबाचे हुकमाप्रमाणें मीरहैदरखान मुनसी व आजमखान व घामीमिया व अर्जबेगी व सरबुलंदजंग इतके होते. तेवेळेस इतक्यांचीं वचनें घेतलीं होतीं कीं, नवाब बोलले आहेत त्याप्रमाणें निभावतील. याविषयीं अर्ज करून निभावून देऊं. याविषयीं सर्वांनीं नवाबास पुसून वचन दिलें. हैदराबादेस आलियावर विप्र पुढारी झाले. सर्वांचे पायमालीची चाल सुरू केली. कोणासही संतोष नाहीं. मीर अलमसुद्धां सर्व खट्टे. तेव्हां सरबुलंदजंग व मीर हैदरमुनसी व अजमखान मिळून नवाबास अर्ज केला. यांत अग्रगण्य मुनसी त्रिवर्ग मिळून नवाबांशीं बोलले कीं, श्रीमंतांशीं कराराप्रमाणें निभावावें, गोविंदराव यासी सफाई ठेवावी, तेही दौलतखाहींत अंतर करणार नाहींत, त्यास बोलावूं पाठवावें, आणि त्याशीं एकांतीं बोलावें. त्याजवरून नवाबानीं चोबदार पाठविला कीं, तुह्मीं रात्रीं दरबारास यावें. त्याजवरून गेलों, दिवाणखान्यांत बसलों, तों सरबुलंदजंग व अजमखान व मुनसी त्रिवर्ग येऊन बोलूं लागले कीं, आह्मीं हजरतीशीं बोलून तुह्मांस बोलावूं पाठविलें. तेवेळेस सदरहू मजकूर इतिकर्तव्यता त्रिवर्गाचीच, असें माझे समजण्यांत आलें. तोंपर्यंत हें वर्तमान समजलें नव्हतें. त्रिवर्ग बोलूं लागले कीं, तुह्मी दौलतखाही करून दाखवाल असें आह्मी हजरतीजवळ बोलिलों, त्यांस शिंदे यास नवाबानीं पैका दिला, त्यांचे तमसूक आहेत तो ऐवज व जप्ती तालुक्याची झाली त्याचा वसूल करारी ऐवजांत वजा घालावा हें तुह्मीं कबूल करावें. याचें उत्तर त्यांस दिलें कीं, मी खाविंद त्या दौलतीचा नाहीं कीं आपला जिम्मा कबूल करावा, जिम्मा कबूल केला आणि खाविंदांनीं मान्य केलें नाहीं तर शब्द आपल्याकडे घ्यावा कीं

काय? नबाब सांगतात त्याअर्थी याविषयीं रद्बदल करून जें होईल तें करीन, यांत कसूर करणार नाहीं. याप्रमाणें बोलिलों. नंतर मुनसी एक वेळ नबाबांकडे गेले. मागती आले. उपरांत ते त्रिवर्ग आणि मी असे नबाबाकडे गेलों. सलाम झाला. त्रिवर्ग मशीं बोलत होते. त्यांतील भाव असा समजण्यांत आला जे, मजकडून पैगाम आहे असें यांनीं नबाबास समजाविलें, पैगाम तर माझा नाहीं, याचें कसें करावें, प्रसंग तर रुबरूचा आला. या मननांतच होतों. नबाबाजवळ जाऊन बसलों. कांहीं वेळ सर्व स्तब्ध बसले. मी नबाबाचे बोलण्याची प्रतीक्षा करितों. नबाब माझे बोलण्याची प्रतीक्षा करितात. मी बोलूं लागलों तर मजकडील पैगाम दिसतो. मुनसी ह्मणूं लागले कीं, बोलावें. ते समयीं मीं नबाबास प्रश्न असा केला जे, चोबदार बोलावूं आला होता, त्याजवरून हजर झालों, काय आज्ञा करणें ती करावी. तेव्हां नबाबांनीं आजमखान व मुनसी यांजकडे हात दाखविला कीं, यांचे बोलण्यावर तुह्मांस बोलाविलें. तेव्हां त्रिवर्ग तोंड पाहूं लागले. मजकडून पैगाम नाहीं, ऐसें या प्रश्नांत भाव दाखवून पुढें समेट करून चालविलें. नबाबास ह्मटलें कीं, माझी परवर्ष आपणांस मंजूर आहे कीं नाहीं? जो जाबसाल खरड्यावर झाला, त्याची खातरजमा आपले सांगितल्यावरून मी तेथें केली, त्याची निभावणी हजरतीस मंजूर असावी. तेव्हां थोडेसें रोषयुक्त होऊन बोलिले कीं, कृष्णराव दौलतखाह त्यांचे तुह्मी पुत्र, तेव्हां तसेंच तुह्मी दौलतखाह. कृष्णराव होते तेवेळेसही श्रीमंतांशीं आह्माशीं लढाया झाल्या, औरंगाबादेस आह्मी निघून गेलों, त्यासमयीं श्रीमंतांनीं आपलेकडून आमची मुदारात करून दहा लक्षांची जहागीर दिली. आतांचे प्रसंगीं तुह्मीं त्याचे तिप्पट आह्माकडून देवविली, ही दौलतखाही कीं काय? तेव्हां नबाबास ह्मटलें, हजरत बोलिले हें मीं ऐकिलें, परंतु माझा अर्ज समजून घ्यावा, मग आज्ञा करावी, माझें बोलणें समजावयाचें नसल्यास उपाय नाहीं. बोला ह्मणून सांगितलें. तेव्हां प्रारंभ प्रथमपासून केला कीं, श्रीमंतांचे अथवा मदारुलमहाम यांचे मनांत माम-

लती आणि सफाईनेगळ दुसरा खियाल नव्हता, खलप ज्यांनीं आणला त्यास काढावे इतकेंच बोलणें, परंतु हजरतीस जे सलाह देत होते त्याजपुढें आमचें बोलणें रुचीस न पडलें. उभय दौलतींत जो प्रकार न घडावयाचा तो होऊं लागला, चाल चालणें आणि बोलणें मनस्वी झालें, कोंकणचा तालुका हजरत निवडूं लागले, याजपेक्षां अधिक गोष्टी झाल्या, इतक्याही श्रीमंतांचे कानावर गेल्या, त्यासही पुढें दोस्तीची उमेद किमपि राहिली नाहीं, प्राप्त प्रसंगाचा निर्वाह करणें प्राप्त, ईश्वरें त्याची गालबता केली तेव्हां हजरतीचे बोलण्या-प्रमाणें मुकाबला केला असता तर आयास नव्हता, परंतु त्यांनीं आपलें खानदानावर दृष्टि देऊन तसें केलें नाहीं, जाबसालाचें बोलणें घातलें, तेंच बोलणें मी हजरतीशीं बोललों, त्याजपेक्षां अधिक आपले फदरचें बोलिलों नाहीं, याविषयीं मनांत हजरतीचे कोणी संदेह घातला असेल याची निवृत्ति कशी होईल, याची एक तोड आहे. श्रीमंत व मदारुलमहा यांशीं हजरतीच्या भेटी होतीलच, तेवेळेस त्याची समक्ष रुजू करून देईन, त्यास प्रथम श्रीमंतांनीं आज्ञा केली, त्याप्रमाणें आपणासी बोलिलों, त्याजवर हजरतीनीं शेवट निश्चयाच्या फर्दा करून दिल्या, त्या घेऊन गेलों, त्यांस दाखविल्या, भोसले, शिंदे आदिकरून सर्व सरदारांच्या मर्जीस येईना, त्यासमयीं श्रीमंतांस व मदारुलमहाम यांस परस्परें दौलतीचे हुकूम सांगून विनंति जशी करावयाची ती करून बजिदी केली. श्रीमंतांचें मोठें खानदान मदारुलमहाम पूर्वीपासून माहित, बमुरुवत हजरतीची भीड त्यास गालब, याजकरितां त्यानीं दौलत-खाहीचे मार्गें त्या फर्दांच कबूल केल्या. प्रथम बोलणें सरदारांचे आग्रहानें काय होतें तें सर्व राहून कसें ठरलें, पैका तेथेंच घ्यावा ऐसा आग्रह होता, हजरतीचे सांगण्यावर मी खातरजमा तिकडील केली, तेव्हां आपले कुच झालें, इतकी कस्त केली, त्याची शाबा-सकी मिळावी तें सर्व राहून इतराजी दृष्टीस पडती हें काय? याचें उत्तर नाहीं. काय लिहावें लागतें हें मनांत येऊन नवाब बोलिले कीं, याचा जबाब देऊं, त्याजवर तुह्मी बोलाल, तकरार बोलण्याची

अधिक होते, हें राहूं द्यावें, पुढें दौलतखाही करावियाचें बोलावें, ऐसें ह्मणों लागले. तेव्हां बोलिलों जे, आपण करार केला त्याप्रमाणें अमलांत आणावें, मीही दौलतखाहींत कसूर करणार नाहीं. तेव्हां ह्मणूं लागले जे, शास्त्रार्थाचें बोलणें बोलूं नये, करूनच दाखवा. तेव्हां विनंति केली जे, करूनच दाखवीन, यांत संदेह नाहीं, परंतु जिम्मा असें बोलत नाहीं, कारण खाविंदीचा दर्जा तिकडे आहे, यास्तव माझें बोलणें हजरतीस अप्रमाण वाटूं नये, दुसरी गोष्ट खावंदाशीं प्रतरणा करून तुमची दौलतखाही करावी हें मजकडून घडावयाचें नाहीं, खावंदास अर्ज मारून करून मर्जी खुष करून करीन याविषयीं संदेह मनांत येऊं नये. ऐसें बोलून एक गोष्ट बोललों जे, कित्येक गृहस्थांनीं हजरतीस समजाविलें आहे कीं, श्रीमंत व मदारुलमहाम यांनीं आह्मांशीं करार केला आहे जे, तालुका घेऊं नये, असें असतां बदले गोविंदराव कृष्ण यानीं श्रीमंतांचे घरांत बळेंच तालुका घातला, यांत दोहींकडे शब्द, एकतर माझे खावंदाचे करारास दोष आणला, दुसरा दोष मजकडे आणला, याची संशयनिवृत्ति झाली पाहिजे, मलाही खावंदानीं लिहिलें आहे कीं, आमचा करार कोणापाशीं असा असेल तो काढावा, याविषयीं तुह्मीं नबाबाशीं बोलावें, त्यास याची चौकशी हजरतीनीं करावी, मोघम ठेवूं नये; दोन्ही दौलती मोठ्या, यांत लटके संशय घालणें हें चांगलें नाहीं, याची जुजरशी जरूर व्हावी. याजवर नवाब बोलिलें कीं, ही गोष्ट आतां राहूं द्यावी, मुलाखतीवर ठेवावें. मीं ह्मटलें, उत्तम आहे, मुलाकातीवर ठरलें तेव्हां माझा संशयही हजरतीनीं मनांत ठेवूं नये, काढून टाकावा, मुलाकातीचे समयीं सर्व निदर्शनास येईल. तेव्हां बोलिले जे, संशय मनांत ठेवीत नाहीं. नंतर आणखी बोलिले जे, आजचा प्रसंग अनायासें घडला, मी कोणाची नालिष हजरतीजवळ केली नाहीं, आणि माझा असा संप्रदायही नाहीं, बल्कें उपकारच कोणावर केला असेल, आजचे मजालसींत जे नसतील ते वाईट मानतील, आणि एखादी आदावत आणतील, हजरतीस समजावतील, ते खातर

मुबारकेत न यावी. बोलिले जे, मनांत येणार नाहीं. मी निःसंशय असूं, असें बोलिल्यावर खातरजमेनें असावें ह्मणून आज्ञा झाली. दोन प्रहर रात्र झाली तेवेळेस निरोप घेऊन घरास आलों. अजमखान यास नवाबानीं सांगितलें कीं, घासीमिया एकटे बाहेर फौजेंत आहेत, यास्तव तुह्मीं जाऊन लोक लष्कर जमा करून उदईक कूच करून मुसारेमूजवळ पट्टणचरूस जावें. त्याजवरून ते प्रहर रात्र असतां तेच दिवशीं गेले. याप्रमाणें ते दिवशींचें वर्तमान. रा छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[७९] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐशीजे. अजमखान व सरबुलंदजंग व मुनशी त्रिवर्ग असतां नवाबाशीं बोलणें झालें. निरोप घेऊन आलों. तों मीर अलम बहादूर खालीं बसले होते. त्यास नवाबांनीं बोलाविलें नाहीं, ह्मणून खप्पा होते. माझी भेट उभाउभी झाली. जवाब सवाल बोलण्यांत आला ह्मणून त्यानीं पुशिलें. उत्तर दिलें कीं, उदईक सांगून पाठवीन. घरास आलों. दुसरें दिवशीं वर्तमान ऐकिलें कीं, नवाबाचे मनांत कोणी संदेह घातला आहे. तुह्मांस दगा दो चहूं दिवसांत होणार असें दोघां चौघांनीं बातनी सांगितली. त्याजवरून बहुत विचारांत पडलों. अविचार प्रकार जेथें झाला तेथें संदेहास कारण. शिद्दी इमामखान याजकडे कांहीं दोष लागून होता. अदावतीमुळें त्याजवर पेंच आला. तसाच अविवेक झालियास काय करावें ह्मणून बहुत फिकिरींत होतों. तों सायंकाळीं मीर हैदर मुनशी याजकडून रुका आला त्यांत लिहिलें होतें कीं, सदाशिव रड्डी याजकडे तुह्मीं एक दोन साहुकार पाठविले आहेत, कारकूनही तुह्माकडील गेला, खर्चाची सरबराई तुह्माकडून त्यास होत आहे, ऐसें ऐकिण्यांत आलें, त्यास काल नवाबाजवळ खातरजमेचें बोलणें दौलतखाहीचें झालें तें काय? आणि हें वर्तमान ऐकतों हें कसें? याचा जबाब पाठवावा. हा रुका पाहिल्यावर मनांत आलें जे, अशा तुफानाच्या गोष्टी अदावतीनें कोणीं सांगितल्या? त्याजवर अविवेक झालियास

कसें करावें? ह्मणोन बहुत चिंतेंत पडलों, शेवटीं मनाचा निश्चय केला जे, श्रीमंतांचे आणि नबाबाचे दोहीं दौलतीची दौलतखाहीची चाल आपली हें वास्तविक आहे, मग याची चिंता कशास करावी, ईश्वर तर सर्व पाहत आहे, मुनपीजींचे रुक्याचा जबाब पाठविला कीं तुह्मीं आमचे येथें यावें, ह्मणजे समक्ष या रुक्याचा जबाब बासवाब देण्यांत येईल. मुनपीनीं तो जबाब घेऊन दरबारास गेले. नबाबास सांगितलें. नबाबानीं त्यास आज्ञा केली कीं, उदईक तुह्मीं त्याजकडे जाऊन पुसावें. त्याजवरून दुसरे दिवशीं मुनपीनीं सांगून पाठविलें जे, दरबारास जाऊन सरबुलंद-जंग यास घेऊन येतों. दोनप्रहरचे वेळेस उभयतां आले. सहा घटिका त्यांशीं बोलणें झालें. बोलण्यांतील विस्तार बहुत, परंतु थोडासा लिहितों. त्या बोलिलों जे, तुह्मीं रुका हुजूरचे हुकमावरूनच पाठविला असें वाटतें, त्यास याचा जबाब हाच आहे कीं अशा अफवाई खबरेनें मनांत संदेह येऊंच नये, कारण श्रीमंतांस अशी गोष्ट मंजूर असती तर खरड्यावर जें च्याहते तें करते. तो वक्त हातचा कां जाऊं देते, नबाबाची दौलत बुडवावयाची नाहीं हेंच कायम ह्मणोन सवालजबाब सुलटचा ठरला, यासि आणि तुह्मीं संशय घेऊन पुसतां यास काय संबंध? एवढ्या मातबर दौलतींत असे संशय घेणें चांगलें नाहीं, हीच गोष्ट तहकीक करावी असें मानस असल्यास उत्तम, आह्मी सिद्ध आहों, दस्तऐवज अथवा पैका याचा मुद्दा साबीत तुह्मीं करावा, अथवा आह्मी तुमचे आंगीं मुद्दा दस्तऐवजमुद्धां झाडून रोकड देखील साबीत करून देऊं, तुमच्यानें तर साबूत करवणार नाहीं, परंतु आमचे सरकारांत तुह्मांकडून जें अयोग्य झालें तें खरें करून देऊं, प्रस्तुतचा समय दोहीं दौलतीचा कसा आहे कीं दिवसेंदिवस एक एक कदम उभयपक्षीं पडत जावा, ह्मणजे दिलांतील गुबार झाडून निघोन प्रांजळ व्हावें, करारमदार झाले, त्यांजवर कायम रहावें, तें सर्व एकीकडे राहून झटके अंदेश काढीत बसून याची तकरार वाढविणें यांत संदेह वाढतील किंवा सफाई होईल, ज्या गोष्टीची तकरार कराल तीच गोष्ट वृद्धीस पावेल, दौलतीची बेहबूत कशांत हें पुर्ते समजून आह्मांशीं बोलावें, आह्मी जें

बोलाल त्याचा जबाब देण्यास हजर आहों, नबाबाची दौलत बहुत जलिल झालियास आणखी जल देणें अथवा रोनक आणणें हा यखतियार तुह्मांकडे आहे, कारण तुह्मीं नबाबाचे घरचे खानाजाद नौकर एकमू आहां, एकमूपणाचा धर्म हाच कीं खावंदाचे दौलतीची बेहबूद असेल तें समजावावें, तमाषबिनी करणार बहुत आहेत, परिणामावर दृष्टि देऊन जें नेक तें करावें. ऐशीं मनुष्यें कम आहेत. त्यांनीं ह्या गोष्टी ऐकून घेऊन बोलिले जें, तुह्मीं बोलतां हें खरें आहे, सारांश, प्रस्तुत जो हंगामा बरपा झाला याचे बंदोबस्ताची फकल कशी श्रीमंत करितात ती बोलावी. ऐसें ह्मणों लागले. हजरत आणि श्रीमंत एकदिल होऊन तजवीज केलियास काय चीज आहे, पाहिजे तसा बंदोबस्त होईल, तुह्मीं आपले करारमदारावर मजबूत असावें, दिवसेंदिवस श्रीमंतांचे दोस्तीमुळें स्वस्थ असून आपले दौलतीस रानक हजरतींनीं आणावी, दोस्ती मजबूत आणि वृद्धि व्हावी, याविषयीं आह्मांस आज्ञा होत असावी, आह्मांकडून दोहीं दौलतीची सेवा करून घ्यावी, अशा कार्यावर मुतवजेह व्हावें, आणि काय होतें तें पहावें, याप्रमाणें रियासतीच्या चाली असाव्या, तें सर्व एकीकडे राहून संशय उकरून काढावे यांत मजा नाहीं, जे नौकर हजरतीचे आहेत, त्यांनीं दौलतीचे बेहबुदीवर नजर ठेवावी, आपले जातीचे पेष आमदेवर दृष्ट दिलियास खावंदाचे दौलतीस धक्का बसेल, दौलत पेंचांत आलियावर तुह्मीं कोणीकडे रहाल? काल तुमचेसमक्ष हजरतीजवळ आह्मीं बोलिलों जे यासमयीं बोलण्यांत नाहींत, ते आमचे वाईट मानून लटक्या कबाहती उठवितील, हजरतीस समजावितील, तें मजूर असूं नये, तेंच नमुदास आलें, सरकारचा जाबसाल कसा तरी होईल, राहत नाहीं, तुह्मीं दरबारचे मुत्सद्दी, आज तुमचे विद्यमानें बोलणें तें दुसऱ्यानें वाईट मानावें, खावंदानीं भलत्याची गोष्ट ऐकून मनांत विचार न केलियास तोहमत आह्मांवर यावी, आह्मांस दगा करावा ऐसें कित्येकांचे मनांत ह्मणोन बहुत ऐकितों, त्यास मला तुमचा कोणाचाही विश्वास नाहीं, श्रीमंतांची जात आहे, ते तर लांब राहिले, त्यास जे श्रीमंत तेच

हजरत, हजरतीने जातीचा मात्र विश्वास इतकें खरें, आज दोन दिवस। आपले घरांत निद्रा करीत नाहीं, ढाल तलवार घेऊन आपले लोक आहेत त्यामुद्धां हुशार, दोन वेळ मशाल पाठवून रात्रीं वाड्याचा शोध करवीत असतों, कारण आपला परकी कोणी वाड्यांत आहे नाहीं हें समजावें, लोक बहुत येणार जाणार, कोणाचें मन कसें आहे हें समजत नाहीं, त्यास तुह्मीं हजरतीशीं दौलतखाहीचे मार्गे सर्व बोलून मला सांगून पाठवावें, हजरतीनीं आपले दौलतीस रोनक आणावयाचें काम आह्मां-पासून घ्यावें, आह्मीं सिद्ध आहों. याप्रमाणें बोलणें समाधानीनें होऊन उभयतां गेले. रात्रीं नबाबाशीं बोलणें होऊन प्रातःकाळीं सांगून पाठवूं याप्रमाणें बोलिले. नंतरचें वर्तमान अलाहिदा लिहिलें असे. त्याजवरून ध्यानांत येईल. रा छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[७६] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐशीजे. मुनसी व सरबुलंदजंग उभयतां जाऊन नबाबाशीं बोलले जे, त्याचें बोलणें साफ आहे ह्मणोन बयान करून बोलले आह्मीं या कामांत नाहीं, आमचा दस्तऐवज निघावयाचा नाहीं, तुह्मीं आमचे सरकारांत राजकारण केलें असेल तें दस्ताऐवजानिशीं श्रीमंत काढतील, गोष्ट लांबणीवर जाईल, यासमयीं सफाईची चाल अधिक असावी हें चांगलें. असें त्याचें ह्मणणें, हें ऐकून नबाब बोलिले कीं, खरें आहे, या गोष्टी न काढाव्या, पुढें सफाईचा मार्ग त्याशीं बोलावा. ऐशी-आज्ञा केली. मुनसीनीं दुसरे दिवशीं सांगून पाठविलें कीं, आपण माझे येथें यावें, मीं हजरतीस पुसून घेतलें, सर बुलंदजंगही येतील, येथें सर्व दरजे बोलण्यांत येतील. याचें उत्तर त्यास सांगून पाठवावें, इतक्यांत मीरअलम याजकडून निरोप आला कीं, मुनसीनीं आपले येथें येण्याविशीं अमजमुन्मुल्क यास ह्मटलें, त्यांनीं जबाब दिला कीं, सर्वकाल मला हुजूर रहावें लागतें, माझें येणें कसें घडेल, मला ह्मणत होते, मीं जबाब दिला जे तुह्मीं बोलाल त्यांत मी आहे, राजाजी तेथें होते, त्यांनीं हें ऐकून त्याचे मनांत आलें कीं, परभारें मुकदमा जातो, मी हात-

पाय कां न हालवावे, ह्मणोन नवाबाजवळ बोलिले कीं, हजरत मला इरषाद झाला तर गोविंदराव कृष्ण याजकडे जाईन, माझा त्याशीं कदीम सिलसिला आहे, आतां जाऊन त्याशीं सफाई करून दौलतखाहीनें सलाह पुसून येईन, हजरत बोलिले कीं, बेहत्तर आहे. त्यास राजाजी तुह्मांकडे येणार आहेत. अशी खबर मीरअलमानीं सांगून पाठविली. मनन केलें तों सारी बचबच. ताळ नाहीं. मुनसीनीं यास सांगून पाठविलें कीं, सर बुलंद्जंग व मीरअलम यास तुह्मीं बोलावून आपले येथें हुजूरचे परवानगीनें आणावें, ते आलियावर आह्मीं येऊं. बोलिले, उत्तम. चार पांच घटिका रात्र झालियावर राजे रेणूरावजी आले. यास पुसिलें कोणीकडे येणें झालें. बोलिले, हजरत मला ह्मणत आहेत कीं तूं बाहेर खेमे दाखल होऊन फौजेची गिर्दावरी करावी, उदईक जाणार, आपला निरोप घ्यावा, सलाह जाण्याची पुसावी, ह्मणून आलों. नवाबास कळवून आला किंवा तुह्मींच आला ऐसें पुसलें. आज्ञा घेऊन आलों. त्यास माझे निघण्याचें वर्तमान सांगून पुढें दौलतखाही जे सलाह काय सांगतील ती पुसतों, ऐसें बोलून आलों. त्यास ह्मटलें कीं, फौज जमा करण्याचा तुमचा विषय नाहीं, मग या कार्यावर का तुह्मांस योजलें. तेव्हां ह्मणाले कीं, नवाब बोलिले जे, मीं निघावें, नाहीं तर तुह्मीं निघून फौजेची गिर्दावरी करावी, तेव्हां मला जाणें प्राप्त. ऐशी आज्ञा असल्यास तुह्मींच जावें, प्राप्त आहे, ह्मणोन सलाह सांगितली. नंतर हळूच पुसूं लागले कीं, अलीज्याह गेले. यांत श्रीमंतांचें संमत आहे कीं काय? मीं त्यास सांगितलें जे, तुह्मांस सांगितलें तर खरें वाटणार नाहीं. मला प्रमाण वाटेल, सांगावें, ह्मणोन बोलिले. तेव्हां वास्तव्य सांगितलें. अलीज्याहानीं हें कर्म केलें यांत श्रीमंतांचें संमत खरेंखुरें नाहीं, हें वर्तमान श्रीमंतांस कळलियावर अलीज्याहाचे बुद्धीस दोष ठेवतील, चांगलें ह्मणणार नाहींत. तेव्हां ह्मणाले, याविशीं शपत करावी. तेव्हां शफतपूर्वक त्यास खातरजमा वाटे अशाप्रकारें सांगितलें कीं, या सल्लाहांत श्रीमंत शफतपूर्वक नाहींत, वास्तविकच गोष्ट, मग शफत करावयासी काय चिंता. ह्मणोन शफत करून त्यास

सांगितलें. पुढें बोलिले कीं, याचे बंदोबस्ताविशीं श्रीमंतांस आपण कांहीं लिहितील कीं काय? मी बोलिलों, नवाबांनीं पत्र लिहावें, मला आज्ञा करतील त्याप्रमाणें मीही लिहीन, मदारुलमहाम दुरंदेश आहेत, नवाबाची पास त्यांस सर्वोपरी आहे. तेव्हां ह्मणाले, आपण शपथपूर्वक बोलिला, याप्रमाणें मी नवाबास खातरजमा करून सांगूं किंवा नको? त्यास ह्मटलें कीं, श्रीमंतांचे दौलतीस व नवाबाचे रोनक आणि बेहबूद दिवसेंदिवस अधिक सफाई व्हावी या इराद्यावर आह्मीं मजबूत, तेव्हां हजरतीशीं खातरजमेनें बोलावयास काय चिंता? बोलावें. नंतर बोलिले कीं, आजपर्यंत मजकडून अंतर पडलें असेल, त्याची क्षमा करावी, मी सर्व प्रकारें आपला आहें. नवाबाचे दौलतखाहीविषयीं खातरजमा केली. मीही श्रीमंतांचे दौलतखाहीविषयीं आपली खातरजमा करितों ह्मणोन शफत केली. उत्तम ह्मणोन बोलिल्यावर ह्मणाले, हा मजकूर नवाबाशीं बोलून उदईक आपल्यास चोबदार बोलावूं पाठवितों, अथवा मला आज्ञा झालियास मी येईन. उत्तम ह्मणोन सांगोन वाटे लावले. तेच वेळेस ते नवाबाकडे जाऊन बोलिले. मीरअलम व मुनसी आमजदुल-मुल्क नवाबाजवळ होते. नवाबाशीं मुनसीनीं बोलून आमजदूलमुल्क यांनीं व मीरअलम यांनीं आपले घरास यावें ह्मणजे रावजी येतात. ऐशी परवानगी उभयतांस घेतली. इतकियांत राजाजी जाऊन नवाबाशीं उभे असतां कानांत बोलिले. ते वेळेस मीरअलम मुनसीजीस ह्मणाले, आतां दुसऱ्यानें परवानगी घ्यावी तर आह्मी येऊं. तेव्हां मुनसीनीं मागती नवाबास विचारिलें. आज्ञा झाली जे, रावजीस उदईक येथेंच बोलावूं, तेव्हां समक्षच बोलणें होईल, रावजीस तुह्मीं आपले येथें बोलावूं नये. याप्रमाणें झालें. दुसरे दिवशीं प्रातःकाळींच नवाबाचा चोबदार आला. नंतर गेलों. तो मजकूर अलाहिदा लिहिला असे. रा छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[७७] श्री. २३ जुलै १७९५.

विज्ञापना ऐशीजे. प्रस्तुत काळीं येथें बचबच झाली आहे. कांहीं ताळ राहिला नाहीं. दौलतीचे बेहबुदीविषयीं कोणाचें लक्ष नाहीं. आपल्या आपल्यांतच कलवंडतात. नवाबाचे येथील कारभार आपणच करावा असें सर्वांचे मनांत येतें. सामर्थ्य तर कोणाचेंही नाहीं. सर्व दौलतीचे कारभाराचें ओझें आपले डोईवर घेऊन श्रीमंतांकडील देण्याचा जिम्मा आपण घ्यावा, नवाबास उपद्रव किमपि न द्यावा, असें जो करील तो कारभारी होईल. या प्रकारचें सामर्थ्य तर कोणाचें नाहीं. श्रीमंतांनीं अंगीकार केल्यास कोणी करतील. परंतु प्रस्तुत काळीं नवाबास कोणाचा विश्वास येत नाहीं. नवाबाचें अंतःकरण संशयी असल्यामुळें कोणास धीर पुरत नाहीं. छिद्र पाहणार, नवाबास संशय घालणार लागून राहिले आहेत. त्याजमुळे नवाबाची चित्तवृत्ति स्थिर नाहीं. खासे नवाबानीं मनावर घेऊन करीन ह्मटल्यास अगाध नाहीं. परंतु पैक्याचा लोभ सुटत नाहीं. खजान्यांतून पैका मुबादल्यास द्यावा, ऐशी ह्मणावयाची ताकत कोणाची होत नाहीं. कदाचित् कोणी बोलेन असें ह्मणावें तर जो असें बोलेल तो शत्रुवत् वाटतो. तेव्हां कोणास गरज? खाशानींच आपले मनांत विचार दुरंदेशीचा करून खजान्यांतून पैका द्यावा; तर ही गोष्ट घडावयाचीच नाहीं. तालुके वगैरे खटपट करून कांहीं ऐवजाची तोड करावी; तर घरचा फंद उभा राहिला. याचे बंदोबस्ताकरितां नवनिगादास्त शिबंदी ठेवणें व मागील शिबंदीचें देणें प्रसंग पाहून लोक अडवितात. त्याची समजूत काढावी लागती. तिकडे पैका खर्च होऊन ही पुरी पडत नाहीं. तेव्हां श्रीमंतांकडील फडच्या कसा होतो? श्रीमंतांस राजी राखावें तर फौजेस काय द्यावें? या प्रकारच्या अडचणी आहेत. एका लोभामुळें इतक्या अडचणी पडल्या आहेत. इतकी बचबच कारण उभयतां विप्र आणि मीर अलम त्यांतही रघोत्तमराव मसलत देणार! त्यांचे मसलहतीनें दफ्तरदार नवाबाशीं बोलणार! श्रीमंत व मदारुलमहाम यांनीं करार केला असतां, बदले गोविंदराव कृष्ण यानीं

तर नवाबाचें हितशत्रुत्व करून श्रीमंतांचें घर भरलें, असें नवाबास समजावून मर्जी बहारम केली. याजमुळें नवाबाचा रोष मजवर. वास्तविक पाहतां नवाबाचे बोलण्याचे खातरजमेवर मी स्वामीपाशीं जिम्मा करून घेऊन नवाबाची सुटका केली. तो उपकार एकीकडे राहून ही अदावळ आणिली. मीर अलम याचें ह्मणणें, मी नवाबापाशीं नालिष श्रीमंतांची अथवा तुमची केली नाहीं, नालिष करावी असें श्रीमंतांकडून घडलें नाहीं, तेव्हां कसें मी बोलेन? याची रुजुवात राजाजीदेखत नवाबाजवळ करून देईन, तुह्मीं गोष्ट मात्र काढावी, रघोत्तमराव याचे मसलहतीमुळें राजाजी चाल चालतात, घरचे नौकर आणि दौलतदार सर्वांची पायमाली करितात, यास काय ह्मणावें ह्मणून हाका मारितात. हें बोलणें आपल्यांत सानिष करून बोलतात किंवा वास्तविक हेंही समजत नाहीं. मीर अलमाची चाल आडून तीर मारावा, लागू झालियास उत्तम, नाहीं तर अलग. मीं पुढारी होऊन एकास हातीं धरावें, तर दुसऱ्यानें वाईट मानून दगड मजवर टाकावे. ज्यास हातीं धरिलें त्याचें सामर्थ्य निर्वाह करण्याचें ह्मणावें तर तेंही नाहीं. अदावळ लटकी आली तरी तेच पंचाईत करीत बसणार. नवाबाची कायम मिजाज असावी, तर जो कानाशीं लागतो तिकडे मर्जीचा प्रवाह, त्यांतही शाश्वत नाहीं. तेव्हां मला सर्वांचा संतोष राखणें प्राप्त. जुरत धरून कार्यावर पडतील, हें तर कोणाचेंही सामर्थ्य नाहीं. संतोष न राखिल्यास अदावळ नाहक आणून घालतील. याचाच विचार येऊन पडतो. उगीच अदावळी घालून काय व्हावयाचें? परंतु पंचायती घालीत बसावें हें स्वरूपास योग्य नाहीं. स्वामीची सेवा करून दाखवावी, नवाबाची दौलतखाई करावी, दोहीं दौलतीची दोस्ती अधिक व्हावी, हें कार्य घडावें तें एकीकडे राहून, आपलीच पंचाईत आपण करीत बसावी, दुसऱ्यांनीं तमाशा पहावा, हें उचित नाहीं, असें समजोन सर्वांचा संतोष आणि नाद लावून ठेविला आहे. मार्गाची गोष्ट होणें तेवेळेस होईल. तोहमत न यावी याजकरितां बहुत संभाळून चालतों. " अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री । न हि न हि तत्र धनाशा जीवित

आशापि दुर्लभा भवति ॥ " याप्रमाणें येथील प्रकार झाला आहे. यांतील अनेक विकृति आहेत. कोठपर्यंत लिहूं! सारांश, नवाब कांहीं समजोत अथवा न समजोत. ज्यांत स्वामीचे आणि नवाबाचे दौलतीस जें चांगलें तें करावयाचें. नवाबासही समजत समजत समजेल. स्वामींचें लक्ष्य नवाबाचे दौलतीचे संरक्षणाकडे असावें. जयफी नवाबाची. या समयांत स्वामींनीं संरक्षणाची दृष्टि या दौलतीवर ठेवावी तरच कल्याण. मला आपण होऊन नवाबाशीं बोलतां येत नाहीं. स्वामींनीं लिहिल्यावर बोलावयास अनमान नाहीं. नेक सलाह खटपट न होतां रहस्यानें बंदोबस्त होईल, अशी सलाह लिहावी, आणि स्वामींनीं मनावर घ्यावें. नवाब स्वामींचें ऐकणार नाहींत असें घडावयाचें नाहीं. नवाबांनीं बहुत पाहिलें, अनुभव घेतला, जईफ झाले. स्वामींचें जें लिहिणें त्याचा गुणच घेतील. त्यांतच कल्याण आहे. यासमयीं उपेक्षा न करावी. सर्व पत्राचें मनन यथास्थित होऊन आज्ञा व्हावी. रा। छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[७८] श्री. २३ जुलै १७९५

विज्ञापना ऐशीजे. रेणूराव रात्रीं जाऊन नवाबाशीं बोलले. प्रातःकाळीं चोबदार बोलावूं आला. गेलों. खाले दिवाणखान्यांत सर्व बसले होते. तेथें जाऊन बसलों. इतकियांत नवाबाजवळून रेणूरावजी उठोन मज-कडे आले. बोलावयाचें आहे, ह्मणोन एकीकडे घेऊन गेले. रोषन-राव व त्याचे व्याही यशवंतराव–पातशाही दफ्तरचें काम त्यांजकडे आहे, ते होते. ते बोलिले जे, आपणाशीं काल बोलणें झालें त्याप्रमाणें नवाबाशीं बोलून आपले तर्फेची खातरजमा नवाबाची केली, आपणास श्रीमंतांकडे पत्र लिहिण्याविषयीं सांगितल्या-विषयीं खुलाशानें बोलावें, रघोत्तमराव यांनें सांगितल्यावरून अथवा कसेंही मजकडून अंतर पडलें असेल त्याची क्षमा करावी, ह्मणोन नमस्कार करून पोटांत डोई घातली. याजउपरि कदाचित् मजकडून

अंतर दिसल्यास कानास खडा लावावा, मी तुह्मावेगळ नाहीं, माझे येथें सर्व दुषमन होऊन लागले आहेत, चहूंकडून मार होत आहे, कुलयातींत मला बुद्धि नाहीं, सर्व निभावणें आपलेकडे आहे, ह्मणोन घाबरें होऊन बोलूं लागले. तेव्हां त्यास ह्मटलें, नवाबाची दौलतखाही इच्छितां तशीच श्रीमंतांची दौलतखाही करावी, जें बोलतां हें दृढ असावें, तुह्मीं बोलतां याप्रमाणें चाल तुमची असल्यावर आमची चाल तशीच राहील, याविषयीं खातरजमा ठेवावी, घाबरें न व्हावें, कोणाचे बुद्धीस लागूं नये. ऐसा दिलासा दिला. नंतर नवाबाकडे गेलों. सलाम झाला. बसलों. मीरअलम, सरबुलंदजंग व मुनसी जवळ होते. सर्वांचें मानस रावजींनीं आमची प्रतिष्ठा नवाबाजवळ विशेष होय असें करावें, आणि सलाह मसलहतींत नवाबानीं घ्यावें असें घडावें. एकटे राजाजी पुढें लागतील ते शहाणे आणि आह्मीं वेडे कीं काय? आमचेदेखतचें पोर आह्मापुढें उड्या मारूं ह्मणतो, हें कसें घडेल? यास अक्कल तरी काय आहे? वास्तविक पाहतां खरेंहा आहे. या कार्यास मोठें ओझील मनुष्य पाहिजे. तो ऐवज तर कोणांतही नाहीं. बुद्धि असून कोणी कृत्रिम, कोणी लबाड, कोणी घातकी, कोणी सरळबुद्धि प्रामाणिक. परंतु कर्तृत्वशक्ति नाहीं. कोणी भडभडे, परिणाम बुद्धीचा नाहीं, कोणी मूर्ख सालस, कोणी मूर्ख दुष्ट, अशा नाना प्रकारच्या विकृति आहेत. घासीमिया व आजमखान तर लष्करांत. जवळचे मजलसीचीं मनुष्यें याप्रकारचीं. यजमानाचे बुद्धीचा निश्चय पक्का दृढ असलियावर इतक्या विकृतींचें साधन राखण्याचेंही प्रयोजन नाहीं. तेथें चलविल. तेव्हां एकास धरावें, एकास सोडावें, तेंही ठीक नाहीं. आमच नाशास कारण होणार. यास्तव सर्व समेटून चालणें प्राप्त. नवाबाजवळ जाऊन बसतांच मीरअलम याजकडे नवाब पाहून बोलतात कीं; आजपर्यंत मला यांचा संशय होता, आतां यांचे निखालसपणाविशीं खातरजमा झाली, कृष्णरावजी यांचे प्राणानें असर केला असें वाटलें. यांचें उत्तर मी नवाबास केलें कीं, मी निखालस पूर्वीपासून आहे, खरड्यावरचा मुकदमा निखालस ते

वेगळ व्हावयाचा नव्हता, परवां सरबुलंदजंग व मुनसी व अजमखान त्रिवर्ग असतां विनंति केली त्यांतही निखालस बोलणें झालें, माझे मनांत आतां कल्पिता नाहीं असें हजरतीनीं फरमाविलें असतां काल राजाजीयास मजकडे आणखी शोध घेण्यास्तव पाठविले हेंच आश्चर्य वाटलें, कारण हजरतीची खातरजमा केली असतां त्याजवेगळ आणखी पृथक् पृथक् कोणकोणाची वेगळी खातरजमा करीत बसावें! निश्चय कोणता मानावा? माझे बोलण्यांत फरक पडावयाचा नाहीं, कोणाशींही बोललों तरी एकच बोलणें, हजरतीनीं आपले करारांत अंतर येऊं न द्यावें, तसेंच श्रीमंतांकडून उभयपक्षीचा संतोष राहून जी दौलतखाही होईल ती आम्ही करावी हें आमचें काम, आमचे बोलण्याची पत राखणें हजरतीकडे, खरड्याचे जबाबसवालांत सरबुलंदजंग व मुनसीजी हीपरिक आहेत, मीरअलम बहादूर व राजे रेणूरावजी तर श्रीमंतांपाशीं होते, यांनीं सर्व फर्दा पाहिल्या आहेत, वाकुफही आहेत, जशी मी हजरतीची दौलतखाही करीन असें ह्मणतों, तशीच सर्वांनीं श्रीमंतांची दौलतखाही असेल ती करावी, दोहीं दौलतीची बेहबूद असेल तीच सलाह एकवाक्यतेनें हजरतीस द्यावी, हजरतीनीं एकवाक्यतेनें नेक सलाह पुसावी, ह्मणजे यांत हुस्नकुभेह कोणती आहे ती ध्यानांत येईल, पृथक् एकएकानें येऊन हजरतीस अर्ज केला ह्मणजे चवघांच्या चार गोष्टी मनांत येऊन विचार पडतो, बुद्धीचा निश्चय होत नाहीं, आपले आपले अकलेमाफक दौलतखाहीनें बोलतों ह्मणोन अर्ज करितात, परंतु चौघांचें चहूं प्रकारचें बोलणें पडतें, कोणाचे बोलण्यावर अम्मल करावा हा विचार पडतो, चौघांनीं चार चाली सांगितल्या, तितक्या करूं लागल्यास व्यत्यय पडूं लागतो, कारण मतलब एक असतो, विचार चहू प्रकारचे होतात, असें झालियावर एकही गोष्ट सिद्ध होत नाहीं. मागें निश्चत नाहीं, बुद्धीस स्थिरता रहात नाहीं, तेव्हां कार्याचा नाश, यास्तव मर्जी-महरम व्हावयाजोगी यांनीं पृथक् सलाह देऊं नये, हजरतीनीं ऐकूं नये, इतकें बोलावयाचें कारण श्रीमंतांचे व हजरतीचे दौलतीची बेहबूद असून ऐक्यता असावी, यांतच सर्व दौलतीवर दाब आहे, हजरतीचे हे नौकर खानाजाद

आहेत, यासही खावंदाचे कल्याणाचीच इच्छा आहे, बुद्धिमंत समंजस आहेत, जे नेक तेच सलाह देतील, ज्यांत परिणाम नीट, दोहीं दौलतीची बेहबूद तो निश्चय हजरतीनीं करून क्रम चालवावा. याजवर नबाब बोलिले, तुह्मी सांगतां हें प्रमाण, असेंच घडेल. नंतर असफज्याहाचे वेळेची कथा सांगितली कीं, आपले जे आषखास लोक आहेत त्यांस घेऊन मसलहत पुसून त्यांतील सारांश समजून आपल्या कर्तृत्वाचा परिणाम पाहून जें नेक तें करीत असावें. मी बोलिलों जे, दौलतदार यांच्या चाली अशाच आहेत, यांत व्यत्यय पडला ह्मणजे दौलतीस नक बसते, मुख्य गोष्ट आपलें करण्यास दोष न लागावा ऐसें मनन असल्यावर परिणामही चांगलाच आहे. याप्रमाणें सर्वांस समेटून मार्गाची गोष्ट ती बोलोन सर्वांनाही रुकार दिला. नंतर अलीज्याहाप्रकरणीं सरकारांत पत्रें पाठवावीं हा मजकूर नबाबाचे बोलण्यांत आला. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला असे. रा छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[७९] श्री. २३ जुलै १७९१.

विज्ञापना ऐसीजे. नबाबानीं इरषाद केला कीं, अलीज्याह यास बातलीं देऊन सदाशिव रड्डी घेऊन गेला, ही गोष्ट नालायक केली, याचा तदारुक जमीदार मजकूर यास करावयाचा, कदाचित् राव पंत प्रधान यांचे तालुकियांतील लोक नौकरीच्या इराद्यानें बोलावितील तर जाऊं नयेत, या इतल्याचीं पत्रें श्रीमंत व मदारुलमहाम यांस पाठविलीं तीं तुह्मीं रवाना केलींच आहेत, त्याचा जबाब बसवाबच येईल, दोहीं दौलतीची यगानगत पेषजीपासून चालत आली, तेव्हां एका दौलतीवर कांहीं एक विचार येऊन वारद झाला तर त्याचे परिहाराची तदबीर दुतर्फाचे विचारें होत आली. खुसूस रघुनाथराव यानीं नामुनासीब हरकत करून नारायणरावसाहेब यांस दगा केला, ही गोष्ट नालायक झाली, त्यावेळेस कैलासवासी बाळाजीराव यानीं हिनयांत असतां आह्माकडे अजूराहे खानगी सांगून पाठविलें होतें त्याचें स्मरण झालें जे, जमाना एकसा नाहीं; कोणे वेळेस काय होईल याचा भरंवसा मानूं नये, या दोहीं दौलतीचे इरादे

एकास एकानीं बिलकुल उखडून टाकावे असे नाहींत, बिरादरीसारखी चाल उभय दौलतीची आहे, कांहीं एका दिवसां माझे घरांत बखेडा आहे, याजकरितां हेंच सांगणें जे, आतां उभय दौलतीची यगानगत आहे याचें स्मरण ठेवून आमचे वंशाचें बरें तें करावें, तें स्मरण होऊन मनांत आलें जे, बाळाजीराव काय दुरंदेष होते? पुढें भविष्य होणार त्याची सूचना पूर्वींच ज्यांनीं केली ऐसे पल्याचे अंदेषे मनांत यावें ही दानाई ईश्वरानीं ज्यास बक्षीस केली, त्यांचे सखुनाची पास ठेवणें लाजीम या विचारांत होतों, तेवेळेस गंगाबाई यांस मदारुलमहाल यांनीं पुरंधरास नेलें, आह्मांस इतला दिला, आणि आमचे मदतीची इच्छा केली, दौलतीचे मार्गानें पाहतां कोणतेंही कर्म करणें तर त्यास तोरा असणें शर्त आहे, तेसमयीं गंगाबाई गरोदर होती, इतकीच उमेद, पुढें काय होईल हा भरंवसा नाहीं, तथापि बाळाजीराव यांचे सखुनाचें स्मरण करून खुदावर तवकुल ठेवून रघुनाथराव यांचे तंबीचा इरादा केला, आमची नियत ईश्वरास मान्य होऊन माधवराव पंतप्रधान याचा तवल्लुद झाला, जें मनांत होतें तें जनाब इलाहींत कबूल होऊन हे दिवस दृष्टीस पडले, आतां एक हउस राहिली आहे कीं, राव पंतप्रधान यांस पहावें ह्मणजे अति संतोष, त्यास ईश्वरइच्छेकडून हेंही लवकरच घडेल, बाळाजीराव यांनीं आह्मांस यगानगतीचे मार्गें जें सांगून पाठविलें ती दोस्ती त्यांचे पाठीमागें आह्मीं अदा केली, याचप्रमाणें मदारुलमहाम राव पंतप्रधान यांचे घरचे पिढीजाद नौकर, त्यास आपले खाविंदावर वख्त येऊन पडला, पुढें तोरा ह्मणावा तर नाहीं, दौलत तर बुडालीच होती, कांहीं उपाय नाहीं, तेव्हां आपले नमकहलालीवर इरादा करून ईश्वरावर भार ठेवून उमेदीची इच्छा ठेवून कियासांत गोष्ट न यावयाची त्याचा अवलंब केला; ईश्वरें यांचे नमकहलालीवर नजर करून मनोदयानुरूप केलें, दौलतींत कांहीं बाकी राहिली नव्हती, त्या दौलतीस खाविंदाबरोबर रौनक आणली, हें सामान्य कर्तुत्व नाहीं, दुरंदेष मनुष्याचींच कार्यें आहेत, या बोलण्यांतील तात्पर्य हेंच कीं, या दोहीं दौलतींची यगानगत आजपासून आहे असें नाहीं, पुरातन-

पासून असेंच चालत आलें आहे, जें करणें तें दोहींकडील सलाहानेंच होत आलें, प्रस्तुत सदाशिव रड्डी जमदार यानें आमचे घरांत फंद केला, याची तदबीर कशी करावी हें राव पंत प्रधान व मदारुलमहाम यांस घराऊ रीतीनें लिहितों, तुह्मींही दोहीं दौलतींत परस्परें हुकूम कसे आहेत याचा बयान त्याचे मनांत यावयाजोगा आह्मीं सांगतों त्याप्रमाणें लिहून पाठवावें, आणि सांप्रतचे प्रसंगाचे तदबीरीस त्यांनीं अनुकूल असावें, याचा समेट कोणे प्रकारें करावा याची काय तजवीज मनांत येईल ती लिहून पाठवावी, यास विलंबावर टाकूं नये, जलद जबाब यावा. मदारुलमहाम नेकसलाह असेल तीच लिहितील, आह्मीं तुमचे पत्रावर हवाला घालून लिहितों. ह्मणोन पत्रें तयार करून लागलींच दिलीं तीं सेवेशीं पाठविलीं आहेत. अवलोकनें ध्यानांत येईल. सारांश नबाबाची आणि सरकारची यगानगत आजपर्यंत रसायनानें चालत आली. पुढेंही ईश्वर असेंच चालवील. सांप्रत नबाबाचा जइफीचा वक्त. या समयांत स्वामीस हेंच लाजीम आहे कीं, नबाबास या समयांत कांहीं दुःख होऊं न द्यावें. दोन्ही दौलती एक. तेव्हां या दौलतीचें उणें तें आपलें असें समजोन बंदोबस्ताची फकल आणि तदबीर नेक असेल ती करावी. आणि नबाबासही लिहून पाठवावें. त्याप्रमाणें हेही करितील. नबाबाचें मानस श्रीमंतांनीं अनुकूल होऊन बंदोबस्ताची फकल करावी. आह्मांस खातरजमेनें लिहून पाठवावें. माझे मनांत ऐसें येतें कीं, जमीदाराची नड किती? अलीज्याहा तोरा हातांत घेऊन बसला आहे, त्यास अलीज्याहा व रड्डी यांस सरकारांतून रीतीच्या गोष्टी सांगून नशीयत करावी. ऐकिल्यास उत्तम. नाहीं तर एके घुरकींत हातपाय गळून जातील. मकदूर किती? ऐसेंच करावें. हें माझे सलाहांत आलें. तें लिहिलें आहे. याजवर स्वामीचे मर्जीस नेक सल्लाह येईल त्याप्रमाणें लिहावें. ह्मणजे नबाबाची खातरजमा करण्यांत येईल. उत्तरें पाठविण्यास विलंब नसावा. रा छ १ माहे मोहरम. हे विज्ञापना.

[८०] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐसीजे. कदाचित् स्वामीचे मनांत येईल कीं, नवाबाचें बोलण्याचें प्रमाण शाश्वत काय मानावें? खरड्यावर करार मदार केले, पैक्याचा निर्गम येथें होणार नाहीं, हैदराबादेस गेल्यावर तजवीज करण्यांत येईल, ह्मणून तुह्मी नवाबाचे तर्फेनें खातरजमा केली. तुह्मांस नबाबांनीं लौकर बोलाविलें तसे गेला. तुह्मांस पोंहचून एक महिना जाहला तोपर्यंत तुमचें पत्र कार्याचे दुरुस्तीचें नाहीं. तेव्हां शाश्वत कसें मानावें ह्मणोन अंदेषा मनांत येईल. तर येऊं नये. नबाब आपले करारमदारावर कायम आहेत. दोन चार वेळ खातरजमेनें मशीं बोलिले. पैक्याबेगळीं जीं कामें तीं सर्व उगवून घ्यावीं, विलंब करूं नये. पुढें अमल ज्यारी करावयाचे त्यास हरकत न व्हावी. ज्यारी करावें याविषयीं राजे रेणूरावजी यांस सांगून निक्षून ताकीद झाली. जशीं कामें उलगडून येतील तशीं लिहून पाठवीन. पैक्याचा प्रकार राहिला त्याचीही तरतूद करतों. असें हजरतीनीं सांगितलें. मागाहून नबाबास पुसून लवकरच लिहून पाठवितों. याविषयीं अंदेषा घेऊन प्रस्तुतचे तदबिरीविषयीं नवाबांनीं लिहिलें यास विलंबावर न टाकावें. दौलतसंबंधाशीं आणि घराऊरीतीशीं ऐक्यता करून यांतील त्यांत त्यांतील यांत असें होऊं नये. दौलतसंबंधीं करार मदार अमलांत आले त्याप्रमाणें होतच आहेत. राहवयाचे नाहींत. प्रस्तुत नबाबानीं घराऊरीतीनें तदबीर पुसली. याचें उत्तर जें उचीत नवाबाची खातरजमा व्हावी असें यावें. या समयांत नबाबास दुःख न व्हावें हें करणें स्वामीकडे. रा छ ६ माहे मोहरम. हे विज्ञापना.

---

[८१] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नवाबानीं सांगितल्याप्रमाणें दोन पुरवण्या लिहिल्या आहेत. एक अलिजाहप्रकरणीं नवाबानीं पत्रें स्वामीस पाठविलीं आहेत ह्मणून. दुसरी पुरवणी करार मदाराप्रमाणें फडच्या करणें याविसीं दोहींचें मनन व्हावें. कसें लिहितां हें मला दाखवा असें बोलिले. त्याप्रमाणेंच लिहिण्यांत आलें आहे. ध्यानांत यावें. रा छ ६ माहे मोहरम. हे विज्ञापना.

[८२] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐसीजे. अलिजाहप्रकरणीं मजकूर नबाबाचे आज्ञेप्रमाणें लिहिला आहे. नबाबानींही स्वामींचें नांवें खरिता दिल्हा हा पाठविला आहे. याचा जबाब माझे मतें असा लिहावा कीं, आपण पत्र फलाण्या मजकुराचें पाठविलें तें पावलें. गोविंदराव यांनीं आपले सांगितल्याप्रमाणें तपशीलवार लिहिलें तें सर्व कळलें. त्यास हा घरगुती मुकदमा आहे. केवळ जमीदारीचा नाहीं. त्यास भडकावूं नये, आणि लांबणीवरही टाकणें ठीक नाहीं. याची वृद्धी न होतां दाबून ठेवावें असें केलें पाहिजे. दोहीं दौलतींची बेहबूद तेंच इकडून करावयाचें. आपण खातरजमा ठेवावी. गोविंदराव कृष्ण यांस व आपणाकडील विश्वासू लायक मातबर असेल त्यास पत्रदर्शनीं लवकर रवाना करावें. गोविंदराव यांनीं अलिजाह याजकडे येते वेळेस जाऊन त्यास चार गोष्टी आमचे तर्फेनें मामूल करून सांगाव्या. यांतच बंदोबस्त होतो. कदाचित् न ऐकिल्यास काय त्याचा खुलासा हें समजण्यांत येईल. उपरांत त्याची तदबीर करण्यास काय उशीर? आपले आमचे विचारानें जी गोष्ट ठरेल त्याचे बंदोबस्तास विलंब लागावयाचा नाहीं. असें खातरजमेनें लिहावें. अथवा अलिजाहकडे जावें हें प्रस्तुत ठीक नाहीं असें मानस असलियास हुजूर गोविंदराव यांची व आपला विश्वासूक असेल त्याची रवानगी लवकर करावी. हे लिहावें. शेवटीं एक शब्द लिहिण्यांत यावा जे, गोविंदराव यास आपण रिकामे पाठविणार नाहीं, कराराप्रमाणें सरकारकामें करूनच लवकर त्यांचें येणें होईल, आणि रवानगीहि कार्यासुद्धां त्यांची आपण करितील हा भरंवसा आहे. नबाबांनीं मला पुरवण्या लिहावयास सांगितल्या त्याची मालुमात जमा धरून उत्तर यावें ह्मणजे नबाबास वाचून दाखवावयासी येईल. यांतून माझे पत्रांत काय लिहावयाचें, नबाबाचे पत्रांत किती लिहावें, याचा विचार ठरून अधिक उणें जें सल्लाहात ठरेल त्याची आज्ञा यावी. माझे येण्याचें काय कारण असें स्वामी ह्मणतील. त्यास, नबाबाची वृत्ति प्रस्तुत बहुत नाजुक झाली आहे. नबाबाचे मनांतील हेतु काय आहे जे, या समयांत मला कोणी

कशाचा उपद्रव लागूं देऊं नये. नबाबाचे मर्जीचें संरक्षण करून आपले डोईवर घ्यावें असें मनुष्य नाहीं. कोणाचा विश्वासहि नाहीं. नबाबास विश्वास नाहीं, तेव्हां नबाबाचाहि कोणास विश्वास येत नाहीं. धनी आणि चाकर यांतच विश्वास नाहीं तेथील प्रकार काय पुसावा? त्यांत घरांतील फंद उभा राहिला. याजमुळें नबाबाचे बुद्धीस स्थिरता नाहीं. पैक्याचा लोभ सुटत नाहीं. श्रीमंताकडील पैका कराराप्रमाणें घ्यावा असें कोणी बोलिल्यास नबाब काय करील, नकळे! या धाकामुळें कोणी बोलूं शकत नाहींत. दिवस काळाचे सर्व घालवितात. असा प्रकार येथील आहे. त्यास, सर्वांप्रमाणें मी तमाषबिनी करीत असावें. होणें तेव्हां सर्व होईल. घोसरा रात्रंदिवस बाळगावा, यांत काय विशेष? माझे येण्यांत एक विशेष आहे. येथील अर्थ सर्व स्वामीचे ध्यानांत आणून देईन. नबाबाचे घरच्या मनुष्यानें धैर्य करवून नबाबाशीं बोलवत नाहीं. स्वामींनीं नबाबास समजावून खातरजमेनें सांगितल्याखेरीज क्रम चालणार नाहीं. यास्तव स्वामींची आणि नबाबाची भेट होऊन घरोब्याचीं बोलणीं व्हावीं, अलिजहा याचा बंदोबस्त व्हावा, सरकारचीं कामें नबाबाकडून उलगडून घ्यावीं, नबाबास तर संकट पडूं नये, या घकला काढून जवा दोहीं दौलतींचा बसावा, हें मी आलियावेगळें फक्त लिहिण्यानें कसें घडेल? प्रस्तुत–काळीं कालवाकालव जाहली. या प्रसंगास लिहिण्यानें कांहीं व्हाव-याचें नाहीं. उगीच येथें बसून कागद मात्र लिहीत जावें इतकें आहे. सरकारी काम करून घेतल्याशिवाय मी येऊं नये. परंतु समय विलक्षण. मला पत्र लिहिण्यासही बहुत विचार पडतो. नबाबाचे दौलतीस मोठा धोका बसावयाचा समय. या वेळेस स्वामींनीं उपेक्षा करूं नये. उपेक्षा केलियास सरकारासही उपयोग नाहीं. स्वामी ह्मणतील, खर्ड्यावर नबाबाचे तर्फेनें खातरजमा केली, आणि आतां तपशील लिहीत बसले, आणि एक एक कवाईत आह्मांस दाखवितात. त्यास, खर्ड्यावर खातरजमा केली ती खरी, आतां ही जें लिहितों हा उगीच तपशील लिहीत नाहीं, स्वामीचे पाय सोडून मला हैदराबादचें

राहणें सुख नाहीं, कार्य करून लवकर पायांजवळ येतों, असेंच येते वेळेस बोललों आहे. भविष्याची गोष्ट वेगळी! अलिजाहास बुद्धि आठवून भलतेंच उपस्थित झालें ही कल्पनाही नव्हती. ईश्वराची लीला विचित्र! परंतु त्यांतील सिद्धांत हाच आहे जे नबाबांनीं स्वामीशीं करार केला हा निभावेल. स्वामींनीं मनःपूर्वक या दौलतीकडे पाहिल्यास फंद मोडून नबाबाची खातरजमा होते यांत संदेह नाहीं. यास दिवसगत लागत नाहीं. स्वामीची उपेक्षा होईल तितकें मात्र काळहरण. मागती काम पडल्यास नबाबाकडे येईन. परंतु या वेळेस बोलावून घ्यावें यांत दोहीं दौलतींस सलाह असें वाटतें. याजवर जशी मर्जी. ताबे मर्जीच्या. विशेष काय लिहावें. रा॥ छ ६ माहे मोहरम. हे विज्ञापना.

---

[८३] श्री. २३ जुलै १७९९.

विज्ञापना ऐसीजे. मिरअलम व रेणूराव वगैरेनीं आपापले घरांतील चीजवस्त सर्व लांबविली. सर्व लोक सावधगिरींत आहेत. आंतून घर सर्वांचा सुटला. मीरअलम यांनीं आपलें कुटुंबही घरांतून काढलें, याची खबर कोणासही नाहीं. बारीक बातमी लागली. मुख्याचा विश्वास कोणास नाहीं. साई आहे त्यांचाहि विश्वास नाहीं. काल नबाबानीं मिरअलम यास सांगून पाठविलें कीं, तुह्मीं आपलें बचावाची यहतियात करीत जावी, सांवध असावें. याजवरून त्यांचे हातपाय गळाले. ही अवस्था येथील आहे. नबाब बहुत फिकीरींत आहेत. अन्न चांगलें भक्षीत नाहींत. रात्रीं निद्रा येत नाहीं. एक स्थलीं बसत नाहींत. शहरांत बोलवा कोणते वेळेस काय उठेल याचा भरंवसा मानीत नाहींत. याप्रमाणें आहे. येथील राहणार यांच्या अवस्था अशा. तेव्हां मीं काय उपाय करावा? कांहीं सुचत नाहीं. स्वामींचे पायांचें स्मरण करून धैर्य धरून आहें. रा॥ छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

[८४] श्री. २३ जुलै १७९५.

विज्ञापना ऐसीजे. मिस्तर किरकपात्रीक इंग्रजाकडील याचा निरोप मजकडे आला होता जे, आमचीं दोन पलटणें पहिल्याप्रमाणें नबाबांनीं अलिजाह प्रकर्णाकरितां आणविलीं तीं येत आहेत, त्यास अलिजाह याजवर रवाना करतील, जर श्रीमंतांचें मानस अलिजाह याजवर हीं पलटणें न जावीं असें असल्यास जाणार नाहींत, अथवा श्रीमंतांकडून अलिजाह यास कुमक थोडेबहुत स्वार आले तर आमचीं पलटणें जाणार नाहींत, नबाबाचे संरक्षणास मात्र राहूं, अलिजाह याजवर जा ह्मटल्यास कबूल करणार नाहीं, याचें काय तें सांगावें? तेव्हां त्यास सांगून पाठविलें कीं याविषयीं आमचे खावंदाकडून कांहीं मला आज्ञा आली नाहीं, तेव्हां काय सांगावें? हें ऐकून उगाच राहिला. उत्तर केलें नाहीं. याप्रमाणें जाहलें वर्तमान सेवेशीं लिहिलें आहे. याविषयीं आज्ञा येईल तसें त्यास कळवीन. संकेतेकडून आज्ञा यावी. रा। छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[८५] श्री. २३ जुलै १७९५.

विज्ञापना ऐसीजे. अलिजाह बहादूर बेदर येथें आहेत. किल्ला व शहरपन्याचा बंदोबस्त करून चिंचोली, कुहीर, तांडुर, हसनाबाद वगैरे भोवते तालुकियांत जमीयत लोक पाठवून कित्येक जागीं ठाणीं बसविलीं. पांच सहा हजार स्वार, दहा हजार पायदळ, ह्याप्रमाणें जमीयत सदाशिवरड्डीपाशीं आहे ह्मणून वर्तमानें येतात. मुसारेमू यानें संगारडी पेठ घेऊन तेथेंच होता. घासीमिया व महमद अजमखान पागावाले व जोधसिंग खंदारकर व सुभानखान वगैरे नबाबाकडील सरदार यास हुकूम झाल्याप्रमाणें हजार बाराशें स्वारांचे जमीयतीनशीं संगारडीस मुसारेमू व हे एक जागीं झाले. संगारडीस पैदलची जमीयत थोडीबहुत ठेवून तेथून पागावाले मुसारेमू वगैरे सरदार आपले जमीयतसुद्धां निघोन जोगीपेठेस जाऊन आंदोळ सदाशिवरड्डीकडील

महसरा केला. तेथें आंदोलांत रड्डीकडील पायदळ दोन अडीच हजार पावेतों आहे. मोर्चेबंदी केली आहे. इसामिया याजवर पत्रसून पडल्याचें वर्तमान उठलें होतें. त्यावरून या मजकुराची विनंति ऐकिल्याप्रमाणें पेशजी लिहिण्यांत आली. त्यास इसामिया पंधरावीस स्वारांसुद्धां हैदराबादेस येऊन नबाबाची मुलाजमत झाली. इसामियाचे लोकांशीं व त्याचे तालुक्याचे जमेदारांशीं कटकट होऊन लोक कांहीं जखमी झाले. सदाशिवरड्डीस जखम लागून शेवट झाला, हेंही वर्तमान एक दोन दिवस दाट होतें. परंतु रड्डीमशार-निल्हे बेदरांत साहेबजादे याजपाशीं आहे, हें तहकीक खबर येथें आली. हैदराबादेंत दरवाजाचा व हवेलीचा बंदोबस्त ज्याबज्या चौक्या पाहरे ठेऊन पक्का केला आहे. येणार, जाणार, घोडीं, तट्टें, माणसें, उंट वगैरे यांस परवानगीशिवाय बंदी आहे. भणंग, भिकारी, दासरी, भोरपी वगैरे तिकडून येतात व इकडून बातमी पोंचवितात. ऐसेंही समजावणाऱ्यांनीं समजाविल्यावरून ताकीद झाली कीं, दासरी वगैरे लोक तेलंगे, कानडे यांस अटक करावी. त्यावरून शहरचे सुभे व कोतवाल यांनीं शहरांत उघडे बोडके ब्राह्मणसुद्धां सांपडले ते शेंपन्नास माणूस धरून दोन दिवस अटकाविले. कागदपत्र शहरांत कोणाचे येतात व येथून जातात ते चौक्यांवरून धरून चौकशी करावी हेंही होत आहे. रायराया रेणूराव यास बाहेर डेरेदाखल होण्याची रुखसत छ १ मोहरमीं नबाबांनीं दिल्ही. त्याप्रमाणें फत्तेदरवाजाबाहेर ताडबनांत जाऊन उतरले. समागमें नफरूदौला व दौलतखान व मनमोहनराव पिंगळे व सुलतानखान, सरमस्तखान वगैरे मिळाले. तीन चारशें स्वारांशिवाय पैदळ, गाडदे वगैरे जमीयत आहे. मनसबदार व सरदारांस ताकीद कीं, राजाजीजवळ जाऊन रहावें. त्याप्रमाणें कोणी कोणी वरचेवर जात आहेत. रायरायां दिवसा नबाबाकडे येऊन दरबार करून तीन प्रहरास डेऱ्यास जातात. रात्रीं तेथेंच राहतात. सांप्रत मोहरमचे आपुऱ्याचे दिवस. शहरांत तमाम सर्वांस ताकीद आहे कीं, डोल्याची मिरवणूक होऊं नये. व

जान साहेबाची स्वारी प्रतिवर्षीं निघते, त्यासमागमें मनुष्यें फार असतात, स्वारी निघाल्यास बलवा होईल हें समजून ताकीद कीं, स्वारी निघणें मवाकुफ, लंगर निघणें तेंहीं दहावीस पंचवीस माणसेंसुद्धां दिवसा नेमणूक केल्याप्रमाणें निघावें. ऐसी बहुत यहतिहात करविली. तात्पर्य, सालाबाद मोहरमचा समारंभ होतो तसा साल मजकुरीं नाहीं. ताकीद आहे. अबदूल करीम कुमदाल यांचे रिसाल्याची गारद, त्याची तलब तनखा चहडली, सबब छ ४ रोजीं गारदी पैदळचे लोक देवडीवर येऊन गवगवा रात्रीं झाला. रोष-नराव यास धरून बसविलें होतें. तो निघोन गेला. चार घटका कटकट पडली होती. दिलदारखान व सैदउमरखान दरम्यान येऊन गारद्याची समजूत करून वाटे लाविले. खासवाड्याचे चौकीस हे गारदी नसावे याप्रमाणें ताकीद झाली. छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[८६] श्री. २३ जुलै १७९५.

विनंति विज्ञापना. सजावरुदौला किल्लेदार उदगीरकर जमीयतसुद्धां अलिजाह यांस जाऊन मिळाला; ऐसें एक वर्तमान नबाबाकडे आल्या-वरून, त्यांचेंहि वकिलीचें काम दिनकरराव यांजकडे, तो सदाशिवरड्डी-पाशीं, सबब त्याचें हातचें हेंहि जाहलें असेल ऐसें मनांत येऊन दिनक-रराव यांचे घरीं चौकी एक दिवस बसली. त्याजवर सजावरुदौल्याची अर्जी आली कीं, उदगीरचे किल्ल्यांत मी आहें, शिबंदी थोडी, किल्ला खालीं करून देतों, ऐशीं साहेबजादे यांचीं पत्रें येतात, याविषयीं काय इर्षाद? हें पत्र आल्यावरून सजावरुदौला अद्याप तेथें गेला नाहीं, हें तहकीक होऊन दिनकरराव यांचे घरची चौकी उठविली. परंतु सजावरुदौलाचा संशय खास आहे. पदमसिंग कवलासवाला याची अर्जी नबाबास आली. त्यांत त्यानें लिहिलें आहे कीं, साहेबजाद्याकडून चार भले मनुष्य व पत्र आलें कीं कवलासचा किल्ला खालीं करणें व जमीयत घेऊन येणें व पैका कांहीं पाठविणें, याचा जबाब मी सांगून पाठविला कीं जमीयत व पैका बंदगानअल्लीचे हुकमाशिवाय कसा येईल,

किल्ल्याची दरखास्त केल्यास दारू व गोळा मजपाशीं हजर आहे, ऐसा नबाब गेला, हजरतीकडून इर्षाद येईल तसें करीन. याप्रमाणें अर्जी पाहून नबाबास संतोष झाला. पद्मसिंग यांची तारीफहि केली. खातर-जमेचा इनायतनामा तयार करून रवाना करविला. जगत्पाल व वालगोंडा व कोपरकुंडा व कल्याण व आंवसें वगैरे किल्लेदारांच्या अर्ज्या नबाबाकडे आल्या कीं, किल्ल्यांत शिबंदी थोडी व शिबंदीचे तलबेचाही गवगवा, गल्ला, बारुद, गोळा सामान सरंजाम कमी, साहेबजाद्याकडून पत्रें येतात, यांस काय हुकूम. या अन्वयें अर्ज्या आल्या व येतात. कांहीं कांहीं किल्लेदार यांचे शिलशिले ऐसेंहि ऐकण्यांत येतें. काय असेल तें असो. होईल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल. रवाना छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[८७] श्री. २३ जुलै १७९९

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर यांजकडे नबाबांनीं खुषरकमखान त्यांचे वस्ताद व दिनकरराव वकील सदाशिवरड्डीकडील, या उभयतांस पाठविलें होतें. पैकीं खुषरकमखान तेथून जाऊन शहरास आले. नबाबास इतल्ला जाहल्यानंतर राजाजीस हुकूम झाला कीं, खुषरकमखान काय सांगतात तें दर्याफ्त करून अर्ज करणें. त्याप्रमाणें राजाजींनीं त्यांस विचारिलें. खानमजकूर यांचे सांगण्यांत कीं, बमोजिब इर्षाद तेथें गेलों, साहेबजादे यांची भेट झालीच नाहीं, एक दिवस नाजमन्मुलूख यांची गांठ पडून बोलणें झालें, त्यांचें ह्मणणें कीं, अव्वल पानगळाहून पट्टणास मोहिमेस जाणें तेसमयीं मी वडील असतां मुसीरुलमुलुख यांचा अर्ज खातरमुबारकेत गुजरून शिकंदरजहा यांची रवानगी झाली; दुसरें हैदराबादेहून बेदरास जाणेचे वख्तीं स्वारीसमागमें सर्व साहेबजादे घेऊन हैदराबादेंत राहण्याचा इर्षाद झाला; तिसरे, बेदराहून खरड्याचे मोहिमेस जाणें तेवेळेस तरी स्मरण व्हावें तें न झालें; इतक्याही गोष्टी अजमुलउमरा यांचे सांगितल्यावरून झाल्या, ऐसें समजोन उगाच होतों; त्यांचे फळ तो पावला; हजरत शहरास दाखल जाहले; मी खुषी

मानली; पुढेंही मर्जी बेरुख पाहिली; सबब विचार होऊन निघालों; बखैरियत बेदरदाखल जाहलों; हजरतीनीं संतोष मानून उमेद हसल व्हावी या अन्वयें नाजमन्मुलूख यांनीं निरोप सांगून साहेबजादे याजकडील पत्रें हजरतीस व बक्षबेगम व तुह्मांस ऐशीं तीन मोहरांनशीं दिलीं; रुखसत देऊन वाटे लाविले; दिनकरराव यास सदाशिवरड्डीनें पाहरे ठेवून बंदोबस्त केला. याप्रमाणें खुषरकमखानाचे जबानीं मजकूर ऐकून राजाजींनीं नबाबास अर्ज केला व पत्रें नबाब व बक्षीबेगम व राजाजी यांचे नांवें आलीं तीं वांचून पाहिलीं. र॥ छ ६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[८८] श्री. २३ जुलै १७९५.

विज्ञापना ऐसीजे. सरकारचा तहनामा नवाबास द्यावयाचा. त्यास, नबाबाकडील तहनाम्यांत अक्षरें नीट करावयाचीं तीं लिहून साफ करून दिलीं ह्मणजे सरकारचाही द्यावा, ऐसी आज्ञा होती. त्याजवरून हा मजकूर नबाबाशीं केला. सरकारचे तहनाम्याची नकलही दाखविली. त्याप्रमाणें नबाबानें आपला तहनामा दुरुस्ती करून द्यावा, त्याविषयीं नबाबाचा अनमान पाहिला. बोलूनही दाखविलें कीं, तहनामा दिलाचे खुषीनें व्हावा, त्याजपुढें राव पंतप्रधान यांच्या भेटी होतील त्यावेळेस तहनामा होईल. तो पक्का टाळा दिसला ह्मणोन सरकारचा तहनामा मीं नबाबास दिला नाहीं. तहनाम्याचे प्रकरणीं सरकारचीं पत्रें माझे जबानीवर हवाला घालून लिहिलीं होतीं तीं दिल्हीं. जबानी बयानही मी केला असतां मान्य न झालें. तसाच प्रकार राहिला. त्यास याजउपरी तहनाम्याविषयीं छेडणी करूं किंवा नको, अगर त्यांनीं आपलेकडूनच तहनाम्याची गोष्ट काढून साफ तुमचे तहनाम्याप्रमाणें करून देतों असें ह्मटल्यास त्याचा तहनामा घ्यावा, आपला द्यावा, किंवा कांहीं बहाणा काढून त्याजवरच शब्द ठेऊन टाळा द्यावा, याचें पुरतें मनन होऊन पत्रीं आज्ञा यावी. येथील प्रकार मायावी. प्रसंग पाहतील तसे करतील. दूरंदेषा नाहीं. सामर्थ्यही नाहीं. स्वामीची मात्र उपेक्षा

आहे. स्वामीचे व नबाबाचे दरमियान डोईजड कारभारी मार्गानें बोलावयाजोगा आणि दोहीं दवलतींचें कल्याण इच्छिणार असल्याशिवाय बंदोबस्त खातरखा होत नाहीं. सरकारचें पत्र, कामें कराराप्रमाणें उगवतात किंवा नाहीं असें, नबाबास अथवा मला आजपर्यंत येत नाहीं. मी आपलेकडून निकड करावी तर, रघोत्तमराव नबाबास समजावतात कीं, मदारुलमहाम यांजकडून अथवा श्रीमंतांकडून कधींच निकड नाहीं, सर्व कृत्य गोविंदराव यांचें आहे, हजरतींनीं यांस भिऊं नये, कदाचित् हे उठोन गेले तर जावेत, गोविंदराव भगवंत यास साधून पक्कें केलें आहे, यांचें त्यांचें थोडेसें वांकडेंही आहे, हे गेलियावर गोविंदराव भगवंत यास हजरतींनीं बोलवावें, ह्मणजे सर्व कार्याचा बीत बसवून देतील. याप्रमाणें बोलण्यावर हजरत उड्या मारूं लागतात. सारांश स्थिरता नाहीं. हें वर्तमान आह्मांस कळावें, ह्मणजे गोविंदराव यांजविशीं मी संशय मनांत आणावा, आपल्यांत आह्मीं कळवंडत असावें, यांतच यांनीं आपलें साधन पाहत असावें. ह्या चाली आहेत. मध्यें वागणार त्यांच्या कुचेष्टा ध्यानांत याव्या ह्मणोन थोडेसें लिहिलें आहे. सर्व ध्यानांत येऊन उत्तर खचित यावें. रा॥ ६ मोहरम. हे विज्ञापना.

नबाबांनीं श्रीमंत खुदावंत न्यामत व मदारुलमहाम व गोविंदराव भगवंत यांस पत्रें लेहून दिलीं. अलिज्याहबहादूर यांचे प्रकरणीं पत्रें तीन सदरहू रवानगींत हीं पत्रें रवाना केलीं. छ. ६ मोहरम.

फारसी पत्र.

छ १६ मोहरम, मु॥ भागानगर टप्यावर.

[८९] श्री. २ आगस्ट १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ १६ माहे मोहरमपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलो-

कर्नेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लेखन केली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. अलिजा यांचे प्रकरणीं नबाबांनीं सरकारांत पत्रें लिहून खरिता दिला तो छ ६ मोहरमीं रवाना केला. तो पावलाच असेल. मार्गातील दंग्यामुळें कदाचित् कांहीं हरकत जाहली असलिया मुसनापत्रें तयार केलीं आहेत, हीं रवाना करावीं आणि तुह्मीं आपलें पत्र मुसना लिहून पाठवावें ह्मणोन सांगितलें. त्यास नबाबाचा खरिता पा॥ आहे. पेशजी दोन पुरवण्या नबाबाचे सांगितलेप्रमाणें लिहिल्या. त्याचा मुसना हल्लीं दोन पुरवण्या लिहिल्या आहेत. सेवेशी श्रुत होय विज्ञापना.

अलिजाह प्रकरणीं नबाबांनीं श्रीमंत व नाना व गोविंदराव भगवंत यांस पत्रें दिलीं तीं छ ६ मोहरमीं टप्यावर रवाना केलीं. त्यास मागील दोन पुरवण्या रवाना केल्या. त्याचा मुसना हल्लीं टप्यावर सदरहू दोन पुरवण्या रवाना व नबाबाचीं पत्रें श्रीमंतांस थैली व नाना व गोविंदराव यांस लखोटे येणेंप्रमाणें तीन छ ६ मोहरमीं रवाना केल्याप्रमाणें मुसनापत्रें हल्लीं रवाना केलीं.

---

[९०] श्री. २ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर साहेबजादे बेदरांत सदाशिवरड्डी व जमीयतसुद्धां आहेत. नबाबाकडील सरदार मुसारेमू व पागावाले घासीमीया अजमखान व इसामिया व जोतसिंग वगैरे संगारडीहून निघोन अंदोल येथें महासरा केला. जोगीपेंठ व अंदोल्याचे दरम्यान तलाव मातबर आहे. त्या पाण्यावर आंबराईत राहून मोर्चेबंदी केली. अंदोलचे गढींत सदाशिवरड्डीकडील पायदळ जमीयत तीन हजारपावेतों होती. त्यांची गोळी सुरू झाली. मुसारेमूबरोबर तोफा बारुद सरंजाम होता. दहा बारा दिवस गोळागोळी झाली. छ ११ माहे मोहरमीं रात्रीं, किल्ल्यांतील जमीयत निघोन, आसबाब जराबाजरा

काढून घेऊन, सदाशिवरड्डीकडे गेले. गढी खाले जाली. मुसारेमू याचे लोक शिरून आंदोलचें ठाणें घेतलें. मुसारमूची अर्जी नबाबास छ १२ रोजीं आली. हरकारे यांस इनाम दहा रुपये देविले. जोगीपेठ व रंगमापेठ हीं दोन ठाणींही घेऊन, मुसारेमूकडील जमीयत त्या ठाण्यांत राहून बंदोबस्त जाला. याप्रमाणें वर्तमानें नबाबाकडे आलीं. रा। छ १६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[९१] श्री. २ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. रायेराया रेणूराव यांस जमियतसुद्धां बाहेर रहाण्याचा हुकूम झाल्याप्रों मशारनिल्हे बोहरियाचे बागापाशीं डेरे देऊन आहेत. येहतषामजंग नफरूद्दौला, व भारामल, दौलतखान, व मनमोहनराव पिंगळे, व सुलतानखान, सरमष्तखान वगैरे सरदार पांचसातशें स्वार व दोन हजार पैदल, याप्रमाणें जमीयतसुद्धां आहेत. राजाजी नित्य दरबारास नबाबाकडे येतात. केव्हां डेऱ्यासही जाऊन राहतात. रात्रीं तलाव्यासभोंवते कोस अर्धकोस लोक स्वार वगैरे यांस ठेऊन, कोणी आले गेले मनुष्य यांची चौकशी फार आहे. शहरचे दरवाजे तीन चार खुले, तेथें गाडदी ठेऊन येणाजाणाऱ्याची जुनरसी बहुत आहे. हवेलींत बारगीर व भोंवते गाडद्याच्या चौक्या ज्याचज्या याप्रों बंदोबस्त आहे. रा। छ १६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[९२] श्री. २ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. नबाबांनीं खुद्द जातीनें निबावयाची साअत नजूमियांस बोलावून विचारिली. छ २१ अगर छ २७ मोहरम दोन तारखा नजुमीयांनीं सांगितल्या. याजवर निघण्याचें जसें ठरेल त्याची विनंति मागाहून लिहिण्यांत येईल. असदअल्लीखान यास, मोहरमचे दिवस होताच जमियमतसुद्धां येऊन पोहचावें, ऐसी ताकीद करून रुखसत दिली. खानमजकूर यांची अर्जी आली कीं छ २५ मोहरम-

पावेतों जमीयतसुद्धां येऊन मी हजर होतों. रा छ १६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[९३] श्री. २ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. राजश्री रेणूराव धोंडाजी याजकडून नबाबांनीं फौजेची नवनिगादास्त करविली होती. त्यास, हा समय नाजूक, दुतर्फा निगादास्त, तेव्हां लोकांचें चित्त स्वस्थ नाहीं. जेथें अधिक मिळेल तेथें जावें, हा इरादा. तथापि लोकही अधिकआगळे नाहींत. भरतीकारितां आजपावेतों अडीच हजार बार जमा झाले. व लोकांस जमीयत आणावयाकरितां मसादा दिला आहे. प्रस्तुत निगादाष्ताकारितां राजेमजकूर बाहेर जाऊन राहिल्यामुळें मर्जी बहारम. चार लावणार ते रात्रंदिवस जवळ. याजमुळें राजेमजकूर यांस नबाबांनीं सांगितलें कीं, आतां निगादास्त पुरे करावी, व लोकांस मसादा ह्मणून ऐवज दिला आहे तो माघारी घ्यावा. त्यास, लोक ऐवज घेऊन ज्याज्या गेले आहेत. राजाजीही शषोपंज्यांत आहेत. सांप्रत येथील फौजेंत भारामल व कल्बाल्लीखान व सिताबराये हे हजरी गणतींत व तलावाळबिना वगैरेस नेमिले आहेत. राजेमजकूर शहरांत आपलें घरीं दोन दिवसांपासून आहेत. मुसारेमू व पागावाले वगैरे जमियतीनें आंदोल घेतले. पुढें बेदराकडे इरादा करितो. कांहीं कुमक पाठवावी ह्मणोन मुसामजकूर यांची अर्जी आली, त्यावरून राजाजीकडील नवनिगादास्त फौजेची रवानगी करणार आहेत. रा छ १६ मोहरम. हे विज्ञापना.

छ २० मोहरम, मु॥ भागानगर, रवाना टप्यावर.

[९४] श्री. ६ आगस्ट १७९९.

श्रीमंत रावश्री रावसाहेब स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २० माहे मोहरमपर्यंत मुक्काम भागानगर येथें स्वामींचे कृपालोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. नबाबांनीं सांगून

पाठविलें त्याचा मजकूर अलाहिदा पुरवणीपत्रांत लिहिला आहे त्याजवरून ध्यानांत येईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[९९] श्री. ६ आगस्ट १७९९.

विज्ञापना ऐसीजे. कोन्हेर बाबूराव ह्यास पाठवून द्या ह्मणून नबाबांनीं सांगून पाठविलें. त्याजवरून मशारनिल्हे पाठविले. त्यांजवळ नबाब बोलिले जे, शिकंदरजाहा साहेबजादे यास अलिजाह याजवर पाठवावे असें आह्मीं मुकरर केलें, राव पंतप्रधान याजकडील सरदाराशींही रफ्त आषनाईचा आहे, हरीपंडतजी कर्नाटकांत गेले होते त्यावेळेस शिकंदरजहाशीं यांच्या भेटी जाहल्या होत्या, रावपंतप्रधान व मदारूलमहाम यांच्या भेटी षादीचे वेळेस पुण्यास गेले त्यावेळेस जाहल्या आहेत, त्यास रावजीस सांगून श्रीमंत व मदारूलमहाम यांस लवकर लिहून पाठवावें कीं तिकडील फौजा या कार्याकरितां लवकर निघाव्या, दहापांच कोशी फौजा बाहेर निघाल्या ह्मणजे शिकंदरजहा यास येथून रुकसत करण्यांत येईल, प्रस्तुत जाहिराण्यांत सर्वांचे जबानत आहे जे श्रीमंतांचे आणि नबाबाचे चित्तांत सफाई पुर्ती नाहीं, त्यास अंतःकरणांतून सफाईच आहे, जाहीराण्यांत सफाई नमूद जाहली पाहिजे याजकरितां तिकडील फौजा निघून शिकंदरजहास सामील जाहल्या ह्मणजे जाहीराण्यांतही सफाई नमूद होईल, इंग्रजी जमैयत आणविली ती येत आहे, त्या अगोदर श्रीमंताकडील जमैयत येणें चांगलें, यांत दोस्तीची ऐक्यता विशेष दिसून येईल, यास्तव लवकर पत्र पाठवून उत्तर आणवावें, कोण सरदार मुकरर होईल याची इतल्ला करावी, जमैयत निघण्याची तरतुद केली अशीं पत्रें तुमचीं आलीं ह्मणजे येथून श्रीमंतांस व मदारूलमहाम यांस पत्रेंही पाठवूं. असें मशारनिल्हेबरोबर सांगून पाठविलें. त्याजवरून सेवेसी लिहिलें असे. त्यास, सरकारची जमीयत किती दिवसा निघेल, कोणते सरदारास आज्ञा होईल, याची सूचना येईल त्याप्रमाणें नबाबाशीं बोलण्यांत येईल. रा। छ २० मोहरम. हे विज्ञापना.

---

[९६] श्री. ६ आगस्ट १७९९.

विज्ञापना ऐसीजे. खुफिया वर्तमान कळलें कीं, मुसारेमू याची अर्जी नवाबास आली त्यांत त्यानें लिहिलें आहे जे, हजरतींनीं अजमखान व घासीमिया व मलकईसा यांस व मला कार्यावर पाठविलें, परंतु कोणांत आळा नाहीं, कार्य पडल्यास हुकूम कोणी करावा, ऐकावें कोणी, याचा बंदोबस्त नाहीं, तेव्हां काम कसें घडेल, याज-करितां एक तोरा यावा, ह्मणजे त्याचे हुकुमानें क्रम चालेल, आळा बसेल. त्यावरून नवाबांनीं विचार ठरविला कीं, सिकंदरज्याहा यांस पाठवावें आणि पंतप्रधान यांस इतल्ला करून तिकडील फौज आणवावी. त्याजवरून सेवेसी लिहावयासी सांगितलें त्याप्रमाणें लिहिलें आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें बोलण्यांत येईल. रा॥ छ २० मोहरम. हे विज्ञापना.

---

[९७] श्री. ६ आगष्ट १७९९.

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजांकडील पलटणें यांनीं आणविलीं आहेत. त्यास दोन पलटणें पूर्वीं आलीं होतीं त्याप्रमाणें येणार. पलटणीचा सरदार यास बंगाल्याचा हुकूम पोहोंचला तेव्हां ते तयारीस लागले. मोहरम झालियावर निघणार. ऐसें वर्तमान आहे. महिन्यानंतर किंवा दीड महिन्यानंतर येतील. पर्जन्यकाल आहे. कधीं येतील पहावें. मुसारेमू याचीं चार पलटणें कृष्णेपार कडप्याचे बंदोबस्ताकारितां गेलीं. तिकडील जमीदारांचा बंदोबस्त न होतां तीं पलटणें इकडे बोला-विलीं. ते कृष्णा उतरून अलीकडे आले असें ह्मणतात. त्यास खर्चास ऐवज तिकडे लावून दिला होता तोही पुरता हातास आला नाहीं. येथें मुसारेमूस तनखा वसमतेवर दिल्ही. ऐवज वसूल होण्यासही कांहीं दिवस पाहिजेत. असें आहे. रेणूराव फौज जमा करण्यास डेऱ्यास जाऊन राहिले होते. प्रस्तुत त्यांचें जाणें मौकूफ झाल्या-सारिखें आहे. आपले घरींच आहेत. लष्करचें कूच शहराजवळून

जालें. एक कोस निपाळ जागा पाहून राहिले. सात आठशें स्वार, हजार पायदळ आहे. भारामल लष्करांत असतात. घरासही येतात. कांहीं गाडद नवाबाजवळ आहे ती शहरपन्ह्याचे आणि शहरांत चौकीस असतात. आसदअल्लीखान फौज जमा करावयासी आपले तालुक्यास गेले. ते कृष्णा उतरून पार गेले ऐसें ऐकितों. कधीं येतील पहावें. आजमखान व घासीमिया व मुसारेमू आंदोलास आहेत. आंदोलाचे आणि हैदराबादेचेमध्यें वानरा आहे. तीस पाणी आल्यावर पलीकडे अटकतील. इकडून कुमक पोहचूं सकणार नाहीं. बेदराकडील उपद्रव हैदराबादेकडे लागण्याविशीं अडथळा नाहीं. यास्तव आंदोलांत कांहीं प्यादे ठेऊन सारेजण वांजरेचे अलीकडे संगारडीपेठेस यावें ह्मणून नबाबाची आज्ञा गेली. त्याजवरून ते नदीजवळ आले तों पाणी आलें. उतार मोडला. पाणी उतरलें ह्मणजे दों चहूं दिवसां अलीकडे येतील. याप्रमाणें येथील वर्तमान आहे. पुढें कसें होईल तें पहावें. रा छ २० मोहरम. हे विज्ञापना.

---

[९८] श्री. ६ आगस्ट १७९९.

विज्ञापना ऐसीजे. सिद्दी इमामखान यांचे येथें पैका सांपडला. दोन तीन लाखपर्यंत सर्व होईल. तो ऐवज व आणखी कोठील कांहीं आमद निघाली त्याजवर मोहरा करून नबाबांनीं आपलेजवळ नेऊन ठेविला. तो खर्चास देत नाहीं. तालुक्याची आमदनी हंगाम्यामुळें येत नाहीं. पेशगी कोणास कोणास फौज ठेवण्याकरितां रेणूरावजीनीं परवानगी घेऊन दिलें, तें सर्वांपासून माघारी मागतात. पैका मोटडींत भरून ठेविला आहे कीं काय, पैदा करून खर्च करावा, ऐसा राजे रेणूराव यांस हुकूम होतो. त्या फिकीरींत ते हैराण! आज एक काम एकास सांगावें, दुसरे दिवशीं ह्मणावें कोणी तुह्मांस सांगितलें? कां असें केलें? याजमुळें बोलण्याचा भरंवसा कोणास येत नाहीं. मुळीं मुख्यस्थानीं जसें आहे त्याप्रमाणें प्रसर. एक नवाबाचे ताळे विज्यात आहेत. मसलहत सांगणार मर्जीकडे पहातात तसें बोलतात. मसल-

हतीवर कोणाची दृष्टी नाहीं. मर्जी हजरतीची खुष राहिली ह्मणजे कृतकृत्य! अंज्याम कसा आहे, इकडे कोणी पहात नाहीं. आजचा दिवस टळला, पुढें पहातच आहों, असा क्रम चालला आहे. रा। छ २० मोहरम. हे विज्ञापना.

---

[९९] श्री. ६ आगस्ट १७९९.

विज्ञापना ऐसीजे. नबाबाकडे सांगून पाठविलें कीं श्रीमंतांकडील आज्ञा आली आहे जे, अलीज्याह यांजकडील त्यांचे लष्करची अखबार कळली पाहिजे, यास्तव एक कारकून तुह्मी पाठवून अखबार लिहून पाठवीत जाणें. याप्रमाणें अजमखान व मुसारेमू याजकडेही कारकून अखबारीस पाठविणें ह्मणून आज्ञा आली. याविशीं काय इरषाद? नबाब बोलिले कीं, बहुत बेहत्तर आहे, कारकून पाठवावा, ह्मणजे आह्मासही खबर कळत जाईल. त्यावरून अलिजाह यांस एक अर्जी लिहून नबाबास दाखविली. उत्तम आहे ह्मणोन बोलून कारकून लवकर पाठवावा असें सांगितलें. रहदारीचें एक दस्तक मागितलें तेंही दिलें. कारकून पाठवावयासी तयार केला. इतक्यांत काय कोणी सांगितलें. सरबुलतजंग यांजकडून नबाबांनीं रुका लिहून मजकडे पाठविला. त्यांत मजकूर कीं, तुमचेबद्दल खातर हजरतींनीं दस्तक रहदारीचे दिल्हे आणि कारकून पाठविण्याविशीं सांगितलें, परंतु राव पंतप्रधान यांची आमची दोस्ती, तेव्हां अखबारनवीस तेथें जाणें हें जाहिराण्यांत खुषनुमा दिसत नाहीं, आमचे येथें अखबार तेथील येत असते ती तुह्मास सांगत जाऊं, तुह्मी राव पंत प्रधान यांस लिहीत जावें, कारकून हरगीज पाठवूं नये. याप्रमाणें हजरतींनीं सांगितलें ह्मणोन रुका आला. तेव्हां कारकून पाठविणें ठीक नाहीं, ह्मणोन राहविला. क्षणिकप्रकृत झाली आहे. कोणताही भरवसा येत नाहीं. असा प्रकार आहे. रवाना छ २० मोहरम. हे विज्ञापना.

सदरहू अर्जी व दस्तक मवकूफ जाली सबब पाठविली नाहीं.

---

[१००] श्री.

सदरहू पारशीपत्राचा तरजुमा हिंदवी येणेंप्रमाणें. श्रीमंत खुदावंद न्यामत राव पंतप्रधान यांचें सरकारांतून आह्मांस लिहिलें आलें आहे कीं, एकनवीसंद्रा तुह्मीं आपलेतर्फेनें दिनचर्येची अखबार लिहिण्याकरितां हरकाऱ्यांचे जोड्यासुद्धां अलिजाहबहादूर यांचे लष्करांत रवाना करून तेथील वर्तमान पैहाम रवाना करीत जाणें. त्यास राव पंतप्रधान यांचें लिहिल्यावरून मुफसल कैफीयतेचा हुजुरात अर्ज केला. इरषाद झाला कीं, बेहत्तर आहे. याजकरितां सखाराम अनंत यांस हरकाऱ्याचे जोड्यासुद्धां पाठविलें आहे. उमेदवार आहे कीं, पंतमशारनिल्हे तेथें राहून पाहिली ऐकिली अखबार दररोजची लिहून पाठवीत जातील. त्याप्रमाणें राव पंतप्रधान यांचे सरकारांत इतला करण्यांत येत जाईल. व सरकारांतून लष्करचे लोकांस अशी ताकीद असावी कीं, कोणी पंतमशारानिल्हे यांस मुजाहीम न होत.

---

[१०१] श्री. ६ आगस्ट १७९१.

विज्ञापना ऐसीजे. नवाबानें सांगितल्याप्रमाणें फौजेविषयीं विनंति लिहिली आहे. याचें उत्तर तेथून येणें तें असें यावें जे, तुह्मीं नवाबाचे आज्ञेप्रमाणें फौज कुमकेस पाठविण्याविषयीं लिहिलें होतें तें कळलें, त्यास फौज जमा करण्याची तजवीज झाली पाहिजे यास्तव कराराप्रमाणें सरकारचा ऐवज आला पाहिजे, तर नवाबाशीं बोलून त्याजकडून मातबरास घेऊन तुह्मीं लवकर यावें, ह्मणजे नवाबाचें बोलणें समजून घेऊन फौजेची तरतूद लवकरच करण्यांत येईल, येणेस विलंब करूं नये, लवकर यावें. याप्रमाणें उत्तर यावें. असें माझे विचारें. यांत अधिक उणें लिहावयाची सल्ला ठरेल त्याप्रमाणें आज्ञा यावी. स्वामी ह्मणतील, आपले येणेविषयीं वारंवार लिहितात याचें काय कारण? त्यास, नबाब आपले सरकाराशीं मनापासून दोस्ती इच्छितात. याचा बयान पत्रीं कोठवर लिहावा? मी समक्ष विनंति केलियाविगळें मनांत भरणार नाहीं.

आपण उपेक्षा केलियास ही दौलत पेचांत येईल, ती न यावी, नबाबाचा वृद्धापकाल, स्वामींनीं चार गोष्टी सल्लयाच्या सांगाव्या, बखेडा जाहला आहे हा मोडावा, नबाबाचे जीवास घोर झाला तो सोडवावा, सरकार काम व्हावें, नबाबास सांगायास योग्य स्वामी, स्वामी करतील तें नबाब मान्यच करतील, हे पर्याय मी समक्ष विनंति करीन तेव्हां मनांत सर्व येईल. यास लिहिणें किती लिहावें? लिहितां येत नाहीं. ह्मणोन नवी वारंवार विनंति लिहितों. जें लिहितों त्याचें पुर्तें मनन व्हावें. ह्मणजे सर्व ध्यानांत येईल. रा। छ २० मोहरम. हे विज्ञापना.

छ २३ मोहरम मुक्काम भागानगर
रवाना टप्यावर.

[१०२] श्री. ९ आगस्ट १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ता। छ २३ माहे मोहरमपर्यंत मुक्काम भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानाची विनन्ति अलाहिदा पुरवणीपत्रीं लेखन केली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तर रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

नबाबाचे सरकारांत बेदराहून अखबार अलीज्याह ह्यांचे लष्करची आली येणेंप्रमाणें.

पारशी.

....

....

....

---

[१०३] श्री.

विनंति विज्ञापना. नबाबाचे येथें अलिजाबहादूर यांचे येथील बेदराहून अखबार छ १८ मोहरमची आली. ते नबाबांनीं वाचून आह्मांकडे पहावयास पाठविली. त्याचा तरजुमा हिंदवी येणेंप्रमाणें :—

जबानी वेंकटराम व रंगापा नवमुलाजम सरकार.

१ हजुरातून नवा महाल तयार करविला होता. तेथें अलिजाह राहिले आहेत; व सदाशिवरड्डी फत्तेदरवाजानजीक, बागांत मीर. अलम राहिले होते तेथें, सदाशिवरड्डी आपले मुलांलेकरांसुद्धां आहेत.

१ सयेफजंग यांचे पुत्र अजमुलउमरा ज्या मकानांत राहिले होते तेथें राहिले आहेत. छ १३ मोहरमीं सयेफजंग यांचे ज्येष्ट पुत्रास बेदरची किल्लेदारी करार जाली.

१ आंदोलाहून जमयेत निघोन आली, ते नागझरीपासून मंगळवारपेठपावेतों उतरली आहे. कुलजमयेत स्वार प्यादे पंधरा हजार किल्ल्याचे आंत बाहेर उतरले आहेत. लोकांचे ह्मणण्यांत वीस हजारपावेतों आहे.

१ सिपाही लोकांस तसदी फार आहे. दोन दोन महिने लोकांचे चढले आहेत. सदाशिवरड्डी आज आज उद्यां उद्यां करतात.

१ सुरापुराकडून कांहीं जमयत आली नाहीं.

१ तळघाटचा व वासलगंजचा दोन्ही दरवाजे बंद आहेत. खिडक्या मात्र उघड्या आहेत.

१ छ १४ चे रात्रीं व छ १५चे प्रातःकाळ माहे मोहरमीं अलिजाह यांनीं, कोणी मषाएख पिरजादा आहे—त्याचें नांव समजलें नाहीं—त्याचे लेकीशीं बदिउलाखान याचे विद्यमानें निका लाविला.

१ फत्तेदरवाजा उघडा आहे. दरवाजाचे आंत बाहेर कर्नाटकी प्यादे व रोहिले पन्नास असामींची चौकी आहे.

१ वर्तमान आहे कीं कांहीं जमयेत अवशाकडे जाणार. बाकी जमयेत सरकारचे फौजेचे मुकाबल्यास येणार.

१ दररोज दरबार प्रातःकाळापासोन दीड प्रहर दोन प्रहरपावेतों होतो. रात्रींही त्याचप्रमाणें दीड प्रहर दोनप्रहरपावेतों होत आहे.

१ फत्तेदरवाजा चार घटिका दिवस आल्यानंतर उघडतो.

१ धारणगल्याची.

८।। जोरी दररुपयास २० शेर.

८।९ गहूं पंध्रा शेर.

८।६ हरभरे सोळा शेर.

१२

एकूण बारा कलमें अखबारींत लिहिलीं आलीं, त्यावरून विनंती लिहिली असे. रा। छ २३ मोहरम. हे विज्ञापना.

---

[१०४] श्री. ९ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. मुसारेमू व घासिमिया, आजमखान व इसामिया वगैरे सरदार नबाबाकडील आंदोल येथें जमीयत येऊन, तेथील बंदोबस्त करून, संगारडी पेठेकडे जावयास निघून, आंदोलाअलीकडे दोन कोसांवर वंजरा नदीचे पैलतीरीं मुक्काम करून आहेत. वंजरेस पाणी फार, पायाव नाहीं. नावा, टोकरे, वगैरे उतरण्याचा सरंजाम पोहोंचला ह्मणजे नदी उतरून संगारडीस येऊं, याप्रमाणें मुसारेमू वगैरे यांच्या अर्ज्या आल्यावरून येथून नावा वगैरे सरंजाम त्यांजकडे रवाना जाला. जमीयेत नदी उतरून संगारडीस येणार. राजाजी बोहरियांचे बागावर स्वार, पायदळ, जमीयत तीन हजारपर्यंत जमा करून उतरले होते. नित्य नबाबाकडे दरबारास येणें जाणें, डेऱ्यासही जाऊन राहणें हा क्रम चालिला होता. सांप्रत राजाजी आपले हवेलींत येऊन राहिले. भारामल बाहेर डेरे देऊन आहेत. बोहरियांचे बागाहून कूच करून शेट गोवर्धनदासाचे बागानजीक जाऊन राहिले. जमीयत हजार बारासें स्वार व दोन हजार पायदळ याप्रमाणें तूर्त जमा आहे. रा। छ २३ मोहरम. हें विज्ञापना.

---

[१०९] श्री. ९ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. संस्थान अदवानी येथील स्वराज्याचा ऐवज सन १२०४ पासोन पेशजींचे मखल्याबमोजीब सालाचे सालास महालीं फडच्या होण्याचा करार. त्याप्रमाणें तेथील अर्मालास इनायतनामा द्यावा ह्मणजे सरकारांत रवाना करूं. याअन्वयें नबाबाशीं बोलणें होऊन राजाजी यास परवानगी सुदामतप्रमाणें फैसल्याविषयीं इनायतनामा तयार करण्याची जाली. त्यास, राजाजी यांचें ह्मणणें कीं महाबतजंगाकडून कारभारी अनवरुद्दोला येथें आहेत. त्यांनीं याद हजरतीपाशीं दिली. त्यांत कसरात होन वगैरे खर्च सालाबाद तेवीस हजार रुपयेप्रमाणें पाऊणेदोन लाखाचे मखल्यांत वजा होऊन बाकी ऐवज जिन्नस व नगदी फडच्या होत आला. या बमोजीब पेशजींची वहिवाट आहे. यास मागील वहिवाटीचे सिलसिल्याअन्वयें पुढील फैसल्याविषयीं ताकीदपत्र तयार करवून देतों. याप्रमाणें राजाजी यांचें बोलणें. याचें उत्तर आह्मी केलें कीं अदवानीचे स्वराज्याची चालवहिवाट अशी नाहीं. पावणेदोन लाख रुपये बेगलगष सरकारी अम्मल, त्याप्रमाणें सालफडच्या व्हावा, ऐसा इनायतनामा झाल्यास ध्यावा. नाहीं तर आपण ह्मणतात याअन्वयें इनायतनामा आह्मीं घेणार नाहीं व सरकारांत मंजूर कसा पडेल? सालाबाद मागील वहिवाट अशी ह्मणतां. त्यास सरकारचे मामलेदार अथवा ज्यांनीं ऐवज घेतला असेल त्यांच्या रसीदा दाखवाव्या ह्मणजे सरकारांत त्याप्रमाणें विनंती लिहिण्यांत येईल. याप्रमाणें बोलणें होत आहे. अदवानीप्रकरणीं जाबसाल यामुळें तटला आहे. त्यास सरकारांत पेशजी अमलाची वहिवाट दप्तरीं असेल त्याचा शोध होऊन आज्ञा येईल त्याप्रमाणें यासी बोलणें होईल. राजाजी यांचेही बोलण्यांत कीं श्रीमंतांचे सरकारांतही सालाबाद वहिवाट असेल ते लिहून आणवावी. त्यास वहिवाटीचे यादीसहीत आज्ञा येईल त्याप्रमाणें बोलून इनायतनामा ध्यावयास येईल. रा छ २३ मोहरम. हे विज्ञापना.

[१०६] श्री. ९ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. होणगुंद्यापैकीं गांव कयामन्मूलूक यांनीं दाबले ते सोडावे, व मुद्दलबाबत स्वराज्याचा ऐवज दरसाल आठ हजार रुपयेप्रमाणें राहिल्या दिवसापासून फडच्या कराराप्रमाणें व्हावा, या कलमांचा जाबसाल राजाजी यांसी बोलण्यांत आला. त्यास, यांचें ह्मणणें कीं, मुद्दलबाबत ऐवज कोणेसालापासून राहिला, त्यांत वसूल काय पोहोंचून बाकी राहिली, किंवा सालीम ऐवज रहात आला याची तादाद समजावी, व होणगुंद्याचे गांवचाही तपशील तेथून लिहून आणवावा, त्याप्रमाणें कयामन्मुलूक यांस ताकीद करण्यांत येईल, याद आली ह्मणजे फडच्या करून देण्यांत येईल. त्यावरून विनंति कीं, यांचे तपशिलाची याद सरकारचे दप्तरांत असेल त्याचा शोध होऊन रवाना व्हावयास आज्ञा जाली पाहिजे. सरकारची सनद होनगुंद्याची दिल्ही, त्यांत कोणती संमत, काय बेरीज लागली, देहे वाटणी सनदेंत कशी आहे, याचा दप्तरीं सर्व दाखला आहे. सनद बरोबर आहे त्याचे नकलेविषयीं आज्ञा जाहली पाहिजे. सरकारसनदेशिवाय काय जाजती दाबलें तें तपशीलवार आज्ञा जाली पाहिजे. कयामन्मुलुक यांचें ह्मणणें, सनदेंत मोघम बेरीज आहे त्याप्रमाणेंच आह्मांकडे आहे. असें त्यांचें ह्मणणें. परंतु हें प्रमाण नाहीं. मोघम बेरजेखालें आणखी दाबलें आहे. त्यास काय दाबलें याची देहबदेहीविशीं आज्ञा लवकर जाली पाहिजे. र॥ छ २३ मोहरम. हे विज्ञापना.

---

[१०७] श्री. ९ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. अदवानी, रायचूर वगैरे ता॥ महाबतजंग यांजकडील याचा बंदोबस्त नबाबांनीं तालुक्याचें काम व्यंकटराव सुरापूरकर यांजकडे सांगून रायचूर येथें महाबतजंगाचा पुत्र गुलाम हुसेन याजला ठेविलें. सांप्रत या गडबडीचे दिवसांत महाबतजंगाचे मुलापाशीं कारभारी यांणीं व्यंकटराव याजकडील ठाणीं उठवून तालुक्यासुद्धां आपली

शिबंदी ठेवून बंदोबस्त केला. याप्रों वर्तमान ऐकण्यांत आलें. तहकीक मारून मागाहून लिहीन. रा। छ २३ मोहरम. हे विज्ञापना.

---

[१०८] श्री. ९ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. मिर इमान सुगूरकर जमेदाराकडील यानें जमीयतसुद्धां नबाबाकडील तालुका हैदराबाद सुभ्यांतील जटचरक व घनपुरा येथील किल्ल्यांत ठाणीं घातलीं. मिरइमाम याचा हंगामा तालुक्यांत येविषयींचे बोभाट नबाबाकडे आले. पानगळाहून पंधरा सोळा कोस हैदराबादेचे अंगास आहे. हैदराबादेहून तीस पस्तीस कोस आहे. रा। छ २३ मोहरम. विज्ञापना.

---

[१०९] श्री. ९ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. इकडे पर्जन्य मृग नक्षत्राचे दोन तीन प्रथम लहान मोठे झाल्यानंतर पुष्य नक्षत्रापर्यंत पर्जन्य अगदीं उडाला होता. हल्ली आश्लेषा नक्षत्राचे पाऊस नक्षत्रा आरंभापासून तीन चार रात्रीं दिवसा असे पडले. चारा चहूंकडे जाला. हैदराबादचे आसपास तालुका धरून बेदरपावेतों पाणी चांगलेंच आहे. हल्लीं येथें शहरांत धारण, जोरी आठ नऊ शेर, तांदुळ सात शेर, हरभरे साडे सात शेर, याअन्वयें तूर्त आहे. अद्याप तळीं आणि विहिरीस पाणी आलें नाहीं. नहर शुष्क जाले ते ज्यारी जाले नाहींत. जमिनी पुरत्या भिजल्या नाहींत. हरळीचे खुरपण मात्र जाले. पिकाचा पर्जन्य अद्याप नाहीं. रा। छ २३ मोहरम. विज्ञापना.

छ २६ मोहरम, मुकाम भागानगर,
रवाना टप्यावर,

[११०] श्री. १२ आगष्ट १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तारीख छ २६ माहे मोहरमपावेतों भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून

सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष. येथील वर्तमानाची विनंति पेशजी पत्राची रवानगी डाकेवर केली त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत इकडील वर्तमान अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंति लेखन केली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करण्यास स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१११] श्री. १२ आगष्ट १७९१.

विनंति विज्ञापना. अलिजाबहादूर याजकडील बेदरची अखबार नबाबाकडे आली. ते नबाबांनीं पहावयास आह्मांकडे पाठविली. त्याचा हिंदवी तरजुमा करून सेवेसी पाठविला आहे. अवलोकनें मजकूर ध्यानास येईल. रा। छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

अखबार पारसी बेदराहून अलीज्या याची आली तिची नकल.

पारसी.

....

....

....

---

[११२] श्री.

अखबार पारसी बेदरची नबाबाकडे आली त्याचा तरजुमा.

अखबार किल्ले बिदर तागायत छ २० मोहरम सन १२०५ हिजरी. बेदरचे किल्ल्यांत हजार स्वार व दोन हजार पायदळ आहे. नबाब अलिजाबहादूर लालबागांत रहातात. लालबाग ह्मणजे बेदरचे किल्ल्यांत हवेली जेथें नबाब होते तेथें. सदाशिवरड्डी तालबजंग यांचे बागांत राहतात. हा बागही शहरपन्ह्याचे आंतच आहे. बेदरांत चौबाऱ्याचा बाजार आहे. तेथें बुरूज मोठा आहे. त्या ठिकाणीं हुसेनीसाहेब ह्मणून मशायख पीरजादा आहे. त्यांचे लेकीशीं अलिजाबहादूर यांनीं छ ११ मोहरमीं निका लाविला. राजे राजंणा चौदरी सदाशिवरड्डीचा बाप व सदाशिवरड्डीची आई उभयतां सदाशिवरड्डीस ह्मणतात

कीं, अलिजाबहादूर यांनीं कुच केलें, तर त्यांचे हमरा रिकाब असावें, त्यांजवेगळें एकस्थानेंच कोठें जाऊं नये, अगर तूं एकटा गेलास तर आह्मीं मुलेंलेकरेंसुद्धां विहिरींत उड्या टाकूं. नजीमन्मुलूक सफेजंग यांचा धाकटा पुत्र एक हजार स्वार व दोन हजार पायदळसुद्धां कल्याणाकडे रवाना झाला. मौजे कोसम परगणें भालकी येथें उतरला होता. बंदे अलीखान अजमसाहेब यांचा पुत्र, यानें हुमणाबाद, कलबोर्गें, व कल्याणी येथील बंदोबस्त कारावाके केला. कलबोर्ग्याचे किलेदार यांस लिहिलें कीं, जमीयत येत आहे, यास्तव हुषारी व खबरदारी असावी, व खंदकामध्यें तळ्याचें पाणी सोडावें. त्यावरून खंदकांत किल्ल्याचें पाणी ज्यारी आहे. बंदेअलीखान यांजपाशीं हुमणाबादेंत एक हजार पागा व एक हजार प्यादा नवनिगादास्त केला.

भोजरड्डी जमीदार इंदूर बोधनवाला सदाशिवरड्डीच्या तर्फेनें जमियत पांचशें स्वार व आठशें प्यादा कुहिरांत राहिला आहे. त्याचा इरादा आहे कीं, राजे प्रकाशवंत व्यंकटराव सुरापुरकर यांचा पुत्र चिंचोलीच्या नवाहांत आहे, त्यास ताख्ततराज करावें. कसबे हुसें येथें दोन हजार पांचशें स्वार पागेचे व दोन हजार प्यादा सरदारउन्मुलूक घासी-मिया याकडील आहेत. पागेचीं घोडीं राजूर, वरबाळ, व कोंडलवाडी, व रुदरुर व पोतंगल, व कोटगीर, वगैरे हुशांत मिळालीं आहेत.

नबाब अलिजाह व सदाशिवरड्डी यांचा इरादा आहे कीं, चार हजार प्यादा व दोन हजार स्वार यांस अजदरजंग मुसारेमू याजवर पत्रखुन पाठवावा. अलीजाहबहादूर याजपाशीं दरोबस्त जमीयत पांच हजार स्वार व बारा हजार प्यादा आहे. स्वारास खर्चास दररोज एक रुपया व प्याद्यास आठां दिवसां एक रुपया, याप्रमाणें देतात.

हसनाबाद परगणा ठाणें न्यालकल येथें ठाणीं अलिजाहबहादूर याजकडील कायम व मामलत ज्यारी आहे.

पिंपळखेड्यांत पागेचीं घोडीं सरकारचीं होतीं. त्यापैकीं बारा रास बछोरे व सोळा रास पसूघोड्या बंदेअल्लीखान यांनीं हुमणाबादेस नेलीं. बाकी सहा रास बछोरे व बारा रास घोडे अलिजाहबहादूर यांचीं माणसें घेऊन गेलीं.

निरख गल्ला दर रुपयास वजन पक्कें.

८॥२ गहूं.	८॥२ तांदूळ.	८८२ तूप.
८॥८ जोरी.	८८१ गूळ.	८॥१ हरभरे.

सदरहूप्रमाणें निरख आहे.

V——— कलमें सुमारें चौदा.

---

[११३] श्री. १२ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. मीरइमाम सुगूरकर जमीदाराकडील यानें जमियतसुद्धां येऊन घनपुरा व जठचरक तालुका हैदराबादेपासोन दक्षिणेकडे तीस पस्तीस कोश येथील नबाबाकडील ठाणीं उठवून दखल केला. जठचरक येथें जमियतसुद्धां मीरइमाम होता. इतकियांत मुसारेमूकडील लयेना महमद अमीखान अरब याचे तैनात कृष्णा पैलतीरीं होत्या. त्या तेथोन निघोन कृष्णा उतरून हैदराबादेकडे येत असतां त्यांनीं मिरइमाम यास जठचरक येथें एकबयेक येऊन गांठलें. लयेनचे लोक येतात हे खबर त्यास नव्हती. मिरइमाम बेफामीनें असतां लयेनाचे लोक पोहोंचून जठजरक येथें वेढा घातला. तेसमयीं मिरइमाम आपले जमावसुद्धां निघोन त्यांची यांची लढाई जाली. जठपोळ वगैरे आसपासचे जमीदार यांची कुमक समयास मिरइमाम यास पोंहोचून लढाईंत चार पांचशें लयेनेचे लोक ठार जखमी झाले. मिरइमामाचेही कित्येक ठार जखमी होऊन जमियतसुद्धां सांभाळून तो तेथून निघोन झाडींत गेला. याप्रमाणें वर्तमान नबाबाकडे आलें. येथून मीरइमाम यांचे तंबीकारितां भारामल्ल व नफरुद्दौला व दौलतखान वगैरे सरदार चार पांचशें स्वार व गाडदी या जमीयतसुद्धां छ २३ रोजीं रवाना जाहले. समसाबादेस पांच कोस जाऊन राहिले. छ २४ रोजीं

फरोखनगरास गेले. पुढें होईल त्याची विनंती लिहिण्यांत येईल. दुसरें वर्तमान कीं, मुसारेमूची लयेन वाटेनें येत असतां मिरइमाम झाडींत होता. तेथून एकाएकीं जमियतसुद्धां लयेनेवर येऊन झटपट झाली. शेवटीं लयेनेचे लोक जठचरकाचे आश्रयास येऊन राहिले. मीरइमाम हें कृत्य करून निघून गेला. याप्रमाणें एक खबर आहे. त्या रुखावर समसाबाद येथील नाक्यावर नफरूदौला वगैरे जमीयत ठेवावी येविसी यांजकडील एकविचार आहे. रा छ २६ मोहरम. हे विनंती.

---

[११४] श्री. १२ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर यांजपासीं स्वार पयेदल जमियत वीस हजारपर्यंत जमा होऊन सदाशिवरड्डी यानें आपले तर्फे फौजेच्या तीन टोळ्या केल्या. एक टोळी, मुसारेमू व पागावाले वगैरे नबाबाकडील सरदार वंजरा पैलतीरीं आहेत त्यांचे रुखावर, व एक तुकडी तांडूरकुहीर या मार्गानें हैदराबादेचे सुमारें, व एक तुकडी बेदरचे पश्चिमेस दोन तीन कोस, याप्रमाणें रवाना केल्या ह्मणोन एक वर्तमान. दुसरें हुमणाबाद येथें अजमखान यांचे पुत्र बांदेअल्लीखान ह्मणोन जमियतसुद्धां आहे. सदाशिवरड्डीचे लोकांची व त्याची पहिले एक वेळ लढाई झाली होती. हल्लीं सदाशिवरड्डीकडील जमियत हुमणाबादेस जाऊन मोर्चेबंदी केली. ऐसेंही वर्तमान आलें. व तिसरी खबर, सदाशिवरड्डी जमियतसुद्धां बेदराहून निघोन, संगारडी अलीकडे चार कोस, बेदराहून बाराकोस, मौजे चिडकिडे हा गांव येथें उतरले. मुसारेमू वगैरे नबाबाकडील सरदार यांजवर येऊन पडावें हा इरादा ह्मणोन वर्तमान. याप्रमाणें वर्तमानें नित्य नूतन येत आहेत. वास्तविक काय असेल तें असो. जे ऐकण्यांत आलें त्याची विनंती लिहिली आहे. रा छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[११५] १२ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. हैदराबाद शहराचा नबाबानीं हवेलीचा बंदोबस्त दरवाजावर परवानगीरसानगी चौक्यापाहरे व रात्रीं गस्त याप्रमाणें नित्यक्रम चालिला आहे. सदाशिवरड्डी जमियतसुद्धां शहरावर येणार, याच्या अवथामुळें रात्रंदिवस हुशारी व ताकीद ज्यारी आहे. छ २३ मोहरमीं रात्रीं नबाब तीन प्रहरापर्यंत दरबार करून मीरअलम व राजाची व सरबुलदजंग वगैरेसुद्धां विचार होता. तीन प्रहर वाजल्यानंतर पिछले प्रहर रात्रीं बरखास्त होऊन लोक आपले मकानास गेले. वाड्यांत पागेचे बारगीर हत्यारबंद चौकीस नेहमीं असतात. गफुरजंगाचे पुत्र एक रामन्मुलुक व आषजाउलमुलुक व मुनिरुलमुलुक या त्रिवर्गास हुकूम रात्रीं चौक्या पाहऱ्यांचा बंदोबस्त शहरचे निगेहबानीविषयीं व देखरेख करीत जावी याप्रमाणें जाला. समशेरजंगास गस्त पाहरा व नवें कोणी मनुष्य आलें गेलें शहरांतील याची चौकशी करून समयाचे समयास अर्ज करावा ऐसी ताकीद झाली. याचप्रमाणें कोतवाल वगैरे सर्वांस खबरदार राहणें म्हणून ताकीद व येहतीयात सांप्रत फारच आहे. शहराबाहेर कारवानची वस्ती, तेथें साहुकार लोक यांस दम पुरेना, सबब त्यांनीं अगोदरच वस्तवानी नगदी ऐवज व मुलेंमाणसें गोलकुंड्याचे किल्ल्यांत ठेविलीं. सढे जरारी होते तेही कित्येक किल्ल्यांतच जाऊन राहिले. कारवानची वस्ती उठली. शहरातीलही लोक हवालदील आहेत. चौकशी पाहरे बंदोबस्तही आहे. इतक्यावर जें होईल त्याची विनंती लिहिण्यांत येईल. रा। छ २६ मोहरम. विज्ञापना.

---

[११६] श्री. १२ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. महाबतजंग याजकडील तालुका अदवानी, रायचूर, कवताल, मनू वगैरे येथील काम व्यंकटराव मुरापुरकर यांजकडे नबाबानीं सांगोन महाबतजंगाचा पुत्र गुलाम हुसेनखान यास महाबारी

नेमून दिल्ही. त्याप्रमाणें महाबारीचा ऐवज द्यावा. रायचुरांत त्यास ठेऊन ह्याप्रमाणें चालिले. तालुका व ठाणीं व्यंकटराव याजकडे होतीं. सांप्रत चहूकडे हंगामा, सबब नबाबानीं महाबतजंगाकडील कारभारी अनवरुद्दौला, हैदराबादेंत होता, त्यास येथून रवाना केलें कीं, तुह्मीं महाबतजंगाचे मुलापासीं राहोन, शिबंदीचा वगैरे बंदोबस्त करून फंद-फितुर न होय, ऐसें करावें. त्याप्रमाणें अनवरुद्दौला रायचुरास येथून गेले. त्यास पंधरावीस दिवस झाले. द्दौलामजकूर तेथें जाऊन व्यंकटराव याजकडील ठाणीं तालुक्यांत होतीं तीं दरोबस्त उठवून दिल्हीं. तालुक्यांत व ठाण्यांत आपली सिबंदी ठेऊन मजबुती केली. किल्ला व ठाणीं गढ्यातालुक्यासुद्धां बंदोबस्त महाबतजंगाचे मुलाचे नांवें अनवरुद्दौला यांनीं केली. हें वर्तमान नबाबाकडे आलें. व्यंकटराव यांचीही अर्जी गुजरली. या वर्तमानाची विनंती ऐकिल्याप्रमाणें यापूर्वीं ही सरासरी लिहिली होती. खचित वर्तमान समजलें त्याचीहि विनंती लिहिली असे. र॥ छ २१ मोहरम. हे विज्ञापना.

---

[११७] श्री. १२ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. संस्थान अदवानी येथील स्वराज्याचा ऐवज सन १२०४ पासोन महालीफडच्याविषयीं अमीलाचे नांवें इनायतनामे यांची परवानगी राजाजीस जाली. मशारनिलेनीं इनायतनाम्याचा मसविदा केला. त्यास सांप्रत राजाजीस विचारिलें कीं, इनायतनामा कोणाचे नांवानें होणार. राजाजीनीं व्यंकटराव याजकडे तालुका, त्याचे नांवें इनायतनामा तयार करवितों, ह्मणून सांगितलें. याजवर राजाजीस विचारिलें कीं, व्यंकटराव यांचीं ठाणीं उठवून अनवरुद्दौलानीं महाबतजंगाचे पुत्राचीं ठाणीं घातलीं, बंदोबस्त केला, ह्मणून वर्तमान ऐकतों, तेव्हां व्यंकटराव याचे नांवें इनायतनाम्यानें काय होतें, हें वर्तमान खचित किंवा व्यंकटराव यांचे याजकडेच तालुका ह्मणून सहजात विचारिलें. हें ऐकून राजाजी हांसून बोलिले, काय असेल असो. इतकेंच. यावरूनही

अनवरुद्दौलानीं ठाणीं व तालुक्याचा बंदोबस्त केल्याचें खचित दिसण्यांत आलें. रा। छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[११८] श्री. १२ आगस्ट १७९१.

विनंति विज्ञापना. रायराया रेणूराव घोडाजी यांस बाहेर डेरे देऊन लोक जमा करण्याविषयीं सांगितलें. घोडेस्वार यांची हजरी, गणती, मिसल, दाग, चेहेरे पाहून खर्चास व मसादा देणें हें करावें. याप्रमाणें सांगोन मशारनिले बाहेर जाऊन उतरले होते. सरदारांस मसादाही कांहीं दिल्हा. पांचशेंपावेतों लोक जमा केले. त्यानंतर ज्या लोकांस जामियतीकरितां ऐवज दिल्हा त्यांजकडे मागील फाजलाचा ऐवज येणें हें राशेनराव यांनीं समजाविलें. नबाब राजाजी यांजवर रुष्ट होऊन मसादा दिल्हा. तो ऐवज माघारा सरकारदाखल करणें ह्मणोन तगादा लागला. राजाजी बाहेर राहिले होते ते शहरांत आपले हवेलींत येऊन राहिले. भारामल यास नेमून दिल्हे. घोड्यावर दाग व मिसल हेंही काम राजाजीकडे होतें. त्यास दाग छ २४ रोजीं मागोन नेले. मिसलही त्याजडील तूर्त राहिली. याप्रमाणें आहे. रा। छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[११९] श्री. १२ आगस्ट १७९१.

विनंति विज्ञापना. मुसारेमू व घासीमिया व अजमखान व इसामिया व ज़ोतसिंग खंदारकर वगैरे सरदार जमियतसुद्धां आंदोलाहून दोन कोस वंजरानदीचे पैलतीरीं आहेत. टोकरे नदींत घालून जमियत उतरून अलीकडे येत आहेत. सर्वांचा उतारा जाल्यानंतर संगारडी पेठेस येणार. नदी उतरतां एक टोकरा बुडाला, ह्मणोनही वर्तमान आहे. तहकीक समजल्यावर लिहिण्यांत येईल. मुसारेमू वगैरे सरदार आहेत त्यांची खर्चाचीही बहुत अडचण. जोतसिंग खंदारकर यास फाकेकसी होत आहे. कर्जवाला तेथें मिळेना, सबब त्याचीं माणसें व पत्रें शहरांत कर्जाकरितां कोणाकोणाकडे आलीं. याप्रमाणें

अवस्था. घारणहीं त्यांचे लष्करांत महाग ह्मणून वर्तमानें येतात. याजवर जें ऐकण्यांत येईल त्याची विनंति लिहीन. रा छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[१२०] श्री. १२ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर याजकडील जमियत दोन हजार स्वार व दोन हजार पयेदळ सदाशिवपेंठेचे मार्गे रुद्रवरं येथें येऊन तो गांव लुटून ताराज केला. पटणचरूचे हिफाजतीकरितां अगोदर नबाबानीं सिताबराव अमील यास तेथें चार पांचसें पयेदल जमियतसुद्धां पाठविलें. त्याजला रुद्रवरं येथें जमीयत आल्याचें वर्तमान समजतांच त्यानें अर्जी नबाबास लिहून शहरास पाठविली. ते अर्जी घेऊन हरकारा आला. त्याजला दरवाजापाशीं अटक जाली. अर्जी पोंहचली. त्याचे मागेंच सिताबराव पट्टणचराहून निघाला. अलिजाह याजकडून चार हजार जमियतसुद्धां रुकनुद्दिवान सरदार रुद्रवरं येथील वषट्कार करून पट्टणचरास जमियतसुद्धां आला. पट्टणचरू लुटून साफ केली. सिताबराव पूर्वीं निघोन, शहराचे दरवाजावर येऊन, नबाबास अर्जी पाठविली. पट्टणचरू मारलें, खबर आली, त्यावरून नबाबानीं छ २९ रोजीं दोन प्रहर दिवसां राजे रायराया रेणूराव यांस बाहेर त्यांचे मुकाबिल्यावर निघण्याविषयीं सांगितलें. दहा हजार रुपये खर्चास देविले. राजाजी शहराबाहेर पांच चारशें स्वार पयेदलसुद्धां निघाले. वाड्यांतील बंदोबस्त बारगीर आणून नबाबानीं करविला. याप्रमाणें छ २९ रोजचें वर्तमान आहे. पट्टणचरूवर लोक कित्येक जखमी झाले तेहि शहरांत आले. माणसांचीं नाकें कानें घेतात ऐसेंहि वर्तमान ऐकण्यांत आलें. छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[१२१] श्री. १२ आगष्ट १७९९.

विनंवि विज्ञापना. पटणचरु लुटलें व गिर इमाम दक्षिणेकडे जमियतसुद्धां, याजमुळें शहरांत व बाहेरील पेठा येथें गडबड व घाबरेपणा

भारी जाला आहे. नबाबांनीं हवेलीचें जलोहखान्यापुढें एक तोफ ठेविली. व जडव्यावर एक तोफ. जागजागा चौक्या नाकेबंद्या केल्या. ह्यावरून लोक फार हवालदील जाले. दम पुरेना. सबब कारवानचे दरोबस्त लोक चीजबस्त मुलेंमाणसेंसमेवत लोक गोलकुंड्यास गेले व जात आहेत. कारवानाहून किल्ल्यास एक गांठोडें नेणें तर त्यास मजुरी एक रुपया जाली आहे. पट्टणचरूचें वर्तमान येतांच नबाबांनीं राजाजीस चार पांचशें जमियतसुद्धां गोवर्धनाचे बागाकडे पाठविलें. तीनशें गाडद दारूगोळीसुद्धां एके नाक्यावर ठेविलीं आहेत. देवडीवर बारगीर व गाड्यांची दाटी दारूगोळी तमाम सर्वांस वांटून दिल्ही. छ २५ रोजीं शहरांत मोठी गुल व खळबळ झाली. बेगमबाजार वगैरे पेठा शहराबाहेर आहेत. तेथील तमाम लोक शहरांत आले व येतात. छ मजकुरीं रात्रीं नबाबांनीं हवेलीचा बंदोबस्त बहुत करविला. बाणाच्या कैच्यांचे उंट पंचवीस देवडीवर आणविले. नफरुद्दौला वगैरे सरदार फरोखनगराकडे रवाना केले होते, त्यांजकडे घुतरसवार रवाना करून सरदार जमियतसुद्धां ताडबनांत आणविले. याप्रमाणें गडबड आहे. यावर होईल त्याची विनंती लिहिण्यांत येईल. रा छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

---

[१२२] श्री. 13 आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. काल छ २५ रोजीं रात्रौ मिरअलम व मुनसी वगैरे मामुलीलोक दरबारास गेले. ते चारीप्रहर रात तेथेंच आहेत. नबाब दोनप्रहर रात्रीनंतर दोनतीन वेळ जनान्यांत उठोन गेले होते. आजही चारपांच घटिका दिवसपर्यंत सर्व दरबारी लोक हुजूरचे वाड्यांतच आहेत. याप्रमाणें येथील वर्तमान हे वेळपर्यंत आहे. नंतर होईल ते विनंती लिहिण्यांत येईल. सर्व रात्र जागत बसले. कारवानचे लोक गोवळकुंड्यांत जात होते त्यास मनाई झाली. रा छ २६ मोहरम. हे विज्ञापना.

[१२३] श्री. १८ आगस्ट १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ताा छ २ मोहरमपर्यंत मुक्काम भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान सुखरूप असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी डाकेवर केली त्यावरून ध्यानांत आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लेखन केली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१२४] श्री. १८ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर यांजकडील जमीयत दोनं हजार स्वार व दोन हजार पयेदल याप्रमाणें टुकडी सदाशिवपेठेस उतरून लुटून ताराज करून तेथून छ २४ मोहरम सोमवारीं दोनप्रहर रात्रीं मौजे पातरंपल्ली, सदाशिवपेठेहून चार कोस अलीकडे, तेथें जमियत नमूद झाली. गांवांत शिरून लुटीस आरंभ केला. भांडींकुंडीं नगदी व पांघुरणेंदेखील बायकांचीं वस्त्रें राहूं न देतां सर्व घेऊन कित्येक माणसें गांवांतील जखमी ठार व नाकें कानें कित्येकांचीं करून शेवटीं गांवास आग लावून मोकळे केलें. हें होऊन पिछली सहा घटिका रात्रीं रहातां रुद्रवरं, पटणचरुपलीकडे तीन कोस, येथें आले. तेथीलही प्रकार तसाच जाला. पठणचरु येथें नबाबाकडून सिताबराव दोनशें स्वार, तीनसें पयेदल जमियतसुद्धां बंदोबस्तास होता. त्यास वर्तमान, रुद्रवरं येथें जमियत पोहोंचून ताराजी मांडिली हें, समजतांच सिताबराय एकाकी पटणचरूहून निघोन शहरास पळोन आला. त्याचे तैनातीस लोक होते, त्यांस सिताबराय पळाला हें समजल्यावर, तेहि फरारी झाले. कांहीं दम धरून राहिले. छ २५ रोजीं मंगळवारीं पटणचरूवर सहा घटिका दिवसा जमीयत येऊन गांव लुटला. शेवटीं आग दिल्ही. सिताबराय अगोधरच निघून शहरास आला. मागाहून पटणचरु

जालिलें. खबर आली. दरवाजे हवेली आदीकरून शहराचा बंदोबस्त. शहराबाहेर दोन तीन कोसीं नाकेबंदी करविली. दिवसा व रात्रीस गडबड भारी जाली होती. पटणचरु लुटोन जमियत निघोन गेली. सरकारचे टप्याचे जासूद, पोतरंपल्ली, रुद्रवरं, पटणचरु येथील, या हंगाम्यांत लुटले गेले. उघडे बोडके होऊन येथें आले. त्यांस खर्चास देऊन ठेविलें. पुढें होईल ते विनंति लिहिण्यांत येईल. जासुदांस खर्चास देऊन एक जोडी टप्याचे खबरीस पाठविली होती कीं, जोड्या कोठपर्यंत उठल्या. चारपांच जोड्या भागानगरापासून लुटल्या गेल्या त्या उठल्या बाकीच्या कायम आहेत. याप्रमाणें येथून जोडी पाठविली ती खबर घेऊन आली. त्यास ज्या जोड्या उठल्या त्यांस मागती टप्यावर रवाना केलें आणि हल्लींचा टपा सेवेसी लिहून पाठविला आहे. रा छ २ सफर. हे विज्ञापना.

---

[१२९] श्री. १८ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. मुसारेमू व घासीमिया व अजमखान वगैरे नबाबाकडील सरदार आंदोलाहून संगारड्डीकडे येणार. ते वंजरा पैलतीरीं नदीचे पाण्यामुळें अटकून नांवा टोंकरें आणवून नदी उतरावयास आरंभ केला. मुसारेमूकडील लोक तीन चारशेंपर्यंत वंजरा उतरून अलीकडे आले. इतक्यांत सदाशिवरड्डीकडील चारपाचशें स्वार एकाएकीं, घासीमियाकडील लोक ह्मणून मुसारेमूचे लोक अलीकडे उतरून आले, त्यांजवर जाऊन हत्यार चालविलें. दोनशें ठार झाले. कांहीं फरारी झालें. याप्रमाणें होऊन सदाशिवरड्डीची जमीयत निघोन गेली. लोक जाया झाले. याप्रमाणें वर्तमान नबाबाकडे आलें. हल्लीं मुसारेमू वगैरे सरदार यांचे लोक वंजरा नदी उतरून संगारड्डीकडे आले. याप्रमाणें खबर आली तेथून इसामिया पन्नास स्वारसुद्धां शहरास आले. छ २८ मोहरम शुक्रवारीं इसामिया नबाबाकडे दरबारास येऊन तिकडील मजकुराचा अर्ज केला. मुसारेमू व घासीमिया व अजमखान वगैरे

सरदार संगारड्डीस दाखल झाल्याचें वर्तमान आहे. इसामिया खर्चास मागावयाकरितां आला. त्यास पन्नास हजार किंवा साठ हजार रुपये देऊन काल छ ३० मोहरमीं रात्रीं रुकसतीचें पानदान दिलें. आज उद्यां एका दोहों दिवसांत जातील. रा छ २ सफर. हे विज्ञापना.

---

[१२६] श्री. १८ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. मुसारेमूकडील लयनेचे लोक कृष्णा पैलतीरीं अमीनखान अरब यांचे तैनात होते ते तेथून निघून हैदराबादेस येत असतां मार्गीं जडचरल्यानजीक मीरइमाम मुगूरवाल जमीनदारिणीकडील जमीयतसुद्धां येऊन त्यानें गाठलें. यांची त्यांची लढाई होऊन चार पांचशें लयनेपैकीं लोक ठार जखमी करून मीरइमाम निघून झाडींत गेला. येथें वर्तमान येतांच नफरुद्दौला, भारामल वगैरे सरदार रवाना झाले. समसाबाद फरोखनगरास गेले, तों मीरइमाम गेल्याची खबर समजल्यावरून सरदार माघारे शहरास जमीयतसुद्धां आणविले. ते आले. मुसारेमूचे लयनेचेही लोक जडचरल्याहून निघून फरोखनगर समसाबादेहून शहरास आले. लंगर हौदापाशीं उतरले. तीन साडेतीन हजारांची जमीयत पैदलची आहे. मीरइमामाचे लढाईत कितेक जखमी घायाळ तेही आहेत. नसरुद्दौला वगैरे येथून सरदार गेले होते. ते ताडबनांत हुकमाबमोजीब उतरले आहेत. पटणचरूवर हंगामा झाल्यापासून जागजागा नाकेबंद्या व बंदोबस्त बहुत आहे. इतक्यावर होईल त्याची विनंति लिहिण्यांत येईल. मिरइमाम यानें पानगळ व घनपुऱ्याचा किल्ला व कोयलकुंडा हीं ठाणीं किल्लेसुद्धां घेतल्याचें वर्तमान आहे. कृष्णेपलीकडे मुसारेमूचे लोक होते ते सरदारसुद्धां आले. मुसाजामबत्तिसा वगैरे लयनेचे सरदार यांची मुलाजमत नजर झाली. दोन तोफा थोर गोळ्याच्या व एक गरनाळ मुसाबतीसाकडे दिली. मीरइमाम व आणखी कोणी जमीनदार आहेत, त्यास घनपुऱ्याचा किल्ला त्यांनीं घेतला. पानगळची खबर पक्की अद्याप आली नाहीं. कोयलकुंड्याची अफवा आहे. खबर नाहीं. रा छ २ सफर. हे विज्ञापना.

---

[१२७] श्री. १८ आगस्ट १७९९.

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजी दोन पलटणें आपले ठिकाणाहून निघून पांच सहा मजली आलीं. पंधरा दिवसांत हैदराबादेस येऊन पोहोचणार. याप्रमाणें इंग्रजाचे वकिलांनीं नवाबास सांगितलें. त्याजवरून मर्जी प्रसन्न आहे. त्यांचे येण्याची प्रतीक्षा आहे. ते आल्यावर सर्व जमाव एक-जड करून बेदरावर रवाना करणार. श्रीमंतांकडील पत्राचे जबाब अद्याप कां येत नाहींत ह्मणोन एक दोन वेळ नवाबांनीं विचारलें. तयार झाले आहेत, लौकरच रवाना होतील, असें उत्तर मला आलें. दंग्यामुळें मार्गांत अटक झाली असल्यास नकळे, असें उत्तर दिल्हें. त्यास उत्तराविषयीं लवकर आज्ञा जाली पाहिजे. नवाब फार इंतजारी आहेत. रा। छ २ सफर. हे विज्ञापना.

---

[१२८] श्री. १८ आगष्ट १७९९.

विज्ञापना एसीजे. मीर सुभानअल्ली फेरुहुंजाह साहेबजादे राजश्री नानांस येदगिरीवर इस्तकहाल नवाबांनीं पाठविलें. त्यांचे घरीं छ २९ मोहरमीं १९० गाडदी नवाबांनीं पाठवून, पहिले उठवून नवे बसविले. कांहीं पहारे जाजती ठेवले. पांच सात माणसें खिदमतगार वगैरे पागीर्दपे-षाचीं व एक मोदी वाणी इतक्यास धरून नेऊन, तोकजंजीर करून, कैद केलें. यांतील कारण फितुराचे किंवा आणखी कांहीं हें समजलें नाहीं. शोध करून मागाहून लिहून पाठवीन. शहरचे दरवाजावर बंदोबस्त फार झाला. येथून टप्पा रवाना करणें अथवा तिकडून येणें तो दरवाजावर अटकतो. नवाबाची परवानगी खाशांचा हुकूम होऊन चोबदार जाऊन दरवाज्यास परवानगी सांगावी तेव्हां टप्याचीं पत्रें जासूद घेऊन बाहेर जातात अथवा येतात. याप्रमाणें झालें आहे. रा। छ २ सफर. हे विज्ञापना.

छ ११ सफर मुा भागानगर
गुरुवार रवाना टप्यावर.

[१२९] श्री. २७ आगष्ट १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ताा छ ११ माहे सफर मुा भागानगर येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी टप्प्यावर केली त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१३०] श्री. २७ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. मुसारेमू व घासीमिया व अजमखान व इसामिया वगैरे सरदार नवाबाकडील जमीयतसुद्धां संगारडीपेठेवर येऊन पांच सात मुक्काम झाले. इसामिया हैदराबादेस नवाबाकडे येऊन दोन रोज राहून रुखसत घेऊन तिकडे पुन्हा गेले. मुसा जामबतिसा सरदार मुसारेमूकडील कृष्णापैलतीरीं तैनात होता. तो जठचरल्यावरून येथें आला. त्याचीही रुखसत नवाबानीं करून संगारडीकडे त्यास रवाना केलें. छ ६ सफरीं लिंगपेठेस जाऊन उतरला. त्याचे समागमें पयदळची जमीयत चार हजाराची आहे. छ ७ रोजीं पट्टणचरूस उतरून छ ८ रोजी संगारडीपेठेपाशीं मुसारेमू याचे लष्करांत प्रहर दिवसां दाखल झाला. मुसारेमूची अर्जी नवास केली कीं हुजुरांतून मुसा जामबत्तीसा याची रवानगी जमीयतसुद्धां जाली, तो येऊन षामील झाला. याउपरीं उदईक येथून कूच करून सदाशिवपेठेवर जाऊन उतरतो. त्याप्रमाणें छ ८ रोज मंगळवारीं मुसारेमू वगैरे सरदार जमीयतसुद्धां संगारडींतून कूच करून गेले. सदा-

शिवपेठेअलीकडे नाल्याचे पाण्यावर उतरले आहेत. अर्जीही आली. येथून त्यांजकडे बारूद, गोळे व बाणाच्या कैच्या वगैरे सरंजाम रवाना झाला आहे. पुढें होईल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल. रा छ ११ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१३१] श्री. २७ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. अलीजाबहादूर साहेब बेदरांत आहेत. जमीयत स्वार पायदळसुद्धां वीस पंचवीस हजारांचा भरणा होईल. चिंचोली, तांडुर वगैरे आसपासचीं ठाणीं घेऊन देगळूर, सारवाड, कोंडलवाडी इकडेही ठाणीं कित्येक जागा बसविलीं. शिबंदीचें देणें, खर्चाचा ताण, सबब भालकी येथें जमीयत साहेबजादे यांची जाऊन भालकीची लूट जाली. पांच चार लाख रुपयांचें वित्तविषय हस्तगत जालें. याप्रमाणें वर्तमान आहे. महमद अजमखान पागावाले यांचे पुत्र बंदेअलीखान दोन अडीच हजार जमीयतसुद्धां हुमणाबाद येथें आहे. त्याजवर सदाशिवरड्डीकडील जमीयत व हिंमतखान ह्मणोन सरदार दोन तीन हजार जमीयतसुद्धां रवाना झाला. बंदेअलीखान बाहेर निघून त्यांचा यांचा मुकाबिला झाला. त्यांत दोन तीनशें लोक इकडील व दोन तीनशें त्याजकडील ठार जखमी होऊन जमीयत माघारी आली. रड्डीकडील हिंमतखान सरदार ठार झाला. याप्रमाणें एक वर्तमान. दुसरें वर्तमान ऐसेंही आहे कीं, यांची त्यांची लढाई होऊन बंदेअलीखान याची शिकस्त झाली. सबब हुमणाबादेस न जातां निघोन गेला. याप्रमाणेंही वर्तमान आहे. खचीत समजण्यांत येईल तशी विनंती लिहीन. रा छ ११ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१३२] श्री. २७ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. मिरइमाम जमीनदाराकडील पेशजी जमीयतसुद्धां जठचरल्यावर येऊन, मुसाजामबत्तिसा यासीं लढाई करून, झाडींत

निघून गेला. मुमामजकूर जमीयतसुद्धां हैदराबादेकडे आल्यानंतर हाली मिरइमाम पांच सहा हजार जमाव व स्वार पायदळसुद्धां राजापूर तालुक्यांत येथून पस्तीस कोसावर नमूद जाला. याप्रमाणें वर्तमान नबाबाकडे आलें. फरोखनगरावर यांजकडील सरदार फकरुद्दौला वगैरे पांच सातशें जमीयत आहे. मीरइमाम राजापुराहून कोणीकडे जातो येतो हें वर्तमान येईल त्याप्रमाणें विनंती लिहिण्यांत येईल. रा। छ ११ माहे रुफर. हे विज्ञापना.

---

[१३३] श्री. २७ आगस्ट १७९९

विनंति विज्ञापना. हैदराबादेंत दरवाजे शहरपन्हा व हवेली आदिकरून बंदोबस्त परवानगी, रसानगी व चौक्या याची येहतीयात रात्रंदिवस आहे. किल्ले गोवळकोंड्यांत तेजसिंग हजारी याचे निसबतीचे लोक ठेवून बंदोबस्त केला. समसाबाद फरोखनगर मोंगलागियाकडेही जमीयत थोडी थोडी आहे. सदाशिवरड्डीकडे येथून कोणी दीक्षित ह्मणोन ब्राह्मण अकबार लिहितो, हें वर्तमान नबाबास समजल्यावरून शहरांतील ब्राह्मण, तेलंग वगैरे धरून चौकशी करण्याविषयीं कोतवाल मोगलखान यास आज्ञा जाली. त्यावरून त्यांनें ब्राह्मण जे शहरांत सांपडले ते एकशेंसव्वीस असामी धरून पहाऱ्यांत ठेविले. इसमनवीशीची फर्द लिहून नबाबास अर्ज केला. दोन रोज ब्राह्मण पहाऱ्यांत होते. त्यानंतर सोडून दिले. रा। छ ११ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१३४] श्री. २७ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना.

१ अलीजाहबहादूर यांजकडे नोकरी वगैरे बहाण्यानें आपले तालुक्यांतून कोणी जाऊं नये व इंग्रजी दोन पलटणें नोकरीस होतीं तीं हल्लीं परतून माघारी बोलविलीं. त्याचे इतलयाचे दोन खरितें नबाबानें दिले ते स्वामी-

कडे पाठविले होते. त्याचे जबाब दोन सरकारचे खरिते छ २९ मोहरमीं राजश्री गोविंदराव भगवंत यानीं रवाना केले, ते छ ६ सफरीं पावले. नबाबाकडे जाऊन दोनी खरिते प्रविष्ट केले.

१ किस्तीचा ऐवज अखेर सालीं यावयाचा, अद्याप ऐवज येत नाहीं, याविषयीं नबाबासीं खरितापत्र पाठविलें. तुमचे विचारास आल्यास द्यावें, नबाबासीं बोलून हप्त्याचा ऐवज लवकर येई तें करणें, ह्मणून छ १९ जिल्हेजचें आज्ञापत्र व खलिता आला तो पावला. अलिजाहप्रकरणीं खरित्याचा जबाब सरकारांतून यावयाचा तोपावेतों ठेविला होता, तो हल्लीं या पत्राबराबर नबाबास पावता केला.

२

दोन कलमें. सदरहू तीन खरिते नबाबांनीं वाचून पाहिले. नंतर बोलिले कीं, अलिजाहबहादूर यांचे प्रकरणीं तदबीर मनांत येते ते लिहून पाठवावी ह्मणून मुसना खरिते मागाहून दिल्हे, त्यांचा जबाब आला नाहीं, पूर्वीं पत्रें पाठविलीं त्याचा मात्र जबाब आहे, त्याचा जबाब केव्हां येईल, त्याची इतंजारी आहे, त्यास तींही पत्रें पाठवावीं. जबाब लवकरच येतील ह्मणून बोलिलों. उपरांत दोन तीन घटका दौलतीचे समारंभाचीं व एहसानाचीं बोलणीं बोलत होते. सरकारचे जाबसालाविषयीं बोलिले. त्याचा मजकूर अलाहिदा लिहिला आहे. त्यावरून ध्यानास येईल. अलिजाह यांचे तदबिरीविषयीं काय सलाह ह्मणून नबाबाचे खरिते मागाहून रवाना केले त्याचे जाब स्वामीचा कदम दरमियान रहावा याप्रकारें समर्पक यावें. छ ११ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१२९] श्री. २७ आगस्ट १७९९.

विनंति विज्ञापना. नबाबानीं विचारलें कीं तुह्मांस काय लिहिलें आहे. खरित्यांत मजकूर होता त्याअन्वयें बयान करून बोलण्यांत आलें जे, दोहीं दवलतींचे इत्यफाकानें कोणतीहि गोष्ट मुष्कील नाहीं,

इत्यफाकाची सर्वोपरी आहे. खर्ड्यापर्यंत ज्या गोष्टी जाहल्या त्या, गुदस्तां तेथें करारमदार होऊन जें ठरलें त्याप्रमाणें, अमलांत येऊन, परस्परें सफाई रहावी हेंच दृष्टीस पडत असावें. हें न होतां करारांत गोष्टी आल्या त्याजवर अद्याप अंमल होत नाहीं. किस्त वगैरे कामें व्हावीं, सरकारचा तहनामा घेऊन हजरतींनीं आपल्याकडील तहनामा त्याप्रमाणें द्यावा, हें कांहींच अमलांत न आलें. तहनाम्याचा मुकदमा भेटी झाल्यावर होईल ह्मणोन ईर्षाद जाला, किस्तींचे ऐवजाचे देण्याचें बोलणेंच नाहीं. कामें होण्याविषयीं राजाजीस आज्ञा जाहली, परंतु एकहि अमलांत येत नाहीं. बरदापूर वगैरेयाचा माविजा तालुका देवावा, हें कांहींच घडत नाहीं. तेव्हां दोस्ती व इत्युहादाची खातरजमा कशावरून समजावी? याचा विस्तार मला बहुत लिहिला आहे, ह्मणून गोविंदराव भगवंत यांचीं पत्रें आलीं होतीं. तींच वाचून दाखविलीं कीं, कराराप्रमाणें किस्त व तहनामा वगैरे अमलांत आले तर खातरजमा होईल. याप्रमाणें बहुत बोलण्यांत आल्यावर नबाब बोलिले कीं, तहनामा व करारमदार झाला त्यांत तफावत आणावयाची नाहीं, जर तफावत आणावयाचें मंजूर असतें तरी हमराही फौजेची बरतरफी व इंग्रजी पलटणाची रुखसत हें अमलांत कशास येतें? करारमदाराबमोजीब अमलांत आणावयास ह्मणून ज्याजती खर्च फौज वगैरे तोडून तालुक्याची वगैरे आमदनी येईल त्यांत किस्तींचे सरबराईची तजवीज करावी याच योजनेंत होतों, तों दरमियान अलीजाह यांचा पिगुफा खडा झाला, याजमुळें शिबंदी खर्च जाजती चहडला, व तालुक्याचीही खराबी, मुख्य आमदानी तालुक्याची, त्याची अवस्था तशी झाली, याजमुळें दिरंगावर पडलें, तहनाम्याविषयीं टाळा दिला ऐसें नाहीं, एका दो शब्दांचा हरफेर बोलण्यांत येऊन तहनामा द्यावा घ्यावा, याजकरितां मुलाकातीवर ठेविले, वरकड कामाविशीं राजाजीस सांगितलेंच आहे, एकएक उलगड्यांत येत जाईल, यास टाळा दिला असें मनांत येऊं नये व संशय नसावा, समंजस आहेत त्यांनीं कियास करून ध्यानांत आणावें जे वांकडी चाल करावी असें लक्षण आह्मांकडून काय दिसलें, दौलतींत

प्रसंग विलक्षणही येतात, त्या अडचणीस्तव बोलावेंही लागतें, त्यास करारांत गोष्ट आली ते खचित आहे, किस्तीचा मुकद्मा तर अलीजाहा यांचा मझेला यापासोन फरागत होऊन त्यांचाही फैसला करण्यांत येईल, तुमच्याकडील भरणा व इकडील खिसारा दोहींचा निर्वाह एक-समयावच्छेदेंकरून कसा होतो? संकटच आहे, वरकड कामाविषयीं ताकीद करितों. एक एक उलगडावें ह्मणोन बोलिले. याचा जबाब मी दिला जे, याविषयीं मागती मी अर्ज करीन ते दर्याफ्त होऊन आज्ञा व्हावी. याप्रमाणें बोलणें झाल्यावर निरोप घेऊन घरास आलों. रा। छ ११ माहे सफर. हे विज्ञापना.

छ १५ सफर.
मु॥ भागानगर.
टप्यावर.

[१३६] श्री ३१ आगस्ट १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. तागायत छ १५ माहे सफरपर्यंत मुक्काम भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी केली त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१३७] श्री. ३१ आगस्ट १७९५.

विनंति विज्ञापना. मुसारेमू व घासीमिया व अजमखान व इसामिया वगैरे सरदार संगारडीहून मुसा जामबात्तिसाच्या जमीयतसुद्धां पोहोंचल्या-नंतर कूच करून सदाशिवपेठेअलीकडील नाल्यावर राहिले, याची

विनंति लिहिलीच आहे. तेथून मुसा मजकूर वगैरेनीं कूच करून बुध-वारचा मुक्काम केला. तेथून मौजे जिरंपल्ली कुहिराचे बराबरीस गांव आहे तेथें जाऊन उतरले. जिरंपल्लीहून बेदर बारा कोस आहे. बेद-रास जाण्याचा रस्ता सदाशिवेपेठेंतून संगमचा नीट. परंतु तो रस्ता सोडून संगमाकडे न जातां जमीयतसुद्धां कुहिरच्या सुमारें जिरंपल्लीकडे आले. सबब कीं, बंदेअलीखान हुमणाबाद येथें अडीच तीन हजार जमीयतसहित आहेत, त्यास आपल्यांत सामील करून घ्यावें, सर्व फौज एकत्र करून मग बेदराकडे जाण्याचा इरादा करावा. या मन-सब्यानें संगमावरून बेदराकडे न जातां कुहीरचे बराबरीस मुसारेमू वगैरे सरदार मुक्काम करून आहेत. बंदेअलीखान हुमणाबादेहून त्याजपाशीं पोहोंचण्याची तजवीज आहे. याप्रमाणें वर्तमान ऐकण्यांत आलें. इतक्यावर कूच मुक्काम कोणीकडे होत हें वर्तमान येईल त्याप्रमाणें विनंति लिहीन. रा॥ छ १९ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१३८] श्री. ३१ आगस्ट १७९१.

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर साहेबज्यादे बेदरांत आहेत. चिंचोली येथील ठाणें पेशजींच कुहिर, तांडूरसुद्धां घेऊन भालकीकडे संगारड्डी वगैरे सरदार बारा हजार जमीयतसुद्धां पाठवून गढी व पेंठ घेतली. महमद इसफ दफेदार पागेवाल्याकडील तेथें होता. तो निघून गेला. गांवांतील प्याद्यांनीं गोळी वाजविली. अलीजाहा यांचे लोकांनीं हल्ला करून शिरले. लूट झाली. तेथून भातांबऱ्यांचें गांव लुटून चिटगोंप्यांत ठाणें घातलें. रयत व जमीदार कितेक धरिले. कांहीं गोसावी व कोमटी हातीं लागले त्यांजपासून खंड घेतला. हुमणा-बादेवर तीन हजार फौज हिंमतखान वगैरे गेले, तेथें बंदेअलीखान यांची त्यांची लढाई होऊन दोनतीनशें माणसें यांचीं व शेंदीडशें बंदेअली-खानाकडील ठार जखमी झालीं. जमीयत फिरून आल्यानंतर सदाशिव-रड्डी पांच सात हजार फौजेसुद्धां हुमणाबादेस जाऊन घेरा घातला.

बंदेअलीखान जमीयतसुद्धां बाहेर निघून लढाई झाली. रड्डीमजकूर यांनीं पेठेपर्यंत कस्त केली. इतक्यांत अलीजाहाबहादूर यांचें पत्र सदाशिवरड्डीस आलें कीं, मुसारेमू वगैरे सरदार जमावसुद्धां संगमाकडे आले, बेदरास येण्याचा इरादा, यास्तव हुमणाबादेचे शहास न गुंततां तुह्मीं पलदर्शनी जमीयतसुद्धां बेदरास येणें. त्यावरून सदाशिवरड्डी जमावसुद्धां बेदराकडे येऊन जमीयत एक जागीं केली. याप्रमाणें वर्तमान आहे. रा छ १९ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१३९] श्री. ३१ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. आसदअलीखान याजकडे पेशजी कडपे तालूका व गुंडमटकल, नारायणपेठ, लोकापल्ली हे महाल होते. नबाब हैदराबादेस आल्यानंतर कडपे तालुक्याची सनद अमीनखान अरब यास दिली. गुंडमटकल वगैरे महाल अमीनानें व्यंकटराव सुरापूरकर यांजकडे सांगितले. खानमजकूर तगीर झाले. दरम्यान अलीजाबहादूर यांचा मझेला उत्पन्न झाल्यानंतर जमीयतीचें प्रयोजन जाणून नबाबांनीं आसदअलीखान याची खातरजमा करून पहिलें फाजील येणें त्याचा जाबसाल एकीकडे ठेवून चार महाल वगैरे घटाळ्याकडील जहागीर आदिकरून तेरा लाखांचा तालुका नवजमीयतीकरितां दिले. मोहरमअखेर जमीयतसुद्धां येण्याचा करार करून खानमजकूर रुखसत होऊन गेले. बेगनपल्ली येथें आहेत. अर्ज्या येतात कीं, गुलामबा जमीयत हजर होता. कडपे तालुक्यांत कबजा त्याजकडीलच आहे. गुंडमटकल वगैरे महालीं व्यंकटराव व त्रिमलराव सनद घेऊन गेले. गुंडमटकलचे किल्ल्यांत आसदअलीखानाचा पुत्र रजाअलीखान जमीयतसुद्धां आहे. त्यास अलीजाहाबहादूर याचें पत्र आलें कीं ठाणें न देणें. त्यानें व्यंकटराव यास गुंडमटकल व उटकर हीं ठाणीं न देतां बळाविलीं आहेत. नारायणपेठ व लोकापल्ली व मदूर तीन ठाणीं व्यंकटराव याचे स्वाधीन झालीं. ते तेथेंच आहेत. रजाअलीखान यास ठाणीं वागुजास्त करावीं

ह्मणून आसदअलीखानाचीं पत्रें येतात. मग जाहीरीचीं किंवा खरें काय असेल तें असो. रजाअलीखान ठाणीं सोडीत नाहींत. त्याचे कुमकेस अलीजाहा याजकडील जमीयतही येणार. याअन्वयें नवाबास व्यंकटरावाच्या अर्ज्या आल्या. मीरइमाम जमीयतसुद्धां बेदरास अलीजाहा याजपाशीं जाऊन भेटला. त्यास हत्ती, घोडा व वस्त्रें दिलीं. मीर इमाम जमीयतसुद्धां रजावळीस येऊन ते व हे एकत्र होणार ह्मणून वर्तमान आहे. रा छ १९ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४०] श्री. ३१ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. तेजसिंग खंदारकर नबाबाकडील पहिला सरदार याचे पुत्र कुंवर विजयसिंग याजकडे कसबे खंदारचा किल्ला व किल्लयाचे व जातीचे सरंजामांत मिळून एक कसबा खंदारचा होता. त्यास खंदारचा किल्ला त्यास बलावून अलीजाहाबहादूर याजकडे पैगाम लागला. दोन हजार जमीयत येऊन खूळ माजविलें. याप्रमाणें नबाबाकडे वर्तमान आलें, व तालुक्यांत तिकडे ठाणींही घालतो, याप्रमाणें वर्तमान आहे. रा छ १९ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४१] श्री. ३१ आगष्ट १७९९.

विनंति विज्ञापना. देगळूर, सारवड, खडक, बाराहळ्ळी, कोंडलवाडी घासीमियाकडील तालुके येथील जप्ती अलीजाहाबहादूर यानीं तिमाराव हरीकडे सांगितली. त्यांजकडील दखल झाल्यावर पागावाले यानीं कोन्हेर हरी तिमाराव यांचा वडील भाऊ यास सनद देऊन नजफअल्ली जमातदारसमागमें दोन तीन हजार जमीयतसुद्धां महालचे बंदोबस्तास रवाना केलें. पागेवालेकडील आमील व जमीयत गेल्याचें वर्तमान अलीजाहा यांस समजल्यानंतर त्यानीं गालबजंग सैफजंगाचा पुत्र यास तीन चार हजार जमीयतसुद्धां देगळूर वगैरेकडे पाठविलें. नजफअल्ली

व कोन्हेर हरी यांशीं व गालफजंगाशीं लढाई होऊन नजफअली मारला गेला. कोन्हेर हरी पळून गेले. जमीयत फरारी झाली. पागेचीं घोडीं व उंट वगैरे सामान सरंजाम गालफजंग याचे हातीं लागलें. याप्रमाणें वर्तमान आलें. रा। छ १५ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४२] श्री. ३१ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. इंग्रजी दोन पलटणें गुंठुराकडून नबाबानीं आणविलीं तीं छ १२ सफरीं हैदराबादेपासून पांच कोसांवर येऊन राहिले. नबाबास अर्जी आली. पलटण उतरावयास जागा मोंगलचे तकियापाशीं शहराबाहेर नेमून दिली. पलटणाचे सरदारांची मुलाजमत छ १४ रोजीं नेमिली आहे. मुलाजमत झाल्यानंतर लिहिण्यांत येईल. रा। छ १५ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४३] श्री. ३१ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. वाळकुंडा, वानवळ, बेमंगल वगैरे जाबीतजंगाबाबद महाल त्रिमलराव सुरापूरकर याजकडे अमीलीनें नबाबाचे सरकारांतून आहेत. मशारनिल्हेकडून व व्यंकटराव देसाई अमीलीचे कामावर तेथें आहेत त्यास वालकुंड्याचा किल्लेदार अलीजाहाबहादूर यांजकडे मिळून किल्ला बळाविला. जमीदार वगैरे त्यास अनुकूल होऊन जमीयत केली. अलीजाहा याजकडूनही कांहीं कुमक त्याजकडे येऊन जमाव झाली. व्यंकटराव याजपाशीं दोन हजार जमीयत झाली. त्यांची यांची लढाई एक होऊन शेंदीडशें माणसें ठार जखमीं झालीं. सरकारांतून कुमक यावी ह्मणून व्यंकटराव नायब याचीं पत्रें त्रिमलराव यास आलीं. त्यानीं आपले अर्जीसमवेत नबाबाकडे पाठविलीं. रा। छ १५ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४४] श्री. ३१ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. रायराया रेणूराव धोंडाजी याजकडे करडखोप तालूका नवाबाकडून जमीयतीचे सरंजामांत होता. तेथें याजकडून आमीलापाशीं पन्नास साठ घोडीं बारगीर व शिबंदी प्यादे होते. पैकीं तीस बारगीर घोडींसुद्धां जमातदार पेशजी अलीजाहा याजकडे जाऊन मिळाला, याची विनंति लिहिण्यांत आलीच आहे. हल्लीं अलीजाहाकडील जमीयत करडखोपास जाऊन जमीदाराचे फितुरानें करडखोप घेतलें. वर्तमान नबाबाकडे व रायाजीस आलें. निळंग, निटूर, हुलसूर, लोहारेंपर्यंत अलीजाहा याजकडील ठाणीं बसलीं. याप्रमाणें वर्तमानें आलीं व येतात. रा छ १५ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४५] श्री. ३१ आगष्ट १७९५.

विनंति विज्ञापना. मुसारेमू वगैरे सरदार कुहिरापलीकडे दोन कोस प्रथम जाऊन राहिले. ते जागा पाणी कमी व तळ वाईट समजोन माघारे दोन कोस चांगले जागा व पाणी पाहून उतरले. हें वर्तमान नवाबाकडे आल्यानंतर पुढें गेले, ते माघारे काय समजोन आले ह्मणून मर्जी बहुत खफा होऊन इनायतनामे रवाना झाले कीं, पत्र पावतांच पुढें ज्या जाग्यावर गेला होता, त्याचे समीप अघाडीस जागा पाणी पाहून उतरणें. याप्रमाणें हुकूम गेला. रा छ १५ माहे सफर. हे विज्ञापना.

छ १८ माहे सफर, मु॥ भागानगर, रवाना टप्यावर.

[१४६] श्री. ३ सप्टेंबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी:—

सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १८ माहे सफरपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. प्रस्तुत इकडील वर्तमान अलाहिदा पुरवणी पत्रांत लिहिलें आहे त्याजवरून ध्यानांत येईल. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

[१४७] श्री. ३ सप्टेंबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. किस्तीचे ऐवजाकरितां सरकारचें पत्र नवाबास आलें तें दिलें. त्याप्रकरणीं बोलणें झालें तेंही पेशजी लिहिलें आहे. अलीजाहा याचे मझेल्यापासून फारकत झाली, यानंतर याचा मार्ग होईल, असें नवाब बोलिले. त्याचें उत्तर मीं दिलें कीं, याविषयीं पुन्हा अर्ज करीन, नंतर हजरत सांगतील तसें लिहून पाठवीन. याप्रमाणें बोलून घरास आलों. पाठीमागें नवाबास बोलिले जें, आह्मीं बोललों हें रावजीचे मनास आलें नाहीं, ह्मणोन पुन्हा अर्ज करीन असें बोलिले, त्यास तुह्मीं जाऊन त्यांस पुसावें. ह्मणोन राजे रेणूरावजी यांस सांगून लागलेंच पाठविलें. रेणूराव नवाबापासून उठोन खालीं आले. खिलवतीचे दिवाणखान्याचे दरवाजेपर्यंत मीं आलों, तों रेणूरावजी पाठीमागून आले. बोलिले जें, हजरतीनीं पुसिलें आहे कीं काय अर्ज करणार आहेत हें पुसून यावें. त्यास सांगितलें जें, उम्यानेंच काय बोलावें, फुरसतीनें गाठ पडल्यास बोलण्यांत येईल. नवाबास अर्ज याप्रमाणें करून मी येईन ह्मणोन बोलोन गेले. मी घरास आलों. त्यानंतर राजश्री रेणूराव व रघोत्तमराव दुसरे दिवशीं माझे येथें आले. बोलणें झालें. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे, त्याजवरून ध्यानास येईल. रा छ १८ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१४८] श्री. ३ सप्टेंबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. राजश्री रेणूराव व रघोत्तमराव उभयता येऊन प्रथम अलीजाहा याचा मजकूर केला कीं, हा मझेला कसा लवकर आटोपेल पहावें, सर्व तालुकियांत ठाणीं बसत चाललीं, इकडे आमदणी तालुकियांतील येणें राहिली, याप्रमाणें आहे. तेव्हां त्यास ह्मटलें, मझेला मातबर खरा, परंतु त्यास पाया नाहीं, नवाबाचा भरोसा लोकांस येईल त्याप्रमाणें त्यांचा भरोसा कोणास येणार नाहीं, रोजीकरितां चार जण जमा झाले, पैका नाहींसा होईल तेव्हां लोक तनहिदी घावयाचे नाहींत.

नवाबाचा भरवसा लोकांस बहुत कीं प्रसंगास पैका देतील, बारे वगैरे जमीयत कदीम तयार मजबूत, त्याजकडील नवनिगादास्त प्याद्याची जमीयत, या जमीयतीपेक्षां दुप्पट असले तरी याचे मुकाबल्यास टिकणार नाहींत, मझेल्याचे मूळ निरसन झालियावर तालुकियाचा बंदोबस्त एके दिवसांत होईल, मसलहतीचे मार्गे अलीज्याहा चर्व पडतील असें दिसत नाहीं, याजवरही ईश्वराची इच्छा काय असेल ती नकळे, दैवाची जात मसलहतीशिवाय आहे. याप्रमाणें बोलणें झालियानंतर बोलिले जे, आपण अर्ज करूं ह्मटलें तें काय, ऐसें हजरतीनीं विचारिलें. तेव्हां त्यास ह्मटलें जे, नवाबानीं सांगितलें त्याप्रमाणें श्रीमंतांस लिहावें हें सलाह नाहीं, हैदराबादेस गेलियावर किस्तीची तजवीज करण्यांत येईल, याप्रमाणें नवाबानीं सांगितल्यावरून श्रीमंताशीं खातरजमेनें बोलून आलों, येथें आलियावर आजपर्यंत टाळाटाळी केली, तेव्हांपासूनच सुरुवात केली असती तर आजपर्यंत किती ओझें हलकें होतें तें न झालें, तहनामाही दिला नाहीं, याजमुळें श्रीमंतांचे मनांत आंदेशा आला, याजवर आतां उमेद ठेवून रिकामा जबाब लिहिणें ठीक नाहीं, आणखी संशयास कारणही लेहोन दाखवितात असें श्रीमंतांचे मनांत येणें हें इतिहादास चांगलें नाहीं, करारमदारांत तफावत दिसण्यांत येईल, कसेंहीकरून करारबमोजीब हप्ता पावता व्हावा, शिवाय कामें आहेत तीं उलगडावीं, दिवसेंदिवस सफाई अमलांत येऊन आपले दौलतीचा बंदोबस्त करावयास कालहरण करणें सलाह नाहीं. तेव्हां बोलिले जे, नवाबाचें ह्मणणें कीं, करारप्रमाणें अमलांत आणावयाचें, परंतु सध्याचे मझेल्यामुळें महालची आमदनी बंद, फौजेस पैका खर्च वरचेवर होत चालला, हा खर्च चालवून तुमची किस्त आदा करावी तर न्याय दाद नाहीं, तुह्मास कांहीं लोपलें नाहीं, सर्व जाहीर आहे, याची शकल तुह्मीच काढून सांगावी. तेव्हां त्यास ह्मटलें, ज्याहीरदारीचा आहवाल आह्मांस दृष्टीस पडतो, परंतु घरांतील वास्तव्य ज्याचें घर त्याचे दृष्टींत असतें, तितकी खबर आह्मास कोठील, हजरतीस सर्व माहीत, तेव्हां तोड हजरत काढतील तर होईल. याप्रमाणें हजरतीस तुह्मीं अर्ज करावा आणि लवकर

नवाबास समजावा ह्मणोन सांगितलें. नंतर उभयतां नवाबाकडे जाऊन सांगितल्याप्रमाणें बोलिले. दोन दिवस निरोप येईल ह्मणोन प्रतीक्षा केली. नंतर रघोत्तमराव यास बोलावून ह्मटलें कीं, दोन दिवस झाले, कांहीं समजलें नाहीं, पुन्हा मांगती हजरतीस आह्माकडून अर्ज करावा आणि लवकर जबाब द्यावे. त्याजवरून मशारनिल्हे नवाबाकडे जाऊन बोलिले. नवाबानीं सांगितलें कीं, त्याच फिकीरींत आहों, मीर अलम यास समाधान नाहीं, त्यास अमळशी फुरसत झालियावर घरची मंडळी बसवून याची तोड काढून तुह्मांस बोलावून बोलण्यांत येईल. त्यास मीर अलम यास समाधान झालियावर सांगावें, ही फुरसत यानीं घातली आहे. दों चहूं दिवसानंतर काय सांगतील त्याप्रमाणें सेवेसी लिहीन. रा। छ १८ सफर. हे विज्ञापना.

---

[१४९] श्री. ३ सप्टेंबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. सरकारचा पैका देणें, जाबसालाचा फैसला करणें, असेंच खचीत यांचे मनांत आहे तर तशीच चाल धरतील. जर मनापासून करावयाचे नाहीं तर कालहरण करून समाधान राखावें असें बोलतील. नादाखालें आपले येथील बंदोबस्त करितील. आह्मांस मधाचें बोट लावून ठेवतील. आजचा प्रसंग पुढें गेला नंतर जाबसालाखालें टाकतील. सारांश जसा प्रसंग तशी वर्तणूक. तहनामेही सफाईचे पाहिजे तसे अद्याप नाहींत. प्रसंग पाहून तऱ्हेतऱ्हेनें पड घेऊन कालहरणाची चाल घालतील. एक जाबसाल लिहिण्यांत येऊन जाबसाल येण्यास थोडातरी एक महिना लागतो. याखालींच दिवस जातील. सरकारचा जाबसाल लांबणीवर पडत जातो. याचा नेम स्वामींनीं काय मनांत आणिला? किंवा जाबसाल बोलतच जावा, यांनीं उत्तरें सांगावीं, तीं लिहीत असावीं, असें करतां करतां जें होईल तें होऊं, असाच बेत आहे कीं काय? याची आज्ञा झाली पाहिजे. कराराचे दिवसांत अंतर आलियावर कालहरण करणें हें सलाह दौलतीस नाहीं. जर मसलहतीनें असेंच ठरलें असल्यास चिंता नाहीं. मर्जीस आलि-

यासी मला आज्ञा व्हावी. आजपर्यंत मी सरकारांत पत्रें पाठविलीं तीं पावलीं ह्मणोन राजश्री गोविंदराव भगवंत यांनीं लिहिलें. परंतु तुह्मी अमकें लिहिलें त्याचें उत्तर या प्रकारचें, याविशीं सरकारचें आज्ञापत्र अद्याप आलें नाहीं. याचें कारणही समजत नाहीं. सरकारचें पत्र कां येत नाहीं याविशीं मी बहुत चिंतेंत असतों. ह्मणोन विनंति लिहिली असे. रा। छ १८ सफर. हे विज्ञापना.

---

[१५०] श्री. ३ सप्टेंबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. मुसारेमू व अजमखान वगैरेस आजपर्यंत पुढें जाण्याची परवानगी नव्हती. सरकारचे पत्राची इंतजारी करीत होते. प्रस्तुत सरकारचे जबाब आले. ते नवाबास दिले. यानंतर अजमखान व मुसारेमू यांस इनायतनामे पाठविले कीं, श्रीमंतांकडील संशय होता, त्यास प्रस्तुत तिकडील पत्रें आलीं, त्यांजवर खातरजमा झाली, याजउपरि तुह्मीं कुच करून पुढें जावें. त्याजवरून ते कुच करून कुहिरावर गेले. तेथून तीन कोसांचें कुच करून एकहल्लीचे रुखानें गेले. छ १७ सत्रावे तेरिखेस एकहल्लीस जाणार. याप्रमाणें वर्तमान आहे. अलीज्याहा याजकडील फौज नमूद होऊं लागली. आठा चहूं दिवसांत मुकाबिला होतो. रा। छ १८ सफर. हे विज्ञापना.

---

[१५१] श्री. ३ सप्टेंबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजी पलटणें दोन येणार होतीं तीं आलीं. छ १६ माहे सफरीं सात तोफा, पन्नास गोरे, पन्नास तुरुब स्वार, शिवाय पलटणचे लोक व दोन सरदार, या सरंजामानिशीं याकुतपुऱ्याचे दरवाज्यानें शहरांत येऊन नवाबाचे हवेलीचे दरवाज्यावर आले. नवाबानीं सांगून पाठविलें कीं, लंगर हौदाजवळ जाऊन उतरावें. त्याजवरून नडव्याचे दरवाज्यानें शहराबाहेर जाऊन लंगर हौदाजवळ उतरले. तुरुब स्वार व गोरे आणि तोफांचे सोलदाद व पलटणाचे लोक तेलंगेसुद्धां दोन हजार आहेत. सात तोफा अकरा पेटारे

याप्रमाणें सरंजाम आहे. पलटणाचे लोक पहिल्यानें होते त्याप्रमाणें हे नाहींत. निरस आहेत. रा। छ १८ सफर. हे विज्ञापना.

---

[१९२] श्री. ३ सप्टेंबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. सिद्दीइमामखान व नूरमहमदखान यांचे घरची जप्ती नवाबानीं केली. यांत आंगावरचे पोषाक व बायकांच्या व त्याच्या इजारा व पेशवान आले ते विकून पैका करावयासी सांगितला. पांचा रुपयांची वस्त सात रुपयांस जबरदस्तीनें विकली. प्रस्तुत अलीजाहा याचे येथील जप्ती केली. बायकावर नगनगोटे होते ते आणविले. दोन-दोन पेशवान मात्र ठेविले. तोषखाना पाहिला. त्यांत साडेसातशें रुपये नगद आणि कांहीं पोषाक होते ते आणवून सांगितलें कीं, माझे समोर आणूं नका, परस्परें विकावे, ऐवज दाखल करावा. याप्रमाणें येथील आचरण चाललें आहे. कांहीं कोणाकडून विपर्यास झाला असा भास पडला ह्मणजे सरदार मुत्सद्दी सर्वांस शिव्यागाळी मनस्वी द्याव्या ऐसें झालें आहे. दौलतदार यास योग्य नाहीं तो धर्म होत चालला हें विपरीत आहे. रा। छ १८ सफर. हे विज्ञापना.

छ २३ सफर मु॥ भागानगर
मंगळवार रवाना टप्यावर.

[१९३] श्री. ८ सप्टेंबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचें सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ता। छ २३ माहे सफरपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजीं पत्राची रवानगी टप्यावर केली, त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमान नवाबाकडे गेलेलें इत्यादिक विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिली आहे. अवलोकनें ध्यानांत येईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१५४] श्री. ८ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. इंग्रजाकडील दोन पलटणें व सरदार आले. त्यांचे मुलाजमतीचा निश्चय ठरून छ २१ रोज रविवारीं त्यास इस्तकहाल राजाजी व मीरअलम यांचे पुतण्यास पाठविलें. शहराबाहेर पलटणाचे सरदार राहिले. त्यांजकडे राजाजी जात असतां शहरचे दरवानकरी यानीं राजाजीस मनाई केली कीं, नवाबाची परवानगी आल्याशिवाय जाऊं नये. तेव्हां राजाजी माघारे येऊन रुसून घटकाभर बैसले. नवाबास समजल्यानंतर त्यांनीं राजाजीचे सांतवनास फौजदारखान यास पाठविलें. परवानगीस बराबर देऊन राजाजीस इस्तकहाल पाठविलें. इंग्रजी सरदार येणार ह्मणून नवाबानीं दरबार केला. बरामद झाले. रावरंभा व मामुली लोक हजर होते. दीडप्रहर पावेतों निषस्त राहिली. परंतु इंग्रजी सरदारास येण्यास उशीर लागला. नवाबानीं दरबार बरखास करून रावरंभा वगैरेस वाटे लाविलें. महालांत गेले. इतक्यांत इंग्रजी सरदार व कीरकपात्रिक वकील राजाजी सहित सर्व आले. मागती नवाब बारामद होऊन इंग्रजी सहा सरदार यांची मुलाजमत झाली. दोन घटिकांपर्यंत कीरकपात्रिक यासीं बोलणें जालें. इंग्रजी सरदारां पैकीं मुख्य यास जिगा व सरपेच, वरकड पांच इसम यांस असामीवार शीरपेच पानदान देऊन वाटे लाविलें. बरखास झाली. रा। छ २३ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१५५] श्री. ८ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. छ २२ रोज सोमवारीं नवाबाकडे दिवसां दरबारास गेलों. मीरअलम व राजाजी होते. नवाब बरामद होऊन सलाम झाला. इतक्यांत मुसारेमू व अजमखान व घासीमिया यांजकडील पत्रें आलीं तीं नवाबानीं वाचून पाहून आह्मांपाशीं दिलीं. त्या पत्रांत मजकूर. छ १९ सफर शुक्रवारीं बंदेअलीखान हजार स्वार व पांचशे रोहिले सदरहू जमीयतसुद्धां हुमणाबादेहून आले. ते आह्मांपाशीं षामील झाले. बेदरापासून तीन कोसावर मौजे राजापूर

ह्मणून गांव तेथें आमचा मुक्काम. छ २० रोज शनवारीं अलीज्याहाबाहद्दूर यांजकडील फौजेशीं व आह्मांसी मुकाबिला झाला. अलीज्याहा जातीनें बाहेरचे किल्ल्यांत आहेत. त्यांजकडील सरदार व जमीयत वासलगंजाचे अलीकडे दीड पावणेदोन कोस वाढून आली. त्याचे फौजेसी व आह्मासी तोफेच्या गोळ्याबराबर तफावत राहिली. तेसमयीं आह्मी सर्व सरदार मयेजमीयत मुकाबिल्यास सिद्ध होऊन प्रथम तरवारेची लढाई झाली. त्यांत शेंपन्नास माणसें तिकडील ठार जखमी व इकडीलही सदरहू अन्वयें झाली. मुसारेमूकडील तोफांचे गोळ्याची शुरवात झाली. याप्रमाणें होऊन अलीज्याहा याजकडील फौज पुढें वाढून आली ते जिग्यावर गेली. आह्मी आपली जागा कायम केली. याप्रमाणें एक लढाईचें वर्तमान. पुढें होईल त्याचा अर्ज लिहिण्यांत येईल. याअन्वयें पत्रांत मजकूर होता. रा छ २३ माहे सफर. हे विज्ञापना.

---

[१९६] श्री. ८ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. छ २२ रोज सोमवारीं नवाबाकडे दरबारास गेलों. सरकारी किस्तीचा ऐवज वगैरे बोलण्यांत आणिले. याजवर तीनचार घटका बोलणें झालें. सारांश किस्तीशिवाय वरकड जाबसाल तालुक्याचे भरतीस माविजा मामलतप्रकरणीं वगैरे राजाजी व मीरअलम व तुह्मीं ऐसें बसून निश्चय ठरवावा, नंतर किस्तीचा पर्याय ल्याहावा, ऐसें नवाब बोलिले. त्यास उदईक मीरअलम व राजाजी व आह्मी मिळोन नवाबाचे येथें जलसा होणार त्याचा तपशील, व किस्तीचा पर्याय यानीं काढिला आहे त्याचा विस्तार, मागाहून विनंति लिहितों. तोंपर्यंत किस्तीपैकीं ऐवज सध्यां मिळावयाचें चिन्ह दिसत नाहीं. पोकळ गोष्टी आहेत. नाद लावून दिवस गतीवर टाकून सांप्रत घरचा बंदोबस्त पहावा तसे करावे, यास्तव मोहजाळें दोस्ती व ममतेचें घालून पैका न देतां दिवस ढकलावें, असें ध्यान आहे. उद्याच्या जलसासुद्धां सर्व तपशील मागाहून लिहितों. आजच्या बैठकींतील निर्गलितार्थ भाव थोड-

क्यांत ध्यानांत यावा यास्तव सरासरी विनंति लिहिली. रा। छ २३ सफर. हे विज्ञापना.

---

[१९७] श्री. ८ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. छ १८ माहे सफर गुरुवारीं रात्रीं नवाबानीं दरबारास यावें ह्मणून आह्मांस बोलाविल्यावरून जाण्यास सिद्ध झालों. इतक्यांत नवाबाकडून चोबदार आला कीं, आज मीरअलम येणार होते, तुह्मासही बोलाविलें, परंतु मीर अलम यांची तबियत कसलमंद, येण्याची ताकद नाहीं, सबब त्यांचें राहणें झालें, तुह्मीही येणें आज मवकूफ करावें. याप्रमाणें निरोप आल्यावरून ते दिवशीं दरबारास गेलों नाहीं. छ १९ शुक्रवार व छ २० शनिवार दोन दिवस मरिअलम याची तबियत मांदीच होती. यास्तव जाणें झालें नाहीं. छ २१ रोज रविवारीं इंग्रजी पलटणाचे सरदार यांची मुलाजमत झाली. तो दिवस त्याखालीं गेला. छ २२ रोज सोमवारीं दिवसा अवलवक्तीं दरबारास यावें, मीरअलमही येतात, ह्मणोन सूचना छ २१ रोजीं रात्रीं आल्यावरून, सोमवारीं दीड प्रहर दिवसा नवाबाकडे गेलों. याचा तपशील अलाहिदा पुरवणीवरून ध्यानांत येईल. रा। छ २३ माहे सफर. हे विज्ञापना.

रा। छ २८ माहे सफर मु॥ भागानगर,
रवाना टप्यावर

[१९८] श्री. १३ सप्टेंबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी :—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ता। छ २८ माहे सफरपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजीं पत्राची रवानगी डाकेवर केली त्यावरून ध्यानास

आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१५९] श्री. १३ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. छ २२ सफरीं नवाबाकडे गेलों. तेसमयीं मामलत प्रकरणीं जाबसाल व सनदेपैकीं हरदापूर वगैरेचे भरतीस तालुका लागणें इत्यादिक जाबसाल ठरणें ते मीरअलम व राजाजी यांनीं आह्मीं नवाबाचे दिवाणखान्यांत उदईक बसोन जलसा व्हावा याप्रमाणें ठरलें. त्याची विनंति लिहिण्यांत आली. त्यास मीरअलम दरबाराहून आपले मकानास गेले, तों हिंवज्वर त्यास येऊन दोन तीन दिवस त्यांची प्रकृति असमाधान. त्यांत छ २६ रोजीं माझेही प्रकृतीस स्वस्थ नाहीं. याजमुळें तीन चार दिवस प्रकृतीमुळें त्यांचें येणें न झालें व मीही गेलों नाहीं. इतक्यावर मीरअलम यास स्वस्थ होऊन दरबारास आले. व मलाही स्वस्थ थोडेसें होतांच जाऊन जलशांत जें ठरेल त्याची विनंति लिहिण्यांत येईल. रा छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६०] श्री. १३ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. किस्तीचे ऐवजप्रकरणीं नवाबासी छ २२ रोजीं बोलण्यांत आलें. त्याचा सरासरी मजकूर लिहून मागाहून तपशिलें लिहितों ऐशी विनंति यापूर्वीं लिहिण्यांत आली. त्यास किस्तीचा मजकूर आज्ञेअन्वयें नवाबासी बोलण्यांत आल्यानंतर उत्तर झालें कीं, करारमदार ठरण्यांत आले, त्यांत आह्माकडून तफावत नाहीं, किस्त आदा करण्याची तजवीज हमराही जमीयत बरतर्फ करून मार्गांतच कितेकांस रुखसत केले. हैदराबादेस येण्याचे पूर्वींच इंग्रजी पलटणें दूर करून मार्गस्थ केलीं. सबब कीं, जमीयतीचा खर्च तुटला. आणि तालुक्यां-

तील तहशील जमा करून किस्तीचे ऐवजाची सरबराई करावी, या तरतुदींत; तों एंकबएक घरांतील फिसाद उभा राहिला. येणेंकरून तालुक्यांची तमाम ताख्त व ताराजी होऊन कोठील पैसा या दिवसांत मवसर नाहीं आणि जमीयत जमा करणें लाजम पडले. याचा खर्च व खिसा रोजबरोज ज्यारी. या बखेड्यामुळें जे तजवीज योजिली होती त्याचा प्रकार बिलफैल या तऱ्हेवर गुजरला. राव पंतप्रधान यांसी घरोब्याचा प्रकार पोषिदा नाहीं. यास्तव तर्फैन मुलाकातीचा इत्यफाक ठरण्यांत यावा, ह्मणजे सर्व गोष्टींचा खुलासा परस्परें होऊन अमलांत यईल. याजवर आह्मीं उत्तर केलें कीं, दोन्ही दौलती एक, जुदाई रतीबराबर नाहीं, हे एकीन व बज्या, त्यापक्षीं मुलाकातही होण्यास काय पसोपेश आहे, याचाही निश्चय तर्फैनचे सलाहाप्रमाणें ठरेल; लेकिन किस्त आदा करणें वगैरे जाबसाल हे अमलांत येऊन, बाद हरदो सरकारचे मुलाकातीचा इत्यफाक व खुलाशाचीं बोलणीं घडावीं हें चांगलें. याजवर नवाब बोलिले कीं, किस्त आदा होणें याची शकल ज्यांत इकडून निभावणी होऊंसके आणि राव पंतप्रधान यांस ऐवज पोहचे अशी ठरण्यांत आली पाहिजे. आह्मीं उत्तर केलें कीं, किस्तीची शकल ठरावी ऐसे मोहगम हजरत ह्मणतात यांत काय समजावें, या तऱ्हेनें शकल ठरली असतां अमलांत येते याप्रमाणें खुलाशानें सांगितल्यावांचून समजण्यांत कसें येईल? याजवर नवाब बोलिले कीं याची शकल ठरणें ते राव पंतप्रधान यांजकडेच आहे, ते ठरावितील तसें. हें बोलणें किस्तीप्रकरणीं झाल्यानंतर मी विचारिलें कीं, वरकड मामलतसंबंधें वगैरे जाबसाल याजविषयीं कांहीं असेंच आहे किंवा याचे कडचे होऊन एक किस्तीचाच सवालजबाब ठरण्यावर. याचें उत्तर झालें कीं, वरकड जाबसाल तुह्मीं व मीरअलम, राजाजी ऐसे बसोन ठरवावे, किस्तीप्रकरणीं निभाव पडे अशी तजवीज ठरली पाहिजे. येविषयीं मोहगम तुह्मीं ल्याहावें ऐसें बोलिले आहेत. त्यास मीरअलम राजाजीसुद्धां जलसा होणार त्यांत कोणते जाबसाल कसे ठरतात व किस्तीचीही शकल काय तऱ्हेनें ठरावून ल्याहावयास सांगतात हें सरकारचे थैलीप-

त्याचा जवाब रवाना करण्यास देतेसमयीं सांगतील त्याप्रमाणें तपशीलें विनंति लिहीन. परंतु एखादें दुसरें साल किस्तीस अधिक ठरावून करावें असाही भाव दिसत नाहीं. रा छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६१] श्री. १३ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. ऐवजाचे किस्तीस एखादें दुसरें साल अधिक ठरण्यांत येऊन करावें हें कांहीं बोलण्यांत न आणितां मोहगम निभावणी ज्यांत होय असें तिकडूनच ठरावें, या बोलण्यांतील तात्पर्य दिसण्यांत येतें कीं, एखादें दुसरें साल बोलल्यांत तेंच ठरतें. यास्तव तिकडेच टाकिलें असतां तेथून शकल ठरली येईल ते पोटीं देऊन त्याजवर अधिक साल लांबणीचें बोलणें व रदबदल पाळावी व दिवसही ढकलीत जावें, असा प्रकार दिसण्यांत येतो. छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६२] श्री. १३ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याहबहादूर यांजकडील फौजेशीं व मुसारेमू वगैरे सरदार नवाबाकडील यांशीं लढाई छ २० सफर शनिवारीं जाली. याचीं पत्रें नवाबाकडे आह्मीं समीप असतां आलीं. याचा मजकूर पेशजी विनंति लिहिल्यावरून ध्यानांत आला असेल. मुसारेमू वगैरे सरदार जमीयतसुद्धां मौजे चिटे पो बेदर या गांवानजीक बेदरापासून दोन कोसांवर आहेत. अलीकडे लढाई झाल्याचें वर्तमान तहकीक आलें नाहीं. सदाशिवरड्डी यास पांच सात दिवस समाधान शरीरीं नव्हतें. सांप्रत बरा झाला ह्मणून वर्तमान आहे. लढाईची खबर आली ह्मणजे लिहिण्यांत यईल. अलीज्याहा यांजकडील ठाणीं भालकी, हुलसूर, निळंगे येथें पहिलीं बसलीं. गुंजोटीसही ठाणें बसोन आलंद येथें फौज गढीशीं लढत आहे. मौजे शिरसी हा गांव गुंजोटीचा लुटून तारूततोराज केला. लोहारे तालुक्यांतील गांव व सास्तु येथें ठाणीं घालून लूट केली. लव्हरे येथें फौज गेली. परंतु ठाणें अद्याप दाखल झालें नाहीं. याप्रमाणें वर्तमानें आलीं. रा छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६३] श्री. १३ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. कोणाराव जमीदार, एलगंदल सरकारचा, याचा जावसाल लष्करजंगाचे मार्फत नवाबासीं किंटनूरचा कौल आल्यास येतो. त्यावरून जमीदारास कौल पाठविला. कोणाराव निघोन येथें हैदराबादेस आला. त्यास इस्तकहाल राजाजीचे भाऊ आपाराव यास पाठविलें होतें. त्याजला जमीदार मजकूर यांनीं वस्त्रें, शिरपेंच व घोडा जियाफत केली. छ २३ रोज मंगळवारीं जमीदार याची मुलाजमत अठ्ठावीस इसमांची नजर झाली. कोणाराव यास मोत्याची कंठी व समागमें नऊ इसमें यांस शालफर्द दिले. जमीदार मजकूर तूर्त येथें आहे. रा॥ छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६४] श्री. १३ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. चंदा कंचनीच्या घरीं चौकी छ २६ सफर गुरुवारीं बसली. याचें कारण चंदाचें पत्र मोहोरेनशीं नाजमन्मुलूक याचे नांवाचें बेदराकडे कोणी घोड्यावर स्वार होऊन जात असतां घोड्याचे खोगरांतून लाखोटा चौकीच्या माणसांनीं धरून नवाबापाशीं आणिला. पत्र वाचून पाहिल्यानंतर हुकूम झाला जे, चंदास धरून आणावें, घरीं चौकी पाठवणें. त्याप्रमाणें चौकीस पहारे व तारासाहेब गुंफरजंगाचे पुलाकडील रिसाल्याचे लोक बसले. चंदा घरीं नव्हती. मीरअलम याचे हवेलीस राहिली. तिच्या पोरी व चीजवस्त जप्त झाली. माणसें धरून आणिलीं. एक दोघांस मारहाण केली. घरावर तोडा झाला. राव रंभा दरबारास आले. ते दोन घटका रातपावेतों नवाबाचे हवेलींतच होते. त्यानंतर आपले बिऱ्हाडास गेले. नाजमन्मुलूक यांस पत्र लिहिलें तें धरलें. त्यांत मजकूर कीं, तुह्मीं पेशजी जिन्नस पाठविला तो पोहोंचला. याउपर जिन्नस पाठवूं नये. सबब कीं, हल्लीं कोतवाल पाहिला तगीर होऊन दुसरा झाला. याअन्वयें मजकूर होता. याची चौकशी, पहिला कोतवाल यास पुरशीस केली. त्याचें ह्मणणें, मला कांहीं ठाऊक नाहीं. चंदाचें ह्मणणें, हे मोहोर

माझी नाहीं, खोटी मोहोर. त्यावरून मीरअलम यानीं मोहोरेचे सनाचीही चौकशी केली व करितात. चंदाचे घरची मालियत याची मोजदाद झाली. चार लक्ष रुपये पाठविले. अजमास झाला आहे. चौकी आहे तशी आहे. पुढें निर्णय काय ठरेल पहावें. चंदाची बहिणी महताब ईचे घरीं चौकी बसली. ते रदबदल होऊन सुटली. रा छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६५] श्री. १३ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. साहुकार चार कमानवाले व करवानवाले यांस रोषनराव यांचे मार्फात हुकूम जाला जेः—सरकारांतून चाळीस लक्ष रुपयांचे होन टिपूकडील बाहदुरी वगैरे दर पावणे चार हाप्रो व आद-वानीचे होन साडेतीनप्रो खरेदी करून नगद ऐवज ज्यास देवण्यांत येईल त्यास देत जाणें; त्यास, हल्लीं बाजारांत होनाचा भाव टिपुशाई दर तीन रुपये नऊ आणे साडे तीन प्रो, त्यास तोटा दर होनीं तीन आणे चार आणेप्रो बसतो, व आद्वानीचे होनाचा निरख तीन रुपये प्रो असतां साडेतीन भावानें दिल्हे. सबब दर होनीं आठ आणे रोज नुकसान. साहुकारांनीं दोन तीन तट खाल्ला. परंतु मान्य जालें नाहीं. सदरहूप्रो होनाचा भाव ज्यारी करणें येविशीं आज्ञा. त्याव-रून कबूल केलें. चाळीस लाखांची तफरीफ इसमनवेसिवार करून होन देविले. रा छ २८ सफर. हे विज्ञापना.

---

[१६६] श्री. १३ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. अजमखान व घासीमिया यांचे लष्करांत आपाजी कोंडाजी यास पा आहे, तेथील लष्करचें वर्तमान पैहम तिकडे खाना करीत जाणें, याप्रो मारनिलेस सांगितलें. त्यास त्यांचीं पत्रें राजश्री गोविंदराव भगवंत यांजकडे येत जातील, विनंति करतील, त्यांवरून ध्यानास येईल. रा छ २८ सफर. हे विज्ञापना.

छ ८ रावल मु॥ भागानगर, डांकेवर.

[१६७] श्री. २२ सप्टेंबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सा॥ नमस्कार विनंति विज्ञापना ता॥ छ ८ माहे रावलपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजीपत्राची रवानगी डांकेवर केली त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लि॥ आहे. अवलोकनानें ध्यानास येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

[१६८] श्री. २२ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. सरकारचें खरीतापत्र नवाबास व मला आज्ञापत्र छ २४ सफरीं रा॥ जालें तें छ ३ रावलीं पावलें. माझे प्रकृतीस दोन तीन दिवस स्वस्थ नवतें. यास्तव नबाबाकडे जाणें जालें नाहीं. आतां प्रकृति कांहीं स्वस्थ आहे. उदईक नबाबाकडे जाऊन सरकारचें थैलीपत्र प्रविष्ट करितों. मागाहून विनंति लिहिण्यांत येईल. रा॥ छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१६९] श्री. २२ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. अलिजाहबहादूर सदाशिवरड्डी जमीयतसहित बेदर येथें आहेत. दोन कोसांवर मुसारेमू, घासीमिया, व अजमखान, इसामिया नबाबाकडील सरदार फौजेसमेवत उतरले त्या स्थळीं आहेत. छ २० सफरीं लढाई झाली तितकी. त्या अलीकडे लढाई नाहीं. अलीज्याह व सदाशिवरड्डी व नाजमन्मुलूक यांजकडून तिघे गृहस्थ मुसारेमू व पागावाले वगैरेकडे जाबसालास आले होते. त्यांचें यांचें बोलणें होऊन मुसामार वगैरेनीं अर्ज्या नबाबास त्यांजकडील गृहस्थाचे बोलण्याअन्वयें लिहिल्या. येथून त्यांचे जबाब इनायतनामे नबाबाकडून

रा जाले त्यांत काय प्रकारें लिहिलें हें अद्याप समजण्यांत आलें नाहीं. खचित समजल्यावर विनंति लिहीन. गालबजंग व रुकमारडी वगैरे अलिज्याहाकडील सरदार संगारडीसुद्धां बाहेर तालुक्याचे ठाणीं दखला सज्याबज्या गेले होते ते जमीयतसुद्धां अलीज्याहा यांजकडे आले ह्मणून वर्तमान आहे. आसदअल्लीखान याची अर्जी नबाबास आली होती कीं गुलाम जमीयतसुद्धां हुजूर बार्याब होतो. जबाब गेला कीं तुह्मी आपले जमीयतीनशीं मुसारेमूपाशीं षामील व्हावें. याजवर होईल वर्तमान तें लिहिण्यांत येईल. रा छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७०] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विनंति विज्ञापना. टिपूकडून सखारामपंत नामें गृहस्थ येथें हैदराबादेस आला आहे. त्यानें राजाजी यांची भेट घेऊन त्यांजला टिपूचें पत्र होतें तें दिल्हें. राजाजीनीं बाहेर बागांत राहवयास जागा दिल्ही. तेथें राहिला आहे. हें वर्तमान समजल्यावरून सहजांत राजाजीस विचारिलें. त्यांनीं सांगितलें कीं, टिपूकडून गृहस्थ आला हें खरें, मजला पत्र दोस्तीचें मरादबाचें आहे, हजूरची भेट नाहीं, गृहस्थ येथेंच आहे. ह्मणून राजाजीचे बोलण्यांत आलें. रा छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७१] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विनंति विज्ञापना. मिस्तर ईष्टवर इंग्रजांकडील किरकपाट्रिक वकील यांजपाशीं होता. पेशजी किनवीचेही हमराह होता. त्याचे शरीरीं दोन अडीच महिने स्वस्थ नवतें. सांप्रत त्याचा काळ झाला. रा छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७२] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विनंति विज्ञापना. पा हवेली परंडा पो एक लक्ष आडुसष्ट हजारांचा तालुका नबाबांनीं सरकारांत दिल्हा. व मशारुत आहपाम किल्लेदाराकडे अठ्ठावन हजारांचा, त्यास या हल्लीं जमीदारीचे वहिवाटीनें एकंदर बेरजेंत

तनखा कमी. याजकरितां सरकारचे कामदार व किल्लेदार यांची कटकट पडली. येविशीं नबाबाचा इनायतनामा किल्लेदारास यावा ह्मणून राजश्री गोविंदराव भगवंत यांचें पत्र आलें. त्यावरून नबाबाशीं बोलून एकंदर परंडे हवेलीचे झाड्याची याद यांचे दफ्तरचे रुईनें घेऊन व ता। गोविंद-राव यांस लिहिलेले विनंति करतील, त्यावरून ध्यानांत येईल. रा। छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७३] श्री. २२ सप्टेंबर १७९५.

विनंति विज्ञापना. होनगुंद्यापैकीं गांव कयामन्मुलूक यांनीं दाबलें तें सरकारांत सोडावें व मुदगलबाबद स्वराज्याचा ऐवज राहिल्यापासोन फडच्या करावा हें बोलणें आमचें नबाबाशीं होत आहे. सांप्रत तुमसंमत दरोबस्त सत्तावीस गांवांत सरकारची जफ्ती आली. कामदारांनीं ठाणीं घेतलीं. उपसर्गाचा बोभाट आल्यावरून कयामन्मुलूक यांचें ह्मणणें, तुमसंमत होणगुंद्याची नाहीं, मुदगलपैकीं. याची तकरार पेशजीही पडली होती. तेसमयीं श्रीमंतांचे सरकारची सनद जमीदाराचे नांवें आहे, व जमीदारापासोनही मुचलका घेतला त्याच्या नकला यांनीं दिल्ह्या. त्यासहित ता। राजश्री गोविंदराव भगवंत यांस लिहिलें आहे. विनंति करतील. त्यावरून ध्यानास येईल. उत्तराविषयीं आज्ञा झाली पाहिजे, व सरकारचा ऐवज मुदगलबाबद कोण सालापासून काय राहिला याचेही यादरवानगीस आज्ञा जाली पाहिजे. रा। छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७४] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजी पलटणाचा सरदार नबाबाचे भेटीस आला तेदिवशीं किरकपाट्रिकही होता. नबाबानीं बोलतां बोलतां त्याशीं मार केला कीं, राव पंतप्रधान यांचा आह्मांस मोठा उपद्रव; व एक वेळ यांस तदारुक चांगले प्रकारें दिल्हा पाहिजे, त्यास तुह्मी दोस्त आमचे असतां आमचा मनोदय सिद्धीस न जावा कीं काय? याचें

उत्तर किरकपाट्रिक यानें लपेटवा दिल्हें कीं, याचा जबाब कंपनीचे आज्ञेशिवाय देतां येत नाहीं. याजवर मीरअलम नबाबाशीं बोलिले जे, मीं हजरतीचे आज्ञेप्रमाणें यांशीं बोलून अर्ज करीन, आतांच हा मजकूर रूबरू छडूं नये. मग नबाब उगेच राहिले. रा छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७५] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. इंग्रजांशीं हे बोलतात. त्यांजकडून जबाब प्राफ होतो. तसाच साफ जबाब नबाबास सांगावा तर मर्जी ठीक राहणार नाहीं. याजकरितां मीरअलम नबाबास समजावितात कीं, दोन महिने दम धरावा, फराशीसाची मसलहत त्याजवर भारी आहे. याजउत्तरीं त्यांशीं लौकरच इंग्रज सलूख करणार. या कार्यापासोन ते निर्वेध जाल्यावर हरएकप्रकारें त्यांस वळवून हजरतीचे कार्यावर आणतों. याप्रों घातुपोषणाच्या गोष्टी सांगून नाद लावून ठेविला आहे. रा छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७६] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विनंति विज्ञापना. वास्तव्य नबाबाचे मनांत पैका आणि मुलुक घेतला याचें दुःख आहे. मामलतीचा पैका वाजवी असेल तो घ्यावा. बाकी सारें माघारें घ्यावें. नंतर तहनामा करावा तो पक्का. करारमदार क्रियेंत अंतर कोणाकडून? सरकारचें बोलणें वाजवी असतां इमान प्रमाण सोडून विपरीत चाल धरली, त्याचें फळ जालें. हें लोभामुळें मनांतच येईना. कोणीही असो. अति लोभावर दृष्टि दिल्यावर तेथें प्रामाणिकता राहत नाहीं. दौलत करितात ते निर्लोभ असत नाहींत. परंतु त्यासही मार्ग आहेत. या मार्गानें केलें असतां अर्थप्राप्ति आणि सुख व प्रामाणिकता आणि यशप्राप्ति आहे. या चाली एका लोभामुळें येथें नाहींत. तेव्हां कातूपणा करावा ही असल चाल ठरली. हैदराबादेस येऊन पावल्यावर डोळे फिरले. तहनामा साफ करून घ्यावयाचें मानस नाहीं. भेट

होऊन खुलासा जाल्यावर साफ तहनामा करावयास येईल. किस्त देण्याविशीं बाहना. याशिवाय जाबसाल होणें. त्याविशीं ताकीद केली, करून देऊं, याप्रकारचें बोलणें. भोसले यांजकडील जाबसालास तर ठिकाणच नाहीं. हें पूर्वी बोलणें. नंतर मीरअलम यांचें बोलणें असें पडलें कीं, कदारमदाराप्रमाणें करावयाचें मानस नसलियास आज सख्त कां बोलावें; नरम बोलून दिवस ढकलावे, आपली मजबुती पाहून करावयाचें तसें करावें. त्यानंतर पुत्र बाहर गेले. घरचाच विचार पडला. सरकारचें पत्र किस्तीकरितां आलें तें दिलें. कराराप्रमाणें अमलांत आलें नाहीं, याजमुळें श्रीमंतांचे मनांत आंदेषा आहे, ऐसें बोलिल्यावर, प्रसंग विलक्षण समजून नरम गोष्टी बोलून, मागील पुढील गोष्टी काढून, ममता आणि सालसपणाचें बोलणें बोलून, पूर्वींचे बोलण्याचे परिहार करावयाशीं लागले. आतां दोस्तीचे आळ्यांत आह्मांस निभावून घ्यावयाजोगी शकल श्रीमंतांनींच काढावी ह्मणून गळीं पडून बोलतात. आपले घरचा बंदोबस्त होय तोंपर्यंत अशा तऱ्हेनें कालहरण करतील. स्वस्थता जालियावर आणखींच कांहीं दिक्कती निघूं लागतील. वास्तव्य पाहतां चालवणूक आहे. अवसर पाहत आहेत. हा खमीद आहे. नवाबानीं करारमदार सोडून टाकाऊ चाल धरली, त्याचा फळादेशही खड्यांवर जाला. सर्व दौलत गारत करावी, निर्मूळ करावें, असा समय स्वामींचे हातांत आला असतां, यांचे कुमार्गावर दृष्ट न देऊन थोरपणास उचित तें स्वामींनीं करून दौलत नबाबाची जाती समेत वांचून मोकळीक केली. हा उपकार नबाबानीं मानावा हें योग्य. परंतु कालदशा विचित्र! यामुळें आपले दोषाचें फळ आपल्यास जालें हें मनांत न येऊन दुःख मानून आहेत. त्यास जशी ज्याची चाल तसें त्याशीं असावें. जसा समय पहातील तसें करतील यांत संदेह नाहीं. आजचा समय समेटाचा आहे समजोन, पाहिजे तसा समेटही कदाचित् करतील. प्रथम गोड बोलून जितकें लांबणीवर पडेल तितकें करतील. भारी नेट पाहिल्यावर आणशपथ करून जशी खातरजमा पाहिजे तशी करतील. परंतु समयावर लक्ष ठेवितील. त्यास सर्व काळ दिवस

सारखे नाहीं. कोणते वेळेस कसा समय येईल हें समजत नाहीं. आज उपेक्षा करून लांबणीवर टाकिल्यास ठीक नाहीं. नबाब करार करतील. त्यास, समय पाहून कातूपणा न करीत अशा प्रकारचें दडपण यांजवर करून ठेवावें. याचा समय हाच आहे. याची वाताहत जालियावर पुन्हा असा समय यावयाचा नाहीं. स्वामीस ह्मणतील, बदमामली केलियाशी बदला करावयास काय उशीर आहे? हें प्रमाण. परंतु त्या समयीं कांहीं वेध नसावा. कदाचित् निर्वेध असला तरी आतां जेवढ्या उद्योगांत कार्य होईल त्याचे चौपट पुढें करावा लागेल. मग काय होईल पहावें. प्रस्तुतकाळीं विशेषात्कारें मसलहतीचा वेध नाहीं. इंग्रज आपले वेधांत गुंतले, याजमुळें दुसरीकडे कान ऐकण्यासही देत नाहींत. नबाबाचे घरांतील मझलेयाची समजूत पाडून देऊन, कलह तोडून, दोन्हीकडील स्वस्थता करून देऊन, नबाबाचे दौलतीचा बखेडा मोडून, सरकारचीं कामें करून घ्यावीं. याचे पोटांत तऱ्हेतऱ्हेनें प्रकार आहेत. केल्यास होतील. दौलतीचे स्नेह केवळ सालसपणानें चालत नाहींत. दाब आणि मजबुती राखून करावे तरच स्नेह राखणार राखितात. असें आहे. कदाचित् गोड बोलण्यावर स्वामींनीं ढील देऊन उपेक्षा केलियास या वेळेचे साहित्याचें स्मरण पुढें होईल. फलाणें वेळेस अमकें केलें असतें तर बरें होतें. याजकरितां विनंति. याचे पर्याय सर्व मनन होऊन निश्चय मसलहतीस येईल तसा. माझे लिहिणें हें एकपक्षीं बेमसलहत करावें असें नाहीं. येथील वास्तव्य कचें मनांत यावें, याजवर दौलतीस योग्य तें घडावें, ह्मणोन ता। लिहिला आहे. आणखीं विस्तार याच प्रकरणीं बहुत आहे. परंतु तितका तपशील उघड लिहिणें या समयीं ठीक नाहीं. ह्मणोन सर्व भाव यांत आणले आहेत. पशेर्जी विस्तारें पत्रें पाठविलीं त्यांतही सर्व संकेत आहेत. जसा घांट उतरावयाचा तशी आज्ञा येत जावी. त्याप्रो चालेन. रा। छ ८ रावल. हे विज्ञापना.

---

[१७७] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विनंति विज्ञापना——इसामिया बेदराकडून लष्करांतून येथें छ ६ रोजीं आला. एक वर्तमान ऐकण्यांत कीं अलीजाह यांजकडील गालबजंग वगैरे सरदार जमीयत सर्व एकत्र होऊन शनवारीं लढाई मुसारेमू वगैरे यांशीं जाली. मुसामाा कोस आर्ध कोस हटले. यास्तव इसामिया हजूर अर्ज करावयास आले ऐसें वर्तमान. परंतु खचीत नाहीं. तहकीक समजल्यावर विनंति लिहिण्यांत येईल. दुसरें, मुसारेमू व पागावाले हे सरदार नबाबाकडील यांत कोणांतकोणी मिळत नाहीं. वतन चित्तापासोन देत नाहींत. इत्यादि त्यांचे गिले सांगावयास इसामिया आले. ऐशी वार्ता आहे. छ ७ रोजीं दिवसा दरबार झाला. इसामियाशीं खिलबत जालें. फरासखान्याचे दारोग्यास हुकूम जाला जे, गोलकुंड्यांतून खेम वगैरे फरासखाना काढून डेरे द्यावे. नबाब निघणार. छ १४ तारखेस डेरे दाखल व्हावे, अशी बोलवा आहे. मागाहून ठरेल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल. राा छ ८ राावल. हे विज्ञापना.

---

[१७८] श्री. २२ सप्टंबर १७९५.

विनंति विज्ञापना. मुसारेमू वगैरे सरदार बेदरानजीक आहेत. सांप्रत इंग्रजी दोन फलटणें गुंटुराकडून आलीं. तीं एका दोहों दिवसांयेथून तिकडे रवाना होणार. नफरुद्दौलास, यांसही राा करावयाचा बेत आहे. राजाजीकडील स्वार पयेदळ यांचीही रवानगी होणार. नबाब जातीनें निघण्याचा नेम होत आहे. मागाहून सविस्तर विनंति लिहिण्यांत येईल. फरासखान्याचा सरंजाम गोलकुंड्याहून आणविला. राा छ ८ राावल. हे विज्ञापना.

छ १० राावल, मुाा भागानगर, रवाना टपालावर.

[१७९] श्री. २४ सप्टंबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेसी.

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साा नमस्कार विनंति विज्ञापना ताा छ १० माहे राावलपर्यंत मुाा भागानगर येथें स्वामीचे

कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानाची विनंति पेशजी पत्राची रवानगी केली आहे त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत नबाबाकडे छ ८ रोजीं जाऊन सरकारी खरितापत्र दिलें. बोलणें झालें. त्याचा तपशील वगैरे मजकूर अलाहिदा पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे. अवलोकनें ध्यानांत येईल. उत्तरें रवाना करावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१८०] श्री. २४ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. छ ८ रविलावल मंगळवार रात्रीं नबाबाकडे दरबारास गेलों. मीरअलम व राजाजी व रघोत्तमराव होते. नबाबाकडील पत्राचा जाब सरकारचे करितां पत्र मजलेल्याचें सलाहविषयींचें उत्तर राजश्री नाना यांजकडील पत्रासहीत प्रविष्ट केलें. नबाबांनीं पत्रें वाचून पाहिल्यानंतर सरकारचें आज्ञापत्र माझे नांवें आलें, तेंही वाचून दाखविलें. सरकारी पत्राचे जबाब मागितले. उत्तर जालें कीं, उदईक जबाब लिहिण्याचें ठरावांत आणून तयार करवून देतों, व तुह्मांसही लिहावयाचे मरातब बोलण्यांत येतील त्याप्रमाणें तुह्मीं लिहावें. त्यास आज उद्यां सरकारी खरित्याचा जबाब नबाबांनीं दिल्हा ह्मणजे बोलण्यांत येईल त्याअन्वयें विनंति पत्रासहित रवानगी करीन. अलिज्याह यांचीं पत्रें सरकारांत आलीं, त्याप्रकर्णीं नबाबास खरिता आला तोही पावला. नबाबास देऊन जाब घेऊन पाठवितों. रा छ १० रावल. हे विज्ञापना.

---

[१८१] श्री. २४ सप्टेंबर १७०९

विनंति विज्ञापना. ऐवजाचे किस्तीविषयीं पेशजी खरिता दिल्हा. व हल्लीं मदारुलमहाम याणीं हजरतीस लिहिलें आहे. माझेही पत्रांत कीं, येविशीं तुह्मीं विचारून करारबमोजिब किस्त आदा होण्याचें अमलांत

येई तें घडावें. त्यास मझेल्याची तकरीब लावणें निसबत नाहीं; इत्यादिक प्रकारें नबाबाशीं बोलण्यांत आलें. उत्तर झालें कीं, किस्तीस हे तकरीब नाहीं, हे वाजाई लेकिन हा मझेला हायेल आहे, इनषा अल्लाहू ताला, थोडेच दिवसांत खलषरफाही होईल, जबाब ठरावून तयार करून देऊं, व तुह्मांशीं बोलण्यांत येईल त्या तरकिबीनें लिहावें. ऐसें बोलले. तात्पर्य, ऐवजाचे किस्तीचा फडच्या तुर्त करण्याचें ध्यान दिसत नाहीं. टाळाटाळ करून दिवसगतीवर टाकावें हा प्रकार आहे. जबाब देते समयीं काय सांगतात त्याची विनंति मागाहून लिहिण्यांत येईल. किस्तीशिवाय वरकड कामें व जाबसाल तुह्मीं व मीरअलम, राजाजी ऐसें बसोन उलगडावीं ऐसें बोलण्यांत होतें, त्यांतून अद्याप एकही नाहीं, याचें काय लिहावें? उत्तर जालें कीं, मीरअलम यांची तबीयत दुरुस्त नव्हती, तुमचेही तबीयतीस दोन तीन दिवस बेआरामी, राजाजी व रघोत्तमराव यांचेही मिजाज मांदगी करितां राहिलें. हें बोलण्यांत आलें. आणखीही विचाराचे मार्गानें चार गोष्टी समजावून सांगून काय ठरतें त्याप्रमाणें मागाहून लिहून पाठवितों. रा छ १० रावल. हे विज्ञापना.

---

[१८२] श्री. २४ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. गुंटुराकडील इंग्रजी दोन पलटणें सरदारसुद्धां रुकसत बेदराकडे जाण्याची होऊन रवाना झालीं. मीरअलम यानींही पलटणासमागमें जावें हा सिद्धांत ठरून रुखसत होणार हें समजल्यावरून नबाबास विचारिलें कीं, मीरअलम बहादूर रुखसत होतात ऐसें ऐकिलें. नबाबानीं सांगितलें कीं, इंग्रजी पलटणासमागमें यांचें असणें जरूर जाणून छ १० रोज गुरुवारीं यांचे रुखसतीचा नेम आहे. ह्मणोन बोलण्यांत आलें. त्यास मीरअलम यांचे जाण्याचें कारण इंग्रजी पलटणाची रवानगी, तेव्हां त्यानीं समागमें असण्यांत उपयोग. दुसरें इसामिया आले. त्यानीं कित्येक सरदार कामकाजविषयीं दिलदेही करीत

नाहींत, इत्यादि समजावण्याचे प्रकार समजाविले. मीरअलम गेले असतां कोणाचें ध्यान कसें हें समजेल. तिसरा प्रकार कदाचित् अलीज्याह निघोन जातील याजकरितां दुरुखा फौज असावी. इंग्रजी पलटणें दोन, याशिवाय फौज घेऊन बेदराचे तळघाटाकडे मीरअलम यांनीं असावें. वरतें मुसारेमू वगैरे यानीं रहावें; व मीरअलम यांचे सलाहानें साऱ्यांनीं चालावें. याप्रमाणें ठरून यांची रुखसत ठरली. छ १० तरखेस आज रुखसत होऊन जातील. रा छ १० रावल. हे विज्ञापना.

---

[१८३] श्री. २४ सपटंबर १७९९.

विनंति विज्ञापना. इंग्रजी पलटणासमागमें जिनशींपैकीं तीन तोफा दहा शेरी गोळ्याच्या व बारुदेचे पेटारे चोवीस याप्रमाणें सरंजाम दिल्हा. छपन हजार रुपये दरमहा पलटणाचा मुकरर आहे. दोन माहचा ऐवज त्यांस येथें देऊन रवानगी केली. पलटणांतील तोफा लहान मोठ्या सात आठ त्यांचे बरोबर आहेत. त्याशिवाय तीन तोफा त्यांनीं आपले जिनसींतून देविल्या. रा छ १० रावल. हे विज्ञापना.

---

[१८४] श्री. २४ सप्टंबर १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याहबाहादूर यांस सदाशिवरड्डी व नाजमन्मुल्क यांनीं फरेब देऊन मझेला उभा केला. तो रफा झाला पाहिजे यास्तव येथून शिकंदरज्याहबहादूर यास रवाना करावें, हे तजवीज योजिली. येविषयींची सलाह कशी इत्यादिक पूर्वी नबाबाचे बोलण्यांत आल्याअन्वेयें विनंति लिहिली होती. त्याचें उत्तर सरकार आज्ञेप्रमाणें राजश्री गोविंदराव भगवंत यांणीं लिहिलें, तेच पुरवणी नबाबास वाचून दाखविली. याजवर नबाबाचे बोलण्यांत आलें कीं, सिकंदरजाह यास कामास पाठविलें असतां जाईल हे खातरजमा आहे. लेकिन, याचे जाण्यांत, तिकडून आलीज्याह, इकडून शिकंदरज्याह, भाईभाईची लढाई, असा प्रकार दिसतो. व भावाभावांत कटकट लावून दिल्ही,

आपण तमाषबीनी करितात, असें जातीकडे येतें. पुढें जीद राहील यास्तव शिकंदरज्याहाचें निघणें मवकूफ केलें. आह्मी निघण्यास तूर्त बरातफात रबिलावलच्या बारा तारखेपर्यंत आहेत. पुढें पहावें तसें करावें. निघण्याची आमची तारीख अद्याप निश्चयांत आली नाहीं. मगर डेरे उद्यां परवां इतके द्यावे याप्रमाणें आहे. ह्मणून बोलण्यांत आलें. रा छ १० रावल. हे विज्ञापना.

---

[१८५] श्री. २४ सप्टेंबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. आलीज्याह यांजकडून बोलणें लागलें त्याविशीं नबाबाजवळ बोलावयाकरितां इसामिया आले. त्यांनीं वर्तमान नबाबास सांगितलें. बोलणेंही मार्गाचें आहे. त्याचा तपशील ऐकिला तो उदईक लिहीन. नबाबानीं सर्वांस सलाह पुशिली. मीरअलम आदिकरून सर्वांचें मत कीं, समेट करून घ्यावा हें चांगलें. नबाबाचें मत, हें कांहीं करूं नये, अलीज्याहानें उठोन यावें, ह्मणजे त्याचें संरक्षण करीन. सर्वांचे मानस, समेट व्हावा हें चांगलें. जिंदीखालीं टाकूं नये. परंतु नबाबाचे मर्जीकरितां रदबदल करून बोलूं सकत नाहींत. याप्रों वर्तमान आहे. रा छ १० माहे रावल. हे विज्ञापना.

छ ११ रावल मु॥ भागानगर.
रवाना टप्यावर.

[१८६] श्री. २५ सप्टेंबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण, कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ता॥ छ ११ रावलपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें. विशेष. इकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी केली त्यावरून तपशिलें ध्यानास आलें असेल. सांप्रत मीरअलम रुखसत जालें इत्यादिक विनंति अलाहिदा पुरवणी

पत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तराविषयीं आज्ञा झाली पो. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१८७] श्री. २९ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. मीरअलम यांस नबाबानीं आज्ञा केली कीं, तुह्मी अगोदर फलाण्याकडे जाऊन त्याशीं बोलून यावें; नंतर तुह्मांस रुकसत करण्यांत येईल. त्यावरून छ १० गुरुवारीं दोनप्रहर दिवसा मीरअलम आह्माकडे आले होते. दोन घटका बोलणें झालें. याचा तपशील मागाहून विनंति लिहितों. छ मारीं मीरअलम यांनीं नबाबाची रुखसत घेतली. साहा घटिका मीरअलमपाशीं बोलणें अलीज्याह वगैरे प्रकरणीं झालें. त्यांत नबाबास कळावयाचें वेगळें, खासगत त्याचें आमचें निराळें, याप्रमाणें बोलणें होऊन ते दरबारास गेले. तपशील उदईक लिहीन. रा छ ११ रावल. हे विज्ञापना.

---

[१८८] श्री. २९ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. मीरअलम रुखसत जाले. इंग्रजी दोन पलटणें अघाडीस रवाना केलींच आहेत. मीरअलम यांचे समागमें स्वार तीन हजारांचा भरणा नबाबांनीं करून दिल्हा. पलटणासहित बेदरास जाऊन तळघांटीं उतरण्याविशींची तजवीज आहे. मुसारेमू व पागावाले आदीकरून सरदार वरघांटीं आहेत. नबाबांनीं खासडेरेही छ १० रोज गुरुवारीं बाहेर उभे करविले. पलटणें व हे एकत्र होऊन जातील. रा छ ११ रावल. हे विज्ञापना.

---

[१८९] श्री. २९ सप्टेंबर १७९९.

विनंति विज्ञापना. नबाबानीं मीरअलम यांस येथून बेदराकडे जाण्याची रुखसत दिल्ही. इंग्रजी पलटणासहित रवाना जाले. स्वामीचें नांवें नबाबांनीं खरितापत्र तयार करवून दिल्हें कीं, हें पत्र रवाना करावे

राव पंतप्रधान यांजकडील आबाजी कृष्ण शेळूकर जमीयतीसुद्धां येत आहेत, त्यास मीरअलम बहादुर ज्याबमोजीब त्यांस सुचवीत जातील व सांगतील त्याप्रमाणें शेळूकर यांनीं त्यांस अनुकूळ होऊन तरतूद करीत जावी. याअन्वयें पत्रांत मजकूर आहे. व तुह्मींही हे मरातीब लेहून पत्राची रवानगी करावी. शेळूकर यांस राव पंतप्रधान यांची ताकीद मीरअलम तर खुद्द सांगतील त्याबमोजीम अमलांत आणावें ऐशी व्हावी. परभारा शेळूकरास तिकडून पत्र पोहोचावें. व एक पत्र इकडे यावें. ह्मणजे इकडून मीरअलम यांजकडे पाठवूं, ते शेळूकर यांस पोहोचावितील. याप्रमाणें ल्याहावयाविशीं आह्मांस सांगतील. व आबाजी कृष्ण यांचे नांवें आमचेंही पत्र नबाबानीं मागितल्यावरून सदरहू अन्वयें मी पत्र मशार-निल्हेस लिहून यांजपाशीं दिल्हें. नबाबानीं थैलीपत्र दिल्हें तें सेवेशीं रवाना केलें आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. आबाजी कृष्ण यास सरकारांतून आज्ञापत्र परभारा रवाना व्हावें, व एक पत्र मजकडे पाठवण्याविषयीं आज्ञा, ह्मणजे नबाबास आज्ञेप्रमाणें प्रविष्ट करीन. रा छ ११ रावल. हे विज्ञापना.

नबाब निजामअलीखां बहादूर याणीं श्रीमंत व नाना यांजला व गोविंदराव भगवंत यांस पारसी पत्रें दिल्हीं. ते छ ११ माहे मारीं डांकेवरून रवाना केलीं. पैकीं श्रीमंताचे खरीतापत्राची नक्कल पारशी.

* * * * * * * * *

फारसी पत्र.

* * * * * * * * *

[१९०] श्री. २५ सप्टेंबर १७९५.

विज्ञापना. अलीज्याह याशीं तह करावा. नबाब ऐकत नाहींत हें ठीक नाहीं. मी याचें साधन करतों. तुम्हींही श्रीमंताकडून पत्र आलें त्याअन्वयें बोलावें. दोस्तीचे अलमांत चांगले प्रकारें श्रीमंताकडून वरचेवर उपराळ्यास पत्रें यावीं; आणि नबाबास बोध करून सांगून तहरह करावा. हीच सलाहबक्षी बेगमा यांचेंही संमत. नबाब आढकपणा करतात हा स्वभाव आहे. तुम्हीं आम्हीं मिळोन आपल्यावर मर्जी यावयाजोगें करावें ह्मणजे ऐकतील. याप्रों बोलणें जालें. तपशील मागाहून लिहितों. रा छ ११ रावल. हे विज्ञापना.

छ १४ माहे रावल, मुा भागानगर, रवाना टप्यावर.

[१९१] श्री. २८ सप्टेंबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ताा छ १४ माहे रावलपर्यंत मुा भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीजाहबाहादूर आपली फौज सरंजाम-सुद्धां बेदराहून निघून गेले. बेदरांत ठाणें नबाबाकडील बसलें; याप्रमाणें आज वर्तमान आलें. त्याजवरून नबाबानीं खुषीच्या तोफा सोडल्या. परंतु अंतर्यामीं नबाब बहुत दिक्क व विचारांत. याप्रमाणें वर्तमान जाहलें तें लिहिलें आहे. अलीजाह कधीं निघाले व कशा तऱ्हेनें आणि कोणीकडे गेले; व बेदरांत ठाणें यांजकडील कशा तऱ्हेनें बसलें हें सविस्तर समजलें नाहीं. शोध करून मागाहून तपशील-वार लिहिण्यांत येईल. हें पत्र लिहीत असतां इतक्यांत नबाबाकडून रघोत्तमराव आले. तो मार अलाहिदा पुरवणींत लिहिला आहे. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१९२] श्री. २८ सप्टेंबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे—छ १२ माहे रावल मंदवार ते दिवशीं दीडप्रहर प्रथम रात्रीं अलीजाह यांनीं सर्व लोकांस बोलावून तयारी करून आपले फौज सरंजामसुद्धां निघोन मैकराकडे गेले. दुसरे दिवशीं रविवारीं किल्ला बेदरचा खालींच होता त्यांत मुसारहमू यांणीं ठाणें कायम केलें. पुढें कोणीकडचा रुख धरतील पहावें. सदरहू मजकूर नबाबानीं राजश्री रत्नोत्तमराव यांजबरोबर सांगून पाठविला. आणखीं सांगून पाठविलें जे, याजकरणीं कांहीं तुह्मांशीं बोलावयाचें आहे, सायंकाळीं बोलावूं ह्मणजे यावें. सायंकाळीं गेल्यानंतर बोलणें होईल तें उदईक लिहून पाठवूं. रा छ १४ माहे रावल. हे विज्ञापना.

छ १७ रावल, मु॥ भागानगर, रवाना टप्यावर.

[१९३] श्री. १ अक्टोबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १७ माहे रावलपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान लिहून पेशजी रवानगी केली त्याजवरून मजकूर ध्यानांत आलाच असेल. मीरअलम माझे येथें आले होते. त्यांशीं भाषण होऊन ते नबाबाकडे गेले. तेथें बोलणें होऊन रुकसत झाले. उपरांत अलीज्याह बेदराहून निघोन गेलियाचें वर्तमान आलें. त्याजविषयीं नबाबानीं बोलावून मजकूर सांगितला. सिकंदरज्याह यांस फौज देऊन पाठलाग करावा असें ठरावून दो चहूं दिवसांत रवानगी करावी ऐसा निश्चय केला. सरकाराशीं करारमदार जाले ते कायम. त्याप्रमाणें अमलांत आणावयाचें. परंतु ज्यांत निभाव होईल ऐसें ठरवावें, ह्मणोन स्वामीकडील खरिता नबाबास आला. त्याचा जाब नबाबानीं दिल्हा. त्यांत गोविंदराव कृष्ण यांस व सरकारचा कोणी एखादा खातरजमेकरितां पाठवावा ऐसा मजकूर आहे. प्रस्तुत नबा-

बानीं ठराविलें जे, आतांच तुह्मीं व मीरअलम यांणीं जावें, जाब येण्याची प्रतीक्षा करूं नये. इत्यादिक सर्व तपशील अलाहिदा पुरवण्यांत लिहिला त्याजवरून ध्यानांत येईल. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[१९४] श्री. १ अक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. मीरअलम यांचें आमचें संधान पूर्वीपासून आहेच. दोघांची समक्ष भेट होऊन बोलणें व्हावें ही इच्छा, परंतु योग घडेना. असें करितां एक दिवस सरकारी कामास्तव त्यांनीं आह्मीं नबाबाचे येथें एकीकडे बसून बोलावें ऐसें ठरलें. इतकियांत त्यांस ज्वर येऊं लागला. मलाही ज्वरांश जाला. त्यामुळें तो बेत राहिला. नंतर तो योग व्हावा. त्यास अलीज्याह यांजवर पलटणें वगैरे फाजै घेऊन त्यांनीं जावें असें ठरलें. तेव्हां तें चांगले. नबाब सरकारचा फडचा चित्तास येईल तेव्हां करतील. आज यांचे ह्मणण्यानें करतात असें नाहीं. कदाचित् मीर-अलम पुढें ह्मणूं लागतील कीं, तेवेळेस मला ह्मटलें असतें तर मी असें करतों. इतकें बोलण्याचें ओझें तरी कशास घ्यावें? आज गोष्टीचे गोड बोलण्यांत आपले सरकारचा दाब ठेऊन कां न बोलावें? सरकारचें वचन यांसीं गुंतलें, त्याअर्थीं यांसही उघडून समजावावें. इतक्यावर यांजकडून कांहींच न जालीयास सरकाराकडे कांहीं नाहीं. पुढें बोलाव-यासी जागा, ऐसें समजोन रघोत्तमराव यांस सांगितलें कीं, मीरसाहेब यांस आमचा निरोप सांगावा जे, खरड्यावर करारमदार नबाबांनीं श्रीमं-तांशीं केला तो तुह्मांस सर्व माहीत, येथें आलियावर नबाबाशीं बोलणें जालें, त्याचीं उत्तरें त्यांनीं दिल्हीं, हल्लीं श्रीमंतांचीं पत्रें आलीं तीं दिल्हीं, आह्मींही बोलिलों, तथापि कांहींच मार्ग निघत नाहीं, तुह्मीं आह्मीं बसून जुजवियातचा उलगडा व्हावा असें ठरलें, तेंही न जालें, तुह्मीं तर चालला, पुढें फडच्याची षकल काय? फडच्या व्हावयाचा तसा होईल, परंतु अजराहे दोस्ती, तुह्मांस गोषगुजार करून ठेवतों हें निमित्य उलट येईल, बरें वाईट कांहीं जाल्यास आह्मीं तुमचें नांव घेऊं कीं फलाण्यास आह्मीं सांगितलें होतें, आह्मांकडे शब्द नाहीं, याचा इतल्ला केला असे,

याप्रमाणें बोलावें असें सांगितलें. तेव्हां रघोत्तमराव ह्मणाले, असें त्यांस सांगून येथें घेऊन येऊं कीं काय? मीं सांगितलें, बोलावण्याविशीं आमचा पैगाम नाहीं, ते येतील तर घर त्यांचें आहे. तेव्हां राव मारनिल्हे दरबारास जाऊन तेथेंच मीरअलम आले होते त्यांशीं बोलले आणि सांगितलें कीं, त्यांजकडे जाऊन बोलणें त्यांचें तुमचें व्हावें हें चांगलें; त्यांतच सलाह आहे, तुह्मांवर त्यांनीं फार उश्रुमा केला. मीर याचे मनांत होतेंच. त्यांनीं ह्मटलें, फार उत्तम, मीं सिद्ध आहें, परंतु हजरतीची परवानगी झाली पाहिजे, माझेतर्फेनें तुह्मींच अर्ज करावा ह्मणून सांगितलें. तेव्हां रावमजकूर नबाबाशीं बोलिले जे, मीरसाहेब यांचा अर्ज आहे कीं श्रीमंतांकडील पत्रें फैसल्याकारितां आलीं, त्याजवर रावजीनीं मी बसून मुजका व्हावा तो न जाला, माझे रवानगीचा ठराव जाला, त्यांजकडील जाबसालाचें कांहींच न ठरेल, आणि असाच मीं गेलों तर त्यांस वाईट वाटेल. त्यांचाही गिल्ला याजविशीं आहे, याजकरितां आज्ञा जालियास त्यांजकडे जाऊन बोलून नंतर रुकसत घेईन. तेव्हां नबाब बोलिले जे, फार चांगलें, यांशीं बोलून आलियावर तुह्मांस रुकसत देउं, अगत्य जावें. तेव्हां मीर यांनीं सांगून पाठविलें कीं, उद्ईक मी आपलेकडे येतों. नंतर दुसरे दिवशीं आले. सहा घटिका बोलणें जालें. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे त्याजवरून ध्यानास येईल. रा॥ छ १७ रावल. हे विज्ञापना.

---

[१९९] श्री. १ अक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. मीरअलम व रघोत्तमराव आले. प्रथम मी त्याजवर फार गिल्ला केला. नंतर त्यांनीं कांहीं परिहार व कांहीं गिल्ला मजवर केला. आजपर्यंत माझी खबर मदारुलमहाम यांनीं कधीं निरोप पाठवूनही घेतली नाहीं हें आश्चर्य! तेव्हां त्यास ह्मटलें जे, अव्वल आपला आमचा परिचय, बादतज मदारुलमहाम यांचा, हैदराबादेस तुह्मी आलेत, आह्मी आलों, आजपर्यंत एके ठिकाणींच असतां मीरसाहेब नवेच दिसावयाशीं लागले, नबाबापाशीं गिल्ला आमचा केलात ही गोष्ट अपूर्व वाटली. तेव्हां

बोलिले कीं, मी तुमचा गिल्ला असा केला नाहीं कीं, पुन्हा तुमचें आमचें बोलणें न व्हावें, इतकाच गिल्ला जे हजरतीची रावपंतप्रधान याशीं मुलाकात करविली असती तर बरें होतें. याचें उत्तर त्यांस दिलें कीं, मुलाकातीचा निश्चय करून आलों, हजरतीस खर्ड्यावर सांगितलें, नबाब बोलले जे, बादज दसरा ह्मणोन राहिले, याचें आह्मांकडे काय? तेव्हां बोलिले, हें मला ठाऊक नाहीं. तेव्हां यास ह्मटलें, जें जें तुह्मी बोलाल त्यांत असेंच निघत जाईल, वास्तव काय कसें हें तर तुह्मांस तर ठाऊक नाहीं, आणि संशय उत्पन्न झाला, तुह्मांस संशय झाला तेव्हां आह्मासही झालाच, सरकार कामाचे दुरुस्तीची षकल तुह्मीं नबाबापाशीं असतां कांहींच दृष्टीस पडेना, तेव्हां मदारुल्महाम यांचें मनांतही संशय, कांहींच समजेनासें झालें, हवाच फिरली, तेव्हां आंदेपेही प्राप्त, मदारुलमहाम यांजवर हर्फ ठेवावा असें नाहीं, तुमचे मनांतील प्रकार आह्मास समजावा, आह्मी मदारुलमहाम यांस लिहावें, तेव्हां निःसंशय आह्मांस कांहींच समजेना, तेव्हां कसें करावें, असो, जे झालें तें गुजष्त, पुढें काम तजवीज सफाई करावी असें मनांत खचित जेथें असतें तेथेंच गिल्लाही करावा लागतो, कारण मनांत उगीच संशयाची गर्द आली असते ती काढून टाकली ह्मणजे साफ, कांहींच खतरा रहात नाहीं, इतका बयान करून सांगण्याचें कारण जर याजउपर उपेक्षा करून काळहरण केलियास नबाबाचे दौलतीस बेतऱ्हा धक्का बसेल, रावपंतप्रधान याशीं नबाबानीं करार केला त्याप्रमाणें कांहींच अमलांत येत नाहीं, नबाब आह्माशीं काय बोलले हें तुह्मासच ठाऊक आहे, तितका बयान श्रीमंतांस लिहिला असता तर सर्व बाजी आफ्तर होती, यास्तव आजपर्यंत संभाळून राखलें. नबाबाचे मनांत कांहीं फिकीरीच नाहीं, तुह्मांस कांहीं विचार सुचत नाहीं असें नाहीं, परंतु संशयांतच गिरिफ्तार, तुमची अवस्था अशी, कोठेंच ठिकाण लागत नाहीं, तुह्मीं आपले कार्यावर चाललां तेव्हां दौलतीचा आंजाम समजला, याजउपरी जसा जो प्रकार आहे त्याप्रमाणें आह्मांस खाविंदाकडे लिहून पाठविणें प्राप्त, दूरंदेशी कोणांत नाहीं, तेव्हां आह्मी काय करावें, खावंदाचा शब्द आह्मांकडे आलियावर मग

काय राहिलें, तुमचेच बोलण्यांत आहे कीं लटकेंलांडें बोलून आह्मीं खावंदाची मिजास खुष करून घेतली, त्यास आमचें खावंदाजवळ लटकें बोलण्याचें कारणच पडत नाहीं, जें वास्तविक खरें आहे तें बोलावें ह्मणजे आमचे खाविंद खुष होतात, असें आह्मीं कां न करावें. याजवर फार हांसले. खरें बोलावयासी जावें तर कबाहत उठेल. ती आटोपणें मुषकील. लटकें बोलावें तर संप्रदाय नाहीं. तेव्हां उगेंच रहाणें प्राप्त. असे दिवसही आजपरियंत गुजरले. आतां उगेच राहण्यांत नबाबाची दौलत बुडते. हें तरी कोणापाशीं बोलावें. कितेक बारीक याची समजही कोणास येथें नाहीं. यास्तव तुह्मापाशीं इतकें बोलावयाचें कारणः—मुषीरुल्‌मुलुक यासारखे मनुष्यास काढून टाकावें, हा मनसुबा तुह्मीं आह्मीं मिळोन केला. याचें हेंच फळ कीं, दोही दौलतीचा खलष निघून उभयतांनीं सफाई आणि एकदिलीनें असावें. ह्मणजे दोहीं दौलतीचा बंदोबस्त. इतिफाकानें उमदीं कामें व्हावीं. खलकुलास आराम व्हावा. तुह्मांस आह्मांस संतोष वाटावा. इतक्याकरितां जें केलें तें सिद्धीस गेलें. असें असतां तुह्मीं आह्मीं उगेंच बसलों. कांहींच कोणास सुचत नाहीं हें काय? याजउपरी दुनयाइचे लोक आह्मां तुह्मांस हासूं लागतील. तेव्हां त्यांनीं येथील मर्जीचा आणि समजेचा प्रकार व कितेक लावालावी करतात याचा विस्तार बहुत सांगितला कीं, असा प्रकार आहे, याजकरितां मीही बहुत जपून चालतों, आपल्यावर आफत न आली इतकेंच मिळविलें, असें समजून आहें, उपाय नाहीं. तेव्हां त्यांस ह्मटलें जे, ही चालढकल आहे, त्यांत परिणाम नाहीं. यास आवल तुह्मीं आह्मीं साफ दिल व्हावें, जाहिरदारीनें सफाई ठीक नाहीं, दिलापासून साफ व्हावें, उभय दौलतीचे बेहबुदीविशीं आणि पंतप्रधान यांचे सरकारची कामें उलगडावीं याचे साधनाविशीं जें मनांत येईल तें खुलाश्यानें बोलावें, ह्मणजे तदबीर ठरवावयासी येईल. याजवर बोलिले कीं, नबाबाची प्रकृत हट्टी, जिदीजिदेवर आले ह्मणजे मसहलत समजूं नये, चुगली कोणी सांगितल्यास तेंच मनावर घेतात. याजवर आलीज्याहाचा मार केला कीं, त्याजकडील

जाबसाल सल्याचा आला आहे. याविशीं मीं सलाह सांगितली कीं समेट करून घ्यावा. बक्षीबेगम साहेब यानीं अर्ज केला, परंतु ऐकत नाहींत. न ऐकिल्यांत फार कबाहती आहेत. याचा बयान करून बोलावें तर अधिक राग येऊन संशय येतो. उपाय नाहीं. तेव्हां कसें करावें? असा प्रकार पडतो. यास पुस्तपन्हा कोणाची आणि तदबीर काय. तेव्हां त्यास सांगितलें कीं साफदिल होऊन निःसंशय चाल धरलियावर पुस्तपन्हा आणि तदबीर श्रीमंत आणि मदारुलमहाम यांजकडुन घडेल. तेथील आज्ञेप्रमाणें आह्मीं हजर आहों. नबाब दुरंदेश मनांत न आणितां कांहीं करूं लागल्यास त्याची तदबीर तुह्मी आह्मी मिळोन करूं. नंतर कसें होतें तें पहावें. असें करणेंही नबाबाचे दौलतीचे बहेबुदीकरितां. तेव्हां यांत नमकहरामीचा शब्दही तुह्मांकडे नाहीं. मग कां यास आळस करावा? आपल्याकडून ज्या तदबिरी असतील त्या कराव्या. याजवरही नच ऐकत तर नशिबीं असेल तसें होईल. तुह्मां आह्मांकडे तर शब्द नाहीं. परंतु तुमची चाल आंत येक बाहेर येक ऐशी नसावी. याची खातरजमा जाली पाहिजे. तेव्हां बोलिले, कीं खातरजमा करून देतों आणि येक गोष्ट सांगतों जे, मी हि मसलहत आणि बरें वाईट समजतों, तुह्मांशीं वचन प्रमाण केलियावर कसा चालतों याची परीक्षा तरी पहावी, जमान्याचे गर्दिषीमुळें नाहक संशय परस्परें आले, पाहतां अर्थी कांहींच नाहीं, पूर्वीचे वचनप्रमाणावरच आहों, पुन्हां गुबार न येई असेंच करून चाल सुरू करावी, श्रीमंतांशीं वांकडी चाल धरलियावर या दौलतीचा परिणाम चांगला नाहीं हें पुरतें मला समजलें आहे, याजवरही गफलत कशी होईल? मुषीरुल्मुलुकासारखा जबरदस्त, त्याची आवस्था काय जाली हे वाकफ, मी तसा चाललों तर माझीही दशा तशीच हें मी जाणतों, आपण माझी खातरजमा खुलाशानें बयान करून केली हें मला पूर्णपणें समजलें, तशीच मीही खातरजमा आपली करतों, जें मनांत येईल तें बोलण्याविशीं मी आंदेशा इतःपर करणार नाहीं ह्मणोन शफत केली. श्रीमंतांकडून खातरजमा तुह्मीं करावी ह्मणोन

तेव्हां खातरजमा त्यांची केली. नंतर त्यांचें माझें बोलणें जालें तें अलाहिदा लिहिलें आहे त्याजवरून ध्यानांत येईल. रा छ १७ रावल. हे विज्ञापना.

---

[१९६] श्री. १ अक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. मीरअलम यास ह्मटलें जे, आमचे सरकारचीं कामें करारबमोजीब होणें हीं नबाबाकडून कशीं करावितां, नबाबानीं दूरंदेशी करून फैसला केलियास उत्तम, नाहीं तर आह्मीं याची तजवीज कशी करावी, येथून फैसला होण्याची सुरत दिसत नाहीं, त्याअर्थी मर्जीस येईल तशी तजवीज करावी ऐसें श्रीमंतास लिहावें कीं काय, याची सलाह काय सांगतां? दुसरी गोष्ट आलीज्याह याचे समजुतीचा प्रकार करावा, असें नबाबास सरकारांतून दोस्तीचे मार्गें लिहिलें आहे. या समेटींत बहुत प्रकार दुरुस्तीचे आहेत. एक तर, श्रीमंतांस संतोष वाटेल कीं आह्मीं दोस्तीचे मार्गें रदबदल घरोब्यानें केली, ती नबाबानीं ऐकिली. यांत अलीज्याह यांची समजूत होऊन उभय दौलतीचे स्नेहाची अधिक वृद्धि. नबाबाचे दौलतींत फंद जाला हा तुटतो. तालुका खराब होतो याचा बंदोबस्त होऊन अमदानी होईल. जमीदार व कमावीसदार वगैरे या निमित्यानें ऐवजास तपशील लावतात हें घडावयाचें नाहीं. ठाई ठाई बदअमली जाली त्याचा बंदोबस्त. श्रीमंताकडील किस्तीचे भरण्याची तोड निघेल. तालुक्याचा तर पैका येत नाहीं. तेव्हां खजान्यातून पैका काढून फौजेस देणें प्राप्त. इकडील खर्च वांचतो तोच ऐवज श्रीमंतांकडे दिला ह्मणजे सचोटी राहून दोस्तीची अभिवृद्धि, इतकें होऊन खलष तुटतो. अलीज्याह यांचे समजुतीस कांहीं तालुका देणें लागेल. तेंही दुसरे दौलतींत जात नाहीं. घरचे घरांतच आहे. चार सरदार सरंजामी असतात तसाच हा एक पांचवा. पुढें फंदफितूर करूं पावणार नाहींत, याची मजबुती पाहिजे

तशी करावी. हा बापलेकांचा कजिया. बाप श्राप देतो. मातुश्री आशीर्वाद देऊन कल्याणाची इच्छा करीत आहे. श्राप कोणाचा लागावा? आशीर्वाद कोणाचा फळास यावा? दोन्हीं सारखींच. समेट करावा हें सर्वांचे सलाहांत ह्मणोन तुह्मीच सांगतां, शेवटीं त्याचे नशीबीं असेल तें घडेल. कदाचित् लढाईंत मारला गेला तर वेधच तुटला. जर दस्तगीर जाला तर नबाब त्यास मारीत नाहींत, कैद करतील. पुढें कोणाचे नशीबीं दौलत आहे याचा निर्णय करवत नाहीं. तुह्मांस व तुमचे पुत्रास नबाबाचे येथेंच जन्म घालविला पाहिजे. कदाचित् याचेच नशीबीं दौलत असली तर तुह्मीं आपला परिणाम पहावा. कितेक आंदेषा नबाबानीं करावा असा आहे. किदेक आंदेषा असा आहे जे, त्याचें कारण नबाबाचे जातीकडे नाहीं. बायका आदीकरून सर्वांचें लक्ष तिकडे. एक नबाबाची मात्र जीद. तुह्मांस तर सर्व माहीतगारी आहे. अनुमानेकरून आमचे मनांत येतें तें बोलतों. याची काय षकल काढतां? नबाबाचे जिदीवर जाऊं नये. ज्यानें प्रजा आदीकरून सर्वांचें संरक्षण, आणि नबाबाचे जातीस स्वस्थता, दौलतीचा बंदोबस्त, इकडे दृष्टि दूरंदेशीं देऊन जे दौलतखाहीस लाजम तें करावें. विपरीत असल्यास करूं नये. परंतु दोन गोष्टी अवश्य कराव्या. यांत गुण बहुत आहेत. एक प्रकार श्रीमंतांशीं करारमदार केले त्याप्रमाणें अमलांत आणून अधिक दोस्तीची वृद्धि करावी. याजमुळें इतर दौलतदार वगैरेपासून स्वस्थता. कोणाचा दगदगा बाळगावयाचें कारण नाहीं. दुसरा प्रकार घरचा फंद मोडावा ह्मणजे खाजगी उपद्रव मिटला. दोन गोष्टी जितक्या लवकर समेटण्यांत येतील तितका उपयोग. स्वस्थ होऊन नबाबांनीं वृद्धापकाळीं सुखानें दिवस घालवावे, तुह्मी आपले कारस्तानीनें नबाबास सुख दाखवावें, हेंच योग्य. जें मनांत आलें तें निःसंशय होऊन बोललों. पुढें याची योजना केली असल्यास उत्तम, अथवा मनन करून ठरवावें. याजवर मीरआलम बोलले जे, इतका बयान माझे मनांत ठसला. खऱ्या गोष्टी आहेत. यांत किमपि संशय नाहीं. परंतु यांतील खुलासा सांगतों. नबाबाचे प्रकृतींत

कृषिप फार आहे. सरकारचा फडच्या सुप्रवृत्तीनें करतील असा रंग मला दिसत नाहीं. मसलहतीचे मार्गे बोलत असतो. परंतु मनांत भरत नाहीं. तसाच अलीज्याह याचा मजकूर त्यास आतां मी नबाबाकडे जातों. काय बोलणें जालें असें पुसतील. ते वेळेस जसें साधन लाऊन बोलावयाचें तें बोलतों. त्यांत कांहीं मार्गाची गोष्ट असलियास उत्तम. नाहीं तर याची तदबीर माझे मनांत जी येईल ती सांगून पाठवीन त्याप्रमाणें करावें. तर बनाव बसेल. याचा इतल्ला श्रीमंत व मदारुलमहाम यांस जसें बोलणें जालें त्याप्रमाणें करावा कीं काय ऐसें पुसिलें. तेव्हां बोलले जे, आज मी जाऊन बोलतों, नंतर उदईक रघोत्तमराव यांजबरोबर सांगून पाठवीन, तें समजून घेऊन सर्व लिहून पाठवावें. श्रीमंतांचे दौलतखाहींत मजकडून हरगीज कसूर होणार नाहीं. याप्रमाणें बहुत खातरजमेनें बोलले. अनुभव येणें पुढेंच आहे. जसा अनुभव तसी खातरजमाही होईल. रा। छ १७ रावल. हे विज्ञापना.

---

[१९७] श्री. १ अक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. मीरअलम हे येथून उठोन दरबारास गेले. चोबदार नबाबाकडील बोलावणें आला होता. नबाबानीं त्यांस पुसिलें जे, कायकाय बोलणें जालें? तेव्हां यानीं अर्ज केला जे, दोहीं दौलतींच्या दौलतखाहीनें मसलतेच्या मार्गें बहुत बोलले. आह्मीं सर्व बोलण्यांत आणिलें. परंतु रावपंतप्रधानाकडील ह्मणोन आमचें बोलणें रुचीस पडत नसेल. परवां श्रीमंतांकडील पत्रें व मदारुलमहाम यांचें पत्र आलें त्यांत एक रुका, दौलतखाहीनें श्रीमंतांच्या आंदेषा दूर होय ऐसें करावें ह्मणोन, लिहिला आहे. त्याचा बयान करून सांगितलें. श्रीमंतांनीं आह्मांस पत्र लिहिलें तेंही वाचून दाखविलें. परंतु हजरतीनीं जबाब चांगला दिला नाहीं. वरचेवर सांगितलें. त्यास तुह्मीं मराऊरीतीनें सर्व हजरतीस समजावून सांगावें ह्मणोन जे मरातीब मसीं बोलले ते

अर्ज करतों ऐसें ह्मणोन मीर यानीं बोलण्यास आरंभ केला. सर्व मजकूर नबाबानीं ऐकून घेऊन शेवटीं आलाह ह्मणोन श्वास टाकून हांसून बोलले जे, त्यांनीं तुह्मांवर फार दाब टाकला. तेव्हां मीर अलम यांनीं जबाब दिल्हा जे, दाब टाकून बोलते तर आह्मींही दाबाचीं बालणीं बोलतों, परंतु दाब टाकून ते बोलले नाहीं, श्रीमंतांकडील जीं पत्रें आलीं तीं सर्व त्यांनीं परवां हजरतीस दाखविलीं. त्यांत ही दबावून बोलावें असें कोठें दिसलें नाहीं, हजरतींनीं कुमकेविशीं लिहिलें होतें, त्याजवरून त्यांनीं सरदारांची रुकसत केली, येवढ्यावर कार्य न जालियास आणखी फौज जमा करण्यविशीं ताकिदा जाल्या आहेत, शिंदे यांचा कंपूही तयार आहे, अलीज्याह यांचा खलष मिटेतोंपारियंत भोंसले यानीं नागपुरास जाऊं नये, वाशिबावर रहावें, याचा अर्थ काय कीं अलीज्याहाचा मुकदमा लौकर फैसल न जालियास मातबर सरंजामही तयार आहे, दोस्तींत अंतर व्हावयाचें नाहीं, इत्यादिक तपशील हजरतीस कळावयाकरितां लिहिला, यांत हजरत सफाई व्हावी ह्मणोन लिहिलें, दबाबाकरितां नाहीं, परंतु दोस्तींचे मार्गानें एक रुकाही हजरतीस मदारुल्‌महाम यानीं लिहिला आहे जे दौलखा-हीनें सुचविलें याचा अर्थ मनांत आणिला असतां यांतच सर्व इतला यांनीं केला, माझे मनांत जें येतें त्याचा अर्ज करतों, मामलतीचा जाबसाल करारमदाराप्रमाणें सुरुवात केलियास त्यांनीं लिहिल्याप्रमाणें सर्व अनुकूल-ताच आहे, नाहींतर फौजा जमा होतात हेंच प्रतिकूल कां नव्हे, याचा इतला दौलखाहीनें त्यांनीं केलाच आहे, हजरतींनीं मसहलतींचे मार्गें सर्व दरयाफ्त करावें. याप्रों बहुताप्रकारें मीरआलम बोलले. याचें उत्तर नबाबानीं केलें कीं पैक्याचें सोंग कठीण आहे, आलीज्याह याचा मझेला उभा राहिला. तालुक्याची आमदनी बिलकुल येत नाहीं. फौजेस पैका खर्च वरचेवर होतो. हें संभाळून पंतप्रधान यांस पैका देणें कसें घडतें? खजाना भरून ठेवला नाहीं कीं त्यांतून देऊं. अलीज्याह यांचा खलष मिटल्यावर भेटीचा निश्चय व्हावा, अथवा किस्ती आह्मांकडून आदा व्हाव्या, असें ठरवून नंतर भेटीचें

ठरावें. ह्मणजे सफाई मनांत आहे तशी मुलाकातींत अमलांत येईल. जाहिरदारींत सर्वांस दोस्तीचे लवाजिमे जाहीर होतील. ह्मणजे तामकनूर किस्तही आदा करण्यांत यईल. याविशीं गोविंदराव याजबरोबर सरकारचा मातबर कोणी देऊन पाठवूं. कराराप्रमाणें अमलांत आणावयाचें यांत संदेह नाहीं. याविशीं त्याची खातरजमा करावी. मगर आमच्यानें आदा होय असे प्रकार ठरवावे ह्मणजे ठीक पडेल. याप्रमाणें उत्तर दिलें. यावर मीरअलम बोलले जे, आलीज्याह यांचा मझेला मिटविला असतां मिटतो. त्यांचीही समजूत काढावी. पंतप्रधानही समजोन सांगतील. हें लांबणीवर घडत नाहीं. पुढें पंतप्रधान याशीं करारमदार झाले ते आदा करण्यास जागा. फौजेचा खर्च खिसारा पडणार नाहीं. हाच ऐवज त्यांचे भरतीस दिल्हा असतां सहजांत सर्व बंदोबस्त होतो. यास लांबणिवर कां घालवावें. ऐसें बोलले. याचें उत्तर नबाबानीं दिल्हें जे, आमचे खानदानाचा हा संप्रदायच नाहीं. आसफज्याह यांनीं नासरजंग यांचा जीव वांचविला. तसेंच अलीज्याह यानें उठोन मजपाशीं यावें ह्मणजे त्याचे जिवास खतरा नाहीं. याप्रों जालियास ऐकेन. नाहींतर ऐकणार नाहीं. याजवर मीरअलम बोलले, आसफज्याह यांचेवेळचा समय आणखी तो जमानाच निराळा, आतांचा जमाना वेगळा, जसें पहावें तसें करावें. दौलतीचे कामास मागलाच नियम काय? याप्रों हजरत सर्व समजतात. आह्मी अर्ज करावा असें नाहीं. हजरतीस अनुभव त्या गोष्टी आह्मी ऐकतों. येथामती जें सुचलें त्याचा अर्ज करावा. दूरंदेशीं तेंच करतील. ऐसें बोलले, नबाब बोलले कीं, आमचे मनांत आलें असेंच करावयाचें. तेव्हां यांनीं सर्व ऐकून घेऊन घरास आले. एक दिवस विचार केला. दुसरे दिवशीं बेदरास जावयाकरितां मीर यास नबाबानीं रुकसत केले. त्यानंतर आपले घरीं येऊन विचार ठरावून राजश्री रघोत्तमराव यांस बोलावून त्यांजबरोबर निरोप सांगून पाठविला तो अलाहिदा तपशील लिहिला आहे त्यावरून ध्यानांत येईल. रवाना छ १७ रावल. हे विज्ञापना.

[१९८] श्री. १ अक्टोबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे. मीरअलम यांनीं राजश्री रघोत्तमराव यांजबरोबर सांगून पो। कीं नबाबाशीं बोलणें झालें तें सर्व सांगावें. नबाबांनीं उत्तरें दिलीं तींही समजलीं. त्यांत दोहों गोष्टींविषयीं मला बहुत चटपट लागली आहे. कसेंहीकरून दोन गोष्टी झाल्या पाहिजेत. नबाब तर समजत नाहींत. हट्टी प्रकृति, सरळ मार्गानें फडच्या करतील असें दिसत नाहीं. याजकरितां जें मनांत आलें तें सांगावें. एक श्रीमंतांशीं करारमदार जाला त्याप्रमाणें अमलांत यावें याची षकल ठरावी. दुसरें अलीज्याह यांची समजूत पडावी. राजाजीशीं सफाईचें बोलणें जालें त्याप्रमाणें अमलांत तर मजकडून यावें. नबाबास समजावून सांगावें तर ऐकत नाहीं. अलीज्याहाविषयीं श्रीमंतांचीं पत्रें आलीं तीं रावजी देतीलच. परंतु उत्तर चांगलें होणार नाहीं. याची तजवीज एक आहे. माझी रवानगी हजरतींनीं केली त्यास मी बेदरास जातों. मजकडे अलीज्याह यांजकडील पैगाम घेऊन येईल त्याजबरोबर सूचना त्यास करतों जे, तुमचा टिकाव येथें होणार नाहीं. तेंव्हां ते तेथून निघोन तिकडे येतील. त्यांस येऊं द्यावें. आह्मीं पाठलाग करूं. श्रीमंतांचे तालुकियांत गेलियावर आह्मीं अलीकडेच राहूं. तेवेळेस नबाब तुह्मांस श्रीमंताकडे रवाना करतील, तुह्मांस जावें लागेल, ऐसें नबाब पूर्वी बोललेच आहेत. इकडून कोणी पाठविणार तेंव्हां मलाच पाठवितील. अगर आणखी कोणास योजिल्यास फलाण्यास पाठवावें असें तुह्मीं ह्मणावें, ह्मणजे जा ह्मणतील. तुह्मीं आणि मी पुणियास गेलियावर श्रीमंतांचा जाबसाल ठरवून घेऊन अलीज्याह याचा जाबसाल ठरविण्यास चांगलें पडेल. नंतर मुलाकातीचा प्रकार धोरणानें करावें, तर जाबसाल उलगडतील, अलीज्याह यांचा बंदोबस्त होऊन नबाबाचे दौलतीचा खलप उठोन आबादानी होईल तर सारे दोस्तीची मजबुती. अशावेगळ कांहींच बनावयाचें नाहीं. हट्टी स्वभाव यास ताळ्यावर आणावयाची हीच षकल. यांतही नबाबाशीं नमकहरामी करावी असा प्रकार नाहीं. जशी ज्याची

समज तसें समजवावें तेव्हां समज पडती. यास काय करावें? हेंही यांचे दौलतीचे रूबंदोबस्ताकरितां धरणें यास बाध नाहीं. हीच मसलहत श्रीमंतांस व मदारुलमहाम यांस लिहून पाठवावे. उत्तर येईल तें कळवावें. यास विलंब लागूं नये. यांत तीन तोडी होतील. श्रीमंतांचा फैसला, अलीज्याहचा बचाव, नबाबाचे दौलतीचा बंदोबस्त. याविशीं इंग्रेजासही वरीक करून घेऊन त्यांजकडूनही नबाबापाशीं बोलवितों. सहजांत सर्व होतें. याविशीं अनमान करूं नये. याप्रों रावजीशीं बोलून तिकडे लिहून पाठवावयाचा निश्चय करून मला येऊन सांगावें. ह्मणजे त्या धोरणाप्रमाणें चाल घालतों. उदईक कुच आहे. त्या अगोदर निरोप कळवावा ह्मणजे स्वस्थ. याप्रों रघोत्तमराव यांनीं सांगितलें. त्यास ह्मटलें कीं, मीरसाहेब यांचें पत्र सरासरी मोघम असतें तर बरें. ते ह्मणाले दरवाजावर परवानगी रसानगीची दिकत, मीच पत्र आपलें देतों. त्याजवरून रावमार यांनीं राजश्री गोविंदराव भगवंत यांचे नांवाचें पत्र मोघम माझे पत्राचा हवाला घालून लि॥ आहे. तें पत्र स्वामीचे सेवेशीं गोविंदराव दाखवितील. रा छ १७ रावल. हे विज्ञापना.

---

[१९९] श्री. १ अक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. सरकारचें पत्र किस्तीविशीं आलें तें नबाबास दिलें. त्याचा जबाब नबाबानीं दिल्हा. याचा मसविदा वाचून दाखविला, आणि सांगितलें कीं, तुह्मींही याप्रमाणेंच लिहावें. तेव्हां विनंति केली कीं, अलीज्याह यांचे मझेल्याची सबब असूं नये. ते बाबत अलाहिदा बीअलाहिदा. अलीज्याह यांची ताकद काय? दोहीकडील दोस्ती आणि यगानगतेंतही बाबत किती? पदार्थ काय? मागोची गोष्ट सांगितली असतां न ऐकिल्यास त्यास उठावून घेणें अवघड नाहीं. याकरितां ही सबब करारमदारी मुकद्म्यास लावूं नये ऐसा तेथून लेख आला. तेव्हां बोलिले कीं, हाही मुकदमा लांबत नाहीं. लवकरच उलगड्यांत येईल. तुह्मीं नीट समजावून लिहावें ह्मणजे श्रीमंत व

मदारुलमहाम समजतील. याजवर कदाचित् तेथील खातरजमा न होय तर तुह्मीं येथील कोणी आपलेबरोबर घेऊन जाऊन श्रीमंतांची ख़ातरजमा करावी कीं, वाजवी मुक़दमा ठरावांत आल्यावर त्यास दिकत नाहीं; परंतु भेटी परस्परें व्हाव्या. अथवा भेटीचे अग़ोदर किस्ती आदा होत, त्याप्रमाणें ठराव ज्यारी करावयाची तऱ्हा होऊन भेटी व्हाव्या; परंतु भेटीवेगळ खुलासा नाहीं. तेच वेळेस तहनामा साफ करावा, हा बोलण्याचा भाव. याजवर एक गोष्ट पुसली कीं, माझे पाठविण्याविशीं आणि पुढें ठराव व्हावा असें आपण लिहिलें याविशीं मी काय लिहावें? तुह्मांस पाठवून निभावणी होईल अशा किस्ती ठराव्या ह्मणजे काय? हजरतीचे मनांतील काय अर्थ? याचा खुलासा तर माझे लिहिण्यांत आला पाहिजे, याचें कसें लिहूं? किस्तींपैकीं कांहीं पुरवात हजरत करतील कीं नाहीं याचें कसें? केवळ शुष्क गोष्ट लिहिणें हें कसें त्यास वाटेल? तेव्हां नबाबानीं द्रिष्ट रोषाची करून बोलले कीं, अगोदर हें पत्र तर जाऊं द्यावें, व हें पत्र पोंहचून जाब आला नाहीं तों काय सांगावें? मर्जींत भास कांहींसा असा दिसला कीं, हें पत्र गेलियावर श्रीमंत व मदारुलमहाम ऐकतील, नंतर याची पकल पाहूं तशी काढूं. हे आजच आपलेकडून कां निकड करून पुसतात? असा मर्जीचा भाव डोळ्यावर दिसतांच मीही समेटून घेतलें कीं, जशी आज्ञा असेंच लिहितों. तेथून लिहिलें आलियावरच अर्ज करीन. सारांश प्रस्तुत कांहीं द्यावयाचें ध्यान दिसत नाहीं. निभाव होय अशा किस्ती ठरवून भेटींचें ठरवावें तेव्हां जे किस्त ठरेल ती आदा करतील. किस्ती तरी कशा किती दिवसांच्या हेंही बोलत नाहीं. मोघम बोलून चार दिवस ढकलावे. नंतर काय उत्तर येतें हें पहावें. मग यांची रवानगी करावी. हे जाऊन बोलतात तोंपावेतों घरचें मझेल्याचें कसें होतें हेंही पहावें. पुढें रदबदल किस्तीची घालीत बसावें. असें लांबणीवरचें ध्यान आहे. नबाबाचे पत्रावरून सर्व कळेल. आज्ञा येईल त्याप्रमाणें बोलण्यांत येईल. रा छ १७ रावल. हे विज्ञापना.

[२००] श्री. १ आक्टोबर १७९५.

विज्ञापना ऐसीजे---अलीज्याहप्रकरणीं नबाबास स्वामीनीं खरीता पाठविला तो दिल्हा. आज्ञेप्रमाणें बोलण्यांत आलें. नबाबानीं पत्र पाहून मागती मला दाखवून वाचूं लागले कीं, श्रीमंतांनीं अलीज्याह यांचे पत्राचा जाब पाठविला. त्यांत लिहिलें आहे कीं, तुह्मांविशीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचे जबाब आलियावर तुह्मांस आह्मीं सांगूं तें ऐकावें लागेल. इतका तकवा त्यांस कां दिल्हा येवढ्यावरच ते चढून जातील. दुसरें आह्मांस लिहिलें, सलाहाचे मार्गानें त्यांस समजावावें; न ऐकिल्यास फळ पावतील, ऐसें कां लिहितात. याचें उत्तर केलें कीं, दोस्ती आणि घरोबा ह्मणोन आपणास लिहिलें आहे, मुलापासून चूक झाली तर वडीलपणें आपण कृपा करावी, त्यांनीं चूक झाली याची क्षमा करून घ्यावी, अगर न ऐकिलें तर सजा पोहोंचवावयासी काय उशीर? तेव्हां बोलिले कीं, रघुनाथराव आह्मांशीं जाबसाल बोलत होते, तो न ऐकतां तुमची पास केली. बलके दौलतीचा अधिकार आमचे शास्त्राप्रमाणें बंधूस आहे. असें असतां आह्मीं त्याची पास केली नाहीं. तसेंच तुह्मीं आह्मांशीं चालावें. मीं उत्तर दिलें कीं, आपले शास्त्रांत कसें असेल तें असो; आमचे शास्त्रांत भावास अधिकार नाहीं. पुत्रासच अधिकार, हें एक. दुसरा प्रकार, रघुनाथराव यांनीं कर्म न करावयाचें तें केलें. तेव्हां त्यांचें मुख अवलोकन करूं नये, ऐसें समजूनच आपणही त्यांचा त्याग केला. याजवर नबाब बोलिले कीं, अलीज्याहनेंही असाच बेत केला होता, घडलें मात्र नाहीं, त्यांजकडून घडलें नाहीं इतकी सुर्खरोई आहे. क्षमापण आपण न केलियास जें फरमावितील तें खरें, श्रीमंतांनीं दूरंदेषीचे मार्गानें लिहिलें, फसाद लांबविणें मुनासब नाहीं, ज्याप्रकारें फंद मोडेल तें करावें, आपणाजवळ त्याची रदबदली करावी अशी कोणाची ताकद. श्रीमंतांस त्यांचीं पत्रें गेलीं, आपणास त्याविशीं लिहिणें हें श्रीमंतांस योग्य, दोंही दौलतींचा घरोब्याचा प्रकार ह्मणोन यांचे तजविजीचा कसा प्रकार करावा हें आपण त्यांस लिहिलें, त्यांनीं आपणास लिहिलें, ह्या चाली याच दौलतींतील. टिपू, इंग्रेज यांस

असें आपण लिहिणार नाहींत, तेही बोलणार नाहींत, मसलहतीचे आणि दूरंदेषीचे मार्ग आपण सांगतील तसेंच लिहिण्यांत येईल. नबाबाचें ह्मणणें कीं अलीज्याह यानें उठोन मजपाशीं यावें, तर त्याचें संरक्षण करीन, नाहींतर पारिपत्य. तुह्माकडे आला तर तुह्मीं धरून द्यावें. याप्रमाणें बोलणें. पत्राचा जाब मागतेवेळेस काय सांगतील त्याप्रमाणें मागाहून लिहून पाठवीन. रा छ १७ रावल. हे विज्ञापना.

---

[२०१] श्री. १ आक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे—अलीज्याह छ १२ रावल शनवारीं बेदराहून निघोन गेले. हें वर्तमान आलें तेच वेळेस सेवेसीं लिहून पाठविलें. नबाबानीं सायंकाळीं बोलाविलें. गेलों. खिलवतींत बसून वर्तमान सांगितलें. कोणते रुखानें कोणीकडे गेले हें पुसल्यावर ह्मणाले, जनवाड्याकडे गेले इतकेंच वर्तमान आलें, याजउपर पत्रें आलियावर कळेल. ऐसें ह्मणोन सांगितलें कीं तुह्मांस श्रीमंतांकडे पाठवावयाचा बेत पूर्वींच करून श्रीमंतांचे पत्रांत लिहिलें आहे. त्याचा जाब येऊन रवानगी करण्याचा बेत होता. प्रस्तुत असा बेत ठरविला आहे कीं, तुह्मीं मीरआलम यास घेऊन जावें. रघोत्तमरावही तुह्मांबरोबर येतील. यांत दोन तीन कामें. एक तर किस्तीचा ठराव आह्मांकडून निभाव होईल असा करावा. दुसरा प्रकार, भेटीचा ठराव. तिसरा प्रकार, अलीज्याह तिकडे आलियास त्यास धरून द्यावें. त्यास उदईक तुह्मीं पत्रें पाठवावीं. नाकेबंदी करावी. मीरआलम यांस फौजेंत पाठविलें होतें. त्यांची रवानगी तुह्मांबरोबर करावयाची. तेव्हां फौजेंत कोणी पाहिजे. याजकरितां शिकंदरज्याह याचे रवानगीचा निश्चय केला. तुह्मी तयारी करावी ह्मणोन बोलले. मीं ह्मटलें कीं श्रीमंतांस लिहून पाठवून आज्ञा आली ह्मणजे निरोप घेईन. इतका अवकाश नाहीं. आजच तुमची रवानगी करावी ऐसा बेत; परंतु शिकंदरज्याह यांचा मुहूर्त दों तिहीं दिवसांत काढविला आहे. इतकाच अवकाश. त्यांजबरोबर तुह्मीं

निघावें. मीरअलम यांची गांठ पडलियावर त्यांजबराबरची फौज याज-पाशीं राहील. तुह्मीं मीरअलम मिळोन पुढें जावें. तेव्हां ह्मटलें कीं, श्रीमंतांची आज्ञा आली नाहीं, आणि मी निघालों तर शब्द येईल. तेव्हां बोलिले कीं, जाब येण्याची हरकत घातलीत तेव्हां आमची दौलत-खाही तुह्मांस मंजूर नाहीं ऐसें वाटतें, दोंही दौलतींची दोस्ती कायम राहून मजबुती असावी ह्मणोन तुह्मांस जा ह्मणतों, श्रीमंत शब्द ठेवणार नाहींत, आह्मीं त्यांस लिहून पाठवितों. ह्मणून मुनशी बोलावून पत्र लिहावयाचा मतलब सांगितला. मीरअलम यांची रवानगी करावी, मी मागाहून गेलीयास कसें? तुह्मी ते बरोबर गेलियाविगळ आमची खातरजमा नाहीं. आमची मर्जी तोडून रहावयाचें असलियास रहावें. ऐशी आज्ञा केलियावर लाचार. तेव्हां विनंति केली कीं सरकारांत तालुका देणें तो पुर्ता आला नाहीं वगैरे कामें होणें, हीं करून देऊन रवानगी करावयाची मर्जी किंवा कसें? राजे रेणूराव यांस सांगितलें कीं तुह्मी व हे बसून निश्चय करून मला सांगावें. पैक्याविगळ काय असेल तें उलगड्यांत आणावें. पैक्याची बाबत ठरावांत यावयाची ती तेथेंच ठराव करून पाठवितील. आणखीं बोललों कीं मीरअलम येथून दहा बारा कोस असतील, त्यांस बोलावूं पाठवावें, त्यांची माझी एकवाक्यता करून काय बोलावयाचें तें खचित सांगावें. कारण एखादा मुकदमा असा येऊन पडतो कीं इत-ल्याची फुरसत नाहीं, तेसमयीं मीरअलम बोलूं लागतील, आमचे त्यांचें मिळणार नाहीं, आपण निरोप मीरसाहेबाकडे पाठवून परभारेंच त्यांची रवानगी केलियास मला काय इरषाद जाला हें त्यांस समजणार नाहीं, त्यांचें मला कळणार नाहीं, याजकरितां समक्ष बोलावून एकवाक्यता करून घ्यावी ह्मणजे नीट. तेव्हां बोलिले कीं, उत्तम, त्यास बोलावूं पाठवितों. याप्रमाणें जालें. त्यास आज उद्यां इतकियांत मीरअलम येतील. याजवर अधिक ओढून धरल्यास यास संशय; आणि कार्यही कांहीं होत नाहीं ह्मणून मान्य केलें. तालुका लाऊन घेणें वगैरे कामें यातून जें होईल तें करून घेऊन येतों. स्वामीचें नांवें या माराचें पत्र लिहविलें. मजपाशीं आलें नाहीं. आलियावर रवानगी करीन. आज

परियंत जाला मार लिहिला. पुढें होईल तें लिहून पाठवीन. ता छ १७ रावल. हे विज्ञापना.

नबाब निजाम अलीखां बहादुर यांजला श्रीमंतांचा खरितापत्र छ २३ मोहरमीं किस्तीचा ऐवज देण्याविशीं आलें. त्याचा जाब नबाबाकडून श्रीमंतांस खरीतापत्र छ १७ रावल डांकेवरून रवाना केलें, त्याची पारशी नक्कल.

येथें पारशी नक्कल.

छ २० रावल मु॥ भागानगर, रवाना टप्यावर.

[२०२] श्री. ४ आक्टोबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंति विज्ञापना ता छ २० माहे रावलपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामींचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिली आहे. अवलोकनें ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

[२०३] श्री. ४ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना—अलीज्याह बहादूर बेदरचे किल्यांतून सदाशिव रड्डी व नाजमन्मुलुक व गालबजंग वगैरे सरदार व जमीयत फौज पायदळसहित छ १२ रावलीं निघाले, ते जनवाड्याचे रस्त्यानें वांजरा किनारियानें गेले. समागमें बेदरांतील पांच तोफा व कांहीं रेहकले, बारुद वगैरे सरंजाम स्वारीसमागमें निघावयाचा तो घेऊन कूच केलें. पयेदळचे लोक व एक जमातदार किल्यांत ठेविला होता. मुसारेमु व घाशीमिया अजमखान वगैरे नबाबाकडील सरदार जमीयतसुद्धां किल्याचे शहावर बाहेर होते. त्यांस समजल्यानंतर मुसारेमूची लयेन किल्याचे बंदोबस्ताकरितां पाठविली. लयेन किल्यांत दाखल होण्यापूर्वी

अलीज्याह यांजकडील जमातदार पयेदळ लोकसुद्धां मागें राहिला होता तो निघोन गेला. मुसारेमूकडील लयेन किल्यांत जाऊन बंदोबस्त किल्याचा जाला. याचें वर्तमान पागावाले व मुसारेमू आदिकरून सरदारांच्या अर्ज्या नबाबास आल्या. किल्ला बाहेरचा फत्ते जाला याच्या खुषीच्या नजरा केल्या. तमाम सरदार मनसबदार मुत्सद्दी यांनीं केल्या. एक दोन दिवस नजरांचेंच प्रकरण होतें. रा छ २० रावल. हे विज्ञापना.

---

[२०४] श्री. ४ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना—अलीज्याह बहादूर बेदराहून निघोन जनवाड्याचे मार्गें आवरादतडखेलचे घुमारें कौलास बाजूस सोडून खंदाराकडे गेले. तेथील किल्लेदार तेजशिंगाचा पुत्र कुंवरबिजेसिंग त्यांजला दोन तीन हजार जमीयतसुद्धां षामील जाला. हें एक वर्तमान. दुसरें चंदापूर डोंगरीचे मार्गें सांखाले मुरुग तालुक उदगीर ह्या जिल्ह्यांत वंजरातीरानें फौजसुद्धां गेल्याचेंही वर्तमान आहे. खचित समजण्यांत येईल त्याची विनंति मागाहून लिहीन. खंदारचा रुख हें खचित. पुढें पहावें. रा छ २० रावल. हे विज्ञापना.

---

[२०५] श्री.

विनंति विज्ञापना—अलीज्याह बाहादूर बेदराहून निघोन गेले तेचसमयीं, मुसारेमू व पागावाले वगैरेइकडील सरदारांनीं ताकुब करावयाचा होता, तें न केलें. यावरून नबाबाचे चित्तांत सरदारांविषयीं रुष्टता व खफगी आहे. सरदार कोणी कोणांत नाहींत. एकाचे हुकुमानें वागणें एकास होईना. याजकरितां शिकंदरज्याह मीरपोलाद अलीसाहेब जादे यांची रवानगी केली असतां सरदार सर्व हुकुमाप्रमाणें राहातील, हें नबाबांनीं मनांत आणून शिकंदरज्याह यास आपली तयारी असों द्यावी हे ताकीद केली. सरदारांसही इनायतनामे पिछा करण्याविषयीं रवाना झाले आहेत. सरदार बेदरावर अलीज्याह यांशीं त्यांशीं फासक लांब

पडला. याजवर जें होईल व येईल वर्तमान त्यांनीं विनंति लिहीन. अजमखान व घाशीमिया पाठलागास बेदरापासून कोसभर गेले, तेथें अलीज्याह यांजकडून मला मनुष्य निघोन आला. त्यानें यांस सांगितलें' जे, पांच सहा हजार फौज, दहा बारा पैदळ इतका सरंजाम व तोफा आठ नऊ लैयनी याप्रमाणें मजबुतीनें आहेत. इतकेंही निवडक आहे. गाळ नाहीं. सर्वांचा एका होऊन शफत जाल्या. मरणाचा संकल्प करून संभाळून जातात. हें वर्तमान उभयतांनीं ऐकून विचार केला जे, आमचेजवळ मलक इसा मिळोन फार तर चार हजार फौज होईल. तोफ जंबुदा घेतल्याशिवाय जाणें ठीक नाहीं. ते मरणावर टेंकले आहेत. तेव्हां मजबूत असलें पाहिजे. त्यास मुसारेमूच्या लैना निवडक. कांहीं लैनी जंबुदे घेऊन जावें, ह्मणोन बेदरास येऊन मुसारेमूस विचार पुसला. तो ह्मणाला तुह्मीं आपली फौज घेऊन पिछा करावा. मला नबाबाचा हुकूम येईल तसें करीन. तेव्हां हे उगेच राहून यांनीं नबाबास अर्ज्या पाठवून वर्तमान लिहिलें कीं, फौज थोडी गाडद व आणखी फौज असावी तर निभाव होईल, याविशीं मुसारेमूस आज्ञा यावी. मुसारेमूनें लिहिलें कीं, पागावाले वगैरे पाठलागास दौड करून गेले नाहींत. मला हुकूम येईल तसें करीन. त्याजवरून नबाब पागेवाले वगैरेवर रागें भरून शिव्यागाळी केल्या. आंतील कर्म समजून आज्ञा जाली नाहीं. त्यांचे पत्राचीं उत्तरें लिहविलीं कीं, जमीयत थोडी ऐसें आतां लिहितां," इतके दिवस कां न लिहिलें. टाळा देतां हें कार्यास येणार नाहीं. दौड करावी. मुसारेमूसुद्धां होते ह्मणोन बोभाट आजपरियंत लिहिला नाहीं. मुसारेमू वेगळा. जाण्यास फौज कमी. ऐसें त्यांचें लिहिणें. याचा विचारच नाहीं. खाविंदीचे मार्गें रागें भरून आज्ञा गेली. याप्रमाणें वर्तमान. रा छ २० रावल. हे विज्ञापना.

---

[२०६] श्री. ४ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना—मीर इमाम सुगुरवाल्याकडील जमीयतसुद्धां घनपुऱ्याची झाडी धरून आहे. आसद आलीखान यांनीं मीर आलम

यास धरलें ह्मणून वर्तमान उठलें होतें. परंतु तें गलत. मीर इमाम लोकसुद्धां धनपुऱ्यानजीक आहे. आसद आलीखान तांडुरावर आपले लोकसुद्धां आहे. व्यंकटराव मुरापुरकर कुहिरावर लोकापल्लीस नारायणपेंठसुद्धां ठाणीं व्यंकटराव यांचीं गुटमटकलेस ठाणें दखल नाहीं. आसदआलीखानाच्या पुत्राकडे आहे. पेशजी भालकी, हूलसूर, निलंगें, आळंद, गुंजोडी पावेतों अलीज्याह यांजकडील ठाणीं होतीं. बेदरावर मुसारेमू वगैरे सरदार आल्यानंतर ठाणें त्यातींतील लोक आपल्याजवळ बोलावून जमीयत एकत्र केली. गालबजंग संगारडी वगैरे फौजसुद्धां देगलूर वरवाल, साडबाड यारुखें गेले होते, ते तिकडे त्यांनीं धामधुम तालुक्यांत करून कोंडलवाडीचे पेटेसुद्धां लुटून तेही बेदरावर मिळाले. तेंव्हां तालुक्यांतील ठाणीं अलीज्याह यांजकडील उठोन आली. नबाबाकडील अमीलांनीं दखल केलें. हल्लीं अलीज्याह यांचें जाणें ज्या रुखें तिकडे ठाण्याची गलबल जाली. रा। छ २० रावल हे विज्ञापना.

---

[२०७] श्री. ४ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना—मीर अलम नबाबाची रुखसत घेऊन इंग्रजी पलटणें आबाडीस यांचे निघण्यापूर्वीं दरगाहा पुढें जाऊन उतरलीं होतीं. तेहे येकल होऊन पट्टणचरूच्या पुढें नाक पाहून राहिले. त्याजवर अलीज्याह बेदरावर जमीयतसुद्धां निघून गेले. याच्या अर्ज्या सरदारांकडील आल्या. नबाबांनीं पाहून मीर अलम यांजकडे पाठविल्या. मीर अलम दोन पलटणें इंग्रजी व तीन हजार सवार तैनातीसुद्धां त्याच जागीं मुकाम करून आहेत. नबाबांनीं बोलाविलेंही आहे. अद्याप बोलाविलें नाहीं. आह्मांस मीर अलमास लवकर रुखसत करणार होते. अलीज्याह यांचा रुख खंदाराकडे, हें वर्तमान आलियापासून आमचें त्यांचें रवानगीचें स्थिर आहे. शिकंदरज्याह यांचा मुहूर्तही अद्याप निघाला नाहीं. अलीज्याहचा रुख जसा दृष्टीस पडेल तसें करणार. मुसारेमू यांचे विद्यमानें सदाशिव रड्डी यांचें राजकारणाचें बोलणें नबाबांनीं कांहीं मान्य केलें. जाब गेला. त्यांचें उत्तर सामजे तोंपावेतों

मुसारेमूस बेदराहून पुढें जावयास हुकूम नाहीं. याप्रमाणें स्तब्ध आहेत. रा छ २० रावल. हे विज्ञापना.

छ २१ रावल, मु॥ भागानगर
रवाना टप्यावर सोमवार.

[२०८] श्री. ९ आक्टोबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २१ रावलपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. येथील वर्तमान लिहून पेशजी टपा रवाना केला त्याजवरून ध्यानांत आलेंच असेल. हालींचें वर्तमान अलाहिदा पुरवणी पत्रावरून ध्यानास येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

[२०९] श्री. ९ अक्टोबर १७९५.

विज्ञापना ऐशीजे—अलीज्याह बेदराहून निघणार ऐशीं वर्तमानें नबाबाकडे आलीं होतीं. ते वेळेस नबाबाचे मनांत येथपावेतों गोष्ट आली, तेव्हां काय बाकी राहिली? जरब दिली ह्मणजे काय पाहिजे तसें ऐकेल. कदाचित् निघोन जाऊं लागल्यास मारून घेऊं. तेव्हां अलीज्याह आपली जमीयत आहे तितक्यानिशीं निघोन मजबुतीनें गेले. नबाबाकडील जमेयत मुसारेमूसुद्धां पाठलाग करते तर ठीक होतें. तेंही न जालें. निघोन जाऊन पंतप्रधानाचे आश्रयास गेलियावर ठीक नाहीं. मग कठीण होईल. या विचारांत पडून आह्मांस बोलावून सांगितलें जे, शिकंदरज्याह यास बाहेर काढतों, तुह्मीं व मीरअलम मिळोन पुणियास जावें. दोन दिवस याजप्रमाणेंच गुलबांग होता. मीर आलम यांस नबाबानीं लिहून पाठविलें कीं, तुह्मीं पटणचरूसच मुकाम करून असावें. शिकंदरज्याह निघतात त्यांजबरोबर तुह्मीं आपली फौज देऊन तुह्मीं आणि फलाणें पुणियास जावें. त्याजवर आणखीं वर्तमान आलें कीं, अलीज्याह बेदराहून दहा पंधरा कोशीं आहेत. दरकुच गेले नाहींत. हालूखाचा जाबसालही त्यांजकडून आहे. जोंपरियंत जाबसालाचा

शेवट समजत नाहीं. तोंपावेतों त्याच मैदानांत असावें. कोठें जाऊं नये. कांहीं होत नाहीं. ऐसें जालियावर ईश्वर बुद्धि देईल तें करूं. ऐसें वर्तमान नबाबाकडे आलें. त्याजवरून मलक इसाखान यास नबाबानीं बेदरास पाठविलें कीं तुह्मीं आपल्याकडून कोणी पाठवून काय बोलतात, कसें आहे हें समजून लिहून पाठवावें. कांहीं जाबसालाचें जमल्यास समेट करावा. बहकून जाऊं देऊं नये. ऐसें आतां नबाबाचे मनांत आलें. पंतप्रधान यांजकडे जावयाचा रुख अद्याप नाहीं, जाबसाल लागला आहे, त्याअर्थीं शिकंदरज्याह यास आतांशींच बाहेर काढूं नये. आमची रवानगीही पुण्यास त्वरेनें न करावी. अलीज्याह यांचा समेट जालियावर जाबसाल ठरवावयाकरितां सावकाश पाठवावयाशीं येईल. याप्रमाणें निश्चय होऊन मीर अलम यांस पत्रें गेलीं कीं, तुह्मीं पटणच-राहून कुच करून बेदरास जावें, मलक इसाखान यास पुढें पाठविलें, ते सांगतील तें ऐकून तसें करावें, आणि वरचेवर आह्मांकडे लिहून पाठवावें. त्याजवरून मीर अलम बेदरास गेले. आमचे रवानगीचें तूर्त राहिलें. नबाबानीं यांतील कांहीं सांगितलें नाहीं. तुह्मांस दोन तीन दिवसांचे आरशांत रवाना करतों ऐसें ह्मटलें होतें. परंतु अमुक कारणामुळें स्थित जालें ऐसें सांगितलें नाहीं. खचित बातमी समजली त्याजवरून लिहिलें असे. पुढें होत जाईल तें लिहून पाठवीन. रा छ २१ रावल. हे विज्ञापना.

---

[२१०] श्री. ९ आक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे—अजमखान यांच्या चुगल्या नाना प्रकारच्या नबाबाजवळ सांगणारांनीं सांगितल्याचा तपशील फार आहे. कोठपरियंत लिहावा? प्रस्तुत त्याचा संशय नबाबाचे मनांत फार आला. याजकरितां त्यास लिहून पाठविलें आहे जे, तुह्मी आपली जमेयत व पुत्र देअळी घासीमियापाशीं ठेऊन एकटे हुजूर लवकर यावें. येथें आलियावर त्यास कैद करावें ऐसा मनसुबा केला. मसलतीनें पाहतां त्यांचे पुत्र व फौज तेथें कार्यावर ठेऊन त्यास येथें

आणून असें करतीलसें वाटत नाहीं. परंतु समयाचा रंग विचित्र! सिद्दीइमामखान याजकडे दोष नसतां आबरो घेतली. असेंच हें जालियास कां न व्हावें? अजमखान याचें ह्मणणें आह्मांपाशीं कीं दोस्ती स्वर्गलोकीं कामास पडत नाहीं, आह्मीं बोललों त्यांत कसूर आह्मांकडून श्रीमंतांचे आज्ञेस जाला नाहीं, आणि नबाब बंदगानअल्ली यांचे दौलतीस वाईट केलें नाहीं, श्रीमंतांस आमची पास आहे कीं नाहीं, तुह्मीं तेच आहा किंवा विसरलेत, नबाबाची श्रीमंतांची दौलतखाही तें करावें असेंच केलें, परंतु जमाना विचित्र, आमचे उपयोगीं यावेळेस पडाल कीं नाहीं? तुमचे भरवंशियावर आहों. ऐसा निरोप आला. त्याचें उत्तर त्यास लपेटवा दिलें. सरकारची मर्जी आतां कशी आहे याचा अभिप्राय समजत नाहीं, तेव्हां खातरजमेनें काय बोलावें, या संशयांत, ह्मणून साफ बोललों नाहीं. पहिले आश्वासनाचा फार भरंवसा मानून आहेत. त्याशीं कसें बोलावें याची आज्ञा आली पाहिजे. डोळे चोरले असतां पत जाते. मोठे अडचणींत. यास्तव लिहिलें आहे. जशी आज्ञा तसें करीन. रा। छ २१ रावल. हे विज्ञापना.

छ ३० रावल मु॥ भागानगर,
रवाना टप्यावर.

[२११] श्री. १४ आक्टोबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता। छ ३० माहे रावलपरियंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीकडील आज्ञापत्रें छ १९ जिल्हेजचीं छ २३ मोहरमीं व छ २० माहे सफरचें छ ३ रावलीं प्रविष्ट जालीं.

१. नबाब निजामअल्लीखान बहादूर यांजकडून करारापैकीं पहिले हप्त्याचा ऐवज अखेरसालीं यावयाचा तो अद्याप येत नाहीं.

येविशीं बोलून ऐवज सत्वर सरकारांत पोंहोचते करणें ह्मणून आज्ञा. त्यास हा मजकूर नबाबाशीं आज्ञेप्रों बोलण्यांत आला. उत्तर जालें कीं, कारमदारांत तफावत काय, लेकिन तालुक्याची अमदनी मझेल्यामुळें बंद आणि खर्च ज्याजती वाढत जातो, खर्च तोडून आमदनीवर सबील करावी. तो प्रकार राहिला, त्या किस्ती अशा ठरून याव्या कीं, त्यांत निभाव व ऐवज आदा होय. इत्यादिक बोलण्याचे अन्वयें तपशील गोविंदराव भगवंत यांस लिहिला. विनंति करितां ध्यानांत येईल. किस्तीविशीं सरकारचा खरीता दिल्हा. उत्तर अलाहिदा कलम.

१. नबाबाकडून कराराप्रों पहिले हप्त्याचा ऐवज आला नाहीं, यास्तव नबाबास सरकारांतून थैलीपत्र पाठविलें आहे, तुमचे विचारें द्यावयाचें जाल्यास देणें, ह्मणून आज्ञा. त्यास, सरकारचें थैलीपत्र नबाबास प्रविष्ट केलें. त्याचा जबाब यांनीं दिल्हा तो विनंतिपत्रासाहित पेशजी सेवेसीं रवाना केला. त्यावरून ध्यानास आलें असेल. कलम.

१. नबाबाकडून जागीर कराराप्रमाणें यावयाची, त्याच्या सनदा व महालचा पट नबाबाकडून तुह्मीं आणिला, त्याची चौकशी करितां पा। हरदापूर व रेणापूर हे दोन्ही द्यावयाचे नाहींत, व कोठें कोठें तनखा जास्त व बेरजेत चूक मिळोन एक लक्ष तीस हजार येकूणतीस रुपये पांच आणे बाकी निघाली, पट अलाहिदा पाठविला आहे, नबाबाशीं बोलून परबाणी महलया बेरजेचा लाऊन घेऊन सनद हुजूर पाठवणें, ह्मणून आज्ञा. त्यास सदरहू बेरजेचा तालुका परबाणी हा महाल सरकारांत द्यावा हें याशीं बोलण्यांत आलें. सरकारचा पट आल्यानंतर मवाज्या करून तालुका लाऊन घ्यावयाचा येविशीं ता। गोविंदराव भगवंत यास लिहिलें आहे. विनंति करतील. परबाणी रोषनखान याजकडे आहे. दुसरा मुबादला द्यावा ऐसें नबाबाचें ह्मणणें. मागाहून तपशील लिहितों. कलम.

१. अलीज्याह बहादूर निघून गेले, सदाशिव रड्डी वगैरेनीं फिसाद केला, याची तजवीज आपले सलाहास काय आली? दोन्ही दौलतीचे स्नेहभाव कैलासवासी नाना साहेबापासोन पुरंदरपावतों विस्तारें तुह्मासीं नबाब बोलले तो ता। लिहिला. त्यास दोन्ही दौलती एक; ऐक्यतेचा उपयोग समजोन वडिलापासोन पूर्व चालीवर नजर देऊन स्नेहांत दुसरा प्रकार न घडला व घडावयाचा नाहीं, तिकडील मात्र कायमी असावी, खर्ड्यावर करार ठरल्याप्रमाणें पैक्यांचा मार्ग व राहिलीं कलमें अमलांत येत नाहींत, दोस्ती व स्नेहांत अंतर नाहीं, असें नबाब लिहितात, ता। राजश्री बाळाजी जनार्दन यांस आज्ञा केली ते लिहितील याप्रमाणें तुह्मीं नबाबाशीं बोलून कराराप्रमाणें फडचे लौकर होत तें करावें. अलीजाह प्रकरणीं समेट व्हावा, नबाबाचे पत्राचे जाब पाठविले ते पावते करून उत्तर घेऊन पाठवणें, ह्मणून आज्ञा. त्यास जाब पावते केले. करारांत अंतर यावयाचें नाहीं, मगर निभावून घेतल्या फडचा होत जाईल, असें नबाब बोलिले. पेशजी सरकारचें पत्र नबाबांस आलें त्यासुद्धां जाब नबाबांनीं दिल्हा तो छ १७ रावलीं खरीता सेवेशीं रवाना केला आहे. त्याजवरून ध्यानांत आलेंच असेल. हल्लीं राजश्री गोविंदराव भगवंत यांस लिहिलें आहे. विनंति करतील. कलम

चार कलमें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[२१२] श्री. १४ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. अलीज्याहबहादूर जमीयतसुद्धां तालुके मरुग पा। उदगीर या जिल्ह्यांत सदाशिव रड्डी व नाजमन्मुल्क वगैरेसहित आहेत. मीरअलम इंग्रजी पलटणासमवेत बेदरास दाखल होऊन तेथून मुसारेमू व घाशीमिया वगैरे सरदार पुढें कूच करून मैलारास गेले. त्यांत पामील झाले. ताकुब करून आलीज्याह यांस गाठावें असा

हुकूम. परंतु नदी वांजरेस पाणी बहुत, याजकरितां उतरून जाण्याची अडचण व पाऊसही तिकडे. यास्तव विचारांत आहे. त्यांजकडे बोलणें चालणेंही जारी आहे. त्यांजकडून कोणी गृहस्थ सरदारांकडे येऊन गेले. इसामिया नबाबाकडे येऊन येथून तिकडे मागती गेले. बोलण्याचा नाद लागला आहे. पुढें काय ठरतें हें वर्तमान येईल त्या प्रो विनंति लिहीन. अलीज्याह याजकडील लोकांनीं उदगीर वगैरे तालुक्यांत कित्येक जागीं ठाणीं बसवून ताख्तताराजी मांडली. सजावारुद्दौलाशीं व त्याचे लोकाशीं कांहींशी लढाईही होऊन सजावारुद्दौलांनीं शें पन्नास घोडीं आणलीं होतीं तीं त्यांनीं कूटबाजी करून घोडीं सोडवून नेलीं, असें वर्तमान आलें. पुढें होईल त्याची विनंति लिहिण्यांत येईल रा छ ३० रावल. हे विज्ञापना.

---

[२१३] श्री. १४ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना.—इंग्रज व फराशीस यांची लढाई विलायतेमध्यें भारी झाली. याचा बयान नबाबांनींही स्वमुखें केला कीं, टोपीवाल्यांत परस्परें कटकट कजीया किती दिवसांपासून सुरू, लेकिन रोज बरोज अधिकच सुलगत चालली आहे, जमीयत सरंजाम दोहीकडीलही भारी व मजबूत, इंग्रजांकडे रूसवाल्याची मदत, फराशिसास रूमवाल्याची कुमक, इंग्रज व फराशीस यांचे लढाईत इकडील चार साडेचार लक्ष व तिकडीलही तशीच जमीयत उभी राहून एक एक लढाईत तीस पस्तीस हजार मनुष्यें ठार जखमी, ह्या लढाया व असा कजीया पहाण्यांत आला नाहीं, टोपीवाल्यांच्या लढाया जहाजांच्या होत असतात, त्याचा बयान काय करावा, जहाजांत जमीयत व तोफा बारुत जंगी सामान, दोहीकडेही सारखी लढाई तरीतील, अशी कीं जहाजांचीं जहाजें बुडवितात. याप्रो घटकाभर विस्मयापन्न होऊन बयान करण्यांत आला. रा छ ३० रावल. हे विज्ञापना.

छ ३ राखर मुा भागानगर
रवाना टप्यावर.

[२१४] श्री. १७ आक्टोबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंति, सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंति विज्ञापना ताा छ ३ माहे राखरपर्यंत मुा भागानगर येथें स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी केली, त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

[२१५] श्री. १७ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याह बहादूर जमीयतसुद्धां उदगीर तालुक्यांत होते. तेथून कुचदरकुच कसबे रेणापुरानजीक मौजे मोटेगांव पाा बरदापूर येथें गेले, याप्रमाणें वर्तमान आहे. मुसारेमू व घासीमिया वगैरे सरदार मातांबऱ्यानजीक शिवणीकशीनें येथें वंजरा ऐलतीरीं आहेत. मीरअलम इंग्रजी पलटणासमवेत जाऊन षामील झाले. वंजरा नदीस पाणी, सबब उतरून जाण्याचा अटकाव, याची तजवीज होत आहे. अलीज्याह जमीयतसुद्धां बरदापूर तालुक्यांत, त्यांशीं याशीं फासक तीस बत्तीस कोसांचा. याप्रमाणें वर्तमान आलें, पुढें होईल त्याची विनंति लिहिण्यांत येईल. बरदापूर तालुकियांतून धारारूस अलीज्याह जाणार ऐशी वार्ता आहे. तिकडील तालुक्यांत ठाणीं बसवून धामधूम व हंगामा याचे बोभाट येतात. स्वार पयेदळ मिळोन जमीयत वीस हजारपावेतों अलीज्याह यांजपाशीं. याप्रमाणें खबर आहे. राा छ ३ राखर हे विज्ञापना.

---

[२१६] श्री. १७ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. मोगल अली हूमायूज्याह बेदरचे किल्ल्यांत कैदेंत होते, त्यांजला हैदराबादेस घेऊन येण्याकरितां नबाबांनीं शेख उमरखान यास बेदरास समागमें पालख्या, रथ, म्याने वगैरे सरंजाम देऊन पाठविलें. खानमजकूर तेथें पोंहचून मोगल अली त्याचे मुलें माणसांसुद्धां घेऊन हैदराबादेस आले. त्यास इस्तकहाल मीर घोकद-अली शिकंदरज्याह साहेबजादे यांस पाठविलें. छ ३० रावल बुध-वारीं मोगल अलीज्याह यांची मुलाजमत जाली. प्रथम दर्शनीं मोगल-अली नबाबापाशीं येतांच कदमबोस झाले. तेसमयीं नबाबास व त्यांस उभयतांसही प्रेम व अश्रुपात क्षणभर होऊन मोगलअली यांनीं पांच पुत्रांसहित नजर केली. नबाबांनीं जवाहीर मोत्याच्या कंठ्या तीन व जिगा, कलगी, सरपेच, तुरा, भुजबंद, दस्तबंद वगैरे अकरा आदाब इनायत केले. हुमायून-ज्याह यास पेशजी गोलकुंड्यास पाठ-विलें होते, तेसमयीं त्यांचें जवाहीर वगैरे सरंजाम आणून जवाहीरखान्यांत दाखल केला होता. तें जवाहीर सांप्रत त्यास इनायत झालें, ऐशीही बोलवा आहे. दोनतीन घटका एकांतीं त्यांशीं बोलणें होऊन भोजन एकत्र झालें. रुखसत दिली. त्यांची हवेली पेशजी रहावयाची झाडून अगोदर नीट करविली होती. त्याजागीं जनान्यासुद्धां जाऊन रा-हिले. फकीर फुकरायांस खैरात करण्याकरितां नबाबांनीं ऐवज त्यांचकडे पाठविला. त्याची खैरात झाली. रा छ २ राखर. हे विज्ञापना.

---

[२१७] श्री. १७ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. घनपुऱ्याचा किल्ला मीर इमाम यानें पेशजी घेऊन शिबंदी ठेविली होती. असदअलीखान त्या किल्ल्यास जमीयतसुद्धां लागून घनपुऱ्याचा किल्ला घेतला. रुकमारड्डी व रामरड्डी वगैरे चार जमीदार कोसगी, कांडगल, तांडूर वगैरे महालचे, यास कौल देऊन

असद अल्लीखान याणीं आणिलें. त्याजला कैद करून खान मजकूर जमीदारांस समागमें घेऊन हजार स्वारसुद्धां निघोन हैदराबादेस छ १ राखरीं आले. नबाबाची मुलाजमत झाली. जमीदार हस्तगत केले. यावरून असद अल्लीखान याजवर मर्जी संतोष झाली. मुलाजमतीचे समयीं कंठी व सरपेच इनायत केला, असद अल्लीखान यास जमीयतसुद्धां अलीज्याह यांचे ताकुबावर रवाना करावें याचाही विचार होत आहे. होईल त्याची विनंति लिहिण्यांत येईल. रा छ ३ माहे राखर. हे विज्ञापना.

---

[२१८] श्री. १७ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. अलीज्याह बहादूर याणीं वऱ्हाड प्रांतीं कोणी आपल्याकडील सरदार जमीयतसुद्धां पाठवून ठाणीं बसवावयाचें सांगितलें. त्याप्रमाणें सरदार जमावसुद्धां वऱ्हाडचे तालुक्यांत जाऊन कित्येक ठाणीं घेतलीं, व हंगामा शुरु केला. याचे बोभाट जागीरदार व आमिलाकडून नबाबाडे आले. त्यावरून तमाम जागीरदारास व वजीरखान वगैरे त्या प्रांतीचे सरदारांस इनायतनामे रवाना व्हावयास तयार झाले कीं, सर्वत्रानीं एकत्र होऊन अलीज्याहकडून कोण ठाणीं बसवावयास आला त्याचा दखल न होतां तंबी करावी. याप्रमाणें पत्रें तयार झालीं. राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांसही पत्र तयार झालें आहे कीं इकडील सरदारांशीं तुह्मांकडील जमीयत अनुकूल होऊन एक विचारें बंदोबस्त करावा. रा छ ३ राखर हे विज्ञापना.

---

[२१९] श्री. १७ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. इसामिया नबाबाकडे बेदराहून अलीज्याह कुच करून गेले, तेसमयीं येऊन वर्तमान सांगितलें. अलीज्याह यांजकडील व सदाशिवरड्डीकडील कोणी बोलावयास आले होते, त्यांचाही मजकूर नबाबाशीं बोलून येथून नबाबांनीं मागतीं इसामिया यास तिकडे रवाना

केलें, मुसारेमू वगैरे सरदार ज्या जागीं तेथें इसामिया गेले. तिकडील बोलणार कोणी आले, त्यांशीं यांशीं बोलणें होऊन अलीज्याह यांनीं इसामियास येण्याविषयीं सांगोन पाठविलें. त्यावरून इसामिया पन्नास स्वारसुद्धां अलीज्याह यांचे लष्करांत गेले. त्यांनीं इसामियास अटकाविलें ह्मणून वर्तमान आहे. तथ्य खबर अद्याप कळली नाहीं. समजलियावर लिहीन. रा॥ छ ३ राखर. हे विज्ञापना.

---

[२२०] श्री. १७ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याह धारुरा अलीकडे चार कोसांवर मुक्काम करून आहेत. मुसारेमू वगैरे सरदार यांत मीरअलम इंग्रजी पलटणासुद्धां छ २९ रावलीं दाखल झाले. हे पोंहोंचल्यानंतर एकत्र होऊन कुच झालें. शिवणी कशीन्यापाशीं वजरा नदी पार होऊन मुसारेमू वगैरे सरदार मीरअलमसुद्धां गेले. अलीज्याह याशीं व मुसारेमू वगैरे फौजेशीं फासक तीस कोसांचा आहे. याप्रों तहकीक वर्तमान. छ २ राखरीं आलें. छ ३ राखर. हे विज्ञापना.

छ ६ राखर मु॥ भागानगर
रवाना टप्यावर.

[२२१] श्री. २० आक्टोबर १७९९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीं :—

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. ता॥ छ ६ माहे राखरपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान पेशजी पत्राची रवानगी डांकेवर केली त्यावरून ध्यानास आलें असेल. सांप्रत येथील वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[२२२] श्री. २० आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. अलीजाहबहादूर रेणापूर बरदापूर तालुकियांतून जमीयतसुद्धां धारूरचे घाटास जाऊन घाट उतरून खालीं गेले, याप्रों वर्तमान आलें: घाट उतरतेसमयीं रखवालीस नबाबाकडील किल्लेदाराचे लोक शेंपन्नास होते, त्याजवर तरवार चालली. तोडातोड करून लोक ठार जखमी झाले. घाट उतरून बीडप्रांतीं गेल्याचें वर्तमान. पुढें कोणीकडे जातात पहावें. मीरअल्लम इंग्रजी पलटणासहीत मुसारेमू वगैरे सरदारांत मिळोन वंजरा नदी पार झाले. अलीजाह याशीं व मुसारेमू वगैरेशीं तफावत तीस कोसांची आहे. बरदापूर, रेणापूर, आवर्से, उदगीर, या तालुकियांत अलीजाह याचे फौजेची धुमधाम होऊन तालुका लुटून तारूततारा़ज झाला. हल्लीं सरदारही त्याच मार्गें पिच्छा करून चालले. तालुक्यांत एक गांव लुटीशिवाय मोकळा राहिला नाहीं. याप्रों बोभाट जागीरदार व आमीलांचे नबाबाकडे रोज येत आहेत. या प्रों तूर्तचें वर्तमान. पुढें होईल त्याची विनंति लिहिण्यांत येईल. रा छ ६ माहे राखर हे विज्ञापना.

---

[२२३] श्री. २० आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. आसद अल्लीखान यांनीं रुकमारड्डी व रामरड्डी वगैरे चौघे जमीनदार तांडूर, कोसगी, कोडगल, कुंदगळ येथील कौल देऊन आणिले. त्यास कैद करून हैदराबादेस समागमें घेऊन आले. हे जमीदार पेशजी अलीजाहबहादूर यांजकडे मिळाले होते, सबब हल्लीं, रुकमारड्डी व एक जमीदार या दोघांस तोफेचे तोंडीं देऊन उडविलें, व दोघे जमीदार ब्राह्मण यांचे शिरच्छेद करून शिर व धडें त्यांचे तालुक्यास पाठविलीं. सबब कीं वरकड जमीदार यांस दाब बसोन कोणी अलीजाह यांजकडे जाऊं नये. वेगळे असतील त्यानीं रुजूं व्हावें हें नबाबानीं मनांत आणून छ ३ राखरीं याप्रमाणें केलें. आसदअल्लीखान यांनीं समागमें तीन तोफा व बारुदचे पेटारे बारा आणिले होते ते जिनशींत दाखल करविले. खानमार तूर्त येथेंच आहेत. रा छ ६ माहे राखर. हे विज्ञापना.

---

[२२४] श्री. २० आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. सरकारी जाबसाल करार बमोजीब नबाबाकडून उगवणें येविषयीं नबाबानीं सांगितलें कीं तुह्मीं व राजानीं बसोन एकएक जाबसाल ठरवावा. त्यावरून छ २९ रावलीं नबाबाचे दिवाणखान्यांत नेमाप्रों आह्मीं जाऊन राजाजी रघोत्तमरावसुद्धां बैठक अस्तमानपर्यंत झाली. त्यांत सरकारचे तालुक्यापैकीं बरदापूर वगैरे वकलातीचे माविजा तालुका द्यावा. हे व सुभे बेदर येथील स्वराज्याचा अम्मल कराराप्रों सन १२०४ पावेतों कमावीसदारांच्या बाक्याचा फडच्या व सालबसाल माहलीं स्वराज्याचा अम्मल फसलीचे फसलींस परवानगीचा उजूर न करितां कैलासवासी माधवराव साहेब यांचे कारकीर्दीप्रों फडच्या करीत जाण्याविषयीं जागीरदार व आमील जमीदारास इनायतनामे द्यावे, व सुभे वराडचा कच्चे आकाराप्रों फैसला होत जावा. तसेंच औरंगाबादेपैकीं कितेक माहलीं अम्मल सुरळीत येत नाहीं, तो कच्चे वहिवाटीनें फैसला करीत जावा. इत्यादिक रकमा करारांतील याची भवति न भवति जाली. इनायतनामे यांचे मसविदे द्यावे, ह्मणजे नबाबास समजावून परवानगी घेऊं हें राजाजींचें बोलणें. त्यावरून बेदर, वराड व आदवनी व अवरंगाबाद हे तीन चार मसविदे कराराअन्वयें पारसी करून दिले. राजाजींशीं बोलिलों कीं तुह्मीं हजरतीस विचारून याचे जबाब सत्वर कळावे कीं त्याप्रों सरकारांत आह्मांस विनंति लिहून, मसोदेही पाठऊन, तेथून ठरून, खचित आज्ञा आल्यावर इनायतनामे त्याप्रों द्यावे, ऐसें जालें. मसविदे तीन चार दिवस राजे राजाजीस स्मरण देण्याचीही सूचना करविली कीं, मसविदे नबाबास दाखविले असतील, उत्तर काय जालें. आज उद्यां याप्रों टाळा देत आले. त्यास नबाबाची परवानगी तुह्मीं राजाजी बसोन ठरवावें, ऐशी जाली असतां, हालीवाल्या देतात याचें कारण काय? याचे बारिक रीतीनें शोध मनास आणितां समजण्यांत आलें कीं, यादवराव मोरेश्वर यांचा भाचा बाबाराव ह्मणोन पुण्यांत आहे. त्याचें पत्र सर बुलंदजंग यांचे मार्फतीनें नबाबाकडे आलें. त्यांत त्यानें लिहिलें कीं, हजूरचे व श्रीमं-

तात्रे सरकारचे जाबसाल काय आहेत त्याचा तपशील मजकडे लिहिला यात्रा, ह्मणजे येथें त्यांजकडून कलमांत कमदोष ठराव कोणे तऱ्हेचा व काय होऊन येतो हें ध्यानास आणावें, तोंपर्यंत इकडे आज उद्यां याप्रों दिवस चालवावे. त्याजकडून येण्यावर प्रतीक्षा. हें ध्यान दिसतें. यास्तव जाबसाल प्रकरणीं टाळावा व दिवसगत होत आहे असें वाटतें. बाबाराव यांनीं सरकारांत विनंति केली असल्यास काय असेल तें ध्यानांत आलेंच असेल. हें वर्तमान समजलें ह्मणून जाबसालाविषयीं टुमणी लावण्यास आह्मीं याशीं आळस करीतच नाहीं. जाबसाल कसे कसे करितात त्यावरून ध्यान समजेल तसें लिहिण्यांत येईल. रा छ ६ माहे राखर. हे विज्ञापना.

---

[२२५] श्री. २० अक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. कल्याणराव व बाबाराव यानीं पेशजी मुशीरुल्मुल्क याशीं कांहींच समजवावें आणि तिकडे कांहींच बोलावें. दरम्यानचे दरम्यान उगीच कारभार पिकवून नाद लाविले. त्यांत परिणाम कोणताही येक नाहीं. मधल्यामधीं मनास येईल तशा गप्पा मारून मीरवले. त्यांचेंच भावंड हल्लीं हे बाबाराव यांस लिहून नाद लावितात. सरकारचे जाबसाल रस्त्यानें व मार्गाचे वळणानें व्हावयाचे तसेच होतील. परंतु अशाच्या नादानें जीं कामें सध्या व्हावयाचीं त्याविषयीं दुराशा मनांत घेऊन एक एक दिवस ढकलणें व टाळाटाळ इतका प्रकार मात्र होतो. होणें तें यथामार्गें करूनच व्हावयाचें समयीं होईल. मनांत आल्याची विनंति असे. ता छ ६ राखर. हे विज्ञापना.

छ ९ राखर मुा भागानगर रवाना टप्यावर.

[२२६] श्री. २३ आक्टोबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीः—

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साां नमस्कार विनंति विज्ञापना. ताा छ ९ माहे राखरपर्यंत मुा भागानगर येथें स्वामीचे

कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीज्याह बहादूर धारूरचा घाट उतरून गेले. या प्रकरणीं नबाबाकडील निरोप आल्याप्रों विनंति. त्यांजकडील खरीतापत्रसहित रवानगी. वर्तमानाची विनंति अलाहिदा पत्रीं सेवेशीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[२२७] श्री. २३ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. नबाबानीं रघोत्तमराव यांजबरोबर सांगोन पाठविलें कीं अलीज्याह धारूरचा घाट उतरून गेले. त्यास श्रीमंतांकडील तालुकदार व आबाजी कृष्ण या कामावर मुकदर असोन कोणीही मुजाहीमत त्यास न जाले, व इकडील सरदार व फौज यांशीं सामीलही जाले नाहींत. त्यास अलीज्याह फौजसमवेत घाट उतरून श्रीमंताकडील तालुकियांतून जात आहे. त्याचे ताकुबावर इकडील सरदार जमीयतसुद्धां आहेत. तेही पिच्छा करून मागोमाग त्याच मार्गानें जातील. तेव्हां तालुकियाचा तसनस. यास्तव तुह्मीं श्रीमंताकडे लिहून त्यांच्या ताकिदा तालुकदार वगैरेस पोंहचाव्या कीं अलीज्याह फौजसुद्धां जात आहे, त्यास दरम्यान आडवें होऊन गाठावें, दस्तगीर करून इकडील सरदार यांचे स्वाधीन त्याजला करावें, याप्रमाणें लिहावें. आह्मींही श्रीमंतांस पत्र तयार केलें, हेंही रवाना करावें. याप्रमाणें निरोप सांगोन खरीता नबाबाकडील सरकारचे नांवें दिला तो सेवेशीं रवाना केला आहे. अवलोकनें पत्रान्वयें मार ध्यानांत येईल. राजश्री नानाचे नांवाचेही पत्र आहे. रा छ ९ माहे राखर हे विज्ञापना.

छ मजकुरीं नबाब निजाम अलीखांबहादुर यांणीं श्रीमंतांस खरीतापत्र दिलें व नाना व गोविंदराव भगवंत यांचे नांवें इनायतनामे दिल्हे. ते रवाना केले. श्रीमंताचे पत्राचा मसविदा पारशी.

(पारशी पत्र)

नाना व गोविंदराव भगवंत यांचे नांवें सदरहू मजकुराअन्वयें इनायतनोंम दोन याचे आलकाब पारशी.

(पारशी)

---

[२२८] श्री. २३ आक्टोबर १७९९.

विज्ञापना ऐसीजे. राजश्री रघोत्तमराव बोलिले कीं अलीज्याह प्रकरणीं मीरअलम यांचें बोलणें जालें त्याप्रमाणें आपण सूचना लिहिलीच असेल. त्या संकेतावर त्यांनीं हल्लीं नबाबास अर्जी लिहिली आहे जेः— अलीज्याह धारूरचा घाट उतरून गेले. त्याचे पाठीमागें जावें. आह्मीं परंतु पंतप्रधान यांचा तालुका पुढें लागतो. त्यांची तसनस आमचे फौजेमुळें होईल. ते काय ह्मणतील न कळे, याजकरितां अंदेषा आहे. ह्मणोन हुजूरचे परवानगीचा उजूर केला. हुकूम येईल तसें करण्यांत येईल. त्या अर्जीचा जबाब मीरअलम यास जावयाचा ठरला आहे कीं आह्मीं पंत प्रधान यांस इतल्ला लिहून पाठवितों, तुह्मीं ताकुब करून जावें. या मनसुब्यावर हल्लीं श्रीमंतांस नबाबांनीं पत्रें लिहून दिलीं आहेत. त्यास दोस्तीचे आलमांत नबाबाचे दौलतीचा बंदोबस्त राहून अलीज्याह याचा बचाव होणें असें श्रीमंतांचे मनांत आहे. ह्मणून नबाबास पेशजी सरकारचें पत्र आलें. त्यापक्षीं मीरअलम यास पत्र जावें जे, तुह्मी फौजमुद्धां सरकार तालुकियांत आलियास पायमाली होईल, आह्मीं अलीज्याहप्रकरणीं नबाबास लिहिलें त्याचें उत्तर आलें नाहीं, उत्तर आलियावर त्याचा विचार. दौलतखाहीचे मार्गें आह्मीं ह्मणतों तशी तोड काढून कजीया मिटवावा, फंद तोडावा, यांत तालुकियाची खराबी आणि फौजेचा खिसारा बेमुबलग होतो, तो तरी कां करावा, थोडकियांत बंदोबस्त होत असतां तुल करून खिसारा वाढवावा हें सल्लाह नाहीं, असें त्यांस पत्र जावें, ह्मणजे तोडीस लागे येईल. नबाबास श्रीमंताचे

जाब हल्लींचे पत्राचे तरकिबीनें दोस्तीचे अलमांत घराऊ मसलहत दौलतखाहीनें लिहिलें ह्मणून यावें. ह्मणजे नबाब समजत समजत समजतील. श्रीमंतांशिवाय नबाबापाशीं अलीज्याहची रदबदल कोणी करावी अशी ताकद नाहीं. अलीज्याह यांचा बचाव करण्याची मर्जी असल्यास ही तोड आहे. सत्रावे रावलचे रवानगींत तपशील लिहिला त्याजवरून ध्यानांत आलेंच असेल. आज्ञा येईल त्या धोरणानें करावयासी येईल. रा। छ ९ राखर हे विज्ञापना.

---

[२२९] श्री. २३ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. अलीज्याह बहादर जमीयतसुद्धां धारूरचा घाट उतरून मौजे पिंपळनेर पो। बीड येथें गेले. तेथून कुच करून गंगातीरास शाहूगडानजीक पोंहचल्याचें वर्तमान आलें. दुसरें वर्तमान कीं, सदाशिव रड्डी याजपासून अलाहिदा होऊन पिंपळनेरीं राहिला. याचें कारण सदाशिव रड्डी याचें सूत्र इसामिया याचे विद्यमानें नबाबाकडे परभारा लागलें. हें वर्तमान अलीज्याहा यांस समजल्यानंतर रड्डीमजकूर याचा संशय त्यांचे मनांत येऊन बेबनाव जाला. अलाहिदा राजकारण सदाशिव रड्डीकडून लागलें. तेंव्हा त्यास आपलेजवळ ठेवण्यांत त्याचा इतबार व भरंवसा कोणे गोष्टीचा, हे समजोन सदाशिव रड्डीस सांगितलें कीं तूं आमचे समागमें असण्याचें कारण नाहीं. याप्रों होऊन सदाशिव रड्डी यास बराबर न घेतां कुच करून अलीज्याह जमीयत व सरदार गालबजंग, नाजमनूमुलुकवगैरे सुद्धां गंगातीरा पर्यंत गेले, ऐसें वर्तमान आहे. सदाशिव रड्डी अलाहिदा राहिल्याचें तहकिक किंवा वाही वर्तमान हें खचित समजल्यावर मागाहून विनंति लिहिण्यांत येईल. रड्डीमजकूर यांचें सूत्र इकडे, सबब याप्रों जालें असेलसें वाटलें. खरें लटकें मागाहून पक्का शोध वर्तमान आल्यावर लिहिण्यांत येईल. रड्डीचें सूत्र इसामियाचे विद्यमानें खरें, त्यावरून वेगळा झाला असेल याचा संभव होतो. रा। छ ९ माहे राखर. हे विज्ञापना.

[२३०] श्री. २३ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. अजमुलउमरा यांचे निसबतीस पागा होती. त्या पागेची घोडियांस दाणाचारा वगैरेचा बोभाट पडूं लागला. पागेची यहतीयात नाहीं. सबब पागेची मोजदाद गल्ला व चारा वगैरे पहाण्याचें काम इमतीयातुदौला, कयामनूमुलुक यांस नबाबानीं सांगितलें. सुरज वंत वगैरे दफ्तरदार यास चंदी, खुराकी व बारगिरांचे दरमाह वगैरे हिसेब इमतीयाजुदौला यांस समजावणें ऐशी आज्ञा झाली. त्याप्रों कयामनूमुलुक पागेची चौकशी करावयास लागले आहेत. रा छ ९ माहे राखर. हे विज्ञापना.

छ १२ माहे राखर मुा भागानगर, रवाना टप्यावरून.

[२३१] श्री. २६ आक्टोबर १७९५.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेशीं:—

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ताा छ १२ माहे राखरपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ ९ रोजीं नबाबाकडे दसरा सबब गेलों. बोलणें झालें. याचा तपशील वगैरे वर्तमानाची विनंति अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिली आहे. अवलोकनें मजकूर ध्यानांत येईल. उत्तरें रवाना व्हावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ. सेवेशीं श्रुत होय. हें विज्ञापना.

[२३२] श्री. २६ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. छ ९ माहे राखर शुक्रवार विजयादशमीचे दिवशीं रात्रीं नबाबाकडे दरबारास गेलों. रोषन महालाचे सहजामध्यें चांदणीचा फर्ष होऊन बरामद जाले. नफरुदौला व रावरंभा व मुनषी व राजाजी वगैरे दरबारी इसमें होतीं. दसऱ्याच्या नजरा लोकांच्या होत होत्या. आह्मीं जातांच सलाम होऊन जवळ बसावयास सांगितलें. बोलणें झालें, त्याचा तपशील अलाहिदा पुरवणी पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानांत येईल. रा छ १२ माहे राखर. हे विज्ञापना.

[२३३] श्री. २६ आक्टोबर १७९५.

विनंति विज्ञापना. दसऱ्याचे दिवशीं नबाबाकडे दरबारास गेलों. तेसमयीं प्रथम नबाबाचे बोलण्यांत आलें कीं, इंग्रजी पलटणें येथून रवाना केलीं तीं रेणापूरचे जिल्ह्यांत आहेत, त्यास पलटणांचें तेथें प्रयोजन नाहीं, यास्तव इकडे आणावीं ऐसा विचार आहे, ह्मणून बोलिले. मीं विचारिलें कीं इंग्रजी पलटणें कामावर तेथें असतां इकडे बोलावण्याचें काय कारण? याजवर बोलिले कीं तिकडे आपला तालुका बहुत आहे, इंग्रजी लोकांस तालुका बहुत दृष्टीस पडणें हें सलाह नाहीं, यास्तव पुढें त्यांचें जाणें न होतां त्यांस इकडे बोलवावें, वरकड सरदार जमीयत आहेच असें बोलिले. त्यास मनास हें बोलणें ठसलें नाहीं. येथपर्यंत पलटणें आलीं तेव्हां मुलुक पहातच आले कीं नाहीं? पहिल्यानें हा विचार केला नाहीं. आतां या विचाराचें प्रयोजन काय? याजवर मनांत कल्पना आली जे, पुढें सरकारचा तालुका आहे, याजकरितां इंग्रजानें दिकत केली असेल कीं पंत प्रधान यांचे तालुकियांत आह्मी जाणार नाहीं ही गोष्ट आह्मांशीं बोलतां येत नाहीं. यास्तव त्यास बाहाणा दुसरा लावून बोलले. तिकडील कार्यावर उपयोग नाहीं. तेव्हां तेथें असून फळ काय? याजकरितां इकडे बोलावून ध्यावीं हा विचार केला. आह्मांस कळविलें पाहिजे याजकरितां एका तकरीबीनें बोलले. प्रस्तुत इंग्रजी पलटणें आणविलीं नाहींत. तेथेंच मुक्कामात करून असावें असें सांगून पाठविलें. सरकारचे तालुकियांत फौजा गेलियावर तसनस होईल यास्तव इतल्ला देण्याकरितां पेशजी पत्रें नबाबांनीं दिलीं तीं पाठविलीं आहेत व हल्लीं राजश्री नानास लिहावयासी नबाबांनीं सांगितलें त्याप्रमाणें लिहिलें आहे. श्रवण करवितील त्याजवरून ध्यानांत येईल. परवानगी जाहलीयावर फौजा सरकार तालुकियांत अलीज्याह यांचे पाठलागास पाठवितील. इंग्रजांनीं दिकत केलियास आह्मांस ह्मणतील कीं परवानगी श्रीमंतांची जाली आहे असें तुह्मीं सांगावें. तेव्हां सांगावें लागेल. नंतर इंग्रजी पलटणें सरकार तालु-

कियांत जातील असें वाटतें. याचा विचार होऊन आज्ञा येईल त्याप्रमाणें नबाबाशीं बोलण्यांत येईल. रा छ १२ माहे राखर हे विज्ञापना.

---

[२३४] श्री. २६ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. अलीज्याह धारूरचा घाट उतरून गेले. इकडील जमीयत स्वार पयेदळ इंग्रजी पलटणेंसुद्धां रेणापूरचे मैदानांत आहेत. पुढें पिच्छा करून जावें तर राव पंतप्रधान यांचा तालुका तसनस होईल, यास्तव आहेत त्या जागीं तूर्त वाकफड जाला. राव पंतप्रधान यांजकडील सरदार व तालुकदारांनीं आडवें होऊन माहसरा करावा हें मरातब तुह्मांस लिहावयास सांगितलें, करितां पत्र दिल्हें तें रवाना केलेंच असेल. दोहीं दौलतींची दोस्ती व एकवाक्यता. तेव्हां प्रसंगास जिकडील उणीव तिकडील पुरवणी करावी हा तर्फेनचा शिलशिला चालत आला. सांप्रत प्रसंगीं हा मझेला दूर व्हावा हें सलाह तिकडे आहे. मदारुल्महम त्या सरकारचे दौलतखाह. तसेंच इकडील दौलतखाही त्याजकडेच आहे. हल्लीं मदारुल्महाम यांस पत्र देतों, त्यांत तुमचे लिहिण्यावर हवाला घालून लिहिण्यांत येत आहे. तुह्मीं सर्व प्रकार तपशिलें लिहून जबाबास जबाब जलद येत ऐसें करावें ह्मणून नबाबाचें सांगण्यांत आलें. राजश्री नाना यांचे नांवें पत्र तयार करवून दिलें, व सांगितल्या अन्वयें तपशील त्यांचे पत्रीं लिहिला आहे, त्यावरून ध्यानांत येईल. रा छ १२ राखर. हे विज्ञापना.

---

[२३५] श्री. २६ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. मीर अलम बहादूर कोणे जागीं आहेत ह्मणून नबाबास विचारिलें. सांगितलें कीं रेणापूर येथें पलटणें वगैरे जमीयतसुद्धां आहेत. अलीज्याह धारूरचा घाट उतरून पिंपळनेर तालुके बीड येथें आहे. सदाशिव रड्डी चोरआंबेघाटानजीक येथें आहे. मलकइसा कोणें ठिकाणीं ह्मणून विचारिलें. उत्तर जालें कीं त्याचें कांहीं

समजलें नाहीं. अलीज्याह यांचे लष्करांत पावल्याचें वर्तमान आलें नाहीं. याप्रमाणें बोलिले. रा छ १२ माहे राखर. हे विज्ञापना.

---

[२३६] श्री.

विनंति विज्ञापना. अलीज्याह बहादूर धारूरचा घाट उतरून पिंपळनेर प्रांत बीड तालुके सरवरजंग येथें गेले, याप्रमाणें एक वर्तमान. दुसरें, पिंपळनेराहून कुच करून शाहगडानजीक गंगातीरीं दाखल जाल्याचें वर्तमान. अवरंगाबाद नजीक, सबब तेथील शहरचे तमाम लोक यांची चीजबस्त असबा व लांबवालांबव करून सडेजरा रहातात. याप्रमाणें अवरंगाबाद. येथील अखबारी वर्तमान आहे. बाहलोलखान सुभे यांच्या अर्जीही येतच आहेत. सदाशिव रड्डी घाटानजीक चोरआंबें येथें आपले जमीयतसुद्धां अलाहिदा उठून होता. इसामीयाचें त्याचें बोलणें होत होतें. हे एक खबर सांप्रत ऐकण्यांत कीं सदाशिव रड्डी इसामीयास समागमें घेऊन अलीज्याह ह्याशीं गेला. याप्रमाणें नित्य नवें एक एक वर्तमान येतें. तहकीक मागाहून समजेल त्याप्रमाणें विनंति लिहिण्यांत येईल. रा छ १२ माहे राखर. हे विज्ञापना.

---

[२३७] श्री. २६ आक्टोबर १७९९.

विनंति विज्ञापना. चेनापट्टणाहून व्यंकटराम पिला याजकडून दोन अखबारा आल्या. त्या पाठविल्या आहेत. त्यावरून ध्यानांत येईल. त्यांत महमद अल्लीखान वालाज्याह यांचा इंतकाल छ २७ माहे रबिलावलीं जाल्याचें वर्तमान आहे. रा छ १२ माहे रबिलाखर. हे विज्ञापना.

छ रबिलाखर मु॥ भागानगर
रवाना टप्यावर.

[२३८] श्री.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेशीः—

विनंति. सेवक गोविंदराव कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १६ माहे रबिलाखरपर्यंत मु॥ भागानगर येथें स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पागावाले अजमखान व घासीमिया वगैरे यांस इंग्रजी पलटणेंसुद्धां बोलावून घ्यावें, असदअल्लीखान यांची रवानगी त्या कार्यावर करावी, मीर अलम यांस पुण्यास पाठवावें, ऐसा ठराव जाला. याचा तपशीलवार मजकूर अलाहिदा पुरवणीपत्रावरून ध्यानांत येईल. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

---

[२३९] श्री.

विज्ञापना ऐसीजे:—अलीज्याह धारूरचा घाट उतरून शहागडाकडे गेले. जाबसालाचा नाद लावला. यामुळें सरदार फौजसुद्धां घाटावर राहिले. पाटलाग केला नाहीं. इंग्रजी पलटणें यांचें ह्मणणें, आह्मीं पंतप्रधान यांचे तालुकियांत जाणार नाहीं. याजमुळें नवाबाची मर्जी खपा, ही संधि असद् अल्लीखान यांनीं पाहून दरबारांत मनस्वी भाषण, उच्चारूं नये ऐसें वाक्य मीरअलम व पागावाले यांस बोलून, नवाबास अर्ज केला कीं, यांच्यानें काय व्हावयाचें, गुलामास आज्ञा केलियास पाठलाग करून अलीज्याह यांस धरूनच आणीन, एवढी चाकरी तर माझी पहावी. याप्रमाणें गप्पा झोंकल्या. मर्जी खुष व्हावी ऐसें बोललें ह्मणजे तो चांगला. परिणाम कसाहि असो. हें येथील ध्यान आहे. असद् अल्लीखान यांचें बोलणें गोड वाटून पागावगैरे सर्वांवर राग. या सर्वांस इंग्रजी पलटणेंसुद्धां बोलावून रायचुराकडे पाठवावें. असदअल्लीखान व मुसारेमू, दिलदारखान, सरबुलंदजंग याजकडील यांस अलीज्याह यांजकडे पाठलाग करावयासी पाठवावें. मीरअलम यासी व अल्लीखान यासी बेबनाव, तेव्हां तेहि तेथें कामाचे नाहींत.

त्यांस पुण्यास पाठवावें. तिकडील जाबसालहि ठरला पाहिजे. याप्रमाणें निश्चय होऊन, नवाबानीं राजश्री रघोत्तमराव यांजबरोबर सांगून पाठविलें तो मजकूर अलाहिदा लिहिला आहे, त्याजवरून ध्यानास येईल. रा छ १६ रबिलाखर. हे विज्ञापना.

---

[२४०] श्री.

विज्ञापना ऐसीजे:—राजश्री रघोत्तमराव यांस नवाबांनीं पाठविलें. त्यांनीं नवाबाचा निरोप सांगितला कीं, इंग्रजी पलटणें व पागावाले या जमयतीस बोलावून रायचूरचे बंदोबस्तासाठीं पाठवावयाचें, असद-अलीखान यांची व मुसारेमूची जमीयत अलीज्याह यांचे पाठलागास जावी, याप्रमाणें ठरलें, त्यास आपण व असदअलीखान मिळोन रेणा-पूरपर्यंत जावें. तेथून मुसारेमू व असदअलीखान पुढें जातील. मीर आलम बहादूर यांस घेऊन तुह्मीं श्रीमंतांकडे जावें, यास दिवसगत लागूं नये. आपली तयारी करावी, याचें उत्तर लवकर कळावें. या-प्रमाणें मशारनिले यांनीं बयान करून सांगितलें. याचें उत्तर त्यांज-बरोबर सांगून पाठविलें कीं, आज्ञेस उजूर नाहीं, मीर आलम यास बोलावून आणावें, त्यांची आमची एकवाक्यता करावी, कितेक निश्चयांचे पर्याय त्यांस व आह्मांस समक्ष सांगावे, ह्मणजे मीर आलम दिक्कत घेणार नाहींत, नाहीं तर थोडक्यासाठीं दिक्कती घेऊं लागतील, थोरल्या कामास दिक्कतीखालें लांबणीवर पडावें हा सलाह नाहीं, त्यांसही कांहीं निश्चय पुसून घ्यावयाचे असतील त्याचा अर्ज करतील, सलाहनेक असेल त्याची आपण आज्ञा करावी, हें होत आहे तोंपावेतों मी श्रीमंतास लिहून आज्ञा आणवितों, मग निरोप घेऊन जाईन. याप्रमाणें रघोत्तमराव जाऊन नवाबाशीं बोलिले. त्याजवर मागती मशारनिले याजबराबर सांगून पाठविलें कीं, मीर आलम यांस येथें बोलावून मंतर रवानगी पडेल, अथवा तुमचा जाब श्रीमंतांकडून येणें यास दिवसगत लागेल. तुह्मीं ते पुण्यास जाऊन, बोलणें होऊन, जाबसाल होणें.

नंतर श्रीमंतांच्या आमच्या भेटी. यास लांबण पडेल. उष्णकाळ हंगाम होतो. याजकरितां लांबणीवर तुह्मीं टाकूं नये. तुह्मीं जाबाची इंतजारी केलीत तर दिवस मात्र लागतील, या ह्मणोन उत्तर येईल, कदाचित् येण्याचें कारण नाहीं, तेथेंच निश्चय ठरवून आह्मीं लिहूं तेव्हां यावें, ऐसें श्रीमंतांनीं तुह्मांस लिहिलें असतां, आमची समजूत पडणार नाहीं. तुह्मीं, मीर अलम जाऊन ठराव केलियाखेरीज कांहींच व्हावयाचें नाहीं. शेवटीं जाणेंच लागेल. आतां आह्मीं जावयासी सांगितलें असतां गेला नाहीं. लांबणीवर तुह्मीं टाकिलें, एवढा मात्र शब्द राहील. याजकरितां जाब येण्याची प्रतीक्षा करूं नये. मीर अलम यांस येथें बोलावण्याचें प्रयोजन नाहीं. ते माहीत आहेत. रघोत्तमराव तुमचेबरोबरच आहेत. हे वाकीफ जातेवेळेस तुह्मांसी सर्व बोलण्यांत येईल. आतां लांबणीवर टाकणें दौलतखाहीस लाजम नाहीं. आह्मीं आग्रहानें जा ह्मणतों, तेव्हां श्रीमंतही तुह्मांवर शब्द ठेवणार नाहींत. याप्रमाणें तकरार करून सांगून पाठविलें. परवानगी आलियाशिवाय जात नाही ऐसें ह्मणावें, तर बेगर्जी होते. बेमर्जी जाली तर होऊ, परंतु परवानगी आलियाशिवाय जावयाचें मान्य करूं नये. यांत कांहीं सरकारकिफायत आहे ऐसें असलियास नीट. यांचे मर्जीशीं दरकार नाहीं, तोही प्रकार दिसत नाहीं. यांचे मनांत असें आलें आहे कीं, श्रीमंतांशीं रदबदल केली असतां मान्य करतील. तो विधि स्वामीजवळ बयान करावा, आज्ञा होईल त्याप्रमाणें सांगावें, हें जालियाविगळ भाग उठत नाहीं. तेव्हां नवाबाची बेमर्जी करून न यावें, यांत सरकार किफायतीचेंही कांहीं दृष्टीस पडेना. मग यांची उगीच बेमर्जी करणें यांत सलाह न पाहिली. सांगून पाठविलें कीं, खाविंदी आणि तावेदारीचा प्रकार, जसे श्रीमंत तसेच आपण, उभय दौलतीस नेक, आणि मजवर इलजाम नाहीं ऐसें समजोन आज्ञा होईल त्यास हजर. याप्रमाणें सांगून पाठविलें. नंतर जबाब आला जे, आह्मीं समजोन सांगतों, विलंब न करतां लवकर दो चहूं दिवसांत निरावयाचें करावें, हीच सलाह. किस्तीशिवाय कलमांचे फडचे व्हावयाचे ते

अद्याप जाले नाहींत. राजाजीस सांगोन करून देवावे ह्मणजे लवकरच रुकसत घेईन, ऐसे रघोत्तमराव यांस बोलावयासी सांगितलें. त्याजवरून राजे रेणूराव यांस आज्ञा जाली कीं, कामें उलगडून द्यावीं. त्यास वास्तव रवानगी आज्ञा रेणूराव यास केली असेल त्याप्रमाणें तेही जाबसाल उलगडतील. काय कामें करून देतील तीं करून घेऊन, मीर अलम यांस घेऊन, सेवेसी येतों. रा॥ छ १६ रबिलाखर. हे विज्ञापना.

---

[२४१] श्री.

विज्ञापना ऐसीजे. येथील क्षणिक कारभार. घटकेंत मनसुबे फिरतात, पूर्वीं एक वेळ रवानगी करण्याची मोठी जलदी. दुसरे दिवशीं निचावें येथपर्यंत आलें. मुहूर्त पहाण्याची देखील फुरसत नाहीं! ऐशी निकड! वेळ गेली ह्मणजे आणखीच विचार. वास्तव रघोत्तमराव यांस ह्मटलें, एक दोन वेळ हेंच बोलून नंतर निश्चय होईल तो सांगावा, ह्मणजे श्रीमंतांस लिहून पाठवीन. दोन दिवस घाटाघाट होऊन मीरअलम यांसही नबाबांनीं लिहून पाठविलें कीं, असदअलीखान व मुसारेमू अलीज्याहचे ताकुबावर जातील, इंग्रजी पलटणें व पागावाले यांनीं इकडे यावें, गोविंदराव कृष्ण यांची रवानगी लवकर करतो, हे तुह्मापांशीं येतील, तुह्मीं ते मिळोन पुण्यास जावें. हें खचित मीर अलम यास लिहिलें गेलें. आतां श्रीमंतास आपण लिहावें ऐसें गशारनिल्हे यांचे सांगण्यांत खचित आलें. तेव्हां स्वामीकडे लिहून पाठविलें. आठ दिवसाआंत येथून निघणें होईल. रा॥ छ १६ रबिलाखर. हे विज्ञापना.

शालिवाहन शके १७१७ आश्विन शुद्ध १५ मंगळवार प्रथम घटिकारात्रीं माधवराव नारायण पंतप्रधान कैलासवासी जाले. सोळावे रबिलाखरपर्यंत पत्रांची रवानगी केली. छ १९ तेरखेस पुण्यानें पत्र येथें पोहोंचलें. त्यांत लिहिलें आहे जे:—छ ११ माहे रबिलाखर आश्विन शुद्ध १२ रविवार शके १७१७ राक्षसनाम संवत्सर सन फसली १२०५

सीत तिसैन ते दिवशीं श्रीमंतांस ज्वरांशांत वायू जाहला होता. प्रातः-काळीं, गणपतीचे दिवानखान्यावर रंगमहाल आहे, तेथें निद्रेचें स्थान, तेथें गेले. पलंगावर बसले होते. वायूचे भिरडींत काय मनास वाटलें न कळे, पलंगावरून उठोन दक्षणेकडील खिडकींत उभे राहिले. खिज-मतगार यानें शालेस हात घातला कीं, येथें उभें रहाणें ठीक नाहीं. तों एकाएकींच येथून उडी टाकिली. खालीं दीड भाला खोल कारंजी हौद आहे, तेथें कांठावर पडून आंत पडले. उजवी मांडी मोडून हाड बाहेर निघालें. दांताची कवळी पडली. नाकावाटें रक्त निघालें. तेथून उचलून राजश्री नानांनीं ऐनेमहालांत नेलें. तबीब आणून, हाड बसवून टाके देऊन शेक केला. चहूं घटकेनंतर शुद्धीवर येऊन डोळे उघडले. वायूचा प्रकोप होताच, कांहीं सावध होऊन बोलत; कांहीं वेळ भ्रंश होऊन बोलत. छ १३ रबिलाखर आश्विन शुद्ध १४ सात घटिकानंतर पौर्णिमा मंगळवार ते दिवशीं प्रथम घटिका रात्रीं माधवराव नारायण पंतप्रधान कैलासवासी जाले, ह्मणोन बाळाजी रघुनाथ व केशवराव कोंडाजी यांचें पत्र आलें. शालिवाहनशके १६९६ जयनामसंवत्सर अधिक वैशाखमास शुद्ध ७ मुा पुरंदर येथें जन्म जाहला होता. शके १७१७ आश्विन शुद्ध १४ सह पौर्णिमासमेत बेविसावे वर्षी कैलासवासी जाले. या तारिखेपासून पत्रें लिहिणें बंद. येणेंप्रमाणें मुा हैदराबाद येथें वर्तमान आलें. हे करार.

समाप्त.